सेवावर्धिनी

# सेवा तरंग 2.0

# सेवा वार्ता

अंक १

२०२३-२४

सेवावर्धिनी
नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम", राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०
कार्यालय: "चंदन" २६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ उद्योगवर्धिनी

२.२ माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान

३. संस्था संचालन - प्रकल्प प्रस्ताव लेखन

४ . ओळख सेवावार्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची - जलदूत

५. सेवाव्रती

६. सेवावार्ता

# मनोगत

सेवा वार्ताचा पहिला अंक आपल्याला सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. सेवावर्धिनीच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या सेवातरंग उपक्रमास आपल्या सारख्या सेवाभावी संस्थांचा उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमादरम्यान संस्थांना अद्ययावत माहिती व प्रशिक्षण असण्याची निकड लक्षात आली. यासाठी सेवातरंग 2.0 अंतर्गत आम्ही सेवा वार्ता या द्वैमासिकाचा शुभारंभ आज विजयादशमीच्या मुहुर्तावर करत आहोत. प्रत्येक अंकात सेवासंस्थेच्या कार्याविषयी एक लेख, विशेष सेवाकार्य केलेल्या संस्थांची आणि त्यांच्या कार्याची माहिती, जगात इतरत्र चालू असलेल्या एखाद्या विशेष उपक्रमाची माहिती तसेच सेवा वार्ता इत्यादीचा समावेश असेल.

आपल्या येणाऱ्या सूचनांचे स्वागत आहे. त्यायोगे आम्हाला सेवा वार्ता व प्रशिक्षण या दोन्ही मधे आवश्यक बदल तसेच संस्थांना अपेक्षित असलेले विषय समाविष्ट करता येतील.

सेवातरंग–2.0 अंतर्गत आम्ही एकंदर दोन उपक्रम योजिले आहेत. पहिला उपक्रम, वर उल्लेख केल्याप्रमाणे या सेवा वार्ताचा आणि दुसरा आभासी (online) प्रशिक्षणाचा. हे दोन्ही उपक्रम एकमेकांशी पुरक असतील. यावेळेस आपण प्रकल्प प्रस्ताव लेखनाबद्दल माहिती दिली आहे. त्यावर आपल्याला काही शंका असल्यास किंवा अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास आम्हाला ईमेल द्वारा कळवावे.यासाठीचा इमेल, प्रकल्प प्रस्ताव लेखन च्या शेवटी दिलेला आहे.त्याचे निराकरण पुढील महिन्यात २८ तारखेला होणाऱ्या प्रशिक्षणात केले जाईल व महत्वाचे प्रश्न पुढील अंकात समविष्ट केले जातील. याच पद्धतीने एकंदर सहा विषयांचे चिंतन आणि अभ्यास पुढील बारा महिन्यात होईल.

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

आज आम्ही आपल्याला सोलापूर जिल्ह्यातील 'उद्योगवर्धिनी'या सामाजिक संस्थेच्या कार्याची ओळख करून देत आहोत. गेल्या ३० वर्षांमध्ये महिलांच्या रोजगाराबाबत भरीव काम करुन सुमारे १०,००० बचत गटांच्या माध्यमातून हजारो स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रवृत्त करुन त्यायोगे कुटुंबाची आणि समाजाची उन्नती करण्याचे काम अतिशय सेवाभावनेने उद्योगवर्धिनी करीत आहे. अशा प्रकारच्या संस्थेच्या प्रेरणादायक कामापासून आपल्याला नवीन उर्जा मिळेल.

## २.१ उद्योगवर्धिनी

उद्योगवर्धिनीचे काम १९९३ साली सुरु झाले. सोलापूर येथे आठ-दहा मैत्रिणींनी एकत्र येऊन आरंभलेले छोटेखानी काम होते. पाहता पाहता, त्यांचा पसारा वाढत गेला. तेव्हा संस्थेची नोंदणी २००४ साली केली गेली. उद्योगवर्धिनी हे नाव उद्योगाशी जरी जोडलेले असले तरी संस्थेचा मूळ उद्देश उद्योगिनी निर्माण करणे हा आहे. संस्थेने सामाजिक जाणिवेतून काही उपक्रम सुरु केले आहेत.

'उद्योगवर्धिनी'चे कार्य तीन पदरी चालते. अन्नपूर्णा, टेलरिंग आणि ट्रेनिंग. अन्नपूर्णा विभाग, भोजन व्यवस्थेची काळजी घेतो. टेलरिंग विभाग वस्त्रप्रावरण क्षेत्रात कार्य करतो आणि ट्रेनिंग म्हणजे लघु उद्योजिकाना पाहिजे तसे ट्रेनिंग उपलब्ध करुन देणे. पण गंमत बघा, 'उद्योगवर्धिनी' स्वत: त्यातील कोणतीही कामे करत नाही. ती महिलांच्या बचत गटांकडून करवून घेतली जातात. एक आहे की,'उद्योगवर्धिनी' मार्फत बचत गटांना मोफत प्रशिक्षण दिले जाते आणि त्या-त्या कामाशी जोडले जाते. उदाहरणार्थ, एखादा बचत गट शेंगांची चटणी बनवणार असेल तर त्यांना फक्त ते बनवण्यास लावायचे आणि मग ऑर्डरनुसार त्यांच्याकडे कामे येत राहतात. उद्योगवर्धिनीने या तऱ्हेने जवळपास दहा हजार बचतगटांना प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योगाच्या दिशेने नेले आहे. त्याच्याशी संलग्न तेथील स्त्री ती आहे त्याच ठिकाणी राहून स्वतःचे काहीतरी सुरु करावे आणि सक्षम व्हावे असे काम उद्योगवर्धिनीकडून सुरु आहे.





**अन्नपूर्णा विभागात दोन योजना कार्यरत आहेत–**

पहिली अन्नपूर्णा योजना आणि दुसरी सरस्वती योजना. ना नफा ना तोटा तत्त्वावर या योजनेचे काम चालते. रोटरी क्लबचे सहकार्य या योजनेस आहे. योजनेत शंभर वृद्धांसाठी जेवण बनवले जाते. परिसरातील शंभर गरजू वृद्धांना दोन वेळच्या जेवणाचे डबे दिले जातात. संस्थेने त्याकरता दोन रिक्षा कायम ठरवलेल्या आहेत. सरस्वती योजनेच्या माध्यमातून सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी विनामूल्य पोळीभाजी देण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे आहे. जैन समाजाकडून भुकेलेल्यांना गरम पोळीभाजी देण्याचे काम जैन रोटीघरच्या माध्यमातून चालते. जैन समाजाने ते काम उद्योगवर्धिनीकडे २०१२ साली सोपवले. शालेय पोषण आहारातून चार शाळांना (जवळपास दोन हजार विद्यार्थी) त्यांच्या नियोजित वेळेत पोषण आहार पोहोचवला जातो. या सगळ्या कामांमुळे अन्नपूर्णा विभागाला बाहेरुन जेवण बनवण्याच्या ऑर्डर्स मिळत असतात. जसजशा ऑर्डर वाढत गेल्या तसतसे बचतगटांना जोडून घेऊन, त्यांना प्रशिक्षण देऊन ती जादा कामे त्यांच्याकडे सोपवली जातात.



दरवर्षी संस्थेकडे फराळाची मागणी खूप असते. ऑर्डर येतात तसतसे पदार्थ बनवले जातात. त्या व्यतिरिक्त भाजणीची चकली, धपाटे, ज्वारीची कडक भाकरी (नव्वद दिवस टिकेल अशी), शेंगांची चटणी, काळा मसाला, तांदूळ पापड, कुरडई, शेवया, सांडगे, भरली मिरची, राजगिरा लाडू, शेंगांच्या पोळ्या, तिळगुळ हे पदार्थही बनवले जातात. 'उद्योगवर्धिनी'च्या स्टोअरमध्ये ते पदार्थ असतात. किचनमधील वातावरण मनमोकळे असते. दुसऱ्या दिवशीचा किंवा पुढील आठवड्यातील जेवणाचा मेन्यू तेथे लावलेला असतो. प्रत्येक महिलेकडे तिचे तिचे काम वाटून दिलेले आहे. त्यामुळे कामाचा ताण निर्माण होत नाही. एखाद्या महिलेला काही कारणास्तव येणे जमले नाही तर तिच्याऐवजी दुसऱ्या महिलेला ते काम करावे लागते. त्या महिलेला अधिक काम केल्यामुळे अधिक भत्ताही मिळतो. किराणा सामान, भाजीपाला आणण्यासाठी त्यांचे दुकानदार ठरलेले आहेत. चपात्या बनवण्यासाठी लागणारे पीठ बाहेरुन न घेता काही बचतगटांना गिरणी कर्जावर घेऊन देऊन त्यांच्याकडे गहू दळण्याचे काम दिले जाते. अशा तऱ्हेने एकेक उद्योगिनी सक्षम बनत आहे.

**टेलरिंग विभाग:**

तेथील महिलांनी शिवलेले विविध प्रकारचे ब्लाउज, ड्रेस, कापडी पिशव्या, रजई आणि गोधड्या असे अनेक प्रकार आहेत. महिलांना टेलरिंगविषयी बेसिक प्रशिक्षण, फॅशन डिझायनिंगचे तंत्र समजावून सांगितले जाते. त्यानुसार तेथेही बाहेरुन जशा ऑर्डर येतील तसे त्यांचे काम सुरु राहते. त्यांनी वेगवेगळ्या पद्धतींनी डिझाइन करुन बनवलेल्या पर्स आकर्षक दिसतात. सोलापूरला नॅपकिन बुके देण्याची पद्धत प्रसिद्ध आहे, त्याचेही काम तेथे चालते. नॅपकिन बुके बनवून विक्रीसाठी बाहेर पाठवले जातात. शिलाई प्रशिक्षणामुळे हजारापेक्षा अधिक महिला-मुली आत्मनिर्भर झाल्या आहेत. प्रशिक्षण दिल्यानंतर, टेलरिंगचा परवाना, कपड्यांचे उत्पादन कसे वाढवावे? विक्री कौशल्य यांसाठी मार्गदर्शन केले जाते. महिला विक्री कौशल्यात सेल्समनलाही फिके पाडतील अशा तयार झालेल्या आहेत. महिला आपुलकीने आणि मन लावून काम करत असतात.

**मंगल दृष्टी भवन:-**

वयोवृध्द, एकाकीजीवन जगणाऱ्या, वयाच्या साठी ओलांडलेल्या महिलांसाठी विनामूल्य निवासी योजना असे स्वरुप असून, सध्या दृष्टी भवन मध्ये ७ महिला आहेत.

**शुभश्री पराठा केंद्र:-**

उद्योगवर्धिनी संचलित या पराठा केंद्रात वेगवेगळ्या प्रकारचे पराठे तसेच मोठ्या प्रमाणामध्ये भाकरी, चपाती, फराळाच्या ऑर्डर घेतल्या आणि पूर्ण करुन दिल्या जातात.

**समुपदेशन केंद्र:-**

समाजामध्ये एकत्र राहून सुद्धा आपापसात वाढत जाणारा दुरावा, भांडणात होणारी वाढ आणि त्यासाठी होणारी आर्थिक पिळवणूक लक्षात घेता समुपदेशनाचे काम संस्थेमार्फत विनामूल्य चालवले जाते. विविध संस्थांना मार्गदर्शन, तसेच कोव्हीडमुळे अनाथ झालेली १३ मुले मुली संपूर्णपणे दत्तक घेण्यात आली आहेत.

**शांत संध्या:-**

कोव्हीड नंतर,एकटे राहिल्याने आलेला मानसिक ताणतणाव लक्षात घेता, वयाच्या उत्तरार्धात मानसिक विरंगुळा म्हणून संस्थेमार्फत आठवड्यातून एक दिवस २ तास एकत्रीकरण आणि खेळ घेतले जातात.

**उद्योगवर्धिनी**
जुना एम्प्लॉयमेंट चौक, बी. सी. बॉईज होस्टेल, रेल्वे लाईन्स, सोलापूर -४१३००
संपर्क - मेधा राजोपाध्ये -९४२२०२६२४२






## २.२ माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान – एक परिवर्तन चळवळ

सामाजिक संस्था व त्यांचे कार्य या भागात सोलापूर जिल्ह्यातील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान याअजून एका संस्थेबद्दल माहिती आम्ही आपल्याला देत आहोत. संस्थेमार्फत आरोग्य, शिक्षण, रोजगार अशा अनेक विषयावर गेले ४२ वर्षे सातत्याने काम सुरु आहे.विविध विषयातील कामाची गरज, पद्धत व सकारात्मक सामाजिक परिणाम याची आपल्याला या भागात माहिती मिळेल.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी, दुर्गम असा सांगोला तालुका. भीषण पाणीटंचाई, कर्जबाजारी शेतकरी, गरिबी, व्यसनाधीनता आणि पुरुषप्रधान संस्कृतीमुळे शिक्षण आणि आरोग्याचा अभाव यामुळे स्त्रीवर्ग तर पूर्णपणे असहाय्य, अशा ठिकाणी पुण्यातील बी.जे. मेडिकल कॉलेजमध्ये शिकलेल्या डॉ.संजीवनी केळकर लग्न करुन १९७३ मध्ये सांगोला येथे आल्या. डॉक्टर म्हणून काम करताना संजुताईंना अनेक हृदयद्रावक अनुभव आले.

येथील बायकांच्या असहायतेने त्यांना अत्यंत अस्वस्थ केले आणि त्यावर त्या उपाय शोधू लागल्या. त्या आणि त्यांच्या समविचारी मैत्रिणी (नीला देशपांडे, प्रतिभा पुजारी) यांनी एकत्र येऊन महिलांशी विविध विषयांवर संवाद साधला आणि परिवर्तनाची एक मोठी चळवळ इथे उभी राहिली. श्री. नानाजी देशमुख यांनी केंद्राच्या पुढील उभारणीसाठी मार्गदर्शन केले आणि १९८१ मध्ये या चळवळीची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे 'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान' म्हणून केली गेली. या चळवळीचे ३ कार्यबिंदू ठरले १. महिला सबलीकरण २. ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि ३. जलसंधारण.

कुणाला कल्पनाही करता येणार नाही अशी कामे महिलांनी या प्रतिष्ठानमार्फत स्थानिक पातळीवर केली. महिला सहविचार केंद्र, अन्याय निवारण समिती, १०५ बचतगटांचा मोठा पसारा त्याद्वारे आर्थिक स्वावलंबन, महिलांची आरोग्य तपासणी, कौशल्य विकसनासाठी विविध प्रशिक्षणे इ. माध्यमातून सबलीकरणाचे काम चालू आहे.





महिला सबलीकरण - बचतगट मेळावा व बैठक



दर्जेदार शिक्षणासाठी कटीबद्ध – उत्कर्ष विद्यालय सांगोला

सततचा दुष्काळ,हे सर्व समस्यांचे मूळ असल्याने त्याला हटवण्यासाठी पाणी उपलब्ध करणे सोपे नव्हते पण १९९७ पासून सुरु केलेल्या आमच्या जल अभियानाने आणि सेवावर्धिनीच्या सहकार्याने २००० हेक्टर जमीन ओलिताखाली आली आणि हरितक्रांतीची पावलं रुणुझुणु लागली.

'माणूस घडविणारे शिक्षण द्यायचं असं ठरवूनच ग्रामीण मुलांसाठी शालेय शिक्षणाचा विचार सुरु केला. सुरुवातीला संस्कारवर्गापासून सुरु करून १९८३ मध्ये शिशुवर्ग सुरु केला. नंतर पालकांचा हट्ट आणि सहभागाचं वचन म्हणून १९८४ मध्ये प्राथमिक विभाग सुरु केला. आज शाळेचे शिशुवर्ग ते बारावीपर्यंत वर्ग आहेत आणि मुलांची संख्या पंधराशे पेक्षा जास्त आहे. ही शाळा 'उत्कर्ष विद्यालय मन, मनगट आणि मेंदू विकसित करून माणूस घडवणारी शाळा' म्हणून ख्यात आहे. Equity, Contextual relevance, Child Friendly Atmosphere, Balanced Thinking and Sustainability - ही येथील शिक्षणाची पाच मूलतत्त्वे आहेत. शाळेतून बाहेर पडणारे विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असले पाहिजे त्यासाठी शाळेत मल्टी स्किल फाउंडेशन कोर्स सुरु केला आहे. मुलांची शारीरिक तंदुरुस्ती, शाश्वत मूल्यांची त्यांच्यामध्ये रुजवण आणि पर्यावरण संतुलनाचा भाव या गोष्टी शालेय शिक्षणामध्ये अंतर्भूत आहेत.

मुलांना चांगले संस्कार देऊन चांगला माणुस घडविण्यासाठी पूर्व प्राथमिक ते इयत्ता बारावी पर्यंतची शाळा, मुक्तविद्या केंद्र, कुमार वयातील मुलींसाठी विशेष जाणीव जागृती उपक्रम आणि अनौपचारिक शिक्षणाचे अनेक उपक्रम, हिमोग्लोबीन तपासणी,आरोग्यदूत योजना, आरोग्य शिबिरे, प्रथमोपचार पेट्यांचे वाटप, अन्य वैद्यकीय मदत, कुटुंब सल्ला केंद्र, दारुबंदीसाठी प्रयत्न, पारंपारिक स्थानिक घोंगडी उद्योगास चालना, उत्कर्ष वाचनालय, उद्योजकता विकासासाठी विविध प्रकारची प्रशिक्षणे, सखी सहेली मंच, उद्योजकता विकास केंद्र, कलावर्धिनी, दुष्काळी तालुका व जिरायती शेती म्हणून जागोजागी जलसंधारणाची कामे, जलदूत योजना अशी केवढी तरी कामे इथे संजूताईंच्या नेतृत्वाखाली महिलांनी केली आहेत. जवळजवळ ४५००० महिला याच्या लाभार्थी आहेत. शालेय शिक्षणाची आणि अनौपचारिक शिक्षणाची ही गंगा या पुढेही वाहती राहो हीच सदिच्छा!!






जलसंधारण – पाझर तलाव दुरुस्ती आणि पिण्याच्या पाण्याची सोय

# ३.० संस्था संचालन - प्रकल्प प्रस्ताव लेखन (Project Proposal Writing)

सेवा संस्थाना सामाजिक कार्यासाठी निधी जमा करताना सर्वप्रथम आवश्यक असा विषय म्हणजे प्रस्ताव लेखन. या विषयाची विस्तृत माहिती सेवावर्धिनीच्या अनुभवानुसार आपल्या समोर सादर करीत आहोत. प्रकल्प प्रस्ताव आकर्षक होऊन सर्व मुद्द्यांचा समावेश व्हावा आणि निधी संकलनास मदत व्हावी हा या मागचा उद्देश आहे.

## प्रस्ताव कशासाठी?

स्वयंसेवी संस्थांचे कार्य हे इतरांकडून मिळालेल्या सहकार्यावर प्रामुख्याने अवलंबून असते. आपल्या कार्यासाठी कुणी समर्थन का आणि कशा प्रकारे द्यावे यासाठी प्रकल्प प्रस्ताव लिहिणे अनिवार्य आहे. संस्था छोटी असो वा मोठी, नावाजलेली असो वा नवीन,– प्रस्ताव लेखन आवश्यकच आहे. नाविन्यपूर्ण,व्यावहारिक आणि रेखीव प्रकल्प प्रस्तावाचे लिखाण करता येणे ही काळाची गरज आहे. आपल्या प्रकल्प प्रस्तावातून सामाजिक विकासाच्या महत्त्वपूर्ण मुद्द्याला हात घालणे या बरोबरच संभाव्य निधीदात्यांना आवश्यक वाटेल अशी मांडणी करावी लागते. आपला मुद्दा तोंडी पटवून देण्याबरोबरच लेखी स्वरुपात प्रस्ताव लिहिल्यानंतरच त्यावर खऱ्या अर्थाने काम सुरु होऊ शकते.

प्रकल्प प्रस्तावामध्ये आपण कोणत्या सामाजिक समस्येवर काम करु इच्छीतो, त्याचे नेमके गांभीर्य किती, त्यावर कोणते उपाय करता येतील आणि आपण जे काम करणार आहोत, त्याचे वेगळेपण कशात आहे, अशा अनेक प्रश्नांची तपशीलवार मांडणी करुन जर प्रकल्प प्रस्तावसादर केला, तर त्याला निधी आणि इतर प्रकारे समर्थन मिळण्याची शक्यता निश्चितच वाढू शकते. तसेच निधी दात्याबरोबर आणि समाजातील इतर भागधारकांसोबत आपल्या संस्थेचे संबंधही वृद्धिंगत होण्यास मदत होते.

## प्रस्ताव लेखनाची पूर्वतयारी

आपला प्रस्ताव लिहिण्यापूर्वी काही पूर्वतयारी म्हणून खालील माहितीचे संकलन करणे आवश्यक आहे. प्रकल्प ज्या भागात आहे, त्या परिसराची तपशीलवार भौगोलिक माहिती, लोकसंख्या, संस्कृती व परंपरा स्थानिक लोकांना भेडसावणारे प्रश्न, त्या प्रश्नांची व्याप्ती आणि त्याचे समाजावर होणारी परिणाम

सर्वांगाने परिपूर्ण अभ्यास करण्यासाठी सामाजिक सर्वेक्षण, आपल्या संस्थेच्या किंवा इतर माध्यमातून संकलित केलेली माहिती याचा वापर करता येईल. इंटरनेट सारख्या साधनांचा वापर करणे, शासकीय माहिती, अन्य विश्वसनीय स्त्रोत यांचाही वापर करता येऊ शकतो. अनेक वेळा या पूर्वतयारी, सर्वेक्षण व अभ्यास यासाठी येणाऱ्या खर्चासाठी सुद्धा वेगळा प्रस्ताव सादर करता येऊ शकतो. अशा अभ्यासाची तयारी दर्शवल्याने आणि संदर्भ, पार्श्वभूमी व्यवस्थित मांडल्याने प्रस्तावाची विश्वासार्हता वाढण्यास मदत होते.

प्रस्तावात सादर करण्यासाठी प्रमुख भागधारक (Stakeholders) कोण आहेत, यांची तपशीलवार माहिती असणे फायदेशीर ठरते. यात किमान पुढील भागधारकांची माहिती येणे आवश्यक आहे.

१. प्रकल्प करु इच्छिणारी संस्था, तिची पात्रता आणि क्षमता, या क्षेत्रात पूर्वी काही काम केले असेल तर त्याची माहिती, किंवा हे काम आपणच का करावे याबाबत विवेचन
२. स्थानिक नागरिक (Community) ज्यांच्या साठी प्रकल्प राबवला जात आहे. त्यांचा या कार्यात सहभाग काय असेल, ते काम शाश्वत राहावे यासाठी ते कसे सहकार्य करु शकतील यांची माहिती
३. निधी दाता (The Donor Agency) निधी देणाऱ्या संस्था कोणत्या असू शकतील, त्यांच्या अपेक्षा काय आहेत, याची माहिती उपयोगी ठरेल

आपल्या संस्थेची माहिती देताना सर्व कायदेशीर, वैधानिक औपचारिकता पूर्ण असल्याची कागदपत्रे (वार्षिक अहवाल, विविध नोंदण्यांचे प्रमाणपत्र, इ.) माहिती तयार ठेवावी. तसेच संस्थेचे प्रमुख पदाधिकारी, संस्थेच्या क्षमता, मर्यादा, संधीव संभाव्य धोके (SWOT) यांचाही समावेश यामध्ये असावा.

## प्रकल्प प्रस्ताव मुख्य गाभा

प्रकल्प प्रस्तावासाठी अनेक मसुदे (template) इंटरनेट वर सापडू शकतील. त्यांचा वापर केल्यास प्रस्तावाची रचना आणि मांडणी सोपी होईल. प्रकल्पाच्या गरजेनुसार यात थोडेफार बदल करणे अपेक्षित असले, तरी प्रस्तावात किमान पुढील गोष्टींचे विवेचन अपेक्षित असते.

1. **शीर्षक (Title):** प्रस्तावाच्या शीर्षकाच्या पृष्ठावर शीर्षक,संस्थेचा संपर्काचा तपशील आणि निधीदात्याचा उल्लेख असावा. एखादे छायाचित्र असल्यास उत्तम. शीर्षक आकर्षक आणि प्रकल्पाचा आशय करणारे असावे.

2. **गोषवारा (Executive Summary):** प्रकल्पाची थोडक्यात माहिती यामध्ये द्यावी. गोषवारा देताना प्रकल्पातील महत्त्वाचे म्हणजे समस्या त्यावरील संभाव्य उत्तर, प्रकल्पाचे वेगळेपण आणि संस्थेची हे काम पूर्ण करण्याची क्षमता याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने....

प्रकल्प का आवश्यक आहे?

प्रकल्पातून कोणत्या सामाजिक समस्येला हात घातला आहे?

समस्या सोडवण्याची तुमची पद्धती काय आहे?

प्रकल्पातून कोणते परिणाम साध्य होतील?

प्रकल्पाचा खर्च एकूण अंदाजपत्रक व कालावधी यांची माहिती मिळणे आवश्यक आहे.

गोषवारा ३००ते ६०० शब्दांमध्ये लिहावा. लिखाण एका पानापेक्षा जास्त असू नये आणि इतके अचूक आणि नेमके पाहिजे कि तोंडी वर्णन करायचे झाल्यास गोषवारा १ मिनिटात सांगता आला पाहिजे.

3. **प्रकल्पाची पार्श्वभूमी ( Project Background)** - प्रकल्पाच्या कार्यक्षेत्राची तपशीलवार माहिती, स्थानिक मुद्दे व समस्यायांची माहिती आणि संस्थेची या समस्या सोडवण्याची संकल्पना व पद्धती यांचे मुद्देसूद विवेचन येथे करावे. तसेच अशा प्रकारचा प्रकल्प पूर्वी यशस्वीपणे केला असेल तर तो संदर्भ इथे मांडला पाहिजे. संस्थेच्या प्रकल्पाला आर्थिक गरज का आहे त्याची माहिती लिहिणे आवश्यक आहे.

4. **समस्येचे /समस्यांचे नेमक्या शब्दात वर्णन ( Problem Statement)** - प्रकल्पाच्या अनुषंगाने जाणवलेल्या स्थानिक प्रश्नांची-मुद्यांची माहिती याठिकाणी देणे आवश्यक आहे. निधीदात्याच्या अर्थसहाय्याचे मुख्य विषय/ क्षेत्र व प्राथमिकतेप्रमाणे त्यांची मांडणी असावी. आपण संकलित केलेल्या, आकडेवारीचा, प्रसार माध्यमातील बातम्यांचा उल्लेख जरूर करावा. तसेच अन्य स्वयंसेवी संस्था, सरकारी यंत्रणा त्यांनी केलेल्या कामांचा/प्रयत्नांचा उल्लेख असावा.

5. **प्रकल्पाचे ध्येय( Project Goal )** - प्रकल्पाचे सर्वसाधारण-सार्वत्रिक व दीर्घकालीन उद्दिष्टे, म्हणजे प्रकल्पाचे ध्येय. प्रकल्पाच्या नेमक्या उद्दिष्टापेक्षा हे वेगळे आहे. अन्य सहाय्यकारी यंत्रणा उदा. शासन, आंतरराष्ट्रीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था इत्यादींचा सहभाग व सहकार्याशिवाय ध्येय साध्य होत नाही. उदाहरणार्थ, गरीबीचे निर्मुलन, कुपोषण दूरकरणे इत्यादी. आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त असलेले शाश्वत विकास उद्दिष्टे (Sustainable development goals) यांच्याशी सांगड जरूर घालावी. याबाबत अधिक माहिती आंतरजालावर (इंटरनेट) वर मिळू शकेल. यातील कोणत्या ध्येयासाठी निधीदाते उत्सुक आहेत याची माहिती आधीच घेतलेली असली तर योग्य ठिकाणी आपला प्रस्ताव पोचवता येतो.

6. प्रकल्पाची उद्दिष्टे (Project Objective) - प्रकल्पाचे ध्येय साध्य करण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती म्हणजे प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी SMART या पद्धतीचा वापर करतात

S - Specific, M- Measurable, A- Achievable, R- Realistic, T- Time Bound

या उद्दिष्टयांचा ध्येय साध्य करण्यासाठी उपयोग होणे अपेक्षितआहे. त्यांची मांडणी करताना ५ W व १ H ची उत्तरे मिळतील याची खात्री करणे आवश्यक आहे.

Why – का ? एक विशिष्ट काम/पद्धती इ. का सुचवत आहात ?

What – काय ? कोणती वेगळी पद्धती वापरुन उद्दिष्ट साध्य करणार आहात ?

When – कधी ? प्रकल्प अंमलबजावणी कधी करणार आहात ?

Where – कुठे ? प्रकल्प कुठे करणार आहत ?

Who - कोण ? प्रकल्पाचे मुख्य घटक-लाभार्थी कोण आहे ? प्रकल्पाचे यश म्हणजे काय ? आणि कोणते परिणाम अपेक्षित आहेत हे समजणे आवश्यक आहे.

How – प्रकल्प कसा राबविला जाणार याची माहिती.

## उद्दिष्टे लिहिण्याचा नमुना –

येत्या ४ वर्षात ‘अन्न हेच औषध’ या संकल्पनेच्या माध्यमातून प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थी महिलांमधील Anemia चे प्रमाण ७०% वरुन १५% वर आणणे.

7. प्रकल्प व्यवस्थापन (Project Management ) - प्रकल्प व्यवस्थापनाच्या पैलूवर इथे भाष्य होणे अपेक्षित असते. इथे कार्यकर्ते, कर्मचारी नेमून कार्यक्रम अंमलबजावणीचे वेळापत्रक आणि संबंधित मुद्दे याबद्दल लिहिणे अपेक्षित आहे. प्रकल्पांमध्ये विविध भूमिकेमध्ये अपेक्षित व्यक्तींची माहिती नमूद करणे आवश्यक आहे. आपला प्रकल्प ठरलेल्या वेळेत, निश्चित केलेल्या खर्चात आणि योग्य मनुष्यबळ आणि इतर संसाधानांचा वापर कसा करणार याचे नियोजन दिसले पाहिजे.

याकरता प्रकल्पाच्या महत्त्वाच्या गतीविधींसाठी वेळापत्रक सादर करावे. प्रकल्प व्यवस्थापनासाठी असलेल्या विविध प्राणलींचा वापर करावा. तसेच प्रकल्पाचे अंदाजपत्रक, लागणरी संसाधने, त्यासाठी कोणती पद्धती वापरणार हे सर्व मुद्दे स्पष्ट करावे,ज्यायोगे निधी देणाऱ्याचा विश्वास संपादन करता येईल.

8. धोरण आणि कार्यक्रम/उपक्रम (Strategies/Activities/Interventions) - उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या योजनेची माहिती या ठिकाणी येणे अपेक्षित आहे. या दृष्टीने निश्चित केलेले धोरण आणि त्या अनुषंगाने आखलेले कार्यक्रम - उपक्रम यांची माहिती देणे आवश्यक आहे. धोरण म्हणजे, ज्या व्यापक संकल्पनेच्या अंतर्गत कार्यक्रम - उपक्रमांची आखणी/ योजना करतो ती संकल्पना..

उदा. धोरण म्हणजे क्षमता वर्धन, संशोधन व विकास

कार्यक्रम/उपक्रम म्हणजे – कार्यशाळा, मेळावे, पथनाट्य, पायाभूत सर्वेक्षण (Baseline Survey) लक्ष केंद्रित गटांच्या बैठका (FGD) सहभागी मुल्यावलोकन (PRA) ज्यामुळे अपेक्षित परिणाम मिळू शकतात असे कार्यक्रम.

9. कामगिरीचे मापदंड (Performance indicator/Success measures) - कामगिरीचे मापदंड योग्य असणे हे प्रकल्प यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले अत्यंत महत्वाचे घटक आहेत. हे मापदंड दोन प्रकारे असतात. १. प्रक्रियेचे मापदंड २. परिणामांचे मापदंड. उदा. बचतगटाविषयी प्रशिक्षण

महिलांची संख्या ही प्रक्रिया दर्शकमापदंड आहे, तर बचत गटात सहभागी झालेल्या महिलांची संख्या, किंवा त्यातून उभे राहिलेले उद्योग हे परिणामाचे मापदंड आहेत.

परिणाम हे तीन प्रकारचे असू शकतात व या तिन्ही प्रकारांवर एकाच वेळी नीट विचार करणे आवश्यक आहे साध्य (Output), निष्पत्ती (Outcome), परिवर्तन (Impact)

साध्य (Output) – प्रकल्पातील कोणताही कार्यक्रम - उपक्रम पार पडल्यानंतर मिळणारे परिणाम. उदाहरणार्थ, महिलांसाठी औषधी वनस्पतींची परसबाग विषयावरील प्रशिक्षण पार पडले. त्यात ठराविक संख्येने महिला सहभागी झाल्या.

निष्पत्ती (Outcome)–निष्पत्ती हे काही काळानंतर दिसणारे बदल आहेत. उदाहरणार्थ महिलांनी औषधी वनस्पतीची परसबाग उभी केली त्यामुळे त्यांना उत्तम भाजीपाला उपलब्ध होऊ लागला.

परिवर्तन (Impact): प्रकल्पांतर्गत झालेल्या कार्यक्रमामुळे दिसून आलेले दीर्घकालीन बदल म्हणजे परिवर्तन होय. उदा. परसबागेत भाजीपाला उपलब्ध झाल्यामुळे महिलांच्या आहारात त्याचा समावेश झाला. त्यामुळे त्यांच्यातील Anemia चे प्रमाण घटले.

10. संनियत्रण (Monitoring) अभिलेखन Documentation व मूल्यांकन Evaluation – संनियंत्रण, अभिलेखन आणि मूल्यांकन यामुळे प्रकल्पाच्या कार्यक्रमावर सातत्याने देखरेख करता येते तसेच प्रकल्पांच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रगतीचे ही नियंत्रण करता येते. मासिक, त्रैमासिक, वार्षिक, प्रगती अहवाल. २. विविध स्तरांवर आढावा व्यवस्था. ३. सहभागीय मुल्यावलोकन (PRA) प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्वेक्षण – परिणाम (Results) संभाव्य धोके (Risks) गृहीतके (Assumptions) आणि कामगिरी (Performance) यांचे सनियंत्रण बैठका व अहवाल यांच्या माध्यमातून नियमित करणे आवश्यक आहे.

अहवालात पायाभूत माहिती, छायाचित्रे, चलचित्रे आणि यशस्वी उदाहरणे यांच्या वेळोवेळी केलेल्या नोंदी प्रकल्पाचे प्रगतीचे दर्शन घडवतात. माहितीचे मूल्यांकन आणि निधीदात्या संस्थेला तसेच स्थानिक लोकांना वेळोवेळी पाठवण्याचा प्रगती अहवाल हे प्रकल्पाचे अविभाज्य भाग आहेत. त्याचा प्रकल्पाचे काम करण्याऱ्या संस्थेला पुढील योजना आखण्यासाठी उपयोग होतो.

प्रस्तावात आपण प्रकल्प अहवाल कधी आणि कसे सादर करणार, प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा उपयुक्त पद्धती वापरुन कसा घेणार, याचे मसुदे किंवा प्रारुप सादर करावे. प्रगतीचा आढावा नियमित घेण्याची तयारी दर्शवणे आणि त्यात निधी दात्यांना समाविष्ट करणे आपल्या व्यवस्थापन पद्धती बाबत आश्वस्त करतो.

11. खर्चाचे अंदाजपत्रक (Budget) - अंदाजपत्रक तयार करताना सर्वप्रथम प्रकल्पांतर्गत करण्याच्या कार्यक्रम- उपक्रमांची तपशीलवार यादी तयार करावी आणि त्याच्या संभाव्य प्रकल्पाच्या खर्चाचे आकडे लिहावेत. ही प्रकल्पाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याची सर्वात सोपी आणि शास्त्रीय पद्धत आहे.

मोठ्या दीर्घकालीन प्रकल्पांच्या बाबतीत त्यामध्ये पायाभूत सुविधा तसेच संस्थेचा खर्च याचीही तरतूद असणे आवश्यक आहे. अन्य खर्चामध्ये कार्यालयाचे भाडे दूरध्वनी हिशोब, लेखन खर्च, संबंधित कर्मचाऱ्यांचे पगार, मानधन, आवश्यक दुरुस्ती, पुरवठा, प्रवास इत्यादी बाबींचा अंतर्भावहोतो. संनियंत्रण व मूल्यांकन याचा खर्चही अंदाजपत्रक करताना विचारात घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे हा खर्च १५ टक्के पेक्षा अधिक होत अधिक होत असेल तर मात्र त्याचे पटणारे योग्य कारण देता आले पाहिजे. लोकसहभाग आणि अन्य स्त्रोतांमधून आलेले उत्पन्न यांचा उल्लेख न विसरता करणे आवश्यक आहे.

**१२. सातत्य आणि शाश्वतता (Sustainability) -** कोणत्याही समाज आधारित कार्याचे सातत्य टिकविण्यासाठी आणि त्याचे फायदे दीर्घकाळ टिकण्यासाठी संबंधित लोक, शासकीय व्यवस्था आणि जोडलेले घटक यांच्यात योग्य ताळमेळ व संबंध असणे आवश्यक असते. प्रकल्पाच्या सातत्याच्या दृष्टीने, संबंधींच्या जबाबदारीचा उल्लेख प्रकल्पात करणे उपयोगाचे असते. उदा. १. लोकसहभाग: (कम्युनिटी पार्टिसिपेशन) २. स्थानिक लोक प्रकल्पखर्चाचा वाटा उचलणार असतील तर आपलेपणाची भावना निर्माण होते. या गोष्टींचा प्रस्तावात अवश्य उल्लेख करावा.

## प्रस्ताव तयार झाल्यानंतर

प्रकल्प प्रस्ताव मसुदा तयार झाल्यानंतर २-३ जाणकार व्यक्तिंकडून तो तपासून घेणे, काही त्रुटी असल्यास दुरुस्त करणे ही आवश्यक प्रक्रिया आहे. यासाठी त्या क्षेत्रातील तज्ञ मंडळींची मदत जरूर घ्यावी. तसेच प्रस्ताव कुणाला सादर करावा याचा शोध घ्यावा. एक प्रकल्प प्रत्यक्षात येण्यासाठी अनेकदा १० ते १०० निधी दात्यांकडे प्रस्ताव सादर करावा लागू शकतो. त्यामुळे या प्रक्रियेत संकोच, ढिलाई किंवा दिरंगाई उपयोगाची नाही. आपण ज्या सामाजिक कार्यक्रमासाठी निधी मागत आहोत, तो विषय पुढे नेणे ही शेवटी आपली जबाबदारी आहे.

सेवावर्धिनी यात आपल्याला निश्चितपणे मदत करु शकेल

**विशेष सूचना :** पुढील महिन्यात याच विषयावर संस्थांसाठी आभासी (online) पद्धतीने प्रशिक्षण आयोजित केले आहे. प्रकल्प प्रस्ताव लेखन या विषयावरील काही विशिष्ट प्रश्न असल्यास आम्हाला contact@sevavadhini.org या इमेल वर पाठवावेत. प्रशिक्षणा दरम्यात याचे निराकरण करण्याचा प्रयत्न करू.

# ४.० ओळख सेवावार्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – जलदूत

**जलदूत प्रकल्प – शाश्वत विकासाचा पाया**

पाणी या विषयात आतापर्यंत अनेक पध्दतीने,अनेक संस्थांनी काम केले आहे. यापुढेही काम करत रहावे लागणार आहे. पाण्याशिवाय जनजीवन अशक्य आहे. त्यातच हवामान बदलाचे अनपेक्षित झटके आपल्याला बसत आहेत. या सर्वांचा विचार केला तर पाणी, पर्यावरण व शाश्वत विकास यावर काम करणाऱ्या संस्थांची ध्येय व दिशा निश्चित होणे गरजेचे आहे. माथा ते पायथा पाणलोट उपचार करुन गावाच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी गावातच अडेल, जमीनीत मुरेल आणि तिथल्याच भुजलात रुपांतरीत होऊन विहीरींमध्ये उपलब्ध होईल, तरच त्या पाणलोटातील गावात शेती उत्पादन वाढून समृध्दी येईल, असे सुत्र आढळले. या सर्वांमध्ये गावामध्ये राहून ग्राम विकासाचा ध्यास घेऊन शेती-पाणी विषयात काम करणारे कार्यकर्ते हा कळीचा मुद्दा आहे.

**जलदूत प्रकल्प –**

जलदूत प्रकल्प सेवावर्धिनीने २०१५ ला हाती घेतला. यासाठी पाणी विषयात काम करणाऱ्या तज्ञ व्यक्तींच्या चिंतन बैठकी झाल्या. चर्चेत असा विषय निघाला की आता पर्यंत अनेक वर्षे अनेक संस्था पाणी या क्षेत्रात काम करीत आहेत. त्यापेक्षा काही वेगळा विचार करता येईल का? हा प्रश्न सर्वांसमोर होता. कोणतेही काम करायचे म्हणले तर त्या साठी झोकून देऊन काम करणारी व्यक्ती ही महत्वाची असते. ज्या क्षेत्रात काम करायचे त्या क्षेत्रातील स्थानिक व्यक्ती असेल तर उत्तम म्हणजे स्थानिक ग्रामस्थांशीचर्चा, सुसंवाद साधण्यासाठी सोपे होते. ही व्यक्ती शैक्षणिक दृष्ट्या उच्चशिक्षित असायलाच पाहिजे असा निकष नव्हता. किमान शिक्षण असले तरी चालेल पण व्यावहारीक दृष्टीने समजदार, लोकांच्या मध्ये राहून, मिसळून आणि लोकांना बरोबर घेऊन काम करणारी असायला हवी. अशा व्यक्तीला जर पाणलोट शास्त्राचे ज्ञान दिले तर फलदायी होईल या बाबत सर्वांचे एकमत झाले. यातून 'जलदूत–पथिक शाश्वत विकासाचा', हे सुत्र हाती घेऊन पुढील रचना केली.

सेवावर्धिनी ही संस्थांना मार्गदर्शन करणारी संस्था असल्यामुळे सहभागी संस्थांना बरोबर घेऊनच हा प्रकल्प राबवायचा हे नक्की होते. त्यामुळे महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यातील प्रत्येकी एक संस्था निवडली. या संस्थांना त्यांच्या संपर्कातील एक गाव निवडायला सांगितले. त्या गावातील एक आणि संस्था पातळीवरील एक अशा दोन व्यक्तींना जलदूत प्रशिक्षणासाठी निवडले गेले.





## जलदूत – पथिक शाश्वत विकासाचा

या जलदूताला पाणी विषयातील सर्वंकष प्रशिक्षण देण्यात आले. पाऊस पडतो कसा, पाणी वाहते कसे, जमीनीत मुरते कसे इथ पासून ते पाण्याचा वापर करुन उत्पादन कसे वाढवावे इथ पर्यंत .. हे प्रशिक्षण ५-६ दिवस दिले. त्यानंतर मध्ये २-३ महिने गृहपाठ दिला. यामध्ये विहीरींची पाणी पातळी मोजणे. पाऊस मोजणे इथ पासून ते पीक पेरा, पीक उत्पादन अशा सर्व विषयांचा गृहपाठ दिला गेला. अशी ६ प्रशिक्षणे साधारण दिड वर्षात झाली. नंतर शेवटी याच जलदूतांना त्यांच्या गावाचा पाण्याचा ताळेबंद तयार करुन ग्राम जल सुरक्षितता आणि शाश्वतता आराखडा तयार करायला शिकविले. त्या मधून त्या गावाची पाण्याच्या बाबतीत स्वयंपुर्ण होण्यासंदर्भात करावयाच्या सर्व उपचारांची यादी तयार झाली. या यादीतील प्रत्येक गावातील एक काम सेवावर्धिनीने पुर्ण केले. उर्वरीत कामे त्या संस्थेने आणि त्या जलदूतांनी इतर निधीतून पुर्ण करावीत अशी अपेक्षा होती.



सन २०१५ ते २०१७ आणि २०१९ ते २०२३ दरम्यान जलदूत प्रकल्पाचे दोन टप्पे पुर्ण झाले. आता पर्यंत या प्रकल्पात महाराष्ट्रातील ४२ संस्थां मधील ८८ जलदूत कार्यकर्त्यांना प्रशिक्षित केले गेले. हे सर्व जलदूत आणि संस्था मिळून २०१५ ते २०१७ आणि २०१९ ते २०२३ या दोन टप्पयात १,२९,३९० मीटर सलग समतल चर, ८ सिमेंट बंधारे, ५ पाझर तलाव, शिवकालीन पाणी टाके दुरुस्ती, सौरउर्जा पंप द्वारा पाणी वापर, रेन वॉटर हार्वेस्टींग अशी २३ विविध प्रकारची कामे झाली आहेत. या कामामुळे एकूण ४५ कोटी ८७ लाख २७ हजार लिटर एवढे पाणी दरवर्षी संवर्धित केले जात आहे.

या प्रकल्पाचे शैक्षणिक साहित्य म्हणून जलदूत-पथिक शाश्वत विकासाचा हे पुस्तक तयार केले आहे. वरील सर्व विषयांची शास्त्रोक्त माहिती, यामध्ये विविध तज्ञ लेखकांच्या कडून दिली गेली आहे. ग्रामविकासात किंवा जलसंधारणात काम करणाऱ्या व्यक्तीला हे पुस्तक उपयोगी होणार आहे.

हे पुस्तक पाहून आणि जलदूत प्रकल्पाचे समारोपातील वृत्त ऐकून सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु नितीन करमाळकर म्हणाले, "नविन शैक्षणिक धोरणानुसार तुमचा हा जलदूत प्रकल्प म्हणजे एक पदवी अभ्यासक्रम आहे". जलदूत प्रकल्पाच्या यशस्वितेला मिळालेले हे मानांकन आहे.



# ९.० सेवाव्रती

## " भारतरत्न नानाजी देशमुख "

पंडीत दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेल्या "एकात्म मानव दर्शन" सिध्दांताला वास्तवात उतरविण्याचे कार्य करुन लाखो लोकांचे आयुष्य घडविणारा महान साधक!

महाराष्ट्रात हिंगोली जिल्ह्यातील कडोली गावात ११ ऑक्टोबर १९१६ ला नानाजींचा जन्म झाला. लहानपणीच त्यांचे मातृ व पितृछत्र हरविले. मामांनी त्यांचा सांभाळ केला. अत्यंत हलाखीच्या स्थितीत त्यांचे बालपण गेले. शिक्षणाची त्यांना प्रचंड आवड होती परंतू शिक्षणासाठी पैसे नाहीत म्हणून भाजी विकून त्यांनी पैसे जमा केले, मंदिरात राहिले व नेटाने आपले शिक्षण सुरु ठेवले. पिलानी येथील बिर्ला इंस्टीट्यूट मधून त्यांनी आपले उच्च शिक्षण पुर्ण केले.

१९३० साली ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबत जुळले. काही काळानंतर त्यांच्यावर प्रचारक म्हणून दायित्व सोपविण्यात आले. राजस्थान, उत्तर प्रदेशमध्ये प्रचारक राहिल्यानंतर ते मध्यप्रदेश सोबत जुळले व नंतर ते कायम तिथेच राहिले. चित्रकूट ही त्यांची कर्मभूमी होती. आपले सर्वस्व त्यांनी संघटनेच्या बांधणीवर अर्पण केले होते. धर्मशाळेत मुक्काम करुन त्या परिसरात संघाचे कार्य उभारले व त्याचा विस्तार केला. गोरखपुरच्या आसपास तब्बल २५० शाखांचे जाळे नानाजींच्या प्रयत्नामुळे विणले गेले होते.

आणीबाणी नंतर झालेल्या निवडणुकीत बलरामपुर लोकसभा मतदार संघातून नानाजी प्रचंड बहुमताने निवडून आले होते. मोरारजी सरकारमध्ये त्यांना मंत्रीपद देवू केले जे त्यांनी नम्रपणे नाकारले व सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले.

नानाजींनी चित्रकूट प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामविकासाचा नवा अध्याय घालून देत पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानव दर्शनातील तत्वांच्या आधारावर ग्रामविकास करुन दाखविला.



# ६.० सेवा वार्ता - संस्थासाठी महत्वाचे

| Sr. No. | Name of Documents | Mode of Registration | Issuing Authority | Validity |
|---|---|---|---|---|
| 01 | Trust / Society Registration | Online - whenever | Charity Commissioner http://charity.maharashtra.gov. | Ongoing |
| 02 | 80G Certificate | Online and offline through CA | Income Tax, Delhi http://incometaxxindia.gov.in | The 80G registration is valid for a specific period, usually five years. As per government rules it may change |
| 03 | 12A Registration - (institutions and trusts registered before 1996) 12A-registration - (Institutions and trusts registered after 1996) trusts registered after 1996.) | Online and offline through CA | Income Tax, Delhi http://incometaxxindia.gov.in | 12A Registration is valid for a specific period, usually five years As per government rules it may change |
| 04 | Form 10B & 10BE (Donor's list) | Online through CA | Income Tax, Delhi http://incometaxxindia.gov.in | Need to submit every year before 31st May. |
| 05 | NGO Darpan | Online | Ministry of Home Affairs Darpan Portal http://ngodarpan.gov.in | Ongoing |

**ट्रस्ट अपडेट :**

**फॉर्म 10B आणि 10BB भरण्याची मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०२३ ऐवजी ३१ ऑक्टोबर २०२३ केली आहे.**
**तसेच, ITR 7 भरण्याची मुदत तारीख ३१ ऑक्टोबर २०२३ ऐवजी आता ३० नोव्हेंबर २०२३ केली आहे.**
**याचा शासन निर्णय क्रमांक 16/2013 दिनांक १८ सप्टेंबर २०२३ रोजी निघाला आहे. याची कृपया नोंद घ्यावी.**

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह
श्री. विक्रम पंडित - कार्यकारिणी सदस्य
सौ. गिरीजा सिरशीकर - प्रकल्प व्यवस्थापक

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी
श्री. आशिष कुवळेकर
श्री. विनायक करमरकर

सेवावर्धिनी

सेवावर्धिनी
एक विश्वासार्ह सहकारी

# सेवा तरंग 2.0

## सेवा वार्ता

अंक २

२०२३-२४


सेवावर्धिनी

नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम", राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०

कार्यालय: "चंदन" २६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य
 २.१ संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी
 २.२ 'स्व'-रूपवर्धिनी

३. संस्था संचालन – धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित असलेले कायदे व नियमांचे पालन

४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – ग्रीन स्वीच- सोलर ग्रीड

५. सेवाव्रती
 ५.१ स्व. बाबासाहेब देशमुख
 ५.२ स्व. किशाभाऊ पटवर्धन

६. सेवावार्ता - संस्थांसाठी महत्वाचे

# मनोगत

नमस्कार ! पहिल्या अंकाला मिळालेल्या आपल्या उत्स्फुर्त प्रतिसादानंतर आज सेवातरंग पत्रिकेचा दुसरा अंक आपल्याला सादर करताना आम्हास अतिशय आनंद होत आहे. या अंकात आम्ही आपल्याला दोन अशा संस्थांच्या कार्याची ओळख करुन देणार आहोत, ज्यांनी गेल्या तीन चार दशकात सातत्याने आपापले ध्येय डोळ्यासमोर ठेऊन समाजोपयोगी कार्याचा खूप मोठा आदर्श आपल्या समोर ठेवला. ज्या व्यक्तिंच्या अविरत प्रयत्नाने संस्थांचे महान कार्य सिद्ध झाले, अशा दोन भगिरथांची ओळख सुद्धा आपण करुन घेणार आहोत. "दररोज" एक-एक पाउल पुढे टाकत, समस्यांमुळे न थांबता त्यावर मात करुन "थेंबे थेंबे तळे साचे" या उक्तिप्रमाणे हजारो विद्यार्थ्यांचे कल्याण या संस्थांच्या माध्यमातून झालेले आपण आज पहात आहोत. आपणाला यापासून नक्कीच प्रेरणा मिळेल.

या अंकात आपण संस्था संचालनासंबंधीत असलेल्या कायदेशीर पूर्ततेबद्दल ओळख करुन घेणार आहोत. सर्व सेवा संस्थांनी या अतिशय महत्वाच्या विषयाकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन आपली संस्था म्हणून असलेली कायदेशीर जबाबदारी पार पाडणे संस्था चालनाच्या दृष्टीने अनिवार्य आहे. आपल्याला यासंबंधीचा लेख मार्गदर्शक ठरेल. यासंबंधी आपल्याला प्रश्न असल्यास ईमेल द्वारे आम्हास कळवावे म्हणजे पुढील महिन्यात होणा-या आभासी प्रशिक्षणात त्याचा समावेश करता येईल.

नुकतेच सोशल स्टॉक एक्सचेंज मधे पहिल्या सेवासंस्थेची नोंदणी झाली. आपल्या संस्थेला आर्थिक बळ मिळण्यासाठी दाते आणि संस्था यांना जोडणार्या या उपक्रमाची माहिती घेणे आणि त्याबद्दल आगामी काळात आपण प्रयत्न करणे उपयुक्त ठरेल. तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि सेवा संस्था यासंदर्भात विवेचन करणारी माहिती या अंकात दिली आहे. आपापल्या भागातील शिक्षण संस्थांशी संपर्क प्रस्थापित करुन, या योजनेचा सेवा संस्थांनी लाभ घ्यावा.

सेवातरंग पत्रिका आणि प्रशिक्षण या उपक्रमांद्वारे सेवावर्धिनीशी आपला संवाद वाढवत असताना आपणा सर्वांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देत आहोत.

"एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ"

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.१ संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी

### सगरोळी : एक संस्कारक्षम शैक्षणिक संकुल

निजाम राजवटीत होरपळलेल्या ग्रामीण भागातील मुलांना विविध क्षेत्रातील दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी सगरोळी, जिल्हा नांदेड येथे 'संस्कृति संवर्धन मंडळ' हे शैक्षणिक संकुल १९५९ साली सुरु केले. यासाठी राज्यभरातून तज्ञ अध्यापकांची फळी उभारण्यात आली. ३६ मुलींसह सुरु झालेल्या या संस्थेत आजमितीस सहा वसतिगृहात १५०० विद्यार्थी निवासास आहेत; तर एकूण ४५०० विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. त्यातही मुलींची संख्या अधिक आहे, हे विशेष. श्री. छ. शिवाजी हायस्कूल, श्री. छ. शिवाजी प्राथमिक शाळा, सैनिकी शाळा, मिलेनिअम इंग्लिश स्कूल, संस्कृत विद्यालय यासोबतच उच्च माध्यमिक स्तरावर तंत्रशिक्षण तर कृषी व्यवस्थापन महाविद्यालय संकुलात सुरु आहेत. एकूणच १५० एकरच्या विस्तारित संकुलात अंगणवाडी ते पदवी शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दिले जाते. शिक्षणासोबतच कृषी, महिला सक्षमिकरण, कौशल्य विकास व पर्यावरण क्षेत्रात संस्था कार्य करीत आहे.

विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील संधी क्षेत्र पाहून संकुलातील विखुरलेल्या शैक्षणिक उपक्रमांचे पाच गटात वर्गीकरण करत संस्थेतील कार्यकर्त्यांनी एकत्रित चर्चा व शिक्षणतज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेसाठी स्वतंत्र असे 'नवीन शैक्षणिक धोरण' तयार केले आहे. यात शिक्षकांचे उन्नतीकरण, विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण व पायाभूत सुविधांचे नुतनीकरण करण्यात आले. शालेय वेळेचे दोन सत्रात विभाजन करून सकाळच्या सत्रात क्रमिक शिक्षण तर दुपारच्या सत्रात कौशल्य तासिका घेतल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्यास 'एक कौशल्य व एक छंद' यासाठी क्रमिक शिक्षणासोबतच ८ आठवीपासून कृषि, तंत्र, कॉम्पुटर प्रोग्रामिंग, रोबोटिक तंत्रज्ञान, व्यवसाय शिक्षण, इंग्रजी संभाषण हे कौशल्य वर्ग सुरु करण्यात आले. छंद विकसनात गायन, वादन, नर्तन, चित्रकला हे विषय निवडण्यात आले. क्रीडा हे कौशल्याचे एक अंग असल्याने एकलव्य क्रीडा अकादमी उभारुन मैदानी खेळ, फुटबॉल, मल्लखांब, योगाभ्यास, जलतरण, कराटे, बॉक्सिंग आदी क्रीडा प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकांमार्फात देण्यात येते. पाठ्यपुस्तकातील विविध संकल्पना विद्यार्थ्यांना समजाव्यात यासाठी संकुलात ५ एकर जागेवर भूगोल उद्यान, विज्ञान उद्यान उभारण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांची आवड हेरुन त्या क्षेत्रातील भविष्यातील संधीबाबत मार्गदर्शन केले जाते, ज्यायोगे व्यवसाय निवड आणि छंद जोपासणी हे दुहेरी उद्दिष्ट त्यांना साधता येते. विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रकल्पांची देशपातळीवर निवड तर अनेक स्पर्धेतही राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत येथील विद्यार्थी यश मिळवत आहेत, हे याचेच फलित म्हणता येईल. सहा दशकांपासून येथे संस्कारित झालेले हजारो विद्यार्थी आज जगभर विखुरलेले असून ते कार्य करीत असलेल्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.



| क्र. | पुरस्कार | कडून | वर्ष | करिता |
|---|---|---|---|---|
| 1 | वसंतराव नाईक पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | 1989 | वनीकरणातील स्तुत्य काम |
| 2 | वसंतराव नाईक पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | 2001 | ग्रामविकासात कौतुकास्पद काम |
| 3 | रियल हिरो अवार्ड | CNN IBN | 2008 | क्रीडा विकासात कौतुकास्पद काम |
| 4 | सेवा गौरव पुरस्कार | शेठ चिमणलाल मेमोरिअल ट्रस्ट | 2008 | उत्कृष्ट ग्रामीण शिक्षण |
| 5 | Best Village Knowledge Center in India | NASSCOM फौंडेशन | 2009 | गावातील सर्वोत्कृष्ट संगणक साक्षरता केंद्र |
| 6 | ऊर्जा संवर्धन राष्ट्रीय पुरस्कार | MEDA | 2009 | ऊर्जा संवर्धन |
| 7 | वसुंधरा सन्मान पुरस्कार | किर्लोस्कर | 2011 | पर्यावरण संरक्षणात उत्कृष्ट योगदान |
| 8 | भूजल संवर्धन पुरस्कार | भारत सरकार | 2012 | मृदा व पाणी संवर्धनाचे स्तुत्य कार्य |
| 9 | राज्य युवा पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | 2014 | युवक कल्याण |
| 11 | आदर्श शैक्षणिक संस्था अवार्ड | शांभवी मेडिकल संस्था नांदेड | 2017 | शिक्षण क्षेत्रात कौतुकास्पद काम |
| 12 | शिवणकर समिती पुरस्कार | शिवणकर स्मृती प्रतिष्ठान परभणी | 2017 | शिक्षण क्षेत्रात कौतुकास्पद काम |
| 13 | समग्र ग्रामीण विकास पुरस्कार | भारत विकास संस्था | 2018 | ग्रामविकासात कौतुकास्पद काम |
| 14 | महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | 2019 | जलयुक्त शिवार अभियानात प्रथम क्रमांक |

यासोबतच विविध सामाजिक संस्था, प्रतिष्ठान यांच्या वतीने अनेकवेळा पुरस्कार देऊन संस्था कार्यास गौरविण्यात आले आहे.

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.२ 'स्व'- रूपवर्धिनी

स्व-रुपवर्धिनीच्या कामाचा जन्म किशाभाऊ पटवर्धन यांच्या संकल्पनेतून झाला. बुद्धिमान परंतु आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे विकासाची संधी न मिळणाऱ्या गरीब सेवा वस्त्यांमधील मुलांच्या भविष्याचे काय? असा प्रश्न त्यांच्या मनात सदैव होता. ते नेहमी म्हणायचे, "It is the real national wealth, if you attend them. If not, it may turn out to be a national nuisance." डिसेंबर १९७८ मध्ये निवृत्त झाल्यावर १३ मे १९७९ ला आर्थिक सामाजिक कमकुवत समाजघटकातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने 'स्व'-रुपवर्धिनी ची स्थापना केली.

### कार्यपद्धती आणि परिणाम:

आर्थिक, सामाजिक दृष्ट्या उपेक्षित स्तरातील पाचवी सहावी इयत्तेत शिकणाऱ्या मुला-मुलींची निवड बुद्धिमत्ता चाचणी आणि मुलाखती यातून केली जाते. अशा मुलांच्या माध्यमातूनच समाजाला आवश्यक असलेले सर्व क्षेत्रातले नेतृत्व उभे रहावे आणि त्यासाठी निवडक मुलांवर अधिक परिश्रम घेणे गरजेचे आहे या हेतूने ही चाचणी घेतली जाते. स्वरुपवर्धिनी हा शाळेला पूरक असा अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे. निवडलेल्या मुलांच्या सध्या पुण्याच्या वेगवेगळ्या भागात १६ सायंकालीन शाखा चालतात. याच्या माध्यमातून खेळ अभ्यास अशा विषयांचे नियमित शिक्षण घेता घेता विद्यार्थ्याला स्वतःचे खऱ्या क्षमतेचे दर्शन घडावे व त्याचा विकास करण्याचा ध्यास लागावा असे प्रेरणादायी कार्यक्रम हा वर्धीनीचा कामाचा आत्मा आहे. या शाखांमध्ये व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासनासाठी जे अनेक उपक्रम होतात त्यामध्ये व्याख्याने, गटकार्ये, निवासी शिबिरे, साहस सहली, मानसिक विकास बैठक, सामाजिक बांधिलकी रुजवणारें उपक्रम होतात. गेल्या ४३ वर्षांमध्ये वर्धिनीच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, लष्करी पोलीस अधिकारी कर्मचारी, सरकारी अधिकारी, वकील, न्यायाधीश डॉक्टर, राष्ट्रीय/ बहुराष्ट्रीय खाजगी कंपन्यांमध्ये अधिकारी, पत्रकारिता, स्वतंत्र व्यावसायिक अशा क्षेत्रांमध्ये आपली छाप सोडली आहे. याचबरोबर सामाजिक क्षेत्रातही आपले जीवन झोकून दिले आहे.

### आधी बीज एकले :

समाजाच्या विविध प्रशनांवरचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न विविध प्रकल्पांतून केला. एक प्रकल्प सुरु झाला आणि त्यातून आवश्यक असे विषय समोर येत गेले. यातूनच आजचे काम विस्तारलेले दिसून येत आहे. १९८८ साली सेवा वस्त्यांनी वेढलेल्या भूखंडावर 'पाकोळी' नावाची बालवाडी सुरु झाली. यामुळे गरिबीशी झुंजणाऱ्या महिलांशी संपर्क वाढला. त्यांच्या अपेक्षेतून या महिलांसाठी शिवण वर्ग व फॅशन डिझाईनिंग कोर्स सुरु झाला. यातून सुरुवातीला होम नर्सिंग कोर्स व पुढे सहाय्यक परिचारिका वर्ग चालू झाला. यासार्वातून वाढलेल्या संवादामुळे, कुटुंब सल्ला केंद्र, माता-बालक आरोग्य केंद्र, बचत गट, साक्षरता वर्ग असे उपक्रम चालू झाले. आर्थिक बाजूसाठी दिवसभर बाहेर असणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी दिवसा चालणारा 'आजोळ' प्रकल्प सुरु झाला. १९९६ साली पुण्याभोवती असणाऱ्या ग्रामीण भागात आवश्यक अशा फिरत्या प्रयोगशाळा प्रकल्पाची सुरुवात झाली. यावेळी शाळा सोडाव्या लागणाऱ्या आणि १८ व्या वर्षाआधीच लग्न कराव्या लागणाऱ्या ग्रामीण भागातील मुलींचे प्रश्न समोर आले. अशा मुलीना स्वावलंबी आणि गावाचा आधार होण्यासाठी असा सहाय्यक परिचारिका कोर्स पौड- माले आणि वेल्हा-नसरापूर येथे सुरु झाला. शासकीय सेवेत ताठ कण्याने आणि परिणामकारक काम करणारे अधिकारी घडविणाऱ्या स्पर्धा परीक्षा केंद्राची सुरुवात झाली.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुली व महिला जितक्या अधिक संख्येने स्वावलंबी होतील, तितकी घरे सर्व दृष्टीने स्थिर व्हायला मदत होते. हे लक्षात घेऊन चऱ्होली येथे 'कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र' उभे केले असून, इथे नर्सिंग, पॅरा मेडिकल कोर्सेस, शिवण, फॅशन डिझाईनिंग असे अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर दरवर्षी ६०० महिला स्वावलंबी होण्यासाठी सक्षम होतील.

**The selfless service of the trust is honored by the State Government, by felicitating the trust with the following prestigious Awards.**




2018




2016

## रुग्ण सहाय्यक अभ्यासक्रमातील एक यश कथा –
## प्रज्ञा जाळीद्रे

२०१७-१८ ह्या वर्षाची विद्यार्थिनी. प्रज्ञा 37 वर्षांची महिला. सासरच्या छळाला कंटाळून आपल्या दोन मुलांना घेऊन माहेरी आली. उदरनिर्वाह करण्यासाठी एका दुकानात काम करत होती. तेथेच तिला नर्सिंग कोर्स बद्दल कळाले. तिने नर्सिंग वर्गाला प्रवेश घेतला. वर्धिनी मध्ये होणारी प्रेरणादायी व्याख्याने व सतत प्रोत्साहन देणारे शिक्षक ह्यामुळे तिच्या मध्ये कमालीचा बदल झाला. आता प्रज्ञा बारामती येथे महाजन हॉस्पिटल मध्ये काम करत आहे. तिच्या नवऱ्याला आता तिचा अभिमान वाटतो. त्याने दारु देखील सोडली आहे. तोही कामाला जायला लागला. तिचा सासरी होणारा छळ बंद झाला. प्रज्ञा म्हणते नर्सिंग वर्ग पूर्ण केल्यामुळे माझा संसार आता सुखाचा झाला आहे





## स्पर्धा परीक्षा केंद्रातील एक यशकथा –
## प्रेमकुमार दांडेकर (२०१६-१७ सालच्या शिष्यवृत्ती बॅचचा विद्यार्थी)

मूळ श्रीगोंद्याचा. घरची अत्यंत गरिबीची परिस्थिती परंतु स्वप्न होते शासकीय अधिकारी होण्याचे. पदवी नंतर संस्थेच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या शिष्यवृत्ती तुकडीत निवड झाल्याने स्पर्धा परीक्षा तयारीचे सर्व शिक्षण पूर्ण फी माफ योजनेत त्याने पूर्ण केले. PSI म्हणून निवड झाली आणि पहिलेच पोस्टिंग मिळाले ते गडचिरोली सारख्या आव्हानात्मक क्षेत्रात. ३ वर्षापूर्वी पोलिसांनी एका जंगलामध्ये अत्यंत धोकादायक असणा-या काही नक्षलवादी अतिरेक्यांना वेढा घातला होता. यातील एका तुकडीचे नेतृत्त्व प्रेमकुमार करीत होता. प्रेमकुमारने या प्रसंगी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता मोस्ट वॉंटेड यादीत असलेल्या तीन नक्षलवाद्यांना ठार केले. त्याच्या या शोर्याबद्दल अलिकडेच राष्ट्रपती शोर्य पुरस्कार त्याला जाहीर झाला आहे. त्याने त्याचे हे श्रेय अतिशय नम्रपणे वर्धीनीत त्याची जी जडणघडण झाली त्याला दिले.

संस्थेच्या सर्वच विभागात अशा यश कथा आहेत आणि लिहिता येतील...







शिरीष पटवर्धन,
उपाध्यक्ष
स्व-रूपवर्धिनी, २२/१ मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११
मोबाईल – ९८२२ ६७५७ ६५
इमेल – wardhinee@gmail.com

# ३.० संस्था संचालन

## धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित असलेले कायदे व नियमांचे पालन

### सामाजिक संस्थांसाठी असलेले Compliances

नोंदणीकृत न्यासाच्या विश्वस्तांवर ते विश्वस्त म्हणुन काम करत असताना कयद्यान्वये म्हणजेच, संस्था नोंदणी कायदा १८६० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये कायदेशीर बाबींची पुर्तता करावी लागते व एखादा विश्वस्त कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यास चुकला तर अशा विश्वस्ताला, मा. धर्मादाय कार्यालयातुन दंडाची अगर गंभीर प्रकरणात फौजदारी कारवाई होवु शकते. त्यामुळे खाली नमुद केलेल्या कलमांप्रमाणे विश्वस्तांनी कायदेशीर बाबींची पुर्तता केल्यास विश्वस्तांवर करवाई होण्याची शक्यता टाळता येऊ शकते व विश्वस्तांवर अशी वेळ येऊ नये याकरीता खाली नमुद केल्याप्रमाणे नोंदणीकृत न्यासांना कराव्या लागणा-या कायदेशीर बाबींची पुर्तता येणे प्रमाणे: -

| क्र. | कलम (सेक्शन) | करावयाच्या पुर्तता |
|---|---|---|
| १ | कलम २२ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० | न्यासाचे परिशिष्ट -१ (Schedule -1) मध्ये असलेल्या रकान्यामध्ये काही बदल झाल्यास तो बदल मा. सहायक/ उपधर्मादाय आयुक्त यांचेकडे लेखी स्वरुपात नियम १३(१) मध्ये नमुद केलेल्या स्वरुपामध्ये दाखल करावा लागतो. असा बदल हा ९० दिवसात दाखल करावा लागतो. ९० दिवसात दाखल न झाल्यास विलंब माफीचा अर्ज दाखल करुन बदल अर्ज दाखल करावा लागतो. |
| २ | कलम ३१ ए | अन्वये ज्या न्यासाचे उत्पन्न निर्धारीत रकमेपेक्षा जास्त आहे, अशा न्यासांना वार्षिक अंदाजपत्रक दाखल करावे लागते. |
| ३ | कलम ३२ | कलम ३२ अन्वये न्यासाला त्यांचे उत्पन्न व खर्चाचा हिशोब ठेवावा लागतो. म्हणजेच न्यासाला अकाउंटच्या नियमाप्रमाणे खतावण्या, लेजर बुक रीसीटस, व्हाउचर्स इ. राखाव्या लागतात. |
| ४ | कलम ३३ | आपल्या ठेवलेल्या सर्व हिशोबाच्या वह्या, सी.ए. ला देउन त्यांचेकडुन ऑडीट तयार करुन घ्यावे लागते. ऑडीट रीपोर्ट हा ३१ मार्चपर्यंत तयार करुन घेउन तो ६ महिन्याचे आत मा.धर्मादाय कार्यालयामध्ये दाखल करणे अनिवार्य आहे. ऑडीट रीपोर्ट दाखल करण्यास विलंब झाल्यास विलंबाचे कारण देऊन ऑडीट रीपोर्ट दाखल करता येतो. मात्र विलंब झाल्यामुळे दंडाची रक्कम भरुन ऑडीट रीपोर्ट दाखल करुन घेतात. |

| क्र. | कलम (सेक्शन) | करावयाच्या पुर्तता |
|---|---|---|
| ५ | कलम ३४ | ऑडीटरने ऑडीट रीपोर्ट ऑनलाइन दाखल करावा लागतो. विश्वस्तांनी ऑडीट रीपोर्टची ऑनलाइन आलेली पोहोच (Acknowledgement) धर्मादाय कार्यालयातुन घ्यायची असते. |
| ६ | कलम ३५ | न्यासाकडे शिल्लक असलेली रक्कम न्यासाच्या उद्दीष्टांकरता वापरणे शक्य नसेल तर अशी शिल्लक रक्कम एखाद्या नॅशनलाइजड बँकेत अथवा शेड्युल बँकेमध्ये एफ. डी. चे स्वरुपात ठेवावी लागते. |
| ७ | कलम ३६ | न्यासाची स्थावर मिळकत ही मा. सहधर्मादाय आयुक्त यांचे पुर्वपरवानगी शिवाय विकता येत नाही. |
| ८ | ३६ए (३) | मा. सह धर्मादाय आयुक्त यांचे पुर्व परवानगीशिवाय न्यासाची स्थावर मिळकत कोणत्याही बँकेकडे तारण ठेवुन कर्ज घेऊ शकत नाही. |
| ९ | ३६ बी | न्यासाने स्थावर मिळकती, जंगम मिळकती, डेड स्टॉक रजिस्टर तयार करुन त्यामध्ये त्याची नोंद करावी लागते. आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३ महिन्याचे आत त्यामध्ये झालेल्या बदलाची नोंद करुन अशी रजिस्टर्स अद्यावत ठेवावी लागतात. अशा रजिस्टरवर सगळ्या विश्वस्तांच्या अगर एखाद्या विश्वस्तास तसा अधिकार दिला असल्यास त्या विश्वस्ताने त्यावर सही करावी लागते. |

अशी एकूण ८० कलमे आहेत. त्यातील प्रमुख कलमांचा उल्लेख वर केला आहे.
सेवावर्धिनीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रकाशित केलेल्या स्मरणिकेतही यावर विस्तृत लेख आहेच.
अधिक माहितीसाठी आपण सेवावर्धिनीशी संपर्क करु शकता.

# ४.० ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – ग्रीन स्वीच – सोलर ग्रीड

## प्रकल्पाची पार्श्वभूमी

सोलर ग्रीड या प्रकल्पाची रचना रायगड जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांसाठी करण्यात आली होती. रायगड जिल्ह्यातील या आदिवासी वाड्यामध्ये स्वातंत्र्यापूर्वीपासून आजपर्यंत वीज पुरवठा झालेला नाही. अशा वाड्यामध्ये सोलरच्या माध्यमातून वीज पुरवठा करण्यासाठी या प्रकल्पाची रचना केली. यामध्ये पेण तालुक्यातील सुळेवाडी, खालापूर तालुक्यातील अरकसवाडी – पिरकडवाडी, उंबरणेवाडी, इरशाळवाडी या पाच वाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. या पाच वाड्यांमध्ये लोकांना आज ही प्रकाशासाठी रॉकेलचे दिवे अथवा घरगुती प्रकाश यंत्रणेवर अवलंबून रहावे लागत होते. ग्रामस्थांची होणारी अडचण लक्षात घेऊन गावात दीर्घकाळ व शाश्वत विद्युत पुरवठा व्हावा यासाठी सौर उर्जेवर आधारित सामुहिक सौर ग्राम विद्युत प्रकल्प राबविला गेला. सदर प्रकल्प संपुर्ण गावाकरिता असून विद्युत पोल द्वारे गावातील घरांना त्याचे वितरण केले आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्येक गावामध्ये त्यांची स्वतंत्र एक सोलर सिस्टम युनिट उभारण्यात आली आहे. प्रत्येक घरामध्ये एक मीटर आणि सर्व वायरिंग करण्याचे काम या प्रकल्पाच्या माध्यमातून केले.



## प्रकल्पाची कार्यपध्दती: -

१) ग्रामस्थांशी संवाद
२) ग्रामस्थांची स्थानिक समिती - सौर उर्जा समिती
३) गावाच्या अपेक्षेप्रमाणे प्रकल्पाची रचना
४) MSECB प्रमाणे वितरण व विजेचे मापन
५) वीज वापराचा दर निश्चिती
६) सामुहिक जबाबदारीतून व्यवस्थापन

या कार्यपध्दतीनुसार सर्व वाड्यांमधील काम पूर्ण करुन घेण्यात आले आणि प्रकल्पाचे व्यवस्थापन आणि संचालन करण्याचे काम हे त्या - त्या वाडीमधे स्थापन केलेली सौर ऊर्जा समिती करते.




## प्रकल्पाचे कार्य :-

| क्र. | गावाचे / वाडीचे नाव | लाभार्थी कुटुंब संख्या | लाभार्थी लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सुळेवाडी ता. पेण | २३ | ९४ |
| २ | अरकसवाडी - पिरकडवाडी ता. खालापूर | ३२ | १९२ |
| ३ | उंबरणेवाडी ता. खालापूर | ३७ | १७० |
| ४ | इरशाळवाडी ता. खालापूर | ३७ | २०२ |
| | एकुण | १२९ | ६५८ |

## प्रकल्पामुळे झालेले दीर्घकालीन फायदे :-

१) फ्रीज, पीठ गिरण या सारख्या साधनापासून उत्पन्न मिळून आर्थिक मदत होण्यास सुरुवात झाली आहे.

२) केरोसीन आणि सरपण (लाकूड) वापर कमी केल्यामुळे हवेचे प्रदूषण कमी झाले तसेच कार्बन उत्सर्जन कमी झाले आहे.

३) मुलांना अभ्यासासाठी वेळ मिळतो व मुले हे आधुनिक पद्धतीने शिक्षण घेत आहेत असे दिसून येत आहे.

४) या वाड्या / वस्त्या या मुळात जंगल भागात असल्याने या भागात वस्ती / वाडीमध्ये देखील फिरताना त्या वस्ती / वाडीमधील व्यक्तींना भीतीच्या वातावरणात राहावे लागत होते ते प्रमाण कमी झाले आहे.

५) जंगल भाग असल्याने वस्ती मध्ये जंगली प्राणी येण्याचे प्रमाण जास्त होते ते कमी झाले आहे.

६) महिलांना त्यांच्या रोजच्या दिनक्रमामध्ये विजेचा वापर होत असल्याने त्यांच्याकडे वेळ हा शिल्लक राहत आहे आणि त्यामुळे त्यांना इतर काही कामे करण्यासाठी त्या वेळेचा सदुपयोग हा त्या महिला करत आहेत.

७) घरातील सर्वांचे राहणीमान फरक दिसून येत आहे.




देश स्वतंत्र झाला आणि शासनाची नाही तर सेवाभावी संस्थेची ७५ वर्षांनी आदिवासींना मिळाली वीज






७५ वर्षानंतर आदिवासी बांधवांना विद्युत पुरवठा

# ८.० सेवाव्रती

## “८.१ स्व. बाबासाहेब देशमुख”



### कर्मयोगी बाबासाहेब : एक समाजव्रती जीवन

दारिद्र्याचे मुळ कारण म्हणजे अशिक्षित समाज, दारिद्र्याचे पूर्णतः उच्चाटन करावयाचे असल्यास समाजातील अंतिम घटकापर्यंत शिक्षणाचे महत्व समजावून शिक्षण व्यवस्था उभी करणे गरजेचे असल्याचे कर्मयोगी के.ना. तथा बाबासाहेब देशमुख यांनी जाणले होते. महाराष्ट्र व तेलंगणाच्या सीमेवरील नांदेड जिल्ह्यातील सगरोळी या गावचे बाबासाहेब हे जमीनदार. सगरोळी परिसर हा निझामाच्या अधिपत्याखाली असल्याने स्वातंत्र्यानंतर येथे शिक्षणाचा कुठलाही गंध नव्हता, त्यात मुलीच्या शिक्षणाचा कुणी विचारही करीत नसे. बाबासाहेबांची मुलगी जिल्हा परिषदेच्या शाळेतून चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणसाठी पुणे गाठले. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये महर्षी धोंडो केशव कर्वे यांची भेट झाली. बाबासाहेब कर्वे यांचे कार्य पाहून प्रेरित झाले व सगरोळी येथे स्वतःची दीडशे एकर जमीन दान करुन सन १९५८ साली संस्कृति संवर्धन मंडळाची मुहूर्तमेढ रोवली.

ज्याकाळी मुलींना घरातून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य नव्हते तेंव्हा बाबासाहेबांनी संकुलात ३६ मुलींसह निवासी वसतिगृह सुरु केले. अत्यंत गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण घेता यावे यासाठी उत्तम अध्यापकांची फळी उभारली. कृतियुक्त शिक्षण पद्धतीवर बाबांचा प्रचंड भर होता. कला, क्रीडा, तंत्र, संस्कृत विद्यालय, सैनिकी विद्यालय हे विभाग त्यांनी सुरु केले. अनाथ मुलांसाठी आनंद बालग्रामची सुरुवात केली. विविध क्षेत्रात नावाजलेल्या व्यक्तींच्या भेटी घेऊन संस्था कार्याचा परिचय करुन देत त्यांना या कार्यात सामावून घेऊन अतिदुर्गम अशा संकुलात बोलावले. संपर्क व दळणवळणाच्या मर्यादित सुविधेतही जनसंपर्क वाढवला आणि विचारांचे आदान प्रदान शक्य झाले. मराठवाड्यातील ही पहिले शिक्षण संकुल जिथे अनेक शिक्षणतज्ञ, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी यांनी भेटी दिल्या.

बाबासाहेबांचे व्यवस्थापन कौशल्य हे अजोड होते. धार्मिक व वैचारिक अधिष्ठान, अलौकिक स्मरणशक्ती, प्रत्येक बाबींचा बारकाईने अभ्यास, योग्य व्यक्तीची निवड, काम पूर्ण करण्याची सचोटी, निधी उभारणी आणि त्यात आपल्या

सोबतच्या सहकाऱ्यांना पारंगत करण्याचे कसब बाबांकडे होते. शिक्षणानंतर त्यांनी गरजेनुसार जलसंधारण, कृषी, कौशल्य विकास अशा अनेक उपक्रमांची सुरुवात केली. सन १९९६ साली सैनिकी विद्यालयाची सुरुवात करुन परिसरातील युवकांना सैनिकी शिक्षणाची संधी दिली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी प्रतिष्ठानची स्थापना करून शेतीतील नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोंचविले. त्याची दाखल घेऊन सन २०११ साली भारत सरकारने नांदेड जिल्ह्यासाठी कृषी विज्ञान केंद्राची मान्यता दिली. आज लाखो शेतकरी या केंद्राशी जोडले आहेत. आज दोनशे एकर संकुलात चार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रीय व राज्य पुरस्काराने गौरविण्यात आले. समाजासाठी अहोरात्र झटणारे बाबासाहेब "कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती" या उक्तीनुसार जगले. बाबासाहेबांनी दि. १६ ऑगस्ट २००४ रोजी आपला देह ठेवला. त्यांनी 'माझी अंतिम इच्छा' लिहिलेल्या मृत्युपत्रात कुठलाही बडेजाव व खर्च न करता अगदी साधेपणाने अंतिम संस्कार करावेत असे लिहिले होते. बाबासाहेबांना अनेकजण आपल्यानंतर संस्थेचे पुढे काय होईल? असा प्रश्न करीत असत, बाबासाहेब त्यांना "माझ्यानंतर संस्थेचे काय होईल? याचा काथ्याकूट करणाऱ्याने खुशाल करावा, मला याची यत्किंचितही चिंता नाही", कारण माझे सहकारी माझ्यापेक्षाही अधिक चांगले काम करतील याचा मला विश्वास आहे असे म्हणत असत. आजघडीस संस्थेची प्रगती पाहिल्यास पुढील पिढी व कार्यकर्ते बाबासाहेबांच्या विश्वासास पात्र ठरली आहेत हे दिसून येते.

| | पुरस्कार | कडून | वर्ष | करिता |
|---|---|---|---|---|
| 1 | दलित मित्र पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | 1985 | सामाजिकदृष्ट्या वंचितांच्या उत्थानाचे कौतुकास्पद कार्य |
| 2 | इंदिरा प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कार | भारत सरकार | 1992 | पडीक जमीन विकास आणि वनीकरणात कौतुकास्पद काम |
| 3 | सानेगुरुजी बालसेवा पुरस्कार | अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला | 1992 | बाल कल्याण मध्ये प्रामाणिक काम |
| 4 | राष्ट्रीय बाल कल्याण पुरस्कार | भारत सरकार | 1994 | बाल कल्याण |
| 5 | FIE फौंडेशन पुरस्कार | FIE फौंडेशन | 1997 | सामाजिक कल्याण |
| 6 | इंडियन मर्चंट प्लातीनाम ज्युबली पुरस्कार | Indian Merchants Chamber | 1998 | सामाजिक उन्नती आणि रोजगार निर्मितीमध्ये प्रशंसनीय कार्य |
| 7 | महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | 2000 | संस्कृत शिक्षणाचा प्रसार |

# “८.२ स्व. किशाभाऊ पटवर्धन”

## कै. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन



स्व-रुप वर्धीनीच्या कामाचा जन्म किशाभाऊ पटवर्धन यांच्या संकल्पनेतून झाला. मुळचे मुंबईचे असलेले किशाभाऊ वडिलांच्या निवृत्तीनंतर १९३४-३५ च्या सुमारास कुटुंबासहित पुण्यात माडीवाले कॉलनी मध्ये आले. याच दरम्यान शंकरराव कानिटकरांनी स्थापन केलेल्या मॉडर्न हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला. लहानपणापासून संघाच्या शाखेत जाणा-या किशोर भाऊ पटवर्धन यांच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्वाचे गुण होते. त्यामुळे शाळेत असतानाच त्यांनी आपल्या अनेक मित्रांना संघ शाखेची गोडी लावली होती. इंटरच्या शिक्षणानंतर विस्तारक म्हणून काही काळ खेड-राजगुरुनगर येथे होते. या काळात केलेल्या कामामुळे संपर्कामुळे त्यांच्या मनात संघाचा प्रचारक म्हणून जाण्याचा विचार दृढ होऊ लागला. पदवीचे शिक्षण पूर्ण करुन कुशाभाऊ संघाचे प्रचारक म्हणून बाहेर पडले. धुळे-चाळीसगाव या भागांमध्ये सहा वर्षे प्रचारक म्हणून संघाच्या कामाचा खुप प्रसार केला. महात्मा गांधी यांच्या दुर्दैवी हत्येनंतर संघावर बंदी आली आणि या काळात बंदी विरुद्ध झालेल्या सत्याग्रहामुळे काही महिने तुरुंगवास भोगावा लागला. १९५१ मध्ये पुण्यात परत आल्यानंतर राजा धनराज गिरजी महाग विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरीला लागले. शिक्षकी पेशात स्थिर होत असतानाच आपल्या पत्नी सौ लीलाताई यांच्या मदतीने किशा भाऊ व्यक्तिगत जीवनात स्थिर होण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळवण्यासाठी सिद्ध झाले. गुऱ्हाळ चालवण्यापासून आंबे विकणे, प्रसाद मासिकाचे सदस्य वाढवणे, शेअर्स अशा वेगवेगळ्या माध्यमातून कष्ट करत होते.

हे सर्व करीत असताना शिक्षक म्हणून त्या अत्यंत जागृत आणि सक्रिय होते व्यक्तिगत संवाद आणि संपर्कातून त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा दाखवली. शिक्षण क्षेत्राची मनापासून केले की किशाभाऊ संघातील त्यांचे एक ज्येष्ठ सहकारी आप्पा पेंडसे बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी सुरुवात करीत असलेल्या नव्या शिक्षण प्रयोगाकडे आकृष्ट झाले. ज्ञानप्रबोधिनी या नावाने सुरु झालेल्या या संस्थेच्या स्थापनेपासून किशाभाऊ या कामात सक्रिय झाले. पुढे संस्थेचे जनसंपर्क अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले. बुद्धिमान मुलांसाठी केलेल्या विशेष प्रयत्नातून नेतृत्व कसे विकसित होते; याचा किशाभाऊ स्वतः ज्ञान प्रबोधिनीच्या कामातून अनुभव घेत होते. मुख्याध्यापक म्हणून ते ज्या शाळेत होते त्या आर.डी, शाळेतील बुद्धिमान परंतु आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे विकासाची संधी न मिळणाऱ्या गरीब सेवा वस्त्यांमधील मुलांच्या भविष्याचे काय? असा प्रश्न त्यांच्या मनात सदैव होता. ते नेहमी म्हणायचे, “It is the real national wealth, if you attend them. If not, it may turn out to be a national nuisance.” डिसेंबर १९७८ मध्ये निवृत्त झाल्यावर १३ मे १९७९ ला आर्थिक सामाजिक कमकुवत समाजघटकातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने 'स्व'-रुपवर्धिनी ची स्थापना केली. ज्या मुलांमध्ये विशेष चमक आहे, अशा मुलांची निवड करुन औपचारिक शालेनान्तारची ही आगळीवेगळी शाळा सुरु केली. ३६५ दिवस चालणाऱ्या या शाळेत सुरुवातीला फक्त १२ मुले होती. आज पुण्यात १६ ठिकाणी चालणाऱ्या या शाळेत शेकडो मुलं मुली येत आहेत.

याबरोबरच, बालवाडी, गरजू महिलांसाठी उद्योग शिक्षण वर्ग, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी फिरती प्रयोगशाळा, शासनात अधिकारी होण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केंद्र असे अनेक प्रकल्प सुरु केले. निवृत्ती नंतर, संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षापर्यंत किशाभाऊ पटवर्धन प्रचंड उर्जेने कार्यरत होते. २००४ साली वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांचे दुख:द निधन झाले.

# ६.० सेवावार्ता – संस्थांसाठी महत्वाचे

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 व सेवाभावी संस्था :

२००९ सालापासून युनेस्कोच्या विविध आंतरराष्ट्रीय संमेलनातून उच्च शिक्षण व सामाजिक जबाबदारी यावर विचार मंथन चालू आहे. आंतरराष्ट्रीय समूहाला भेडसावणाऱ्या अन्नसुरक्षा, पर्यावरणातील बदल, पाणी व्यवस्थापन, अपारंपरीक ऊर्जा, सार्वजनिक आरोग्य, आणि विविध सांस्कृतिक समूहामधील सुसंवाद यासारख्या विषयांवर उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व शिक्षक संशोधन, शिक्षण व समाजात उतरून प्रत्यक्ष कामाद्वारे खूप काम करू शकतात. शिक्षण, समजाची सहभागीता आणि उच्च शिक्षण संस्था व विद्यार्थी यांचे समाज परिवर्तनातील योगदान हेच यातून अधोरेखित होते. आंतरराष्ट्रीय शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या 2030 पर्यंत साध्य करण्याच्या प्रतिबद्धतेसाठी भारतही कटिबध्द आहे. 17 शाश्वत विकासाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. उद्योगांचा सामाजिक दायित्व निधी(CSR) देताना या शाश्वत विकास उद्दिष्टांवरच प्रामुख्याने भर दिला जातो.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ठरविताना याच गोष्टींचा विचार करण्यात आला आहे. सामाजिक प्रश्नांची जाण असणारा, धैर्यशील, तर्कसंगत विचार करणारा तरीही लवचिक, सृजनशील व कल्पक आणि सामाजिक नीति व मूल्यांविषयी श्रद्धा असणारा असा माणूस घडविणे हे या नवीन धोरणाचे ध्येय आहे. सामाजिक जबाबदारी आणि समाजाची सहभागीता व उच्च शिक्षण संस्था आणि त्यातील विद्यार्थी यांची योग्य सांगड यात घातली आहे. समाजातील पारंपारिक ज्ञान व उच्च शिक्षण या दोघांच्या समन्वयातूनच सामाजिक जबाबदारी व समाजा च्याया सहभागिताचे उद्दिष्ट साध्य होणार आहे.

सामाजिक प्रश्नांवर विद्यार्थ्यांनी विचार करावा, संशोधन करावे, व समाजाला बरोबर घेऊन उपाय योजना आखाव्यात यावर नवीन शैक्षणिक धोरणात भर देण्यात आला आहे. अशा कामासाठी काही गुण (क्रेडिट पॉईंट्स) देण्यात आले आहेत. शिक्षकांसाठीही असे क्रेडिट पॉईंट्स देण्याची यात सोय आहे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी स्थानिक सेवासंस्थांची जाणीवपूर्वक व दीर्घकालीन संबंध प्रस्थापित करावे असे यात अधोरेखित करण्यात आले आहे. स्थानिक सेवा संस्था (NGOs) यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील वरील उद्दिष्टे लक्षात घेता आपापल्या परिसरातील कॉलेज विद्यार्थी व प्राध्यापक यांना सेवा कार्याशी सेवा संस्थांनी जोडून घ्यावे. आपण कोणत्या प्रश्नावर काम करत आहोत, त्यात कोणत्या अडचणी आहेत, कोणती चॅलेंजर्स आहेत यावर त्यांच्याशी सविस्तर चर्चा करावी व त्यांना प्रत्यक्ष कामात सहभागी कसे करता येईल याची योजना तयार करावी. क्रेडिट पॉइंट्स मिळवण्यासाठी किती तास त्यांना काम करणे गरजेचे आहे हे कॉलेज प्राध्यापकांची चर्चा करून ठरवावे व आपल्या संस्थेत काम करायला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कामाचे नियोजन करावे. अशा प्रकारे दरवर्षी तरुणांना आपल्या कामाशी जोडता येऊ शकते. याचा सर्वांनी सर्व सेवा संस्थांनी लाभ घ्यावा.

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन – कार्यवाह

श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर – प्रकल्प व्यवस्थापक

आमोद काटीकर – प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी

# सेवा तरंग 2.0

# सेवा वार्ता

अंक ३

२०२३-२४

सेवावर्धिनी
नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम" , राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०
कार्यालय: "चंदन"२६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य
 २.१ पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन, पुणे
 २.२ जनाधार सेवाभावी संस्था, लातूर

३. संस्था संचालन – सामाजिक संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन

४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – स्वावलंबन अभियान

५. सेवाव्रती
 ५.१ संत गाडगे बाबा
 ५.२ बिंदेश्वर पाठक

६. सेवावार्ता – सेवा संस्थांसाठी महत्वाचे

# मनोगत

नमस्कार. पहिल्या दोन अंकांना मिळालेल्या आपल्या उत्स्फुर्त प्रतिसादानंतर आज सेवातरंग पत्रिकेचा तिसरा अंक आपल्याला सादर करताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

या अंकात आम्ही आपले लक्ष एका अशा विषयाबद्दल वेधणार आहोत की जो विषय शहर असो की खेडेगाव, शाळा असो की कॉलेज, आपले घर असो की आजू बाजूची वस्ती, परसबाग असो की सार्वजनिक बाग थोडक्यात जिथे तिथे सर्वत्र आपल्याला दिसतो, त्याचा त्रासही आपण सर्व सहन करतो तो विषय म्हणजे "कचरा". आपणा सर्वांना याबाबत स्वतःला खूप काही करता येणं शक्य आहे. मुळातच कचरा कमी करणे. घर व परिसर स्वच्छ करणे हे खरे म्हणजे नुसते बोलण्यापेक्षा आपल्याच हातात जास्त आहे.

आज या अंकात अशा दोन सेवाभावी संस्थांची माहिती करून घेणार आहोत ज्यांनी कचऱ्याच्या व त्याच्याशी निगडीत व्यक्तिंच्या समस्यांशी सामना करत प्रचंड मोठे काम करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. त्याच बरोबर सार्वजनिक स्वच्छतेविषयी स्वतःला झोकून देऊन आयुष्यभर कार्य करणारे संत गाडगे बाबा महाराज व डॉ. विश्वंभर पाठक या दोन महान व्यक्तिंच्या कार्याची ओळख करून घेणार आहोत. या संस्था व व्यक्तिंचे कार्य आपणाला प्रेरणा देईल याचा विश्वास वाटतो. आपल्याच आजूबाजूला करण्यासारख्या खूप गोष्टी असतात, कचरा निर्मूलन, कचरा व्यवस्थापन, खत किंवा बायो गॅस निर्मिती, अशा. कितीतरी आपण स्वतः याबाबत काय करु शकतो याचा विचार आपल्या मनात आल्यास व त्याप्रमाणे कृती आपल्या घरापासून वा संस्थेपासून प्रत्यक्षात सुरु केल्यास या अंकाचे खरे सार्थक होईल.

या अंकात 'स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन' या महत्वाच्या घटकाची आपण ओळख करून घेणार आहोत. सर्व सेवा संस्थांनी या अतिशय महत्वाच्या विषयाकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन कृती करण्यासाठी यासंबंधीचा लेख मार्गदर्शक ठरेल. खूप चांगली कामे, किंवा कामाची संधी वा देणगीदार वगैरे सर्व असूनही केवळ आर्थिक नियोजनाकडे दुर्लक्ष झाल्याने संस्थेचा पूर्ण गाडाच थांबू शकतो. याबद्दल तज्ञांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. या अंकातील लेखाचा सखोल अभ्यास करून आपल्याला आर्थिक नियोजना बद्दल काय करायला पाहिजे याचा आढावा प्रत्येक संस्थेने घ्यावा अशी कळकळीची विनंती आहे. या विषयासंबंधी आपल्याला काही प्रश्न असल्यास ईमेल द्वारे आम्हास कळवावे म्हणजे पुढील महिन्यात होणाऱ्या आभासी प्रशिक्षणात त्याचा समावेश करता येईल.

सेवावर्धिनीच्या स्वावलंबन अभियान या प्रकल्पाची ओळख या अंकात आपल्याला करून देणार आहोत. बेकारी निर्मूलन या विषयावर आपण सर्वांनी मिळून एकत्रितपणे काय काम करता येईल याचा विचार व्हावा. आता २७ मार्चला होणाऱ्या कार्यशाळेत आपण भेटणार आहोतच तेंव्हा यावर अधिक सखोल चर्चा होईल.

"एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ"



कचऱ्यातून खतनिर्मिती

सहयोगी सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांना जोडून नवनवीन प्रकल्पांची आखणी करून सरकारी यंत्रणांच्या ग्रँट मिळविण्यासाठी लिहिले आणि सादर केले जातात.

या मुख्य प्रकल्पांना जोडून शाळा-कॉलेज, सोसायटी आणि कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये कचरा व्यवस्थापनाविषयी जनजागृतीपर सत्रे आणि व्याख्याने घेतली जातात. कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी लोकांचा सहभाग वाढणं ही सध्याची गरज आहे. अनेक जागरूक नागरिक ह्या सर्व प्रकल्पांमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी होतात आणि त्यांच्या ओळखीतल्या आणखी लोकांना किंवा स्वतःच्या सोसायटीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना या विषयाबद्दल सजग करतात. अनेक लोक दाते म्हणून संस्थेच्या कामाला देणगी देऊन त्यांचा सहभाग नोंदवतात. माणसांबरोबरच अनेक संस्था आणि कॉर्पोरेट कंपन्या वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये जोडल्या जातात त्यांच्या सहयोगातून पर्यावरण संवर्धनासाठी केले जाणारे कार्य अधिक विस्तारते.

पुढील वाटचालीतही अनेक जण या कामाशी जोडले जातील आणि कार्यक्षेत्राची कक्षा रुंदावेल.

**– डॉ. राजेश मणेरीकर,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.१ पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन, पुणे

शहरी भागात वाढती लोकसंख्या, बदलती जीवनशैली आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे कचरा खूप प्रमाणात निर्माण होतो. पुण्यासारख्या शहरात लोकवस्तीमुळे कचऱ्याची समस्या निर्माण झालेली आहे. याच कचऱ्याच्या सुयोग्य व्यवस्थापनाचा आणि त्यायोगे पर्यावरण संवर्धनाचा विचार करून 'पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन' ही संस्था स्थापन झाली.

### कचऱ्याच्या सुयोग्य व्यवस्थापनातून पर्यावरण संरक्षण

शहर आणि ग्रामीण भागातील 'घनकचरा व्यवस्थापन' म्हटलं की, स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी समजली जाते आणि त्यासाठी योग्य ती यंत्रणा त्यांच्या मार्फत उभारली देखील जाते. परंतु याला जोड म्हणून सामाजिक संस्थांचा हातभार आणि नागरिकांचा सहभाग मिळाला तर त्या यंत्रणेला यश मिळते. वाढत्या कचऱ्याची समस्या सगळीकडे आहेच पण सुयोग्य व्यवस्थापनातून ती सोडवता येऊ शकते. सर्व भागधारकांच्या एकत्रित प्रयत्नांतून कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे शक्य आहे.

घनकचऱ्यामध्ये विविध घटक समाविष्ट असतात. कचऱ्याच्या प्रकारानुसार त्याच्या विल्हेवाटीचा उपाय बदलतो. सर्वसाधारणपणे ओला कचरा आणि सुका कचरा किंवा विघटनशील आणि अविघटनशील असे कचऱ्याचे मूलभूत प्रकार पडतात. अविघटनशील कचऱ्यामध्ये कागद, प्लास्टिक, ई-कचरा, धातू, रबर इत्यादी वस्तू असतात तर विघटनशील कचऱ्यामध्ये स्वयंपाकघरातील कचरा समाविष्ट होतो. विघटनशील कचऱ्यापासून अर्थात ओल्या कचऱ्यापासून खत किंवा बायोगॅस बनविता येतो. अविघटनशील कचऱ्यामधील बरेचसे घटक हे वेगळे जमा केल्यास रिसायकलिंगकरिता जाऊ शकतात.

पूर्णम इकोव्हीजन फाऊंडेशन ही कंपनी कायदा सेक्शन ८ अंतर्गत नोंदणीकृत संस्था असून कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण या क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेअंतर्गत ई-यंत्रण, परिपूर्णम, ग्रीन कन्सल्टन्सी आणि पी-केअर हे प्रकल्प चालतात. ई-यंत्रण मध्ये ई-कचरा संकलन, पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण याविषयी तर परिपूर्णम मध्ये जुने कपडे संकलन आणि अप-सायकलिंगचे काम केले जाते. याविषयी विविध स्तरांवर जनजागृतीचे काम संस्थेमार्फत केले जाते. ग्रीन कन्सल्टन्सीद्वारे विविध स्तरांवर कंपोस्ट खत निर्मिती, पर्जन्य जलसंधारण प्रकल्प आणि बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारणी व देखभाल-दुरुस्तीचे तसेच शहरी अथवा ग्रामीण भागात कचरा व्यवस्थापनासाठीच्या रचनेचा आराखडा आणि प्रत्यक्ष यंत्रणा उभारणीसाठी मदत असेही काम केले जाते. पर्यावरण आणि कचरा व्यवस्थापन विषयामध्ये संशोधन आणि विविध स्तरांवर जनजागृतीचे काम पी-केअर या प्रकल्पांतर्गत केले जाते. कचरा व्यवस्थापनातून रोजगार निर्मिती हेही संस्थेच्या उद्दिष्टांपैकी एक आहे.

नवीन कपडे खरेदीचा वेग पाहता मोठ्या प्रमाणावर जुन्या कपड्यांचा ढीग घराघरांमध्ये साठून राहतो. संस्थेद्वारे जुने कपडे संकलित करून त्यांचे वापरता येण्याजोगे कपडे वेगळे करून सहयोगी संस्थांमार्फत गरजूंपर्यंत पोचवले जातात. उरलेल्या जुन्या कपड्यांपासून महिला बचत गटांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत आकर्षक वस्तू तयार केल्या जातात. यामध्ये पर्स, लॅपटॉप बॅग, पाउच, हँड बॅग, टोट बॅग, की चेन इत्यादी विविध प्रकार समाविष्ट आहेत. गरजू महिलांना शिवणकामातून रोजगार दिला जातो. पुण्याबाहेरील महिला बचत गट देखील प्रशिक्षणाद्वारे या प्रकल्पात सहभागी होऊ शकतात. तयार वस्तूंची विक्री विविध ठिकाणी स्टॉलद्वारे आणि ऑनलाईन शॉप्सद्वारे केली जाते.

विद्यार्थ्यांची आवड हेरून त्या क्षेत्रातील भविष्यातील संधीबाबत मार्गदर्शन केले जाते, ज्यायोगे व्यवसाय निवड आणि छंद जोपासणी हे दुहेरी उद्दिष्ट त्यांना साधता येते. विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रकल्पांची देशपातळीवर निवड तर अनेक स्पर्धेतही राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत येथील विद्यार्थी यश मिळवत आहेत, हे याचेच फलित म्हणता येईल. सहा दशकांपासून येथे संस्कारित झालेले हजारो विद्यार्थी आज जगभर विखुरलेले असून ते कार्य करीत असलेल्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

ई-यंत्रण या प्रकल्पामधून इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक कचरा (ई-कचरा) आणि प्लास्टिक कचरा संकलित केला जातो. ई-कचऱ्यातून दुरुस्त करता येण्याजोगे संगणक आणि लॅपटॉप दुरुस्त करून गरजू शाळा व संस्थांना देणगीदाखल दिले जातात. उरलेला ई-कचरा आणि प्लास्टिक कचरा शासनमान्य नोंदणीकृत रिसायकलर्सना सुपूर्त केला जातो. हा दोन्ही प्रकारचा कचरा हा पर्यावरणास हानिकारक आहे. त्याचे स्वतंत्रपणे संकलन केले तर रिसायकलिंगसाठी पाठवण्यास सोपे जाते. नियमांनुसार नागरिकांनी प्लास्टिक व ई-कचरा अधिकृत संकलन करणाऱ्या संस्थांना दिला पाहिजे. परंतु त्यांना नोंदणीकृत संस्था कोणत्या आणि रिसायकलिंग कुठे केले जाते ते माहिती नसते. रीसायकलर्स मोठ्या कंपन्यांकडून ई-कचरा घेतात पण सोसायटी, छोटे व्यावसायिक आणि छोट्या किंवा मध्यम कंपन्या येथे तयार होणारा कचरा योग्य ठिकाणी पोचत नाही. 'पूर्णम' अशा स्तरांवर संकलनाचे काम करते आणि तो कचरा अधिकृत रीसायक्लर्सपर्यंत पोचवण्याचे काम करते. या प्रकल्पाद्वारे शहर स्तरावर सुद्धा मोहिमा राबविल्या जातात. प्रत्येक वर्षी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त 'ई-यंत्रण' या नावाने शहर स्तरावरील ई-कचरा संकलनाची मोहीम घेण्यात येते. संत गाडगे महाराज जयंती आणि राष्ट्रीय विज्ञान दिनाचे दुहेरी औचित्य साधून 'पेहेल' हे ई-कचरा व प्लास्टिक संकलन अभियान आयोजित करण्यात येते. ई-यंत्रण मोहीम एकाच वेळी अनेक शहरांमध्ये राबविली जाते. यावर्षी पिंपरी-चिंचवड, सांगली-मिरज, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नाशिक-सिन्नर, अहमदनगर, सोलापूर, श्रीरामपूर आणि मालवण अशा एकूण ९ शहरांमध्ये उत्तम प्रतिसादात पार पडली. तसेच 'पेहेल' हे अभियान पुणे शहरात राबविले जाते. सर्व शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, कॉर्पोरेट कंपन्या आणि सामाजिक संस्थांना सोबत घेऊन मोहीम आखली आणि पार पाडली जाते. या मोहिमांमध्ये आणखी इतर शहरे आणि ग्रामीण भाग देखील भविष्यात सहभागी होऊ शकतील. अशा रीतीने पर्यावरण संवर्धनाचे काम पुण्यापुरते मर्यादित न राहता विस्तारते आहे आणि विस्तारत जाईल.



ई-कचरा संकलन

**ग्रीन कन्सल्टन्सी** द्वारे सोसायटी, बंगला आणि व्यावसायिक स्तरावर ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पर्जन्यजल संधारण केले जाते. त्याचप्रमाणे ग्रामीण किंवा निम-शहरी भागात घनकचरा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करून तशी यंत्रणा तयार करण्यास मार्गदर्शन करणे या प्रकारची कामेही केली जातात. आजकाल अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण होताना दिसतात. त्यामुळे पावसाचे पाणी साठवण्याची आणि भूजल पातळीमध्ये वाढ करण्याची आत्यंतिक गरज निर्माण झाली आहे. गेल्या वर्षी बीड जिल्ह्यामधील १०० गावांमध्ये पर्जन्य जलसंधारण प्रकल्प उभारून देण्याचे कार्य अनेक सहयोगी संस्था आणि सीएसआर फंड्सच्या मदतीने हाती घेण्यात आले. याबरोबर पी-कैअरद्वारे नवनवीन संशोधनाच्या संधी शोधल्या जातात.

## जन आधार संस्थेचे प्रकल्प :

१) जनसेवा घनकचरा व्यवस्थापन सहकारी संस्था
२) बचतगट
३) श्रमजीवी शाळाबाह्य विद्यार्थी वर्ग
४) शोषक खरेदी विक्री केंद्र (पुनर्वापर करता येणारा कचरा विकण्याचे दुकान)
५) सुधारित जीव इंधन आणि सुधारित स्वयंपाकघर उपकरणे विस्तार प्रकल्प
६) घंटागाडी प्रकल्प.



## पुरस्कार आणि सन्मान

- नातू फौंडेशन, पुणे सेवाव्रती पुरस्कार २००७
- मगत सद्ल तेजोमय ( सर्वोत्कृष्ट सामाजिक कार्यांसाठी ) २००८
- परम पुरस्कार, मुम्बई मित्र २००९
- वसुंधरा मित्र, २००९
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी पुरस्कार ( अध्यक्ष संजय कांबळे यांना )
- स्वच्छ पृथ्वी हा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार २०११ हैदराबाद येथे प्रदान करण्यात आला.
- २०१६-२०१७ चा साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार २०१६-२०१७
- २०१८-२०१९ चा शाहू फुले आंबेडकर पुरस्कार
- २०१९-२०२० भारत विकास संगम पुरस्कार
- प्रिसिजन फौंडेशन चा प्रिसिजन पुरस्कार २०२१-२०२२ (अध्यक्ष संजय कांबळे यांना)
- याच बरोबर विविध संस्थांकडून संजय कांबळे आणि जन आधार ला ३०-३५ पुरस्कार मिळाले.

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.२ जन-आधार सेवाभावी संस्था

दररोज इतरांनी केलेला कचरा काढून परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या कचरावेचकांचा दैनंदिन संघर्ष कॉलेजला जाता येता जवळून पाहिला आणि स्वामी विवेकानंदांच्या विचाराचा आणि कार्याचा प्रभाव असणाऱ्या राष्ट्रभक्तीने प्रेरित झालेल्या काही तरुणांच्या मनात यांचा संघर्ष दूर करण्यासाठी काहीतरी नक्की करायचे असं विचार आला. त्यांना या घाणीतून बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा मुख्य उद्देश त्यामागे होता आणि यातूनच जन–आधार या संस्थेचा जन्म झाला. संस्थेचे संस्थापक होते लातूर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजयजी कांबळे आणि त्यांचे सहकारी मित्र.

कचरा वेचक वर्ग हा तसा समाजाने नाकारलेला दुर्लक्षित घटक. विशेषतः या कामामध्ये कुष्ठरोग्यांची संख्या जास्त. यांच्या नशिबी कायम अवहेलना आणि उपेक्षाच! पण रोजच्या जगण्यासाठी कष्ट करणे तर अटळ आहे. शरीर आणि चेहरा विद्रूप असल्याने कुणी धड बोलायला धजावत नाही तिथे कामावर कोण ठेवणार? एकतर भीक मागून पोट भरणे किंवा कचऱ्यातील प्लास्टिक भंगार गोळा करून त्याच्या विक्रीतून आलेल्या तुटपुंज्या पैशातून उदरनिर्वाह भागवणे हे दोनच पर्याय. त्यांना अन्य रोजगार उपलब्ध करता येईल का हा विचार संजूभाऊंच्या मनात आला पण त्यांनी केलेल्या प्रयत्नांना म्हणावे तसे यश मिळाले नाही रोजच्या दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या या घटकांना अवगत असलेल्या कौशल्याला अभिनव पद्धतीने विकसित करायला हवे, जेणे करून त्यांचं एकंदर जीवनमान सुधारण्यास मदत होईल हे त्यांच्या लक्षात आले.

सुरुवातीला या कामगारांच्या आरोग्याच्या समस्या दूर करणे गरजेचे असल्याने कुष्ठरोगी व इतर कचरावेचक राहतात, त्या वस्ती मध्ये आरोग्य तपासणी व मोफत उपचार शिबीर घेण्यापासून जनआधारच्या कार्याला सुरुवात झाली. लातूर येथील विवेकानंद वैद्यकीय प्रतिष्ठानच्या मदतीने ही शिबिरे घेण्यात आली. आरोग्य तपासणी करताना डॉक्टरांनी समतोल आहाराविषयी कचरावेचक महिलांना माहिती सांगितली आणि दररोज त्यांच्या जेवणाबद्दल विचारले तेव्हा एक विदारक वास्तव समोर आले, बहुतांश घरामध्ये रोजचा स्वयंपाकच बनत नव्हता! आणि बनवण्यासाठी चूलही नव्हती! काम करत जाईल तसे दिवसेंदिवस जन आधारसमोर आवाहनाचा डोंगर उभा राहत होता. पण खचून जाणे हे जन आधारच्या स्वभावातच नाही. सर्व कार्यकारी मंडळाने कचरावेचक कामगारांच्या प्रश्नांवर मुळापासून काम करण्यासाठी कंबर कसली. या कुटुंबांना सुरुवातीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे गरजेचे होते. भंगार विकून मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशातून त्यांना बचतीची सवय लावली. बचतगटांची सुरुवात झाली. हळूहळू या कुटुंबात थोडीफार आर्थिक स्थिरता येण्याला मदत झाली.

एका प्रसंगाने जन आधारच्या कामाला वेगळी दिशा मिळाली. एकदा लातूर शहरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा मोबाईल फोन चोरीला गेला आणि अख्खी पोलीस यंत्रणा कामाला लागली . कचरा गोळा करणाऱ्या महिला अशा चोऱ्या करतात अशी चुकीची माहिती मिळाल्यामुळे सरसकट सगळ्याच कचरा वेचक महिलांना चोरीच्या संशयावरून पकडून पोलीसस्टेशन मध्ये कुठल्याही कारणाशिवाय डांबून ठेवले. संजूभाऊंना समजल्यावर त्यांनी तत्कालीन पोलीस अधीक्षक डॉ. सुहास वारके यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. कुठलाही पुरावा नसताना निरपराध महिलांना त्रास दिल्याबद्दल वारके साहेबांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्याला खडे बोल सुनावले आणि महिलांना सोडून देण्यास सांगितले आणि जन आधारच्या कार्यकर्त्यांकडून संस्थेच्या कामाविषयी जाणून घेतले.

त्यांच्या कामाविषयी काही सूचना केल्या. कचरा वेचक संघटीत झाले तर त्यांचे अनेक प्रश्न मार्गी लागतील, तेव्हा त्यांचे संघटन करावे असे त्यांनी सुचवले. इकडे पोलिसांनी सर्वांची नावे व पत्ता लिहून घेऊन त्यांना सोडून दिले. तेव्हा असे लक्षात आले की, काही महिला आपली खोटी माहिती सांगत आहेत. त्याबद्दल त्यांना विचारल्यावर समजले की या महिलांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन पोलिस कर्मचारी दिलेल्या पत्त्यावर येतात व त्यांच्यावर अत्याचार करतात. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न नव्याने समोर आला. त्यामुळे प्राधान्याने संघटना स्थापन करण्याचे निश्चित झाले आणि "जनसेवा घनकचरा व्यवस्थापन सहकारी" संस्था या नावाने संघटना स्थापन झाली.

लातूर शहरात बऱ्याच भागात त्यावेळी नगर परिषदेकडून परिसर स्वच्छतेची कुठलीच यंत्रणा कार्यरत नव्हती. कित्येक दिवस उचलल्या न गेलेल्या रस्त्यावरच्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. जन आधारने लोकसहभागातून कचरा व्यवस्थापन करता येईल का या संदर्भात सर्वे केला आणि त्या सर्वेच्या आधारे प्रत्येक घरामागे दरमहा १०रु. इतके नाममात्र सेवाशुल्क घेऊन जन आधारची टीम सफाई चे काम करु लागली. कचरा गोळा करणाऱ्या तिला जन आधार स्वच्छ ताई असे संबोधले. सुरुवातीला आनंदाने सेवा शुल्क देण्याची तयारी दाखवलेल्या नागरिकांनी पैसे देण्यास सपशेल नकार दिला. मिळालेल्या पैशातून कचरा वेचकांना आर्थिक मोबदला मिळेल हि कल्पना धुळीस मिळाली कारण ३००० रु. जमा होणार त्या ठिकाणी केवळ ४८० रु. जमा झाले. हा उपक्रम बंद पडणार की काय असे वाटत असताना पद्मीनबाई काळे ही स्वच्छताई पुढे आली आणि म्हणाली, "संजुभाऊ, मला कामाचे पैसे नाही दिले तरी चालतील. फक्त ही गाडी आणि एप्रन द्या. पण माझं कचरा गोळा करण्याचं काम नका थांबवू, कारण हा कचरा म्हणजे आमची लक्ष्मी आहे. आणि या कचऱ्यामुळे तर आम्हाला जरा चांगले दिवस बघायला मिळाले. "संजूभाऊंना काही अर्थबोध होईना तेव्हा ताईंनी खुलासा केला, "गाडी नव्हती तेव्हा मी कचरा गोळा करायला जायची, आमचा अवतार पाहून कुत्रे अंगावर येत असत. चावत असत. या कामामुळे भंगार शोधायला जाण्याची गरजच राहिली नाही. आता या कामाला तुम्ही एक दर्जा मिळवून दिला आहे. माणुसकी असलेले लोकं आदराने वागवतात. उरलेलं खायला देतात. त्यामुळे बऱ्याचवेळा जेवणाचा प्रश्न मिटतो. सणावाराला गोडधोड खायला मिळतं. कुणी कपडे देतं. एप्रनमुळे आमच्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलला आहे." पद्मीनबाईंच्या या अनुभवामुळे जन आधारने कचरा संकलनाचं काम सुरु ठेवलं. या कामाला गती मिळत गेली. कचरावेचक पुरुष व स्वच्छताईंची संख्याही जवळपास १२५ च्या जवळपास झाली. हे सगळे काम लोकसहभागातून सुरु होतं शासनाचा कुठलाही सहभाग नव्हता. स्वच्छतेचे हे काम इतके प्रभावी होते की जन आधारने नागरिकांचा विश्वास संपादन करण्यात यश मिळवले.



त्यानंतर २००४ साली लातूर नगरपरिषदेकडून संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाचे टेंडर त्यांना मिळाले त्यांनी शहर स्वच्छतेचे काम जन आधार या संस्थेस दिले. त्यातून आणखी १६० लोकांना रोजगार मिळाला. उत्पन्नही वाढीव मिळू लागले. त्यानंतर मात्र अन्य संस्थांच्या मदतीशिवाय २०१७ मध्ये जन आधार संस्थेने स्वत:च टेंडर भरले. एकंदरीतच कचरा व्यवस्थापनाच्या कामाला दर्जा मिळवून देण्याचं काम जन आधारने केले.

आपलं संपूर्ण आयुष्य कचरा आणि भंगार गोळा करण्यात गेलेल्या या महिलांनी त्या कचऱ्यावर चक्क संशोधन केले. प्लास्टिक चे एकूण २८ ते १६ प्रकार असतात, हा शोध निरक्षर असलेल्या गंधारबाई सकट या स्वच्छताईंनी लावला. आपल्या भाषेत त्यांनी त्याला नावेही दिली. रिलायन्स कंपनी चे डायरेक्टर डॉ बिष्णोई यावर म्हणतात प्लास्टिक वर्गीकरण विषयात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांलाही नसेल एवढे ज्ञान गंधारबाई यांना आहे. त्या या विषयातल्या डॉक्टरेट आहेत.

जन आधारच्या दृष्टीने अभिमानाची बाब म्हणजे २००९ साली दूरदर्शनवर 'तगस्या' या मालिकेत लातूरच्या स्वच्छताईंच्या मुलाखती झाल्या. या मुलाखतीच्या माध्यमातून महिलांना आपली यशोगाथा महाराष्ट्रभर पोचवता आली जन आधारच्या टीममध्ये आता एकूण ८६० कामगार काम करतात. संस्थेने ३६ E-Vehicle आहेत. ज्याचा कचरा संकलनासाठी वापर केला जातो. ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस निर्मितीचा संस्थेचा प्रकल्प आहे. या बायोगॅस वर जनरेटर चालते. या वीज निर्मितीतून कचरा संकलनाच्या E-Vehicle चार्ज होतात. त्यामुळे एकंदर रु.७६००/- इतका डीझेल खर्च वाचतो. शिवाय कचरा जाळताना येणारी दुर्गंधी टाळता आली. पर्यावरणाचे रक्षण झाले. उत्पन्नात वाढ झाली. हा एक अभिनव असा सेल्फ सस्टेनेबल प्रकल्प आहे .



जन आधारच्या स्वच्छताई आपले काम समर्पित वृत्तीने काम करतात. यामध्ये अगदी पदवीधर द्विपदवीधर महिला आहेत हे विशेष! लातूर महानगरपालिकेसोबत काम करताना त्यांनी दिलेल्या या सेवेची दखल देशपातळीवर घेतली गेली आणि २०१९ साली लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छ शहर म्हणून देशात प्रथम क्रमांक आला. हे सगळे श्रेय जाते, प्रत्यक्ष स्वच्छता करणाऱ्या कामगारांना. परंतु हे पारितोषिक स्वीकारण्यासाठी त्यांना कुणी विचारलेही नाही. खूप भांडावं लागलं झगडावं लागलं. तेव्हा कुठे लताबाई रसाळ या स्वच्छताईंना सोबत घेऊन जाण्यास महापौर तयार झाले आणि रेल्वेतही न बसलेली लताबाई चक्क विमानाने दिल्लीला पारितोषिक स्वीकारण्यासाठी गेली.

# ३.० संस्था संचालन

## सामाजिक संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन

### विश्वस्त न्यास किंवा धर्मादाय संस्था – संकल्पना आणि तदनुषंगीक महत्वाच्या बाबी

"खूप मोठा प्रॉब्लेम झालाय. कधी येऊ भेटायला?" पुण्यातील एका समाजसेवेला वाहून घेतलेल्या ट्रस्टच्या विश्वस्थांचा फोन आला. थोड्या वेळाने ते ऑफिसमध्ये आले. चेहऱ्यावर भयंकर टेन्शन. आल्या आल्या म्हणाले, "एवढं मोठं सामाजिक कार्य करतोय आणि आता इन्कम टॅक्सची डिमांड आलीय चार लाखांची." डिमांड लेटर पाहिलं, आयकर विवरण पत्रक पाहिलं. वर्षाच्या अखेरीस अकरा लाखाचं अनुदान आलं होतं ते एकतीस मार्चच्या आत खर्च झालं नव्हतं. म्हटलं तर सांगायला लागले के पुढच्या दोन महिन्यात मेपर्यंत सगळं खर्च झालाय. मी सांगितलं की वर्षात मिळालेल्या सगळ्या उत्पन्नापैकी कीमान ८५% खर्च झालाच पाहिजे त्याच वर्षात. नाहीतर उर्वरित रक्कम पुढील ५ वर्षात खर्च करण्यासाठी विहित नमुन्यात फॉर्म भरणे गरजेचे असते. एवढं मोठं समाजकार्य करतोय तर इन्कम टॅक्स वाले एवढी प्रोसिजरल बाब का धरं घेऊन बसलेत, त्यांचा स्वाभाविक प्रश्न.

हाच खरा प्रश्न आहे बऱ्याच ट्रस्टपुढे. ट्रस्ट तयार केला आणि सामाजिक उद्देशासाठी खर्च केला की इन्कम टॅक्स भरायची गरज काय हि बहुतेक सगळ्यांची मानसिकता. चार्टर्ड अकाउंटंट म्हणून लेखा परीक्षक किंवा कर सल्लागार म्हणून काम करताना किंवा स्वतः विश्वस्त म्हणून काम करताना एक गोष्ट लक्षात आली की, अक्षरशः हजारो ट्रस्ट अस्तित्वात आहेत. यातही तीन प्रकार येतात. एक खूप मोठे ट्रस्ट ज्यांच्याकडे संघटन आहे, माणसं आहेत, सल्लागार आहेत ज्यांच्या मदतीने सर्व कायदेशीर बाबींचे पालन होते. दुसरे खूप छोटे ट्रस्ट ज्यांना काहीच माहित नाही त्यामुळे कोणत्याच कायदेशीर बाबींचे पालन होत नाही. जोपर्यंत कोणत्याही सरकारी खात्याशी संबंध येत नाही तोपर्यंत असे कोणतेतरी प्रॉब्लेम्स येऊ शकतात याची कल्पनाच नसते. तिसरे म्हणजे या दोन्हीच्या मधले आकाराचे आणि प्रकारचे ट्रस्ट जे त्यांना माहित असलेल्या तरतुदींचे पालन करतात आणि त्यामुळे माहित नसलेल्या तरतुदींबद्दल नोटीस आली की भांबावून जातात.

ट्रस्ट म्हटले की समज कमी आणि गैरसमजच जास्त असतात. या गैरसमजामुळे बऱ्याच अडचणी येऊ शकतात आणि त्या अडचणी येतीलच का? आणि कधी येतील हे सांगताही येत नाही. त्यामुळे होतं काय की, ट्रस्ट सुरु करताना बराच उत्साह असतो, बऱ्याच अभिनव कल्पना असतात. पण अनपेक्षीत अडचणी आल्या की कामंच होत नाहीत, मालमत्ता उगीचच ट्रस्टमध्ये अडकून बसतात. तेव्हा ट्रस्ट सुरु करताना धर्मादाय संस्था म्हणजे काय, कोणकोणते कायदे लागू असतात आणि कोणत्या तरतुदींचे पालन करावेसे लागते याबद्दल पूर्ण माहिती असणे अत्यंत आवश्यक असते. धर्मादाय संस्था सुरु केल्यानंतर तरी या बाबींची माहिती करून घेण्याला कोणताही पर्याय नाही.

धर्मादाय संस्था आणि त्यांचे स्वयंसेवी उपक्रम बिनमहत्त्वाचे आहेत आणि देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर त्याचा फारसा परिणाम होत नाही, असे अनेकदा चुकून मानले जाते, परंतु हे विधान सत्यापासून खूप दूर आहे. प्रत्यक्षात, धर्मादाय उपक्रम राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देतात. खरे तर, सेवाभावी संस्था आणि स्वयंसेवी कार्यांची भूमिका सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांच्या भूमिकांपेक्षा कमी महत्त्वाची नाही. धर्मादाय संस्था आवश्यक सेवा प्रदान करतात, ज्या नागरिकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम करतात, जसे की रुग्णालये, शाळा, अनाथाश्रम आणि धार्मिक केंद्रे चालवणे.

दुसरे म्हणजे, धर्मादाय संस्था वैयक्तिक सक्षमीकरण आणि प्रशिक्षण, गरिबीशी लढा, अंमली पदार्थांच्या सेवनासारख्या सामाजिक रोगांशी लढा आणि श्रीमंत आणि गरीब यांच्यातील खोल दरी कमी करण्याचा प्रयत्न यासह अनेक पैलूंमध्ये सरकारच्या महत्त्वपूर्ण भागीदार आहेत.

धर्मादाय संस्था देशाच्या सुरक्षेसाठी आधारस्तंभ देखील आहेत कारण ह्या संस्था अनेक प्रकारच्या प्रतिबंधात्मक भूमिका बजावत असतात. विशेषत: अनेक वेळा गरिबी आणि कठोर परिस्थितीमुळे लोक गुन्हेगारीकडे वळतात. अश्या वेळी ह्या संस्था अश्या असुरक्षित असलेल्या लोकांना आर्थिक, शैक्षणिक मदत करून गुन्हेगारीपासून दूर ठेवतात. ही देखील एक प्रकारची देशसेवा व सामाजिक उपयुक्तता आहे. या व अशा अनेक कारणांमुळे धर्मादाय संस्थाकडे देखील आपण एक गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. त्यांना व्यावसायिक व्यवस्थापन आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्स ह्या सारख्या खाजगी कंपन्यांकडे असणाऱ्या मूलभूत व्यवस्थांचे प्रशिक्षण देणे काळाची गरज आहे.

जरी काही धर्मादाय संस्था सामाजिक उद्देशांना चालना देण्याच्या उद्दिष्टांचे पालन करत नसतील परंतु बहुसंख्य धर्मादाय संस्था चांगल्या विश्वासाने आणि कायद्यानुसार कार्य करतात. काही वाईट घटकांनी अनेक अत्यंत उपयुक्त धर्मादाय संस्थांची प्रतिष्ठा खराब केली आहे आणि भीतीचे, संशयाचे, बेकायदेशीरतेचे वातावरण निर्माण केले आहे, ज्यामुळे लोकांचा आत्मविश्वास कमी झाला आहे. दुसरी समस्या म्हणजे काही धर्मादाय संस्थांमधील खराब व्यवस्थापन आणि आर्थिक आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराच्या घटना. यामुळे अनेकांना धर्मादाय कार्य आणि त्याच्या व्यवस्थापनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे टाळण्यासाठी, धर्मादाय संस्थांनी त्यांच्या देणगीदारांना आणि स्वयंसेवकांना स्वतःच्या कार्यातील भागधारक म्हणून पाहणे आवश्यक आहे. नैतिक संहिता, व्यावसायिकता आणि कॉर्पोरेट गव्हर्नन्सने धर्मादाय क्रियाकलाप नियंत्रित केले पाहिजेत. धर्मादाय संस्थांनी पारदर्शकता, समाज, अर्थव्यवस्था आणि सरकारचे पालन या चौकटीत आपले दायित्व पूर्ण केले पाहिजे.

'चॅरिटी' या शब्दाचा अर्थ विचार आणि कृतीत परार्थ आहे. त्यात स्वतःच्या ऐवजी इतरांना फायदा करून देण्याचा विचार समाविष्ट आहे" धर्मादाय ही ऐच्छिक मदत म्हणजे पैशाने किंवा गरजूंना दयाळूपणे केलेली मदत. सामूहिक प्रयत्न नेहमीच अधिक फलदायी असतात. म्हणूनच, विविध अशासकीय संस्था (एनजीओ) आणि ना-नफा संस्था एकत्र संस्था किंवा ट्रस्ट तयार करून जगभरात विधी उभारून सेवाभावी उपक्रमांवर सतत कार्यरत आहेत.

धर्मादाय संस्थांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत देणग्या हाच असतो. समाजातील विविध व्यक्ती स्वतः होऊन चांगल्या उद्दिष्टांसाठी आर्थिक व इतर मदत करण्यास उत्सुक असतात. देणग्यांचे मुख्यत्वे तीन प्रकार असतात.

यातला पहिला प्रकार म्हणजे एन्डोमेंट्स. हे असे फंड आहेत ज्यात देणगीची मूळ रक्कम अखंड ठेवली जाते आणि केवळ व्याज किंवा लाभांश धर्मादाय हेतूंसाठी वापरला जातो. ते धर्मादाय कारणांसाठी उत्पन्नाचा दीर्घकालीन स्रोत प्रदान करतात.

दुसरा प्रकार म्हणजे विशिष्ट कारणासाठी दिलेली देणगी. यात देणगीदार देणगी देतानाच ती कोणत्या उद्देशासाठी देत आहेत याचा स्पष्ट उल्लेख करतात. अशी देणगी घेतल्यावर ट्रस्टची ही जबाबदारी बनते की, ती देणगी फक्त त्याच कारणासाठी वापरली जाते. अन्यथा देणगीदार अशी न वापरलेली किंवा अन्य कारणासाठी वापरलेली देणगी परत मागू शकतो. सीएसआर च्या योजनेखाली दिलेल्या देणग्या या प्रकारात मोडतात. सामान्यतः अशा देणग्यांच्या विनियोगाचे चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्रसुद्धा मागितले जाते. जोपर्यंत अशा देणग्या प्रत्यक्ष विहित कारणासाठी वापरल्या जात नाहीत तोपर्यंत त्या स्वतंत्रपणे ठेवणे गरजेचे असते.

तिसरा प्रकार म्हणजे सर्वसामान्य देणग्या. यामध्ये दिलेल्या देणग्यांचा वापर संस्थेच्या मान्य कोणत्याही उद्देशांसाठी विश्वस्त करू शकतात. यामध्ये सुद्धा दोन प्रकार येतात. एकतर रोख किंवा बँकेतून दिलेली देणगी आणि वस्तुरूपाने दिलेली देणगी. सामान्यतः बरेच ट्रस्ट मिळालेल्या वस्तुरूप देणग्यांचा हिशेबपुस्तकात जमाखर्च करत नाहीत. परंतु मिळालेल्या वस्तूंचे मूल्यांकन करून त्यांचा जमाखर्च करणे गरजेचे असते.

इनकम टॅक्स च्या कलम ८०जी खाली नोंदणी झालेल्या ट्रस्टला दिलेल्या देणग्यांसाठी आयकर कायद्यानुसार देणगीदाराला आयकर सवलत मिळू शकते. यासाठी ट्रस्टने देणगीदारांना कलम ८०जी प्रमाणे विहित नमुन्यात विहित तपशील लिहून पावती देणे गरजेचे असते. देणगीदाराचे नाव, पूर्ण पत्ता अँड पॅन नंबर पावतीवर असणे अत्यंत गरजेचे आहे. जर असा तपशील पावतीवर लिहिला नसेल तर अशी देणगी बेनामी समजली जाते आणि एका मर्यादेपुढच्या अशा बेनामी देणग्यांवर ट्रस्टला आयकर भरावा लागतो. त्यामुळे पावती देताना खबरदारी घेणं गरजेचे आहे. परंतु अशी सवलत वस्तुरूप देणग्यांना मिळत नाही त्यामुळे अशा वस्तुरूप देणग्यांना कलम ८०जी ची पावती देऊ नये.

ट्रस्ट स्वतःच्या उद्देशांसाठी जी काही कामे करतो त्यातूनही त्याला उत्पन्न मिळू शकते जसे की शैक्षणिक संस्थाना मिळालेली फी, रुग्णालयांना मिळालेले रुग्णांकडूनचे उत्पन्न वगैरे. ट्रस्ट असे उत्पन्न मिळवू शकतो परंतु त्याचा विनियोग विहित उद्दिष्टांसाठी करणे आवश्यक असते. परंतु जर कोणत्याही ट्रस्टला जर त्याची उद्दिष्टे पूर्ण करताना कोणतेही व्यावसायिक उत्पन्न मिळाले आणि जर ते ट्रस्टच्या एकूण उत्पन्नापेक्षा २०% पेक्षा जास्त असेल तर असे उत्पन्न सुद्धा करपात्र असते.

आयकरातून सूट मिळण्यासाठी, ट्रस्टने त्याच्या उत्पन्नाच्या किमान ८५% इतकी रक्कम उत्पन्न मिळालेल्या वर्षातच भारतातील धर्मादाय किंवा धार्मिक हेतूंसाठी खर्च करणे आवश्यक आहे. कर तरतुदींनुसार प्रदान केलेल्या व्याख्येनुसार, धर्मादाय उद्देशामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो:

1. गरिबांना दिलासा
2. शिक्षण
3. योग
4. वैद्यकीय आराम
5. पर्यावरणाचे रक्षण (स्मारक किंवा ठिकाणे किंवा कलात्मक किंवा ऐतिहासिक आवडीच्या वस्तू)
6. सामान्य सार्वजनिक उपयोगितेच्या इतर कोणत्याही वस्तूची प्रगती.

तथापि, व्यापार, वाणिज्य किंवा व्यवसायाच्या स्वरूपातील कोणतीही क्रियाकलाप किंवा कोणत्याही व्यापार, वाणिज्य किंवा व्यवसायाच्या संबंधात कोणतीही सेवा प्रदान करण्याची कोणतीही क्रियाकलाप, उपकर किंवा शुल्क किंवा इतर कोणत्याही मोबदल्यास धर्मादाय हेतूंसाठी मानले जात नाही, वापर किंवा अनुप्रयोगाचे स्वरूप, किंवा अशा क्रियाकलापातून मिळणाऱ्या उत्पन्नाची पर्वा न करता: अशा प्रकारच्या व्यापार/व्यापार/व्यवसायाचा क्रियाकलाप सामान्य सार्वजनिक उपयोगाच्या इतर कोणत्याही वस्तूच्या अशा प्रगतीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान केला जातो आणि आर्थिक वर्षातील अशा क्रियाकलाप/कार्यक्रमातून मिळालेल्या एकूण पावत्या त्या आर्थिक वर्षात त्या ट्रस्ट किंवा संस्थेच्या एकूण पावत्यांपैकी 20% पेक्षा जास्त नसतात.

याशिवाय, भांडवली मालमत्तेच्या खरेदीसाठी वापरलेले उत्पन्न, भांडवली मालमत्तेच्या खरेदीसाठी कर्जाची परतफेड, महसूल खर्च आणि कलम १२एबी आणि कलम १०(२३सी) अंतर्गत नोंदणीकृत ट्रस्टला देणगी (हेकाही विशिष्ट मर्यादेपर्यंत) देखील धर्मादाय हेतूंसाठी वापरले आहे असे मानले जाईल आणि म्हणून करातून सूट दिली आहे.

**'धार्मिक उद्देश'** या अभिव्यक्तीची व्याख्या कायद्यांतर्गत केलेली नाही. धार्मिक उद्दिष्टे धर्माशी निगडित असतात आणि व्यक्ती किंवा समुदायांसोबत विश्वासाचा विषय असतो. धार्मिक उद्देशामध्ये धर्माची प्रगती, समर्थन किंवा प्रचार आणि त्याचे सिद्धांत यांचा समावेश होतो. धार्मिक ट्रस्ट किंवा संस्थेचे उत्पन्न सूट मिळण्यास पात्र आहे, जरी ते एखाद्या विशिष्ट धार्मिक समुदायाच्या किंवा जातीच्या फायद्यासाठी असेल. कलम 11 अंतर्गत सूट केवळ सार्वजनिक धार्मिक ट्रस्टसाठी उपलब्ध आहे आणि खाजगी धार्मिक हेतूंसाठी ट्रस्टना नाही.

आधीच नमूद केल्याप्रमाणे, १५% पेक्षा जास्त नसलेले उत्पन्न भारतात त्याच्या अर्जासाठी जमा केले जाऊ शकते किंवा बाजूला ठेवले जाऊ शकते. पुढे, एखादी व्यक्ती भारतात अर्ज करण्यासाठी विनिर्दिष्ट उद्देशासाठी अर्ज न करता ८५% उत्पन्न जमा करू शकते किंवा बाजूला ठेवू शकते.

असे संचय गुंतवणुकीच्या खालील पद्धतींद्वारे असणे आवश्यक आहे:

- सरकारी बचत प्रमाणपत्र/ यूटीआयमध्ये गुंतवणूक
- पोस्ट ऑफिस बचत बँक/ शेड्युल्ड बँक/ सहकारी बँकेत ठेव
- स्थावर मालमत्तेत गुंतवणूक
- केंद्र किंवा राज्य सरकारने तयार केलेल्या आणि जारी केलेल्या पैशासाठी कोणत्याही सिक्युरिटीमध्ये गुंतवणूक
- कंपनी डिबेंचर केंद्र किंवा राज्य सरकारद्वारे पूर्णपणे आणि बिनशर्त हमी
- सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीत गुंतवणूक किंवा ठेव
- भारताच्या औद्योगिक विकासासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करण्यात गुंतलेल्या वित्तीय कॉर्पोरेशन किंवा सार्वजनिक कंपनी (भारतात नोंदणीकृत) च्या बाँडमध्ये ठेव किंवा गुंतवणूक

सवलती आल्या की काही अनुशासन किंवा शिस्तपालन अपरिहार्यच असते. जेव्हा ट्रस्टला आयकरातून सवलती दिलेल्या आहेत तेव्हा काही कायदेशीर बाबींचे पालन योग्यरीत्या आणि वेळेवर करणे क्रमप्राप्त आहे. अशा काही महत्वाच्या बाबींबद्दल आपण येथे विचार करू.

सर्व ट्रस्टसाठी काही औपचारिकता दरवर्षी पूर्ण करणे गरजेचे असते. त्यातील एक म्हणजे धर्मादाय आयुक्तांच्या आणि दुसऱ्या आयकर कायद्यांतर्गतच्या. आपण यांचा येथे थोडक्यात विचार करू.

**धर्मादाय आयुक्त:**

१. दरवर्षी म्हणजे ३१ मार्च रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठीची हिशेबपत्रके तयार करणे. दरवर्षी संस्थेचे आय-व्यय पत्रक, ताळेबंद आणि जमा नावे पत्रक तयार करून ते चार्टर्ड अकाउंटंटकडून तपासून घेऊन ती त्यांच्याकडून प्रमाणित करून घेणे गरजेचे असते. अशी प्रमाणित हिशेबपत्रके धर्मादाय आयुक्तांच्या साईटवर अपलोड करावी लागतात व त्याची कॉपी धर्मादाय आयुक्तांकडे प्रत्यक्ष सादर करावी लागते. यासाठी विशिष्ट कालमर्यादा असते.

अशी हिशेबपत्रके तयार करण्यासाठी आधी संस्थेची हिशेबपुस्तके योग्यरीत्या ठेवणे आवश्यक असते. संस्थेला मिळालेला प्रत्येक पैसे आणि त्याचा केलेला विनियोग याचा काटेकोर हिशेब ठेवणे आवश्यक असते. संस्थेचे उत्पन्न कितीही कमी असले तरी या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालत नाही.

२. ज्या ट्रस्टचे वार्षिक उत्पन्न रु. ५,०००/- पेक्षा जास्त असेल अशा प्रत्येक ट्रस्टला दरवर्षी २८ फेब्रुवारी आधी पुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करून धर्मादाय आयुक्तांकडे सादर करावे लागते. खरे तर अंदाजपत्रक तयार करणे संस्थेच्या नियोजनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असते.

- मिळालेल्या उत्पन्नापैकी किमान ८५% रक्कम त्याच वर्षी संस्थेच्या उद्दिष्टांवर (महसुली खर्च असो वा भांडवली खर्च असो) प्रत्यक्ष रित्या वापरली गेली असली पाहिजे. जर एखाद्या वर्षात उत्पन्नाच्या ८५% पेक्षा कमी रक्कम वापरली गेली असेल तर कमी विनियोग झालेली रक्कम पुढील ५ वर्षात वापरता येऊ शकते परंतु त्यासाठी आयकर कायद्याच्या विहित नमुन्यातील फॉर्म १० भरून ती रक्कम विशिष्ट कारणासाठी नमूद करून त्याप्रमाणे ती रक्कम पुढील ५ वर्षात वापरता येऊ शकते. परंतु असा फॉर्म विशिष्ट कालमर्यादेत सादर करणे आवश्यक असते. ही रक्कम विनियोग करेपर्यंत कलम ११(५) मध्ये नमूद केलेल्या (ज्याबद्दल या लेखात स्वतंत्र तपशील दिला आहे) गुंतवणूक प्रकारात ठेवणे आवश्यक असते. जर ५ वर्षात असा विनियोग न केल्यास ती रक्कम ५ वर्षांअखेरीस करपात्र होते.
- ट्रस्टच्या उद्दिष्टांमध्ये बदल केल्यास त्यासाठी आयकर आयुक्तांची पूर्व परवानगी आवश्यक असते. अन्यथा कलम १२एबी प्रमाणपत्र रद्द होऊ शकते.
- दरवर्षी आयकर कायद्याखालील हिशोबांचे लेखा परीक्षण करून घेऊन तो अहवाल विहित कालमर्यादेपूर्वी सादर करावा लागतो.
- दरवर्षी आयकर विवरणपत्र फॉर्म आयटीआर ७ मध्ये विहित कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे.

३. ट्रस्टला देणग्या मिळवताना देणगीदारांना कर सवलत आवश्यक असल्यास कलम ८० जी खाली प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्याबद्दलचा ऊहापोह या लेखात इतरत्र केला आहे.

एकंदरीत ट्रस्टचे व्यवहार करताना वरील सर्व बाबींचा विचार करून त्या सर्व बाबींची पूर्तता करणे कितीही क्लिष्ट वाटले तरी अत्यावश्यक असते. या लेखात आधी नमूद केल्याप्रमाणे सरकारकडून सवलती घेताना विविध कायद्यांमधील तरतुदींची किंवा बंधनांची पूर्तता करणे अपरिहार्य असते.

मोठ्या ट्रस्टकडे मनुष्यबळ आणि इतर संसाधने उपलब्ध असल्यामुळे त्यांना सर्व तरतुदींचे पालन करणे सुलभ होते. परंतु छोट्या ट्रस्टकडे पुरेसा पैसा आणि पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे सर्व तरतुदींची पूर्तता करणे काहीसे अवघड जाते. पण आता काही स्वयंसेवी संस्था छोट्या व मध्यम आकाराच्या ट्रस्टसाठी रास्त दरात या सर्व सेवा देत आहेत.

कायद्याचे अज्ञान ही कायद्याचे पालन न करण्याची सबब होऊ शकत नाही. वास्तव योग्य सल्लागारांकडून सल्ला घेऊन कारभार चालवणे हितावह असते. कोणत्याही ट्रस्टने स्वतःचे विश्वस्त आणि प्रत्यक्ष काम करणारे सेवक, कार्यकर्ते यांना ट्रस्टच्या एकंदरच सर्व व्यवहारांचे योग्य प्रशिक्षण द्यावे असा सल्ला मी देईन.


**– सीए शशांक पत्की**

७७६७८ १०३४९

**shashank.patki@rediffmail.com**

असे अभियान संपूर्ण देशात राबवण्यासाठी केंद्र स्तरावर स्वदेशी जागरण मंचाच्या मार्गदर्शनाखाली 'स्वावलंबी भारत' अभियानाला सुरुवात झाली. अनेक राष्ट्रप्रेमी संघटना त्यामधे सामील झाल्यावर अभियानाला वेग प्राप्त झाला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने अभियानाच्या भाव जागरणासाठी 'उद्यमिता यात्रेची' आखणी केली. त्या माध्यमातून लोक या अभियानाशी जोडले गेले. जोडल्या गेलेल्या व्यक्तीला, उद्योजकता परिचय वर्ग – आयडिया व्हॅलीडेशन – EDP प्रशिक्षण – प्रकल्प अहवाल – भांडवल उभारणी – व्यवसायात मार्गदर्शन अशा प्रत्येक टप्प्यावर सेवावर्धिनी जिल्हा मंडळाच्या माध्यमातून साथ देत असते.

हा विषय पश्चिम महाराष्ट्रापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात घेऊन जाण्याचा सेवावर्धिनीचा मानस आहे. त्यासाठी अन्य क्षेत्रात काम करण्यासाठी सेवाभावी सहयोगी संस्थेची आवश्यकता आहे. इच्छुक संस्थांनी सेवावर्धिनीशी संपर्क करावा. आंग्ल वर्ष २०३० पर्यंत बेरोजगारी समस्येचे निराकरण करण्यासाठी या अभियानात सहभागी व्हा!

विश्वस्तांनी बजेटिंगकडे कसे जायचे?

- सहयोगी प्रयत्न: अर्थसंकल्प प्रक्रियेमध्ये धर्मादाय संस्थेच्या विविध विभागातील व्यक्तींचा समावेश असावा. निधी उभारणीपासून ते विनियोगापर्यंत, प्रत्येक कार्यसंघ अपेक्षित उत्पन्न आणि खर्चाबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करेल.
- ऐतिहासिक विश्लेषण: मागील आर्थिक पत्रकांचे पुनरावलोकन केल्याने मौल्यवान अंतर्दृष्टी मिळू शकते. गेल्या वर्षीचे वास्तविक विरुद्ध अर्थसंकल्पीय आकडे काय होते? अनपेक्षित खर्च किंवा निधीचा अचानक ओघ आला? हा डेटा वापरल्याने भविष्यातील अंदाजांसाठी एक भक्कम पाया मिळू शकतो.
- पुराणमतवादी अंदाज: उत्पन्नाचा अंदाज लावताना, विशेषत: देणग्यांमधून, पुराणमतवादी असणे शहाणपणाचे आहे. आर्थिक अडचणीत सापडण्यापेक्षा जास्त निधीचे सुखद आश्चर्य वाटणे चांगले.
- नियमित पुनरावलोकन: आर्थिक लँडस्केप स्थिर नाही, म्हणून बजेटचे नियमित पुनरावलोकन आवश्यक आहेत, जे विश्वस्तांना बदलत्या आर्थिक वास्तविकतेच्या प्रतिसादात समायोजन करण्यास अनुमती देतात.
- आकस्मिकता समाविष्ट करा: कितीही तपशीलवार असला तरीही, कोणतेही बजेट प्रत्येक खर्चाचा अंदाज लावू शकत नाही. अनपेक्षित खर्चासाठी अर्थसंकल्पातील काही भाग वाटप केल्याने अनपेक्षित आर्थिक आव्हानांपासून बचाव होऊ शकतो.
- तंत्रज्ञान वापरा: ना-नफा आणि धर्मादाय संस्थांसाठी तयार केलेले असंख्य लेखा आणि बजेट सॉफ्टवेअर आहेत. ही साधने अंदाजपत्रक प्रक्रिया सुव्यवस्थित करू शकतात, अंतर्दृष्टी देतात आणि अचूकतेमध्ये मदत करतात.
- बाह्य कौशल्य: आर्थिक तज्ञ किंवा धर्मादाय क्षेत्राशी परिचित असलेल्या लेखापालांशी सल्लामसलत करण्याचा विचार करा. ते अंतर्दृष्टी देऊ शकतात, संभाव्य तोटे ओळखू शकतात आणि सर्वोत्तम पद्धतींवर मार्गदर्शन देऊ शकतात.

३. कोणतीही स्थावर मालमत्ता विकत घेतली असल्यास त्याचे विवरण धर्मादाय आयुक्तांना सादर करणे गरजेचे असते. असे न केल्यास सादर मालमत्ता विकती वेळी किंवा गहाण ठेवते वेळी प्रॉब्लेम होऊ शकतो.

४. ट्रस्टला अगदी एक रुपया जरी कोणाहीकडून, अगदी विश्वस्तांकडून सुद्धा कर्ज रूपाने घ्यायचा असेल तरी त्यासाठी धर्मादाय आयुक्तांची पूर्व परवानगी घेणे अत्यावश्यक आहे. असे न केल्यास आयकर तरतुदीत झालेल्या बदलानुसार संस्थेचे १२एबी चे प्रमाणपत्रसुद्धा रद्द होऊ शकते.

५. संस्थेची स्वत:ची स्थावर मालमत्ता विकायची असेल, गहाण ठेवायची असेल किंवा दीर्घ मुदतीने भाडे तत्वावर द्यायची असेल तर अशा वेळी धर्मादाय आयुक्तांची पूर्व परवानगी घेणे अत्यावश्यक आहे.

## आयकर कायदा :

१. जर ट्रस्टला स्वत:चे उत्पन्न करमाफ करून घ्यायचे असेल तर कलम १२एबी खाली आयकर खात्याकडून तसे प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक असते. असे प्रमाणपत्र मिळवताना योग्य सल्लागारांकडून मार्गदर्शन घ्यावे जेणेकरून त्यामध्ये कोणती अडचण येणार नाही.

२. कलम १२एबी खाली प्रमाणपत्र मिळाल्यास संस्थेचे उत्पन्न करमाफीसाठी पात्र होण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करणे गरजेचे असते.

# ४.० ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – स्वावलंबन अभियान

**!! स्वावलंबी भारत अभियान !!**

२४ मार्च २०२० ही तारीख कोणीच विसरु शकणार नाही. संपूर्ण देशात लॉकडाऊन लागू झाल्याचा दिवस. हातावर पोट असणारे हजारो श्रमिक "गड्या आपुला गाव बरा" अशा मन:स्थितीत शहराकडून गावाकडे निघाले. घरी बसून दिवाणखान्यातल्या टीव्हीवरील दृष्य बघून थरकाप उडत होता. कोरोनाच्या रुपात एका जागतिक संकटाच्या विळख्यात सर्व जग पोळून निघत होते. भविष्यात काय वाढून ठेवलंय हे कोणीही ठामपणे सांगू शकत नव्हते. अशा काळात सेवावर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातल्या गावागावात त्या काळातील सर्वात मोठा सर्वे करुन लोकांची मानसिकता जाणून घेण्याचा प्रयत्न केला. (८००० पेक्षा जास्त व्यक्ती) ऑनलाईन माध्यमातून संवाद आणि चर्चेअंती स्वावलंबी भारत अभियानाचा प्रारंभ झाला. गावातून शहराकडे जाण्याचे प्रमुख कारण म्हणजे उपजीविकेचे मुख्य साधन. जर गावातच रोजगार निर्मिती होऊ शकली तर गावातून शहराकडे होणारे स्थलांतर कमी होऊ शकते असा विचार करुन अभियानाची आखणी करण्यात आली. व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती हे सूत्र डोळ्यापुढे ठेवून 'उद्योजकता परिचय वर्गाची' ऑनलाईन सुरुवात झाली. ३००० पेक्षा जास्त इच्छुकांनी याचा लाभ घेतला.

यांतील काही जणांच्या डोक्यात उद्योजकतेचे बीज रोवले गेले. त्याला अंकुर फुटण्यासाठी 'दे आसरा' संस्थेच्या सहयोगाने आयडिया व्हॅलीडेशन सत्राची रचना सुरु झाली. 'दे आसरा' ही संस्था उद्योजकता आणि नव उद्योजक या विषयावर मार्गदर्शन करणारी नामांकित संस्था आहे.

स्वावलंबी भारत अभियानाच्या रचनेतून आलेल्या प्रत्येक व्यक्तीला यशस्वी उद्योजक होईपर्यंत साथ देण्यासाठी सेवावर्धिनी कटिबद्ध आहे.

याच्या पुढील टप्पा म्हणजे EDP प्रशिक्षण म्हणजेच उद्योजकता विकास प्रशिक्षण (Entrepreneur Development Program). यासाठी या विषयातील तज्ञ मंडळींच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासक्रमाची आखणी करुन सुरुवातीला ऑनलाईन पद्धतीने वर्ग घेण्यात आले.

प्रत्येक जिल्ह्यात आणि गावात गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचण्यासाठी जिल्ह्यासाठी जिल्हा मंडळ स्थापन केले. या मंडळात सेवावर्धिनीचा पूर्णवेळ कार्यकर्ता, जिल्ह्यातील सामाजिक संस्था/संघटना आणि तज्ञ मंडळींचा सहभाग असतो. प्रत्येक जिल्हा मंडळाच्या मासिक आढावा बैठकीत महिन्याचे नियोजन आणि प्रभाव या विषयावर चर्चा होत असते. या विषयावर शाश्वत व्यवस्था निर्माण व्हावी आणि उद्योजकता विषयाला समर्पित केंद्र असावे यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील नामवंत शैक्षणिक संस्थेसोबत सेवावर्धिनीने MOU करुन त्या संस्थेच्या सहयोगाने जिल्हा स्तरावर काम सुरु झाले.

# ८.० सेवाव्रती

## ८.१ संत गाडगे बाबा



भारतीय संस्कृतीमध्ये संतांचे स्थान अनन्यसाधारण आहे वेळोवेळी निद्रिस्त होणाऱ्या समाजाला जागृत करून योग्य मार्गावर आणण्याचे काम सर्व संतांनी केलेले आढळते. संत केवळ मध्ययुगातच होते आणि आधुनिक काळात संत निर्माण होणे अशक्य आहे, अशी मांडणी करणाऱ्या समाजाला सणसणीत उत्तर देण्याचे कामही नंतरच्या काळातील अनेक संतांनी केलेले आहे. संत गाडगेबाबा हे त्यातीलच एक!

डेबुजी झिंगराजी जानोरकर या नावाने विदर्भातल्या अमरावती जिल्ह्यातील शेणगावी जन्मलेल्या या महापुरुषाला समाजाने गाडगेबाबा नाव दिले कारण फाटके कपडे घालून, हातात खराटा आणि गाडगे घेऊन सर्वत्र स्वच्छता करत फिरणारी ही अनन्यसाधारण व्यक्ती होती. सामाजिक जीवनात आपले वर्तन कसे निस्पृह असले पाहिजे, याचा आदर्श आपल्या वागण्यातून त्यांनी समाजासमोर ठेवला.

लहानपणापासूनच समाजाचे नेमके प्रश्न त्यांच्या ध्यानात आले. दारू पिणे, कर्ज काढून सण साजरे करणे, मोठेपणा मिरवणे, आपल्या खाण्यासाठी पशुहत्या करणे,  माणसाला माणूस म्हणून वागणूक न देणे इत्यादी गोष्टी त्यांना खटकत राहिल्या. डेबुजी लहान असतानाच दारू पिण्यामुळे त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे आई डेबुजींना घेऊन आपल्या भावाकडे राहायला आली. तेथे आईप्रमाणेच अतोनात कष्ट करून डेबुजींनी मामा-मामी आणि आजी-आजोबा यांना सुखात कसे ठेवता येईल, याकडे लक्ष दिले. शेतकऱ्याच्या दुःखाचे मूळ कारण उत्पन्नाची कमतरता आणि रोखीचा अभाव आहे, हे त्यांनी ओळखले. त्यामुळेच सावकाराच्या पाशात शेतकऱ्याची जमीन अडकली जाऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले. जीवन जगताना आलेल्या अडचणींना कसे सामोरे जायचे याबद्दल झालेल्या सामाजिक संभ्रमाविषयी डेबुजी विचार करत राहिले. त्यातून त्यांना समाजाच्या विकासाची दिशा सापडली. त्यामुळेच आपल्या मुलीच्या जन्मानंतर आनंद व्यक्त करण्यासाठी समाजातील पुरुष मंडळींना दारू पाजण्याला डेबुजींनी विरोध केला. कर्ज काढून सण साजरे करायचे नाहीत आणि दारू प्यायची नाही, या तत्त्वांवर ते ठाम राहिले.



आपल्या जीवनाचा आपल्या जन्माचा नेमका हेतू काय, याचा शोध ते घेऊ लागले. या शोधात त्यांच्या काही सत्पुरुषांच्या भेटी झाल्या आणि मग एक खरा मार्गदर्शक त्यांना भेटला. तुकोबांप्रमाणे त्या सद्गुरूंच्या सहवासात त्यांना आपल्या जीवनाचा अर्थ कळाला. त्यातून एका रात्री डेबूजीने आपले चांगले कपडे उतरवले, चिरगुटे घातली, गाडगे घेतले आणि घरातून निघाले, ते कायमचेच. समाजाच्या उद्धारासाठी डेबुजीचा गाडगेबाबा होण्यासाठी!

पुढे गावोगाव भटकत जाऊन स्वच्छता करणे, भाकरी मागून खाणे, एका गावी जास्त काळ न राहणे, कुठेही स्वतःला भावनिक दृष्ट्या गुंतवून न घेणे अशी विरक्त आणि तरीही समाजाच्या उद्धारासाठी तळमळणारी वृत्ती त्यांनी कायम ठेवली. संवादाच्या माध्यमातून रंगणाऱ्या कीर्तनाच्या रूपाने समाजाला चांगल्या मार्गावर नेण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. उत्तम आवाजात अभंग गाणारे गाडगेबाबा सर्वांना आपोआपच आकृष्ट करून घेत. या आकर्षणातून त्यांच्या कीर्तनाला भरपूर गर्दी जमू लागली आणि समाजात सुधारणांची एक मालिकाच सुरु झाली.

गावागावांतून तीर्थक्षेत्रांना जाणारी मंडळी, त्यांचे तिथे होणारे हाल पाहून गाडगेबाबांनी ठिकठिकाणी धर्मशाळा उभ्या करण्याचा सपाटाच लावला. त्यांच्यामुळेच आज महाराष्ट्रातल्या सर्व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा उभ्या राहिल्या आहेत. (यामध्ये तत्कालीन समजुतीप्रमाणे काही जातींच्याही धर्मशाळा आहेत तर काही धर्मशाळा या सर्वांसाठी आहेत.)

ईश्वर कर्मकांडात नाही तर समाजसेवेत आहे, हे ठामपणे सांगणारा, पशुहत्या करू नका, दारू पिऊ नका, कर्ज काढून सण-लग्नसमारंभ साजरे करू नका, स्वतः स्वच्छ रहा आणि आपला परिसरही स्वच्छ ठेवा, सर्व मुला-मुलींना शिकवा, कोणालाही अडाणी ठेवू नका असं मार्गदर्शन करणारा हा आधुनिक काळातील संत खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या आधुनिकतेचा जनक आहे. त्यामुळेच  ग्रामस्वच्छता अभियानाला त्यांचे नाव देण्याचे औचित्य महाराष्ट्र शासनाने सांभाळले आहे, ही अतिशय उत्तम कृती आहे.

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह

श्री. विक्रम पंडित - कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर - प्रकल्प व्यवस्थापक

आमोद काटीकर - प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी

# ५.२ डॉ. बिंदेश्वर पाठक



## डॉ. बिदेश्वर पाठक – स्वच्छतेच्या संकल्पातून सामाजिक समतेचा वारसा जपणारे सुधारक



डॉ. बिंदेश्वर पाठक यांचा जन्म २ एप्रिल १९४३ रोजी बिहार राज्यातील वैशाली जिल्ह्यातील रामपूर या गावी एका ब्राह्मण कुटुंबात झाला. ते अवघ्या सहा वर्षांचे असताना त्यांनी एका सफाई कामगार महिलेला स्पर्श केल्यामुळे त्यांच्या आजीने त्यांना शिक्षा केली होती. या घटनेचा खोलवर परिणाम त्यांच्या बालमनावर झाला. त्याकाळी महिलांना उघड्यावर शौचास जावे लागत असे. हाताने मैला स्वच्छ करणे आणि उघड्यावर शौचास जाणे ह्या समस्या समाजात रूढ होत्या. त्यांचे वडिलोपार्जित घर नऊ खोल्यांचे होते. परंतु घरात शौचालय नव्हते. त्यामुळे त्यांच्या घरातील महिलांनासुद्धा सूर्योदयापूर्वी उघड्यावर शौचास जावे लागत असे. हे पाहून डॉ. पाठक यांचे बालमन अस्वस्थ झाले. त्यामुळे स्वच्छता व उघड्यावर शौचास जाणे. ह्या दोन्ही विषयांवर काम करण्याचा संकल्प त्यांनी बालपणीच केला होता.

तारुण्यात पदार्पण केल्यानंतर डॉ. पाठक यांना महिलांना दिली जाणारी दुय्यम वागणूक, मैला साफ करण्याचे काम करण्यामुळे सफाई कामगारांशी केला जाणारा जातीभेद, त्यांचा आत्मसन्मान व आरोग्याच्या समस्या, त्याचप्रमाणे उघड्यावर शौचास जाण्यामुळे स्त्रियांना करावा लागत असलेला अनेक समस्यांचा सामना, एक स्त्री म्हणून आत्मसन्मानाला द्यावी लागणारी मूठमाती आणि स्त्रियांना अनेक जीवघेण्या आजारांचा करावा लागत असलेला सामना; इत्यादी समस्यांनी अस्वस्थ केले. या सर्व समस्यांचा डॉ. विंदेश्वर पाठक यांनी अतिशय संवेदनशीलपणे सखोल अभ्यास व निरीक्षण केले.

डॉ. पाठक यांचे कुटुंबीय त्यांच्या कामावर नाखुष होते. विशेषतः त्यांच्या वडिलांनी तीव्र विरोध दर्शवत खूप संताप व्यक्त केला. त्याशिवाय त्यांच्या सासऱ्यांनी सुद्धा अतिशय वाईट शब्दात त्यांची अवहेलना केली. सासरे म्हणाले, मला तुझे तोंड बघायची इच्छा नाही. तू माझ्या मुलीचे आयुष्य उध्वस्त केलेस. लोक मला विचारतात तुझा जावई काय काम करतो ? मी त्यांना काय उत्तर देऊ ? मला सांगताना लाज वाटते. एवढी निर्भत्सना सहन करूनही  डॉ. पाठक हे आपल्या निर्धारावर ठाम राहीले. त्याउलट त्यांनी आपल्या सामाजिक कार्यावर अधिक लक्ष केंद्रित केले.

डॉ. पाठक हे आपल्या संकल्पपूर्तीकडे वाटचाल करत असताना त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठातून समाजशास्त्राची पदवी संपादन केली. १९८० मध्ये त्यांनी पाटणा विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. १९८५ मध्ये त्यांनी संशोधनाच्या क्षेत्रात सर्वोच्च समजली जाणारी पी.एच.डी. ही पदवीही प्राप्त केली. 'भंगी मुक्ती आणि स्वच्छतेसाठी सर्व उपलब्ध संसाधने' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. दरम्यान त्यांना १९६८–६९ मध्ये बिहार गांधी जन्मशताब्दी उत्सव समितीमध्ये काम करण्याची संधी मिळाली.

# ६.० सेवावार्ता – संस्थांसाठी महत्वाचे

प्रति,

मा. संस्था प्रतिनिधी,

सस्नेह नमस्कार !

सेवावर्धिनीच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गतवर्षी 'सेवा तरंग' या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन केले होते. यात राज्यभरातून २५० पेक्षा अधिक सेवाभावी संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि मिळालेल्या प्रतिक्रियांतून संस्थांच्या वार्षिक एकत्रीकरणाची गरज लक्षात आली. याचा पाठपुरावा म्हणून सेवा तरंग २.० या प्रकल्पाचे आयोजन केले आहे. या प्रकल्पांतर्गत सेवाभावी संस्थांसाठी, रविवार, १७ मार्च २०२४ रोजी एक दिवसीय 'सेवा तरंग २' या कार्यशाळेचे आयोजन करित आहोत.

कार्यशाळेत दोन प्रात्यक्षिक प्रशिक्षणे– प्रकल्प प्रस्ताव लेखन, संस्था मूल्यमापन व एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे.

कार्यशाळेची माहिती पुढीलप्रमाणे

सेवा तरंग २

स्थळ : BAIF सेमिनार सभागृह, वारजे, पुणे

दिनांक : रविवार, १७ मार्च २०२४

वेळ : सकाळी ०९:०० ते ६:००

शुल्क : रु. १००/– प्रतिव्यक्ती. (कार्यशाळा शुल्क, न्याहरी, जेवण आणि २ चहा समाविष्ट)

(एका संस्थेचे कमाल २ प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील)

नोंदणीचा अंतिम दिनांक: २९ फेब्रुवारी २०२४

नोंदणीसाठी लिंक: https://forms.gle/fDgff3AoXw4wf1xg8

आपण या कार्यशाळेत सहभागी होऊन प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

अधिक माहितीसाठी संपर्क:

ईमेल: contact@sevavardhini.org

दूरभाष: ८७६७५ २९६१७, ९८३४२ ४९७०५

एक आठवण: येत्या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक सर्व संस्थांनी धर्मादाय आयुक्तांकडे फेब्रुवारी अखेर पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

समितीने डॉ. पाठक यांच्या अभ्यासाचा व सामाजिक जाणिवेचा आवाका लक्षात घेऊन त्यांना सुरक्षित व परवडणारे शौचालय तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्याची जबाबदारी सोपवली. ही जबाबदारी डॉ. पाठक यांच्यासाठी मोठा प्रेरणास्रोत ठरली. आणि १९७० मध्ये डॉ. पाठक यांनी "सुलभ इंटरनॅशनल" या सामाजिक सेवाभावी संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून दोन पीट फ्लश शौचालय विकसित करण्यात आले. त्याची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली. तत्कालीन समाजात एका उच्चविद्याविभूषित, श्रीमंत व उच्चवर्णीय तरुणाने हे सर्व करणे इतके सोपे नव्हते. परंतु डॉ. पाठक यांनी जे-जे कठीण होते, ते-ते सर्व आव्हान म्हणून स्विकारले व पूर्णत्वासही नेले. हे सर्व करत असताना त्यांनी आपल्या आयुष्याला नवी दिशाही दिली. त्यांनी स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात केलेली जागृती अभूतपूर्व होती.

डॉ. बिंदेश्वर पाठक हे गांधीवादी सामाजिक कार्यकर्ते म्हणून भारतीयांना परिचित आहेत. त्याचप्रमाणे पर्यावरण, मानवी हक्क, मैला व्यवस्थापन, अपारंपारीक उर्जा, आणि सामाजिक व्यवस्थापन या क्षेत्रात कार्यरत असलेल्या "सुलभ इंटरनॅशनल" या संस्थेचे संस्थापक म्हणूनही त्यांची जगभर ख्याती आहे.

या स्वच्छतेच्या चळवळीला गतिमान करण्यासाठी डॉ. पाठक यांना अनेकवेळा सामाजिक दुष्टाईचा सामना करावा लागला. तरीही ते डगमगले नाही. त्याउलट त्यांनी दृढ निश्चयाने आपली सामाजिक चळवळ जोमाने पुढे रेटली.

डॉ. बिंदेश्वर पाठक यांचे कार्य स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रात अग्रेसर मानले जाते. त्यांच्या कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेऊन त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्याना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. १९९१ साली भारत सरकारने त्यांना "पद्मभूषण" हा पुरस्कार देऊन सन्मानित केले. तसेच २००३ साली जागतिक पातळीवरील ५०० सुप्रसिद्ध समाजसेवकांपैकी एक समाज सेवक म्हणूनही त्यांचा व त्यांच्या समाजाभिमुख कार्यांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर शेती क्षेत्रातील त्यांच्या भरीव कार्यासाठी त्यांना प्रियदर्शनी पुरस्कार व दुबई आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे २००९ साली इंटरनॅशनल रिन्यूएबल एनर्जी ऑर्गनायझेशन तर्फे 'रिन्यूएबल एनर्जी अवार्ड' प्रदान करण्यात आला. तसेच त्यांना भारत सरकार तर्फे स्व. इंदिरा गांधी पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. यावर्षीच प्रजासत्ताक दिनानिमित्ताने त्यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

आज "सुलभ इंटरनॅशनल" या संस्थेने जागतिक पातळीवर स्वच्छतेच्या क्षेत्रात आपले स्थान निश्चित केले आहे. गंध रहीत शौचालय व प्रवेश योग्य शौचालयाचे सुलभ तंत्रज्ञान भारतासह अनेक विकसनशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. सुलभ शौचालयातील कचऱ्याचा खत म्हणून वापर करण्यासही संस्थेतर्फे प्रोत्साहन दिले जाते. संस्थेच्या माध्यमातून मानवी हक्क, पर्यावरण, स्वच्छता, उर्जेचे अपारंपारीक स्रोत, आणि शिक्षणाद्वारे सामाजिक बदल इत्यादी विषयांवर सुमारे पन्नास हजार स्वयंसेवक समर्पित भावनेने काम करीत आहेत. यातच डॉ. बिंदेश्वर पाठक यांच्या महान कार्याचे गमक सामावलेले आहे.

अशा ह्या अवलिया समाज सुधारकाने १५ ऑगस्ट २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, दिल्ली येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

आज डॉ. बिंदेश्वर पाठक हे हयात नसले, तरी देशासाठी व समाज परिवर्तनासाठी त्यांनी दिलेले योगदान नव्या पिढीला प्रेरीत करत राहील. आणि त्यांच्या समाजाभिमुख कार्याच्या रुपाने त्यांनी सुरु केलेली सामाजिक चळवळ गतिमान होत राहील.

– संपादन: तात्याजी पवार, सेवावर्धिनी

सेवावर्धिनी

# सेवा तरंग 2.0

## सेवा वार्ता

अंक ४

२०२३-२४

सेवावर्धिनी
नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम" , राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०
कार्यालय: "चंदन"२६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ सेवा आरोग्य फाउंडेशन, पुणे

२.२ विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान, सांगली

३. संस्था संचालन – सोशल मिडीयाची ताकद आणि प्रभावी वापर

४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – एक मुठ्ठी अनाज अभियान

५. सेवाव्रती

५.१ पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे

५.२ पद्मश्री डॉ. मनोहर कृष्णा डोळे

६. सेवावार्ता – सेवा संस्थांसाठी महत्वाचे

# मनोगत

सेवातरंग २.० या अंतर्गत प्रकाशित होणार्‍या चौथ्या अंकात आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत. गेल्या महिन्यात आपण सेवावर्धिनीच्या वर्धापनदिनी प्रत्यक्ष भेटलो होतो. प्रकल्प अहवाल, आपल्याला आर्थिक मदत करणार्‍या आस्थापनांच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संस्थाबांधणी अंतर्गत सेवासंस्थांच्या व्यवस्थापनात असलेल्या त्रुटी शोधून काढून त्या दूर करण्याच्या संबंधीची उपाययोजना निश्चित करण्यासाठी दिशा दाखवणारे सेवावर्धिनीने तयार केलेले एक तंत्र आपण पाहिले. त्यानंतर आभासी माध्यमाद्वारे आर्थिक नियोजनाबाबत झालेल्या मार्गदर्शन कार्यक्रमात आपण भाग घेतलात. या सर्वांचा आपण प्रत्यक्ष संस्थाचालनात उपयोग करून घ्याल याची खात्री वाटते.

आजच्या अंकात आपण आरोग्य क्षेत्रात काम करणार्‍या दोन संस्था व त्यांचे कार्य यांची माहिती करून घेणार आहोत. सेवाभावी वृत्तीने समाजासाठी झोकून देऊन आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या अशाच दोन व्यक्तींचीही आपण या अंकात ओळख करून घेणार आहोत. सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर एक व्यक्ति किती महान कार्य उभे करू शकते हे वाचणे आपल्याला स्फुर्तिदायक ठरेल. समाजाच्या दैनंदीन जीवनातील निरिक्षणांवरून समस्यांची अनुभूती होऊन त्यावर आपण नुसताच विचार न करता प्रत्यक्ष काहीतरी करायला पाहिजे या भावनेतून एका व्यक्तिने सुरु केलेला एक प्रकल्प फक्त गरजवंतांना मदत करत नाही, तर हजारो कुटुंबांना सेवा कार्यात कसा जोडू शकतो याबद्दलही आपण जाणून घेणार आहोत.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या दैनंदीन जीवनात वेगवान बदल घडत आहेत. आपण लोकांशी संवाद कसा साधतो, माहितीचे आदान प्रदान कसे करतो याची माध्यमे गेल्या दोन दशकात खूप बदललेली आहेत. या बदलाची नोंद घेऊन आपण संस्था संचालनासाठी अशा नविन समाज माध्यमांचा (सोशल मिडियाचा) वापर कसा करून घेऊ शकतो याची उद्बोधक माहिती आपण घेणार आहोत. या नविन माध्यमांचा वापर करण्यात आपल्याला आता मागे राहून चालणार नाही. या संबंधीची आभासी चर्चा आपण मे महिन्यात करणार आहोत. नेहमीप्रमाणे आपण लेख वाचून त्यावर आपल्या प्रतिक्रिया तसेच असल्यास काही शंका आम्हाला कळवाव्यात म्हणजे त्याचे निरसन प्रत्यक्ष चर्चेत करता येईल.

हा अंक हाती पडे पर्यंत जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीची निवडणूक प्रक्रिया चालू झाली असेल. आपण सर्वांनी मतदान करून इतरांसही प्रवृत्त करावे व बलशाली भारताच्या उभारणीत आपले अमूल्य योगदान द्यावे ही विनंती करून आज येथे थांबतो.

– विक्रम पंडित



## वार्षिक उपक्रम

### निवासी शिबीर

घे भरारीच्या २०० किशोरींचे दोन दिवसीय निवासी शिबीर राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा,कासार आंबोली येथे २५,२६ डिसेंबर ला संपन्न झाले.

### फिल्ड व्हिजीट

वर्गातील मुलींना तुम्हाला काय व्हायचे आहे ? असे विचारल्यावर बऱ्याच मुली सैनिक ,पोलीस व्हायचे आहे असे सांगतात. त्यामुळे करिअर मार्गदर्शनासाठी तज्ञांना आमच्याकडे न बोलावता आम्ही मुलींना  फिल्ड व्हिजीट साठी घेऊन जातो. सेंद्रिय शेती,अग्निशामक दल,आर्मी युनिट ,पोलीस प्रशिक्षण केंद्र अशा ठिकाणी घे भरारी प्रकल्पातील किशोरींची फिल्ड व्हिजीट झालेली आहे.

"घे भरारी" हा फक्त एक प्रकल्प नसून किशोर वयातील मुलींना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून देऊन त्यांच्या आकांक्षांना साकार करण्याची संधी प्रदान करण्याचे एक अभियान आहे.

**– प्रदीप कुंटे**

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.१ सेवा आरोग्य फाउंडेशन, पुणे

प्रत्येक व्यक्तीला निरोगी व परिपूर्ण जीवन जगण्याची संधी, योग्य वैद्यकीय सेवा मिळणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून २०१६ मध्ये सेवा आरोग्य फाउंडेशनची स्थापना झाली. पुण्यातील वंचित समुदायांसाठी आरोग्यसेवा सुलभता आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी समर्पित सेवा देणे हे संस्थेचे ध्येय आहे. पुण्यातील कोथरूड, कर्वेनगर, वारजे, उत्तमनगर व शिवणे आदि परिसरातील वस्तीमध्ये सेवा आरोग्य मागील ८ वर्षांपासून काम करत आहे. आरोग्यवर्धन, घेभरारी, समृद्धी वर्ग व शिक्षण उपक्रम असे आयाम असून या अंतर्गत आरोग्य, शिक्षण, संस्कार इत्यादी उपक्रम घेतले जातात. यातील प्रत्येक उपक्रमाविषयी थोडक्यात जाणून घेऊ.

आरोग्यवर्धनचा अर्थ आरोग्य सुधारणे असा आहे. सेवा आरोग्य फाउंडेशनचा हा प्रमुख उपक्रम आहे. मागील ८ वर्षांत २५ वस्त्यांमधून २८ साप्ताहिक अल्पमूल्य दवाखाने सुरू असून यामध्ये ॲलोपॅथिक २०, आयुर्वेदिक १, फिजिओथेरपी ५ आणि नेत्र तपासणी २ असे दवाखाने सुरू केले आहेत. यातील लाभार्थींची संख्या ९१,००० आहे.

साप्ताहिक दवाखाना: सेवा वस्तीमध्ये साप्ताहिक दवाखाने सुरु आहेत. त्याच भागामध्ये मंदिर या छोट्या खोलीमध्ये दवाखाना चालवला जातो. दोन प्रकल्प समन्वयक, सहा वस्ती समन्वयक व तीस आरोग्य मैत्रिणी अशा साऱ्याजणी मिळून सेवाकार्याची धुरा सांभाळतात. वस्तीमध्ये राहणारी महिला दवाखान्यात आरोग्यमैत्रीण म्हणून काम करते. दवाखान्यामध्ये सर्दी, खोकला, ताप यासोबतच ॲनेमिया, हाडांमधील ठिसूळपणा, त्वचारोग, सांधेदुखी, डोळ्यांचे विकार अशा विविध आजारांवर उपचार केले जातात. ज्यांना सांधेदुखी, पक्षाघात आहे अशा रुग्णांना फिजिओथेरपी ओपीडीला तर डोळ्याचे आजार असणाऱ्या पेशंटची Eye OPD ला जोडणी करून दिली जाते. त्वचाविकार सारख्या काही आजारांवर होमिओपॅथि उपचार केले जातात.  मागील ४ वर्षांपासून नंदादीप बालक मंदिर येथे आयुर्वेद OPD चालू आहे. संधीवात, आमवात, मूळव्याध, जीर्ण- अम्लपित्त, त्वचा विकार इ. व्याधिंपासून स्त्रियांचे विकार, वंध्यत्व, उच्च रक्तदाब , मधुमेह, किडनी स्टोन, मज्जातंतूचे विकार, कॅन्सर अशा आजारांकरिता येथे पूर्ण आयुर्वेदीय उपचार नाममात्र दरात केले जातात. राष्ट्रसेविका समूहातील युवा वैद्य या विभागाचे काम सातत्याने पाहत आहे. प्रति सप्ताह १०० रुग्ण येथे चिकित्से करता येतात. तर आता पर्यंत हजारो रुग्णांनी या आयुर्वेद उपचारांचा लाभ घेतला आहे.

### वार्षिक शिबीर:

वस्तीमधील लोकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी वार्षिक शिबिरांचे आयोजन करण्यात येते. अशी ७८ आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून वस्तीतील लोकांना आरोग्यविषयक उपचार व मार्गदर्शन केले आहे.

### ॲनिमिया निर्मुलन १०० दिवस उपक्रम:

ज्यांचे रक्त कमी आहे त्यांची शिबिरामधे नोंदणी केली जाते. त्यांना साप्ताहिक दवाखान्यात तपासून पुढील ४५ दिवसासाठी रक्तवर्धक, विटामीन सी औषध दिले जाते. त्यांना आहाराचे व जीवनशैली बदल याविषयी मार्गदर्शन केले जाते. लोखंडी कढईत स्वयंपाक करण्याचे फायदे सांगितले जातात.

## फिजिओथेरपी दवाखाना:

वस्तीमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, मानदुखी, लहान वयात पॅरॅलेसेसचे प्रमाण जास्त आढळून आले. आतापर्यंत बरे झालेली रुग्ण संख्या १३०० आहे. तर पॅरॅलेसिस झालेले पेशंट काही बरे झाले आहेत तर काही पेशंट वरती उपचार चालू आहेत त्यांच्यामध्ये ६०% फरक दिसून येत आहे.

नेत्र दवाखाना: आठवड्यातून दोन दिवस नेत्र दवाखाने सुरु आहेत. पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी संजीवनी हॉस्पिटलमधील रेणुका नेत्रालयाची मदत घेतली जाते. यावर्षी १७ नेत्र तपासणी शिबिर घेऊन यात सुमारे ४००० लोकांची तपासणी करून डोळ्यांच्या अनेक विकारांचे रुग्ण बरे केले आहेत. त्यामध्ये मोतीबिंदू, नासुर, रांजणवाडी, लांबचा चष्मा, जवळचा चष्मा, डोळ्यांचे अनेक विकार समाविष्ट आहेत.

## समृद्धी वर्ग

संस्कारांचा उपयोग करून आपल्या रोजच्या व्यावहारिक जीवनात आपले स्वतःचे जीवन समृद्ध कसे करायचे याचे सहशिक्षण देणारा, विविध कलागुणांना वाव देणारा, स्वतःच्या कुटुंब, समाज, देश यांच्या प्रगतीचे स्वप्न पहायला शिकवणारा पुढे जाताना आपल्यासह इतरांनाही घेतले पाहिजे ही जाणीव करून देणारा विचार विकसित करण्याच्या उद्देशाने वस्तीतील मुलांसाठी हा प्रकल्प सुरु केला आहे.

सध्या कोथरुड, कर्वेनगर, उत्तमनगर, परमहंस नगरातील एकूण २० वस्त्यांमध्ये ३ ते १४ वयोगटातील मुलांसाठी हे वर्ग चालू आहेत. प्रत्येक वर्गात साधारण २० ते २५ मुलांची उपस्थिती असते. एकूण ६४० मुलांची संख्या आहे.

पर्यावरण संवर्धनातील आपली जबाबदारी काय हे लहान वयातच रुजल पाहिजे. यासाठी पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणारा एक अभिनव उपक्रम घेतला ई-कचरा संकलन.

## घे भरारी किशोर विकास प्रकल्प –

## एकुण वर्ग १७, साप्ताहिक उपस्थिती ४००

२०१८ मध्ये सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेचे काम असलेल्या वस्त्यांमधील १२ ते १८ वयोगटातील किशोरींच्या प्रश्नांना योग्य उत्तरे देऊन योग्य मार्गदर्शन करणे, योग्य वेळी योग्य निर्णय घेणे, व्यक्त होण्याची जागा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या पंखात बळ भरून त्यांना उंच भरारी घेण्यासाठी सक्षम करणे हे ध्येय समोर ठेऊन "घे भरारी" किशोर विकास प्रकल्पाची सुरुवात केली. सध्या एकुण १७ वस्त्यामधे १७ साप्ताहिक वर्ग चालतात, त्यामधे ४०० किशोरी सहभागी आहेत.

## साप्ताहिक वर्ग उपक्रम

संयम सत्रातर्गत किशोर वयातील विविध समस्यांवर प्रशिक्षित समुपदेशकांकरवी वेगवेगळ्या विषयांवर सत्रे घेण्यात येतात.

## समुपदेशन

गेल्यावर्षी पासून "घे भरारी" वर्गातील किशोरींना वैयक्तिक समुपदेश करत आहोत. वर्गातील काही मुलींना प्रत्यक्ष समुपदेशनाची आवश्यकता आहे असे वाटल्यास संस्थेच्या कार्यालयात प्रत्यक्ष समुपदेशन केल्या जाते.

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.२ विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान, सांगली

"वैद्यकीय सेवेतून सामाजिक परिवर्तन" हे उद्दिष्ट समोर ठेवून दि. १२ जानेवारी २००१ रोजी 'विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान'ची स्थापना झाली. ज्या परिसरात कोणत्याही प्रकारची आरोग्यसेवा पोहोचलेली नाही, अल्प उत्पन्न गटातील व दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती व मुले वैद्यकीय सेवेपासून वंचित आहेत, ज्यांना वैद्यकीय उपचारासाठी कित्येक मैल चालत जावे लागते, प्रामुख्याने अशा समाज घटकांसाठी विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानची स्थापना डॉक्टर राम लाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. निस्पृह, निरपेक्ष, निस्वार्थी वृत्तीने सेवा ही विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानची ओळख. ग्रामीण व गरीब लोकांसाठी संस्थेमार्फत खालील सेवा प्रकल्प चालवले जातात.

१. विवेकानंद रुग्णालय
२. संजीवन लिंक वर्कर स्कीम
३. लक्ष्मीप्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूट
४. विवेकानंद कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था
५. विद्यार्थी पालकत्व योजना
६. विवेकानंद मोबाईल हेल्थ युनिट्स
७. अन्नपूर्णा योजना
८. विवेकानंद पुस्तक प्रदर्शनी
९. स्वस्थ ग्राम
१०. महिला बचत गट
११. आरोग्य मित्र
१२. होम नर्सिंग केअर
१३. स्वल्पविराम योजना
१४. विवेकानंद रुग्ण साहित्य केंद्र
१५. संवाद हेल्पलाइन
१६. ज्येष्ठांसाठी निरामय योजना
१७. स्वच्छ पेय जल योजना
१८. ॲनेमिया इरॅडिकेशन प्रकल्प
१९. सहारा प्रकल्प
२०. सहेली प्रकल्प
२१. सेवासरिता
२२. स्नेहसदन प्रकल्प (प्रस्तावित)

### विवेकानंद हॉस्पिटल

संस्थेचे हे हॉस्पिटल १०० बेडस् चे असून सर्व रुग्णांची मनोभावे सेवा करणारे तज्ज्ञ व कुशल अनुभवी डॉक्टर्स, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि सुसंस्कारित पॅरामेडिकल स्टाफ हे या हॉस्पिटलचे वैशिष्ट्य आहे. विवेकानंद हॉस्पिटलमध्ये बामणोली, कुपवाड आणि आजूबाजूच्या २०/२५ खेडेगावांमधून, वाड्या व वस्त्यांमधून, तसेच सोलापूर, सातारा, कोल्हापूर, कर्नाटकातील बेळगाव, विजयपूर अशा जिल्ह्यांमधूनही विविध आजारांनी ग्रस्त रुग्ण येतात. विवेकानंद हॉस्पिटल मध्ये आज पर्यंत ६,५०,००० पेक्षा जास्त पेशंटनी उपचार घेतले असून ५००० प्रसूती तसेच ९००० पेक्षा जास्त शस्त्रक्रिया दहा ते बारा वर्षांमध्ये झाल्या आहेत.

हॉस्पिटलमध्ये वेगवेगळे स्पेशालिटी विभाग चालवले जातात. यामध्ये मेडिसिन, शस्त्रक्रिया, प्रसुती आणि स्त्रीरोग, बालरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा, दंतरोग, हृदयरोग, अस्थिरोग, कॅन्सर, मधुमेह, मेंदूरोग, मानसिक आजार, मूत्ररोग, निसर्गोपचार, आयुर्वेद, पंचकर्म इत्यादी विभाग आहेत. तसेच रुग्णालयामध्ये ३
मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्स, २० बेडचा अतिदक्षता विभाग, नवजात शिशू अतिदक्षता विभाग, एक्सरे, सोनोग्राफी, पॅथॉलॉजी, रक्तपेढी, डायलिसीस व अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे; जसे की, सी आर्म, लॅप्रोस्कोप, न्युरोसर्जरी मायक्रोस्कोप, ऑपथलमिक सर्जरी मायक्रोस्कोप, व्हेंटिलेटर्स, सी. पॅप, बायपॅप, ए स्कॅन, बी स्कॅन, ग्रीन लेझर इ. उपलब्ध आहेत. तसेच हृदयावरील शस्त्रक्रिया करण्याची अत्याधुनिक सामग्री ही लवकरच बसवली जाणार आहे.

या रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना, कामगार विमा योजना, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना तसेच कर्नाटकची सुवर्ण आरोग्य सुरक्षा ट्रस्ट योजना या सर्व योजनांमार्फत मोफत उपचार केले जातात. तसेच अनेक विमा कंपन्यांच्या बरोबर करार झालेला असून त्या विमा कंपन्यांच्या मार्फत असणाऱ्या योजनांचा लाभ ही रुग्णांना दिला जातो.

कोविड काळामध्ये विवेकानंद हॉस्पिटल हे डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल म्हणून शासनाने जाहीर केले. कोविडच्या दोन्ही लाटेमध्ये एकूण १६०० पेशंट रुग्णालयामध्ये दाखल झाले आणि यशस्वीरित्या उपचार पूर्ण करून डिस्चार्ज केले गेले. त्याचबरोबर १६००० पेक्षा जास्त पेशंटनी बाह्य रुग्ण विभागात उपचार घेतले. यातील बहुतांशी पेशंटवर शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले योजनेखाली मोफत उपचार केले गेले आणि त्यामुळे पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी विवेकानंद रुग्णालयाचा विशेष सत्कार केला आहे.

विवेकानंद हॉस्पिटलमध्ये कोव्हीड लसीकरण केंद्रही उपलब्ध होते. १०,००० पेक्षा जास्त लोकांचे लसीकरण रुग्णालयामार्फत मोफत करण्यात आले. सध्या रुग्णालयाचा १०६ कर्मचारी वृंद असून ३६ स्पेशालिस्ट डॉक्टर्स उपलब्ध आहेत. रुग्णालयाचा व्याप दिवसेंदिवस वाढतच असून, रुग्णांवर कमीतकमी खर्चांमध्ये उपचार केले जातात.

## संजीवन लिंक वर्कर स्कीम:

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई व विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान संचलित संजीवन लिंक वर्कर स्कीम एप्रिल २०१७ पासून सांगली जिल्ह्यातील शंभर गावात सुरु असून सदर प्रकल्पात २४ कर्मचारी काम करीत आहेत. या प्रकल्पांतर्गत एच. आय. व्ही बाबत जनजागृती केली जाते. गावातील तरुण मंडळे, महिला मंडळे, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांना एचआयव्ही व एड्स विषयी प्रबोधन व प्रशिक्षण दिले जाते शिवाय विद्यालय व महाविद्यालयातील विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना एचआयव्ही, एड्स विषयी प्रबोधन केले जाते. गावात आरोग्य शिबिरे घेऊन ट्रक ड्रायव्हर्स, सेक्स वर्कर्स, विस्थापित कामगार वर्ग तसेच तृतीयपंथी यांची एचआयव्हीची तपासणी करणे, मोफत निरोध वितरण (कंडोम) केंद्र स्थापन करणे, टोल फ्री नंबर १०९७ चा प्रचार करणे जेणेकरून संपर्क करून एचआयव्ही, एड्स विषयी माहिती घेण्यास प्रवृत्त केले जाते. तसेच एचआयव्ही पॉझिटिव्ह असणाऱ्या व्यक्तींचे एआरटी औषधोपचारासाठी सातत्य राखणे, गुप्तरोगासाठी संदर्भित सेवा देणे व औषधोपचार संबंधी माहिती देणे इत्यादी कार्य या प्रकल्पांतर्गत केले जाते. सर्व गावात संजीवन लिंक वर्कर स्थानिक समितीची स्थापना केली आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील २६ लाख लोकांपर्यंत संपर्क केला आहे. आजपर्यंत ७६ हजार जणांची मोफत रक्त तपासणी केली आहे. त्यामधून २२८ नवीन एच. आय. व्ही. बाधित रुग्णांची नोंद झाली.






फिरता दवाखाना उपक्रमातून संस्था गेल्या दहा वर्षांपासून सांगली जिल्ह्यातील श्यामनगर, सावळी, तानंग, कानडवाडी, वाघमोडे नगर, रसूलवाडी, कांचनपूर, हरिपूर, धुळगाव, सोनारवाडी, मानमोडी, बुधगाव, म्हैसाळ, सांगलीवाडी, दुर्गानगर, कापसे प्लॉट, दत्तनगर, बजरंगनगर, ज्ञानगिरी वसाहत, कवलापूर, बुधगांव, पाटगाव, इंदिरानगर (बुधगाव), सिध्देवाडी, सिध्दार्थ परिसर, अंबाजी माळी वस्ती, स्वामी मळा, अष्टविनायकनगर, इंदिरानगर (सांगली) इत्यादी ठिकाणी आरोग्यसेवा पुरवित असून महिला, ज्येष्ठ नागरिक, गरीब व गरजू लोकांना या सेवेचा लाभ होत आहे. या गाडीत प्रथमोपचार, औषधे, इंजेक्शन, ड्रेसिंग किट, सलाईन इत्यादी उपचार रुग्णांना मोफत मिळू लागले, त्यामुळे अल्पावधीतच हा फिरता दवाखाना या गावांची गरज बनला आहे. गावातील लोकांचा एकूण आरोग्य स्तर सुधारण्यासाठी महिन्यातून एकदा प्रत्येक गावी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात.

शिबिरांमध्ये लोकांच्या विविध रक्त तपासण्या, डोळे, हाडांचे आजार, स्त्रियांचे आजार इत्यादींचे निदान व उपचार केले जातात. वेगवेगळ्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या भेटी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले जाते. गावातीलच काही समाजसेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य व मंडळी या उपक्रमात आपला हातभार लावत असतात. सध्याच्या फिरत्या दवाखान्याद्वारे दहा वर्षामध्ये २५० पेक्षा जास्त आरोग्य शिबिरांचे आयोजन झाले आहे. फिरता दवाखाना प्रकल्पामुळे ३,००,००० पेक्षा जास्त रुग्णांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. ३० गावे आणि वस्त्यांमध्ये विवेकानंद प्रतिष्ठानचा फिरता दवाखाना जातो. रुग्णांची तपासणी व औषधोपचार निशुल्क केला जातो. हजारो रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. फिरता दवाखाना उपक्रम राबवताना औषधांचा खर्च कर्मचाऱ्यांचे मानधन, इंधन इत्यादी खर्चाचा संस्थेवर भार पडतो. या प्रकल्पासाठी प्रत्यक्ष होणारा खर्च रुपये ६०००० ते ६५००० इतका आहे तरीसुद्धा विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान तसेच समाजातील दानशूर व्यक्ती, कंपन्यांचे सीएसआर फंड, संस्थेचे शुभचिंतक व कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नामुळे हा आरोग्य रथ....

"सेवा हे यज्ञकुंड" या उक्तीप्रमाणे अविरत कार्यरत आहे. असे दोन मोबाईल हेल्थ युनिट्स कार्यरत आहेत.

**– अनिल मोरे**

## लक्ष्मी प्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूट

वैद्यकीय क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि पॅरामेडिकल स्टाफची वाढती गरज लक्षात घेऊन संस्थेने २०११ साली लक्ष्मीप्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूटची स्थापना केली. यामध्ये शासनमान्य ए एन एम हा नर्सिंग कोर्स सुरू केला आहे. या इन्स्टिट्यूटमध्ये सुसज्ज फंडामेंटल लॅब, सी.एच.एन. लॅब, ॲनाटॉमी लॅब व लायब्ररी आहे. लक्ष्मी प्रभा नर्सिंग इन्स्टिट्यूटचे वामणोली येथे विद्यार्थिनींसाठी वसतिगृह व मेस आहे. आजपर्यंत आठ ते बऊ जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांनी हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या विद्यार्थीनींना नर्सिंग कौशल्य प्राप्त व्हावे म्हणून विवेकानंद हॉस्पिटल येथे त्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाते. या सर्व नर्सेस देशभरात विविध शासकीय व खाजगी हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेचे कुशल काम करत आहेत व त्यातून पूर्णपणे आर्थिक स्वावलंबी झाल्या आहेत. भविष्यामध्ये जी.एन.एम. व बी.एससी. (नर्सिंग) हे कोर्सेस चालू करण्याचे प्रयोजन आहे. संस्थेने कोर्सेससाठी जवळच १.५ एकर जागा खरेदी केली आहे.

## विवेकानंद कौशल्य प्रशिक्षण संस्था

संस्थेमार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण प्रकल्पांतर्गत शासनमान्य कोर्सेस चालवले जातात. त्यामध्ये ओ. टी. टेक्निशियन, आय.सी.यु. टेक्निशियन तसेच सर्टिफिकेट कोर्स इन नर्सिंग केयर चालवले जातात. अनेक विद्यार्थी हे कोर्सेस करुन स्वत:च्या पायावर उभे राहिले आहेत. आजपर्यंत २००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला आहे. या कोर्सेस अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठी विवेकानंद हॉस्पिटल येथे सुविधा उपलब्ध आहे.

### विद्यार्थी पालकत्व योजना

ज्या मुला मुलींना वडील किंवा आई वडील दोन्ही नाहीत अशा गरीब घरातील मुलांचे पालकत्व संस्थेमार्फत स्वीकारले जाते. या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी स्टेशनरी युनिफॉर्म तसेच इतर लागणारा खर्च संस्थेमार्फत केला जातो. तसेच करिअर मार्गदर्शन, सहल, दिवाळीनिमित्त ड्रेस व खाऊ वाटप केले जाते. चौथीपासून ते ग्रॅज्युएट पर्यंतच्या वयोगट असणारे विद्यार्थी त्यांचे पालकत्व संस्थेतर्फे स्वीकारले जाते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीची चौकशी वरचे वर केली जाते. तसेच त्यांना मानसिक आधार दिला जातो. अनेक चांगल्या आस्थापनांमध्ये या योजनेतील लाभार्थी नोकरीत असून आमच्या संस्थेचे नाव उज्ज्वल करत आहेत. आजपर्यंत ३५० पेक्षा जास्त अनाथ विद्यार्थी विद्यार्थिनी या योजनेच्या लाभातून लाभान्वित झाले आहेत. अनेक विद्यार्थी चांगल्या नोकऱ्या मिळवून स्वत:च्या पायावर उभे राहिले आहेत.

### अन्नपूर्णा योजना

या योजनेअंतर्गत विवेकानंद हॉस्पिटलमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोफत भोजन दिले जाते. रोज सरासरी ७० ते १०० रुग्णांना व नातेवाईकांना याचा लाभ मिळतो. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांची भोजनासाठीचा डबा आणून देण्यासाठीची परवड टाळली जाते. आजपर्यंत हजारो रुग्णांची रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

### विवेकानंद मोबाईल हेल्थ युनिट्स

दिनांक ३१ जानेवारी २०१२ रोजी विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठानमार्फत चालवला जाणाऱ्या फिरता दवाखाना या प्रकल्पाची सुरुवात झाली. हा प्रकल्प सुरु करण्यामागे संस्थेचा उद्देश ज्या खेड्यात, वाड्या-वस्त्यांवर आजही प्राथमिक आरोग्य सेवांची कमतरता आहे तेथे या फिरत्या दवाखान्यामार्फत मोफत आरोग्य सेवा पुरवणे हा आहे. या उपक्रमाद्वारे वृद्ध, अपंग, गरोदर स्त्रिया तसेच अंथरुणाला खिळून असणाऱ्या रुग्णांना आरोग्यसेवा पुरवल्या जातात.

## संस्थेला मिळालेले पुरस्कार

- युनिसेफ पुरस्कार २००७-०८
- आदर्श संस्था पुरस्कार ग्रा.पं. धामणोली २००९-१०
- बेस्ट वॉलेंटरी ऑर्गनायझेशन पुरस्कार
- मानव संसाधन व विकास मंत्रालय नवी दिल्ली २०१०-११
- रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी पुरस्कार २०११-१२
- लुल्ला चॅरिटेबल ट्रस्ट यांचेकडून प्राप्त पुरस्कार २०१२-१३
- समर्पण पुरस्कार बँक ऑफ बडोदा २०१६
- डी.ए.पी.सी.यु. (एम्सॅक्स) पुरस्कार २०१६
- बेस्ट सेवा पुरस्कार फॉर कोविड महाराष्ट्र सरकार २०२१
- कै.बापूराव गोरे पुरस्कार २०२१
- इदं न मम पुरस्कार साप्ताहिक विजयंत
- क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके पुरस्कार सांगली (जिल्हा) नगरवाचनालय सांगली २०२१

5. सोशल मिडियाद्वारे संस्था आपल्या हाती घेतलेल्या प्रकल्पांची अद्ययावत माहिती, यशोगाथा, अडचणी याबद्दल माहिती तसेच शंकांचेही निरसन करू शकतात.
6. सोशल मिडियामधे एखाद्या येणार्या उपक्रमांची माहिती देऊन संस्था त्यातील सहभागींची उपस्थिती आणि परिणामकारकता वाढवू शकतात.
7. सोशल मिडिया हे संवादाचे माध्यम आहे. त्याद्वारे सेवासंस्था वेगवेगळ्या सूचना, नाविन्यपूर्ण कल्पना मागवू शकतात. तसेच मतदान घेऊन, चर्चा घडवून आपला उपक्रम सर्वसमावेशक करू शकतात.
8. याशिवाय सेवासंस्था आपल्या विषयांबद्दल जागृती तसेच वेगवेगळ्या विकास कामांबद्दल योग्य माहिती प्रसारीत करून समाजात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करू शकतात.

### तात्पर्य:

'आतापर्यंत नमूद केलेले मुद्दे व घ्यायवयाची काळजी विचारात घेऊन" सोशल मिडीया आपल्या सारख्या संस्थांना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देऊन आपले कार्य सिद्धिस नेण्यासाठी मदत करू शकते. आपण सर्वांनी आता लवकरात लवकर योजनापूर्वक सोशल मिडियाचा वापर करून त्याचा आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी जास्तीत जास्त सुयोग्य उपयोग करून घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

**– डॉ. रविंद्र उतगीकर**

**उपाध्यक्ष, कार्पोरेट स्ट्रॅटेजी, प्राज इंडस्ट्रीज पुणे.**

# ३.० संस्था संचालन
# – सोशल मिडीयाची ताकद आणि प्रभावी वापर.

### A. सोशल मिडिया (समाज माध्यमे) म्हणजे काय ?

आजच्या युगात सोशल मिडिया ही अशी एक शक्तिशाली व्यवस्था निर्माण झाली आहे की ज्यायोगे आपण आपले विचार, भावना संपूर्ण जगापर्यंत क्षणार्धात पोचवू शकतो व ज्यायोगे आपण आपल्या संस्थेच्या कार्याशी संबंधीत असलेल्या सर्वांशी प्रभावीपणे संवाद स्थापून आपल्याला अपेक्षित असलेला सकारात्मक बदल घडवू शकतो. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, लिंकडइन, यु ट्यूब व व्हॉट्सअप सारखी अनेक माध्यमे आज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. ज्यांचा आपल्या आचार, विचार आणि एकंदर जीवनाचरण प्रचंड प्रभाव पडतो. या माध्यमांद्वारे आपण व्यक्त होत असतो आणि माहिती व ज्ञानाची देवाण घेवाण करत असतो.

### B. सोशल मिडियाचे वाढते महत्व

संपर्क: समाज माध्यमातून आपण आपल्या जगभरातल्या परिवाराशी, मित्रमंडळींशी आणि आपल्या संबंधीत असलेल्या सर्वांशी संपर्क साधून आपल्या भावना, अनुभव, विचार, संकल्प व इतर अनेक गोष्टींची देवाणघेवाण करत असतो. या माध्यमांवर आपण चित्रे, चलचित्रे, विविध कला याद्वारे आपला विचार, आपले संशोधन वा आपले यश जगभर पोहोचवू शकतो.

या आभासी माध्यमांचे मुख्य वैशिष्ठ्य म्हणजे; प्रत्येकासाठी समान संधी; प्रत्येक व्यक्ति, गरीब असो वा श्रीमंत, ग्रामिण असो वा शहरी, कुठल्याही मर्यादेशिवाय सामाजिक भेदभावापलिकडे जाऊन आपले विचार अतिशय कमी खर्चात जगभर पोचवू शकतात. वेगवेगळ्या विचारांना बांधील असलेल्या पारंपारीक माध्यमात ते शक्य होत नाही. नवमाध्यमांची ही ताकत आपण ओळखली पाहिजे व तिचा खुबीने उपयोग करून घेण्यास शिकले पाहिजे.

### C. सोशल मिडियाचा संस्थेसाठी वापर

आज संस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी,  आपल्या समाजातील विविध घटकांना संस्थेच्या कार्यात सामावून घेण्यासाठी सोशल मिडियाचा वापर आवश्यक आणि अनिवार्य झाला आहे. आपण विविध प्रकारे नियोजन करून उपलब्ध असलेल्या संधी/ शक्यतांचा सोशल मिडियाद्वारे पुरेपूर फायदा करून घेऊ शकतो. उदा;

1. माहिती संकलन व पृथःकरण: यासाठी उपलब्ध असलेल्या विविध तंत्रांद्वारे आपण आपल्या पुढे असलेल्या विविध प्रश्नांची, परिसराची,  तसेच समाजाची विचार आणि वागणूक विषयक माहिती संकलीत करून व त्याचा सखोल अभ्यास करून सर्वोत्कृष्ट परिणामांसंबंधीची उपाय योजना निश्चित करू शकतो.

2. माहितीची गुणवत्ता:

समाज माध्यमांचा उपयोग करताना योग्य परिणाम होण्यासाठी आपण प्रसारीत करीत असलेले लिखाण उच्च दर्जाचे  व आकर्षित करणारे असणे अत्यंत आवश्यक आहे. माहितीपूर्ण लेख, चलचित्रे किंवा इतर काही आपल्या श्रोत्यांच्या आकांक्षा समोर ठेऊनच तयार केले पाहिजेत.

3. भावनिक गुंतवणूक : या संवादांद्वारे आपण आपल्या अपेक्षित समुहांवर आपल्या विचारांचा प्रभाव टाकून त्यांच्याबरोबर भावनिक जवळीक निर्माण करू शकतो. ज्याद्वारे ते समूह आपल्या कार्यात समाविष्ट होऊन अपेक्षित परिणाम साध्य करू शकतात. पण यासाठी आपली विश्वासार्हता प्रथम प्रस्थापित करणे महत्वाचे आहे.

**D. सोशल मिडिया वरील आपली प्रतिमा :**

१. प्रतिमा: सोशल मिडियावर आपली प्रतिमा निर्माण करण्यासाठी योजनापूर्वक तयारी असणे, सातत्य असलेली आणि कुतूहल जागृत करणारी माहिती देणे जरुरीचे आहे. त्यासाठी खालील गोष्टींचा विचार होणे महत्वाचे आहे. सोशल मिडियावरील गर्दीत आपली विशेष प्रतिमा निर्माण करणे गरजेचे आहे. यामध्ये आपले कार्यक्षेत्र, आपली मुल्ये यात आपल्या अपेक्षित समुहांच्या आकांक्षा प्रतिबिंबीत होणे महत्वाचे आहे. आपण सतत वेळोवेळी प्रयत्न करुन आपल्याशी संबंधीत समुहांमधे आपली प्रतिमा उत्कट होण्यासाठी प्रयत्न करणे हे आवश्यक आहे.

२. संदेश: आपण आपल्याबद्दल देत असलेल्या संदेशामधे सातत्य असणे जरुरीचे आहे. वेगवेगळ्या माध्यमांद्वारे जाणारी आपल्या बद्दलची माहिती, आपला संदेश यामधे सुसूत्रता असणे व त्याचा आपल्या मुल्यांशी तसेच उद्दीष्टांशी योग्य मेळ असणे आवश्यक आहे. याद्वारे सेवा संस्था आपली प्रतिमा बळकट करुन आपल्या बद्दल विश्वास निर्माण करु शकतात.

३. दृष्य माहिती: फोटो किंवा व्हिडिओ याबाबत आपल्याला खूप मदत करु शकतात. अनेक सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर यासाठी खूप सोयी उपलब्ध असतात. ज्याचा वापर आपण दर्शकाला आकर्षित करुन आपली एक लक्षात रहाण्यासारखी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करु शकतो.

४. थेट प्रक्षेपण: कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण सोशल मिडियावर आता खूप लोकप्रिय होत आहे. याद्वारे आपल्या कार्यक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन आपण अपेक्षित समुहांना विश्वासार्ह माहिती वेळच्या वेळी पारदर्शक पद्धतीने पोचवू शकतो ज्यायोगे आपली योग्य व विश्वासार्ह प्रतिमा निर्माण होऊ शकते.

**E. सोशल मिडियाचे भवितव्य :**

आपण इतरांशी कशा प्रकारे संपर्क साधू शकतो याबाबत गेल्या पंचवीस वर्षांत झालेले अचंबीत करणारे बदल आपण प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. यापुढे आभासी प्रतिमा, विदा नियोजन तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवनविन तंत्रज्ञानामुळे सोशल मिडियाची प्रगती विलक्षण वेगाने होणे अपेक्षित आहे. तसेच आपल्या दैनंदीन जीवनातही तंत्रज्ञान वेगाने प्रवेश करत आहेत. मोबाईल सारख्या साधनांचा आपण अगदी नेहमीच्या जीवनात आपण पहातोच. तसेच सोशल मिडियाचे होणार आहे. या अमोघ शस्त्राचा वापर आपण आतापासूनच करायला शिकले पाहिजे.

**सेवासंस्थांसाठी सोशल मिडियाचे महत्व**

आतापर्यंत आपण सोशल मिडियाच्या वापरामुळे होऊ शकणारे फायदे पाहिले आहेत. यामधे आपल्या कार्यक्षेत्राचा परिघ वाढवणे, नविन समुहांशी संबंध प्रस्थापित करणे, नविन माहितीचे आदान प्रदान करणे, आपल्या संस्थेसाठी मदत मिळवणे ही उद्दीष्टे साध्य होऊ शकतात.

1. सोशल मिडियाद्वारे आपल्या कार्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळवून देऊ शकतो.
2. सोशल मीडियाद्वारे आपण समविचारी मंडळी, कार्यकर्ते, इतर सेवाभावी संस्था, देणगीदार व आपल्या कार्याचा फायदा होणार्‍या व्यक्ति या सर्वांना अगदी प्रकल्पाची कल्पना, आखणी आणि नियोजन यापासून ते प्रकल्पाच्या यशस्वी सांगतेपर्यंत आपल्या कार्यात सहभागी करुन सर्वांशी आपुलकीचे नाते जोडू शकतो.
3. सोशल मिडिया द्वारे आपण इतर संस्था, वेगवेगळ्या विषयातील तज्ञ मंडळी आणि विकास कामातील संस्था यांच्याशी संपर्क साधून अद्ययावत माहितीचे आदान प्रदान करुन आपल्या कार्याची व्याप्ती तसेच परिणामकारकता अनेक पटीने वाढवू शकतो.
4. सेवासंस्था आपली आर्थिक मदतीची अपेक्षा आपले दाते तसेच शुभेच्छुक यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना आपल्या कार्यात आर्थिकदृष्ट्या सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करु शकतात.

आज अभियानाच्या माध्यमातून हजारो वंचित घटकांना पोट भर जेवण मिळते आहे,
त्यांना योग्य पोषण मिळत आहे.

धान्य घेतलेल्या अनेक संस्थांचे वेग वेगळे अनुभव आहेत –

१) काही संस्थांना पुरेशी मदत मिळत नव्हती त्यामुळे तेथे राहणार्यांना योग्य ते पोषण मिळत नव्हते, आज त्यांना चांगल्या प्रति चे धान्य मिळते त्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारत आहेत, तेथील लोक कमी आजारी पडत आहेत.

२) ३–४ हजार किलो धान्य मिळाल्यावर संस्थेची ६ महिन्याची धान्याची गरज पूर्ण होते आणि या कालावधी मध्ये वाचलेल्या पैशातून संस्थांनी तेथील मुलांसाठी शाळेत जायला सायकल घेतल्यात, वाचनालय उभी केलीत, मुलांना नवीन कपडे आणि दप्तर घेतली.

३) संस्था अधिकाधिक वंचित घटकांपर्यंत पोहचते आहे, स्वतः ची क्षमता वाढवीत आहेत.

अभियानाच्या पारदर्शकते मुळे दिवसेंदिवस लोकांचा प्रचंड विश्वास संपादित होत आहे, आधी दान करताना दिलेले दान हे योग्य ठिकाणी जाईल कि नाही अशी काळजी वाटत होती ... आज या अभियानाच्या पारदर्शकते मुळे दानकर्त्यांना दान दिल्याचा आनंद होत आहे.

एक छोटीशी कल्पना आज सामाजिक चळवळीत मध्ये रुपांतरित झाली.

**– विनोद पाटील**

**अध्यक्ष, एक मुठ्ठी अनाज अभियान**

ठरल्याप्रमाणे संध्याकाळी ४ वाजता अभियान संपविले आणि दोन्ही सोसायटी मध्ये सभासदांनी भरभरुन प्रतिसाद दिला. गहू, तांदूळ आणि डाळ धान्य जमा झाले आमच्या उत्साहाला आणि आनंदाला पारावर उरला नव्हता. दोन्ही सोसायटी मधून साहित्य घेतले आणि संचालक मंडळाचे आभार मानले.

दुसऱ्या दिवशी महिला सेवा मंडळ जिथे १६० वंचित महिलांना सांभाळले जाते त्या संस्थेच्या संचालिका आल्या आणि धान्य स्वीकारले. २-३ दिवसात महिला सेवा मंडळ संस्थेकडून २८४ किलो धान्य मिळाल्याची पावती आली आणि अभियानाचा श्री गणेशा झाला.

पुढील २-३ महिन्यात सोसायटी ची संख्या २६ पर्यंत गेली, टीम हि वाढली आणि आमचा उत्साह ही.
ऑक्टोबर २०२१ मध्ये आम्ही अभियानाचा व्हिडीओ बनविला आणि तो प्रचंड व्हायरल झाला, बऱ्याच सोसायटी मधून फोन आले चौकशी झाली आणि त्यातूनच सोसायटी ची संख्या वाढायला सुरवात झाली.

ऑक्टोबर २०२१ मधेच आम्ही सेवावर्धिनीशी जोडले गेलो आणि अभियान सेवावर्धिनी मार्फत चालवले जावे असा निर्णय घेतला. दर महिन्याला सोसायटी ची संख्या वाढत होती, अभियान मूर्त स्वरुप घेत होते. अश्यातच नोव्हेंबर २०२२ मध्ये माननीय राज्यपाल श्री भगतसिंग कोश्यारी जी यांची भेट घेण्याचा योग आला. त्यांनी दिलेल्या शब्बासकीमुळे टीम चा उत्साह द्विगुणीत झाला.

आज ३४ महिने झालेत अभियान अविरत चालू आहे, मार्च २०२४ पर्यंत -

१. २ सोसायटी पासून सुरु झालेले अभियान आज ६८ सोसायटी पर्यंत पोहचले
२. ४ कार्यकर्त्यांनी सुरु केलेले अभियानात आज ६३० हुन जास्त कार्यकर्ते दर महिन्याला सहभागी होतात.
३. पुण्यातील ६ उपनगरात हे अभियान चालते
४. दर महिन्याला २६,००० घरापर्यंत संपर्क होतो
५. ७० हुन अधिक महिला या अभियानात दर महिन्याला आपला सहभाग देतात.
६. आज वर १,२०,००० किलो धान्य या अभियानाचे माध्यमातून जमा झाले आहे
७. अभियानाच्या माध्यमातून गेल्या ९९० दिवसापासून रोज ६०० जेवणाची व्यवस्था होते.
८. महाराष्ट्रातील ३८ संस्थांना धान्य स्वरूपात मदत झाली आहे.







# ४.० ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची
# एक मुठ्ठी अनाज अभियान - एक सामाजिक चळवळ

सामाजिक क्षेत्रात काम करताना असे अनुभव येतात ज्याने तुमच्या आयुष्याचा मार्गच बदलतो.

करोना महामारी आली आणि त्यात काम करताना अनेक बरे वाईट अनुभव आले. मनुष्य स्वभावाचे, बोलण्याचे वागण्याचे अनेक कंगोरे देखील समजले. सर्व समाज एकवटला तरच अशा आपत्तींवर मात करता येईल ही गोष्ट मनात रुजली. रुग्णसेवा, अनाथांची सेवा, रेशन किट वाटप, आपापल्या गावाला परतणाऱ्या कामगारांना मदत अशी अनेक कामे या काळात स्वयंसेवी संघटना करत होत्या.

या काळात १५-१६ अनाथ आश्रम ना आम्ही भेट दिली त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या, सर्वांची कॉमन गरज होती 'भूक'. हे ही प्रकर्षाने जाणवले. या सर्व अनाथ मुला मुलींना निराधार वृद्धांना कायम स्वरूपी काय मदत करता येईल यावर विचार मंथन सुरु होते. सामाजिक क्षेत्रात मित्र मंडळी समवेत अनेक विषयावर आम्ही चर्चा करीत होतो. यातूनच उदयास आले एक मुठ्ठी अनाज अभियान. ही संकल्पना जुनीच आणि खूप पूर्वी पासून चालत आलेली होती पण सध्याच्या तथाकथित मॉडर्न जगात हि संकल्पना प्रत्यक्षात कशी उतरवता येईल आणि  सध्याची पिढी ज्यात नवरा बायको दोघे नोकरी ला आहेत ते दररोज एक मूठ धान्य जमा करतील का ?. हि शंकाच होती. पिंपळे सौदागर, विशाल नगर, वाकड या भागात सोसायटी भरपूर आहेत, छोट्या जागेत १००–२०० फ्लॅट आहेत. तोच एक प्लस पॉईंट घेऊन विचार आला कि रोज एक मूठ धान्य काढण्या ऐवजी सर्व फ्लॅट्स नि महिन्यातून एक मूठ धान्य दिले तरी प्रत्येक सोसायटी मध्ये ५०–६० किलो धान्य नक्कीच जमा होईल. धान्य घेताना गहू, तांदूळ, तूर डाळ, मूग डाळ घेण्याचे ठरले कारण हे धान्य जास्त टिकते.

२५ जुलै २०२१ ला ५ सोसायटी मध्ये पायलट प्रोजेक्ट करायचे नक्की केले. सोसायटी मध्ये भेटीगाठी सुरु केल्या. सोसायटीच्या संचालक मंडळाला भेटून उद्देश समजविण्याचा प्रयत्न करू लागलो. असे करत करत प्रत्यक्षात ठरलेल्या २५ तारखे पर्यंत फक्त २ सोसायट्या तयार झाल्या. पूर्वा रेसिडेन्सी आणि गणेश रेसिडेन्सी. तेही नसे थोडके म्हणत अभियानाला सुरवात केली.

बरेच प्रश्न होते, धान्य कशात घेणार, कोणत्या संस्थेला देणार, पॅकिंग कसे करणार इत्यादी इत्यादी.

त्यावर चर्चा करून अभियानाचे नियम ठरविले, त्यात -

- ज्या संस्थेला मदत करायची ही संस्था नोंदणीकृत असावी
- संस्थेला सरकार कडून कुठलीही मदत मिळत नसावी
- अभियान महिन्यातून एकदाच म्हणजे ३ऱ्या  किंवा ४ थ्या रविवारी होणार, सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत
- गहू, तांदूळ, तूर डाळ, मूग डाळ, चा आग्रह असेल पण दानकर्ता जे देईल ती त्याची श्रद्धा म्हणून स्वीकारावं
- संस्थेकडून मिळालेल्या धान्याची पावती सर्व सोसायटी ना द्यायची म्हणजे पारदर्शकता ठेवता येईल.
- अभियानात फक्त धान्य घेतले जाईल, कुठल्याही स्वरूपाची आर्थिक मदत घेतली जाणार नाही.

धान्य जमा करण्यासाठी आम्ही त्यावेळी पुठ्ठ्याचे बॉक्स आणले आणि दोन्ही सोसायटी मध्ये ठेवले, सोसायटीच्या संचालक मंडळाला अभियानाची माहिती सोसायटी मध्ये प्रसारित करण्यास सांगितली. छोटे छोटे व्हिडीओ बनवले व  ते सोसायटी ग्रुप मध्ये पाठवून वातावरण निर्मिती केली. दुपारी १२ – १२.३० पर्यंत आम्ही त्या खोक्या सोबत बसून होतो, दान देणाऱ्यांना धन्यवाद देत होतो.

# ५.० सेवाव्रती

## ५.१ पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे



### वैद्यकीय क्षेत्रातील 'पथदर्शी' प्रयोग – विवेकानंद रुग्णालय, लातूर महाराष्ट्र

आजकाल करिअर बाबत अतिशय जागरूक आणि संवेदनशील पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये, वैद्यकीय क्षेत्र (डॉक्टरकी) हे अतिशय कौतुकाचे, सामाजिक प्रतिष्ठेचे आणि आर्थिक स्थैर्याचे साधन म्हणून लोकप्रिय आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये पूर्ण आवडीच्या विषयात विशेष प्राविण्याचे शिक्षण घेऊन मोठे रुग्णालय थाटणे, मोठ्या शहरांत किंवा संधी मिळता परदेशात काम करणे, अशा अनेक कल्पना आजचा तरुण वर्ग बहुतांशी रंगवत असतो. डॉक्टरांचे रुग्णांवर उपचार करणे ही सुद्धा एक प्रकारची सेवाच आहे असे आपण अनेकदा म्हणतो. त्यामुळे आपण नामांकित डॉक्टर झालो आणि भव्य अशा रुग्णालयात बसून रुग्णांवर उपचार करतो आणि त्यांना बरे करतो, इथेच कदाचित अनेकांची सामाजिक कार्याची व्याख्या येऊन थांबत असावी. परंतु यापलीकडे देखील वैद्यकीय क्षेत्रातून समाजोपयोगी काम करण्याच्या अनेक संधी, अनेक नवीन क्षितिजे आपल्यासमोर असतात. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे अशा वाटांवरून चालणारी अनेक अनुकरणीय उदाहरणे देखील आपल्या सभोवती असतात.

ही गोष्ट आहे, अशाच एका वैद्यकीय क्षेत्रात चाललेल्या संघटनात्मक विशेष उपक्रमाची, ज्याचे नाव आहे विवेकानंद रुग्णालय. समाजातल्या सर्व थरातील जास्तीत जास्त व्यक्तींना चांगल्या दर्जाचे उपचार वाजवी शुल्कात मिळावेत म्हणून १९६६ साली वैद्यकीय व्यवसायात संघटनात्मक कामाचा वेगळा प्रयोग करण्याच्या  निश्चयाने चार ध्येयवेडे तरुण एकत्र आले – डॉ. अशोकराव कुकडे, डॉ .सौ ज्योत्स्ना कुकडे, डॉ. रेम अतुरकर व डॉ.गोपीकिशन भराडिया. या चौघांकडे स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक व्यवस्था उपलब्ध होत्या. त्यातून अमाप पैसा व प्रसिद्धी मिळवणे ही सहज शक्य होते. परंतु आपल्या शिक्षणाचा उपयोग मागास भागातील लोकांना व्हावा, त्यांना चांगल्या वैद्यकीय सुविधा मिळाव्या, या विचारांनी हे तरुण प्रेरित झालेले होते. अर्थातच अशा ठिकाणी वैद्यकीय सेवा देण्याची प्रेरणा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारातून मिळाली होती.

हे काम करायचं ते लोकांसाठीच करायचं ही भावना मनात दृढ होऊ लागते. आपण जे पेरतो ते कधी ना कधी उगवतं आणि चांगल्या कामाचे फळ चांगलेच मिळते हे आपण नेहमीच सांगत आलो, सांगत असतो. त्याचा प्रत्यक्ष अनुभव अशा संस्थांच्या कामांमध्ये येत असतो.

१९९० साली मुंबई पुणे आणि कोल्हापूर याच ठिकाणी सिटीस्कॅन होते. त्यावेळी विवेकानंद रुग्णालयामध्ये सिटीस्कॅन घेण्याचे ठरले पण पुरेसा निधी उपलब्ध नव्हता. पण एक विश्वास होता की सामाजिक कामासाठी आर्थिक अडचण केव्हाही येत नाही. समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी यासाठी सढळ हाताने मदत केली व सिटीस्कॅन उपलब्ध झाले. अशाप्रकारे ग्रामीण भागांमध्ये अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न विवेकानंद रुग्णालयाने यशस्वीरित्या केल्याचे दिसून येते. वैद्यकीय क्षेत्रात विवेकानंद रुग्णालयाने कमावलेली कीर्ती म्हणजे वैद्यकीय कौशल्य अधिक निस्वार्थ सेवाभाव, असे समीकरण आहे. संघाच्या एका गीतात म्हटल्याप्रमाणे 'स्वार्थ, लोभ आणि शत्रुत्वाचे दर्शन ठाई ठाई घडे'! अशा आपल्या समाजातील आजच्या वातावरणात 'निस्वार्थ, निरपेक्ष सेवा व कर्तव्य भावनेने' जर कोणी कार्य केले तर ते यशस्वी होऊ शकते हा विश्वास विवेकानंद रुग्णालयाच्या माध्यमातून येतो.

डॉ. अशोकराव कुकडे यांनी सुरु केलेल्या विवेकानंद रुग्णालयाच्या पाच दशकांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक आपत्ती अनुभवाला आल्या. आपली संस्था वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक बांधिलकीने काम करत असल्याने, समाजावरील कोणत्याही आपत्तीमध्ये स्वाभाविक रितीने काम करण्यास आपण उभे राहतो. १९९३ सालचा किल्लारीचा भूकंप, कच्छमधील भूकंप, तामिळनाडू मधील त्सुनामी, मुंबई, नेपाळ किंवा काश्मीरमधील महापूर अशा अनेक आपत्तीत विवेकानंद रुग्णालयाने यथाशक्ती निवारणासाठी हातभार लावलेला होता. हेच त्यांच्या सामाजिक कर्तव्य भावनेचे दृश्य स्वरुप होते. वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक बांधिलकीने काम करणाऱ्या संस्थेचे हे आदर्श आपल्या डोळ्यासमोर असावेत. 'कोरोना काळातही याचा पुनः हार्दिक अनुभव आला!

डॉ. अशोकराव कुकडे यांनी केलेल्या अतुलनीय आरोग्य विषयक सेवा कार्याची दखल घेऊनच भारत सरकारने त्यांची "पद्मभूषण" पुरस्कारासाठी निवड केली. या कार्याला समाजमान्यते बरोबरच शासनमान्यताही मिळाली आहे, असे म्हणता येईल व त्यायोगे आपल्यालाही अशा कामाची प्रेरणा मिळावी यासाठी हा लेख प्रपंच.

— विनोद खरे

रुग्णालय सुरु करण्यासाठी आपल्याला कोणकोणत्या डॉक्टरांची आवश्यकता आहे याचा विचार करून हेतुपूर्वक तशाच प्रकारचं शिक्षण घेण्यातआले. उदाहरणार्थ, डॉ. अशोकराव कुकडे हे MBBS ला विद्यापीठात सर्वप्रथम आले होते. त्यांचे आवडीचे विषय मेडिसिन किंवा ऑर्थोपेडिक असे असूनही नवीन रुग्णालयाची गरज लक्षात घेता त्यांनी आपल्या आवडीचे विषय सोडून पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी जनरल सर्जरी हा विषय घेऊन अभ्यासक्रम सुवर्णपदकासह पूर्ण केला. त्याचप्रमाणे डॉ. ज्योत्स्ना कुकडे यांनी पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी मेडिसिन या विषयाची निवड केली होती, परंतु ग्रामीण भागात रुग्णालय सुरु करायचे असेल तर स्त्रीरोग तज्ञाची नितांत आवश्यकता आहे म्हणून त्यांनी आपल्या आवडीचा मेडिसिन विषय डावलून स्त्रीरोग तज्ञ या विषयासाठी पुढील अभ्यासक्रम निवडला.

या सर्व विचार व धडपडीतून लातूर सारख्या उपेक्षित व दुष्काळी भागाची निवड करण्यात आली. जानेवारी १९६६ साली. विवेकानंद रुग्णालयाची भाड्याच्या बारा खोल्यांमध्ये सुरुवात झाली. तीन खोल्यांमध्ये दोन डॉक्टर कुटुंब व बाकीच्या नऊ खोल्यांमध्ये रुग्णालय सुरु करण्यात आले. जवळजवळ एक वर्षामध्ये बऱ्यापैकी काटकसर करून, पैसा जमवून स्वतःची जागा घेऊन त्या ठिकाणी रुग्णालय बांधण्याचा संकल्प करण्यात आला. रुग्णालयाच्या खात्यामध्ये जमा झालेली रक्कम, काही दानशूर व्यक्तीकडून ठेवी घेऊन व बँकेचे कर्ज – असे मिळून दहा हजार चौरस फूट जागा विकत घेऊन बांधकाम सुरु करण्यात आले. १९ ऑगस्ट १९६९ ला विधिवत विवेकानंद रुग्णालयाची स्वतःच्या वास्तूमध्ये सुरुवात झाली. १९७५ पर्यंत विवेकानंद रुग्णालय हे प्रथितयश व सर्व सुविधांनी युक्त असे सामान्य नागरिकाला परवडेल असे उत्तम रुग्णालय म्हणून समाजात मान्यता प्राप्त झाले होते.

२६ जून १९७५ रोजी देशभरामध्ये आणीबाणीच्या काळात देशभरातील संघ कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली यात डॉ. अशोक कुकडे देखील होते. जवळजवळ 21 महिने ते जेलमध्ये असताना, त्यांच्या अनुपस्थितीमध्ये सुद्धा विवेकानंद रुग्णालयाचे काम थांबले नव्हते. १९७७ मध्ये आणीबाणी उठल्यानंतर त्यांनी पुन्हा जोमाने कामाला सुरुवात केली. अनेक अडचणींवर मात करत रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर जात होते आणि याला समाज मान्यता सुद्धा मिळत होती.

१९६६ ते ७९ या काळामध्ये विवेकानंद रुग्णालय हे खूप मोठ्या प्रमाणामध्ये सर्व सुविधांनी युक्त अशा प्रकारचे भागीदारी पद्धतीचे मोठे रुग्णालय म्हणून नावारुपाला आले. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करून स्वतःच्या कर्तृत्वाने ती समाजाला अर्पण करण्याचं धाडस या मंडळींनी केलं व १ जानेवारी १९८० रोजी या संस्थेचे "विवेकानंद मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर" या नावाने विश्वस्त संस्थेत रुपांतर केले. ही सगळी संस्था समाजाला अर्पण करून त्यामध्ये आपण सामील झाले. अशा प्रकारे स्वकष्टाने मिळवलेली संपत्ती, समाजाला अर्पण करणे हा एक उदात्त भाव या सगळ्या कामातून आपणास पाहायला मिळतो.

समाजातील वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे अन्य डॉक्टर मंडळी नेहमी प्रश्न विचारतात – आम्ही सुद्धा त्याच क्षेत्रात काम करतो, तुम्ही सुद्धा रुग्णांवर उपचार करता त्याची फी घेता, आमच्यासारखं तुमचही त्याच फी वर घर चालत, मग तुम्ही करता ते सेवाकार्य आणि आम्ही करतो तो धंदा किंवा प्रॅक्टिस असं का म्हटलं जात? तुमच्या आमच्यात नक्की काय फरक आहे? सगळ्यात महत्वाचे म्हणजे सर्व मालकी हक्क सोडले व सर्व अर्जित असलेले समाजाच्या मालकीचे झाले, व्यक्तीगत राहिले नाही!

विवेकानंद रुग्णालयाचे विश्वस्त संस्थेमध्ये रुपांतर केले तेव्हा सेवा कार्य व अन्य प्रॅक्टिस यातील हा फरक स्पष्ट झाला. कोणा एकाच्या किंवा एखाद्या गटाच्या हितसंबंधासाठी किंवा त्याच्या उपजीविकेसाठी कोणतीही संस्था चालवायची नसते, तर संस्थात्मक कामामागे व्यापक सामाजिक संदर्भ असतात, उदात्त हेतू असतात, समाजाला उपयुक्त ठरतील असे उपक्रम राबवावे लागतात. यातून समाज आपल्याकडे कसा पाहतो हेही जाणवायला लागते.

# ५.२ पद्मश्री डॉ. मनोहर कृष्णा डोळे – संदीप डोळे



## समाजसेवेच्या ध्यासातून नेत्ररुग्णालय

डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनचे मोहन ठुसे नेत्र रुग्णालय, नारायणगांव, जि. पुणे ही गेली ४२ वर्षे पुणे, नगर, सातारा, नाशिक व ठाणे इ. जिल्ह्यातील दहा तालुक्यांमध्ये नेत्र विषयक काम करीत आहे. या रुग्णालयातून आजपर्यंत एक लाख पंच्याहत्तर हजाराहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. या संस्थेमार्फत प्रत्येक महिन्याला ४०–५६ मोफत नेत्रतपासणी शिबिरे घेऊन या शिबिरांद्वारे नेत्र रोगांवरील रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येतात. येथील नेत्र रुग्णालय आदिवासी, वनवासी व ग्रामीण भागासाठी वरदान ठरलेले आहे.

डॉ. मनोहर डोळे यांनी २६ डिसेंबर १९८२ रोजी नारायणगांव येथील मोहन ठुसे यांच्या जुन्या छोट्या जागेत मोहन ठुसे नेत्र रुग्णालय सुरु केले. या जागेत तात्पुरते ऑपरेशन थिएटर उभारले. त्याला लागणारी सर्व यंत्रणा येथेच जमा केली. पुण्याहून नेत्रतज्ञ डॉ. सुधीर काळे, डॉ. रविंद्र कोलते असे तज्ञ डॉक्टर या भागातील रुग्णांना सेवा देण्यासाठी येऊन विनामुल्य सेवा देत असे. ८ वर्षे अशाच प्रकारे काम करून सन १९९०–९१ मध्ये १० हजार चौ. फुट जागेत या छोट्याशा रुग्णालयाचे मोठ्या रुग्णालयात रुपांतर झाले. या रुग्णालयाची कामाची दखल घेऊन जागतिक बँकेने भारत सरकारच्या माध्यमातून १४ लाख रु ची देणगी या रुग्णालयाला दिली. अनेक दानशुर देणगीदार व संस्थांच्या मदतीने आज हे रुग्णालय अद्ययावत सुविधांनी युक्त झाले आहे. रुग्णालयामध्ये चाळीस कॉटसची सुसज्ज अशी रु. ६० लाखाची दुमजली भव्य इमारत, २४ तास दहा निवासी तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती, तीन अति आधुनिक वातानुकूलित शस्त्रक्रियागृह असून या ठिकाणी एकाच दिवसात कमीतकमी ६० शस्त्रक्रिया करण्याची सोय उपलब्ध आहे. संस्थेच्या वतीने आदिवासी व ग्रामीण भागातील रुग्णांना नेत्र सेवा मिळावी यासाठी सुमारे ८० ते १०० किमी परिसरातील बेल्हा, पारनेर, अळकुटी, टाकळी ढोकेश्वर, शिरोली, जुन्नर, पारगाव या गावांमध्ये उपकेंद्रे सुरू केली आहेत. रुग्णांना ने आण करण्यासाठी पाच रुग्णवाहिका सुसज्ज ठेवण्यात आलेल्या आहेत. शिबिरांच्या माध्यमातून आलेल्या रुग्णांची लेन्स टाकून शस्त्रक्रिया केली जाते. तसेच त्यांना मोफत प्रवास, जेवण, चहा, निवास आदी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मधूमेही रुग्णांसाठी मागील पडद्याची (रेटिना) तपासणी सुविधा येथे उपलब्ध आहे. संस्थेच्या माध्यमातून भविष्यात नेत्रपेढी, डोळ्यांचा फिरता दवाखाना, ऑप्टोमेट्रिस्ट डिप्लोमा कोर्स संशोधन प्रकल्प सुरु करण्याचा मानस आहे.

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन – कार्यवाह

श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर – प्रकल्प व्यवस्थापक

श्री. आमोद काटीकर – प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी



[illegible]



नेत्र तपासणी करताना डॉ. मनोहर डोळे

१) मोहन ठुसे नेत्र रुग्णालय व संशोधन संस्था :- महिन्यात सुमारे ४० मोफत नेत्र तपासणी शिबिरे डोंगराळ भागासह सर्व परिसरात घेऊन नेत्ररुग्ण गोळा केले जातात. त्यांचे चांगल्या प्रकारची लेन्स टाकून ऑपरेशन करून दोन दिवस चहा, भोजन दिले जाते व पुन्हा त्यांना आपल्या निवासस्थानी सोडले जाते.

२) अथर्व नेत्रालय व हायटेक लेसर सेंटर: लेसरच्या सहाय्याने उपचार करणारे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील एकमेव हॉस्पिटल आहे. डोळ्याच्या आजारांकरीता थोडाफार खर्च करू शकतील अशा रुग्णांवर येथे उपचार केले जातात.

३) माधव नेत्रपेढी:-अंध नेत्ररुग्णांसाठी 'माधव नेत्र पेढी' द्वारे 'कॉर्निअल इम्प्लॉन्ट' (कॅरॅटोप्लॅस्टी) च्या सहाय्याने नवीन दृष्टी दिली जाते.

४) श्री. विनायक श्रीपाद राजगुरु डोळ्यांचा अत्याधुनिक फिरता दवाखाना (मोबाईल आय क्लिनिक): एकूण सहा ॲम्ब्युलन्स द्वारे अत्यंत दुर्गम भागातील नेत्ररुग्णांच्या घरापर्यंत नेत्रसेवा देण्याचा प्रयत्न केला जातो.

५) रक्त साठवणूक केंद्र:- संपूर्ण जुन्नर तालुक्यात २४ तास रक्त पुरवठा करणारे हे एकमेव रक्त साठवणूक केंद्र असून महिन्याला सुमारे १५० रक्त पिशव्या अत्यावश्यक रुग्णांना दिल्या जातात.

६) फेको ट्रेनिंग सेंटर:- रुग्णालयाच्या फेको इमल्सिफिकेशन सेंटरमध्ये भारताबाहेरील देशामधूनही नेत्रतज्ञ ट्रेनिंगसाठी येतात.

७) मोतीबिंदु शस्त्रक्रिया प्रशिक्षण केंद्र: कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ञ डॉक्टरांकडून पडदा खराब झाल्याने दृष्टी गेलेल्या रुग्णांसाठी मुक पेशींचा मोतीबिंदु शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण दिले जाते.

८) स्टेम सेल संशोधन केंद्र, पुणे: डोळ्याचा वापर करून पुन्हा दृष्टी प्राप्त करून देण्याचे संशोधन व काम केले जाते. आजपर्यंत संस्थेने सुमारे एक लाख पंच्याहत्तर हजार मोफत मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत.

डॉ. मनोहर डोळे यांनी आरोग्य आणि शिक्षण यांची सांगड घालत नेत्रदानाचे हे कार्य करण्यामध्ये यथाशक्ती आपला वाटा उचलला आहे. आजच्या तरूण पिढीने त्यांना आदर्श मानून काम केल्यास शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे स्वप्न पूर्ण होण्यास वेळ लागणार नाही म्हणूनच म्हणावेसे वाटते......

नेत्र ज्योतीने उजळे जीवन । नवल पाहतील सृष्टीचे........।<br>
मदतीचे का होई मापन । दान देवू या दृष्टीचे.....॥

**- डॉ. संदीप मनोहर डोळे**

## Eligibility Criteria and Procedure -

1. Your organization should be registered as a non-profit organization or charity organization, not as
   a. a government entity or organization.
   b. a hospital or healthcare organization
   c. a school, academic institution of university
2. You should have a soft copy of the registration.
3. Your organization should have its registered domain
4. Check the country wise eligibility before you proceed

## Procedure -

1. Search Google for non-profits on the internet.
2. Keep a soft copy of your government registration.
3. Note down your domain name.
4. Please keep the password handy if you already have the email of your domain.
5. Look for the registration link, then it will ask for your current domain name. Then it will ask you to upload a registration certificate. Post that login with your current admin login to the domain.
6. This will take a week to get you confirmation from Google.
7. Once it is confirmed then login with admin. It will take you to Google Workspace. You will see Gmail and other Google products.
8. Go to Email and check all your previous email IDs are migrated here.

**- Vinod Thakur**

# ६.० सेवावार्ता – संस्थांसाठी महत्वाचे

## Google for Non-Profit Organizations

Google for Nonprofits is a free program that offers Google Products/tools to eligible nonprofit organizations. This can help to solve the challenges that Nonprofits face: finding new donors and volunteers, working more efficiently, and getting supporters to take action. Google for Nonprofits is currently available in 65+ countries.

Some of the advantages of Google for Nonprofits include

1. YouTube Nonprofit Program: This program allows nonprofits to engage with supporters through videos
2. Google Workspace includes, Gmail, Drive, Meet, Calendar, Chat, Slides, Sheets, Docs, Keep, Sites, Forms, Currents
3. Gmail offers unlimited Gmail accounts with @yourdomain.com
   Each user will get 30 GB of cloud storage.
4. Google Meet with100 participant video meetings
5. Technical Issues resolution: This program offers quick resolution of technical issues with 24/7 support via phone, chat, and email
6. Google Ad Grants – This helps your organization to attract donors, raise awareness about your activities, get more volunteers
7. Google Maps Platform – This helps people locate community/volunteering programs and resources around them
8. Check to see which Google for Nonprofits products are available in your country

## Benefits -

1. Stay in touch with volunteers, donors, supporters, and your community with unlimited email addresses at your custom domain via Gmail.
2. Keep everyone on the same page with Google Docs – create and edit grant proposals, meeting agend s, and more, in real-time, from anywhere.
3. Keep schedules organized and appointments updated with Google Calendar.
4. Enable your teams to collaborate, iterate, and innovate together, from anywhere, in real-time, with our cloud-based productivity suite.

आदिवासी भागात या रुग्णालयाच्या माध्यमातून जी विशेष शिबिरे घेतली जातात, त्यात ६० टक्के रुग्णांना या शिबिराचा लाभ मिळाला आहे. रुग्णालयाच्या वतीने नेत्रपटल प्रत्यारोपणाचे कार्य सुरु केल्यानंतर मृत्यूनंतर नेत्रदान करणाऱ्या १०० हून अधिक लोकांचे नेत्रपटल काढून अंध असलेल्या व्यक्तींना नेत्ररोपण करुन या अंध व्यक्तींना दृष्टी देण्याचे काम मोहन कुले नेत्र रुग्णालयाने केले आहे. संस्थेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या डोळे फाउंडेशन रक्तपेढीला देखील उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून पुणे ते संगमनेर पर्यंत ही एकमेव रक्तपेढी आहे. या रक्तपेढीतून दर महिन्याला किमान २००–२५० रुग्णांना रक्तपुरवठा केला जातो. रक्तपुरवठ्याची मागणी लक्षात घेऊन जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे यासाठी नेत्रशिबिरांबरोबर रक्तदान शिबिराचे आयोजन देखील संस्थेच्या माध्यमातून करण्यात येते. संस्थेच्या माध्यमातून डॉ. मनोहर डोळे यांनी गेली ४० वर्षे राबविलेल्या सामाजिक उपक्रमाची व कार्याची दखल घेत या रुग्णालयाला आतापर्यंत २० हून अधिक पुरस्कार मिळालेले आहेत. विशेष म्हणजे गेल्या वर्षी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डॉ. मनोहर डोळे यांच्या कार्याबद्दल त्यांना 'डि.लिट' ही पदवी देऊन सन्मानित केले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचा मानाचा समजला जाणारा 'शिवनेरी भूषण' हा पुरस्कार मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते किल्ले शिवनेरी येथे देण्यात आला.

या रुग्णालयामध्ये कॉम्प्युटरद्वारा नेत्र तपासणी, आंतरराष्ट्रीय दर्जाची "व्हाईट स्टार" तंत्रज्ञान असलेले लेसर मशीनद्वारे (फेको इमल्सिफिकेशन) बिनटाक्याची, बिनाभूल, बिनापट्टीची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याची ग्रामीण भागातील एकमेव अद्ययावत सुविधा असलेले रुग्णालय आहे. विशेष म्हणजे या रुग्णालयामध्ये शस्त्रक्रियेनंतर रुग्ण एक तासाच्या आत घरी जाऊ शकतो, डोळ्यांच्या पडद्यावरील तपासणी व शस्त्रक्रिया (ग्रीन लेझर द्वारे उपचार), लहान मुलांची नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया, काचबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया, डोळ्यांच्या पापणीवरील शस्त्रक्रिया (प्लॅस्टिक सर्जरी), एन–डी याग लेसरद्वारे उपचार, तिरळेपणावरील तपासणी व शस्त्रक्रिया, नासूरवरील दुर्बिणीद्वारा शस्त्रक्रिया, नेत्रदानानंतर नेत्रपटल काढून दुसऱ्या व्यक्तीला डोळा (नेत्रपटल) बसविण्याची नेत्ररोपण शस्त्रक्रिया. मधुमेही रुग्णांसाठी विशेष नेत्र तपासणी, मधुमेही रुग्णांसाठी डोळ्यांच्या मागील पडद्याची तपासणी व ग्रीन लेझर द्वारा उपचार इ. सुविधा उपलब्ध आहेत या सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणारे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील हे डोळ्यांचे एकमेव हॉस्पिटल आहे.

लॅसिक म्हणजे लेझर इन सिटू केराटोमिलीयसिस, तुमची दृष्टी सुधारण्यासाठी केली जाणारी ही एक सुप्रसिध्द आणि सर्वमान्य लेझर अपवर्तन (रिफ्रॅक्टिव) प्रक्रिया आहे. कॉन्टॅक्ट लेन्सेस किंवा चष्मा वापरणे यासाठी एक चांगला पर्याय म्हणून याची नेहमी शिफारस केली जाते. डोळ्याच्या पुढील भागात असलेल्या टिशूला जो कॉर्निया म्हणून ओळखला जातो, आकार देण्यासाठी एका खास प्रकारच्या कटिंग लेसरचा उपयोग केला जातो. त्याने दृष्टी सुधारते आणि दुरचे न दिसणे व जवळचे न दिसणे किंवा जवळचे व लांबचे अंधुक दिसणे यासारखे समस्यांकरीता लाभदायक आहे. भारतातील ग्रामपंचायत स्तरावरील लॅसिक लेसर उपचार सुविधा असणारे हे एकमेव हॉस्पिटल असा सर्वोच्च मान हॉस्पिटलला मिळत आहे. या निमित्ताने कार्लझाईस, जर्मनी (MEL 90) या अत्याधुनिक मशिनद्वारे डोळ्याचा चष्म्याचा नंबर कायमचा घालविण्याची शस्त्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. अत्यंत कमी वेळाची व सुरक्षित अशी ही शस्त्रक्रिया असून रुग्णांना एका तासामध्ये घरी सोडण्यात येते.

संस्थेच्या विश्वस्त व संचालकांनी संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये डॉ. मनोहर डोळे मेडिकल फौंडेशन स्थापन करुन त्याअंतर्गत खालील सर्व संस्थांचा समावेश केला आहे.

सेवावर्धिनी

एक विधायक सहकारी

# सेवा तरंग
## 2.0

# सेवा वार्ता

अंक ६

२०२३-२४

सेवावर्धिनी

नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम" , राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०

कार्यालय: "चंदन"२६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ संवेदना प्रकल्प, हरंगुळ

२.२ आरंभ – स्वमग्न व गतिमंद मुलांची शाळा

३. संस्था संचालन – Impact assessment of Social initiatives under CSR

४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारव पुनरुज्जीवन व पुनर्वापर प्रकल्प

५. सेवाव्रती

५.१ श्री.पंकज मिठ्भाकरे

५.२ सौ. सुनिता लेले

६. सेवावार्ता – सेवा संस्थांसाठी महत्वाचे

# मनोगत

सेवातरंग २.० या उपक्रमा अंतर्गत आजचा हा पाचवा अंक आहे. यावेळेस आम्ही दोन प्रयोग केले आहेत. एक म्हणजे अंक प्रकाशनाची वेळ. आम्ही हा अंक जरा उशीरा प्रकाशित करत आहोत ज्या योगे अंक प्रकाशित होण्याची वेळ आणि त्यातील विषयाबद्दल होणारे चर्चा सत्र यात कमी दिवसांचे अंतर असेल. याच जुलै महिन्याच्या २७ तारखेला Impact assessment या एका महत्वाच्या विषयावर चर्चा सत्र आयोजीत केले आहे ज्याची माहिती या अंकात समाविष्ट आहे. विषय ताजा असल्याने चर्चा सत्र अधिक प्रभावी ठरावे असा उद्देश आहे. त्याच प्रमाणे Impact assessment बद्दलची माहिती आम्ही इंग्रजी भाषेतच प्रस्तुत करत आहोत. Impact assessment चा उद्देश आपल्या कार्यांच्या आपल्यातील सुधारणांसाठी असलेल्या आवश्यकते बरोबर आपल्या देशभरातील वा बाहेरील देणगीदारांच्या मनात आपल्या बद्दल असलेला विश्वास वृद्धिंगत करणे हा असतो. त्यासाठी आपल्याला तसाही परकीय भाषेचा उपयोग अनिवार्य असतो. त्याची सवय या निमित्ताने व्हावी.

यावेळेस आम्ही अंकात समाविष्ट केलेल्या संस्था व व्यक्ति एका विशिष्ट, दुर्लक्षित पण खूप महत्वाच्या विषयात काम करणाऱ्या आहेत. तो विषय म्हणजे काही वेगळे प्रश्न असलेली मुले व त्यांच्या संगोपन व शिक्षणा बद्दलची पालकांपुढील आव्हाने. आपल्या पाल्यावर आलेल्या प्रसंगातून कष्ट आणि चिकाटीने मार्ग काढून त्याबरोबर समाजासाठी केवढे मोठे कार्य संस्था व व्यक्ति उभारू शकतात याची प्रचिती तुम्हाला येईलच पण त्यातून समाज कार्याची प्रेरणाही मिळेल याची आम्हाला खात्री वाटते.

येत्या २७ तारखेला online भेटूच.

धन्यवाद.

– विक्रम पंडित

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.१ संवेदना प्रकल्प, हरंगुळ : दिव्यांग क्षेत्रातील एक दिशादर्शक सेवाकार्य

चांगले आरोग्य एखाद्या व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारते. तथापि, दिव्यांग असणाऱ्या मुलांना व व्यक्तींना सामान्य लोकांपेक्षा जास्त आरोग्य समस्या असतात. कोणतेही अपंगत्व हे व्यक्तीला दुर्बल करते, त्यात एखाद्याला बौद्धिक अपंगत्व (ID: Intellectual Disability) असेल तर त्या दिव्यांगत्वाची व्याप्ती, त्यातील समस्या, अडथळे, नकारात्मक कौटुंबिक व सामाजिक दृष्टीकोन आणि समस्या निवारणासाठी असलेला उदासीन करणारा मार्ग. विशेषत: खेड्यांमध्ये या समस्येची फारशी समज नसल्यामुळे बहुतेकदा दिव्यांगाना समाजाकडून आणि त्यांच्या स्वत:च्या कुटुंबाकडून दुर्लक्षित/बहिष्कृत केले जाते. भारतातील बौद्धिक दिव्यांगत्व असलेल्या बहुतेक व्यक्तींची औपचारिक ओळख पटलेली नाही आणि ज्यांची ओळख पटली आहे, त्यापैकी बहुसंख्य व्यक्तींना उपेक्षित समाजाने वगळले आहे. बौद्धिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना अपंगत्व नसलेल्या लोकांप्रमाणे संधी दिली जात नाही. त्यांच्या अपंगत्वामुळे त्यांना त्यांच्या कुटुंबात आणि समाजात पूर्ण सहभाग घेण्यापासून ते वंचित राहतात. दिव्यांगाना लागणाऱ्या सुविधा, वाहतूकीची सोय आणि त्यांना सहज समजु शकेल अश्या पद्धतीने योग्य माहितीचा अभाव, त्यांना समान संधींचा आनंद घेण्यापासून परावृत्त करते.

बौद्धिक अपंगत्वावर वैद्यकीय उपचार नाही, परंतु सुरुवातीच्या स्थितीपासून ते मागेही जात नाही. या प्रकरणाची आणखी गुंतागुंतीची गोष्ट अशी आहे की अधिक गंभीर अपंगत्व असलेले मुलं/व्यक्ती अनेकदा त्यांना अनुभवत असलेल्या आरोग्यविषयक गुंतागुंती तोंडी सांगू शकत नाहीत, ज्यामुळे आरोग्य समस्यांचे निदान होत नाही आणि त्यावर उपचारही केले जात नाहीत. विशेष वैद्यकीय सेवांमध्ये प्रवेश, विशेष शिक्षण, विविध थेरपी, बुध्यांक तपासणी, कौशल्य विकास व व्यावसाईक प्रशिक्षण, कुटुंबांचे समुपदेशन आणि प्रशिक्षणामुळे दिव्यांग आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडथळे दूर होऊ शकतात.

रा. स्व. संघाचे स्वयंसेवक असलेले श्री. सुरेशदादा पाटील व त्यांच्या पत्नी सौ. दीपाताई यांचा एकुलता एक मुलगा चि. मिथीलेश हा सेरिब्रल पाल्सी ग्रस्त बहुविकलांग आहे. मिथीलेशच्या जन्मानंतर गळू महिन्यांनी लक्षात आले की, हा परावलंबी राहणार, दीर्घकाळ थेरपी द्यावी लागणार म्हणून जिल्ह्याच्या ठिकाणी राहून वैद्यकीय उपचार घेता येईल का? दीर्घकालीन थेरपी केंद्र निर्माण करता येईल का? हा संघाच्या कार्यकर्त्यांच्या मनातील भाव जेष्ठ कार्यकर्त्यांनी ओळखून प्रकल्प प्रारंभाचा विचार सुरु झाला. संघाचे जेष्ठ कार्यकर्ते, जनकल्याण समितीचे तत्कालीन प्रांत अध्यक्ष स्व. किशोरपंत बापट, प्रांत कार्यवाह श्री. शरदराव घाटपांडे, मुंबईचे स्व.डॉ. नरेंद्रजी देसाई, डॉ. अशोकजी कुकडे )काका( यांनी संवेदना सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र या प्रकल्पाची स्थापना दि. १३ ऑगस्ट २००६ रोजी केली. प्रकल्पाच्या प्रारंभी श्री. सुरेश पाटील व सौ. दीपाताई यांनी या विषयातील विविध ठिकाणचे प्रकल्प पाहून अध्ययन केले. सौ. दीपाताई यांनी स्पास्टीक सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई येथून बी.एड चा कोर्स पुर्ण केला. २००६ साली संवेदना शाळेची सुरवात विवेकानंद प्रतिष्ठानच्या जागेत सेरेब्रल पाल्सी ग्रस्त २ विद्यार्थ्यांना घेऊन दिव्यांग क्षेत्रातील सुरु झालेला हा प्रवास विविध उपक्रमाद्वारे दिव्यांगाना व त्यांच्या पालकांसाठी एक दिशादर्शक केंद्र स्थापित होत आहे. आज शाळेचा विस्तार प्रशस्त १ एकर जागेत आणि ७२ दिव्यांग विद्यार्थी, ६०० पालक प्रकल्पाशी जोडले गेले आहेत. नूतन वास्तूमध्ये दिव्यांग मुलांच्या शाळेसाठीची एक आदर्शवत इमारतीची उभारणी संवेदना प्रकल्पाने केली आहे.

### संस्थेचे उद्देश:

- बौद्धिक दिव्यांगत्व असलेल्या (आयडी) मुलांना विशेष शिक्षण, विविध थेरपी आणि आधुनिक सुविधा प्रदान करणे जेणेकरून ते शिक्षण आणि आरोग्याचा अधिकार असलेले नागरिक म्हणून समाजात आनंदा राहू शकतील आणि सहभागी होऊ शकतील.
- संवेदना प्रकल्पाला संसाधन संदर्भ केंद्र म्हणून विकसित करणे जेणेकरून, बौद्धिक दिव्यांग मुलांना एकाच छताखाली सर्व सुविधा मिळतील.
- दिव्यांग सशक्तीकरण उपक्रमांचा विस्तार करणे आणि अपंगत्व लवकर ओळखणे, समाजाला प्रेरित करण्यासाठी जनजागृती शिबिर आणि समाजाचा व शासनाचा सहभाग घेवून दिव्यांग व्यक्तींसाठी, त्यांच्या कुटुंबियांना साहाय्य करणे.
- सर्व प्रवर्गातील दिव्यांगाना समान संधी, सर्व समावेशक शैक्षणिक धोरण, कौशल्य विकास, व्यावसायिक प्रशिक्षण संधी निर्माण करून त्यांना स्वावलंबी बनवणे, त्यांना रोजगारासाठी संधी उपलब्ध करून देणे, त्यांची आरोग्य तपासणी व
- उपचारासाठी शिबीर आयोजित करणे.
- दिव्यांगाना शासकीय योजनांचा लाभ मिळून देण्यासाठी पाठपुरावा करणे.
- दिव्यांग व त्यांच्या कुटुंबियांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना कार्यान्वित करणे.

### प्रकल्प उपक्रम:

#### संवेदना सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र, लातूर: -

संवेदना सेरेब्रल पाल्सी केंद्र हे एक डे केयर सेंटर आहे. या केंद्रात ३-१८ वयोगटातील दिव्यांग मुलांसाठी एकाच छताखाली विशेष शिक्षण, व्यावसायिक चिकित्सा, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, म्युझिक थेरपी, वैद्यकीय चिकित्सा, कृत्रिम साधणे पुरविणे, विशेष शैक्षणिक साहित्य पुरवणे, निरामय आरोग्य विमा काढणे, बुध्यांक तपासणी व पालकांचे समुपदेशन करणे, काळजी वाहक व पालकांचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. या शाळेमध्ये बौद्धिक अपंगत्व असलेल्या )आयडी( मुलांचे पुनर्वसन केले जाते. बौद्धिक अपंगत्व मध्ये सेरेब्रल पाल्सी, मतिमंदत्व, स्वमग्न, डाऊन सिंड्रोम व बहुविकलांगता असलेल्या मुलांचा समावेश आहे. संवेदना प्रकल्पामध्ये सर्व समावेशक शिक्षण, अडथळा विरहीत परिसर निर्माण करण्यास प्रोत्साहित करणे, सेरेब्रल पाल्सी असलेल्या मुलांना दहावीच्या परीक्षेची तयारी करून घेणे, त्यांना परीक्षेसाठी लेखनिक )रायटर( पुरवणे तसेच कौशल्य विकसित करण्यास विविध उपक्रम राबविले जातात. ज्याप्रमाणे सामान्य मुलांच्या शैक्षणिक सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आयोजित्या जातात त्याप्रमाणे संवेदना दिव्यांग मुलांना प्रेक्षणीय स्थळांना भेट देणे, मंदिर, बगीचा, रेल्वे स्थानक, शॉपिंग मॉल, शेता मध्ये घेऊन जातात. दिव्यांग मुलांना आपल्या परंपरेची ओळख व्हावी, त्यांनी सुद्धा याचा आनंद घ्यावा म्हणून वेळ अमावस्या, दिव्याची अमावस्या, गणपती उत्सव, राखी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी आदी सण उत्साहाने साजरे केले जातात. सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन केले जाते तसेच शाळेतील मुलांना इतर ठिकाणी कार्यक्रमात तसेच नाटिका, संगीत व क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यास पाठवले जाते. शाळेतील मुलांना राज्य व केंद्र स्तरावर विविध पुरस्कार सुद्धा प्राप्त झाले आहेत.

#### जनकल्याण दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नदी हत्तरगा, ता. निलंगा, जिल्हा लातूर:

दिव्यांग क्षेत्रातील अनुभवानुसार असे लक्षात आले कि, ही बुद्धीबाधित मुलांचे १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या पालकांना आणखीन गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. त्यासाठी संवेदना प्रकल्पाने १८ वर्षापेक्षा अधिक वयाच्या बौद्धिक दिव्यांग व्यक्तींसाठी केंद्र शासनाची घरौंदा योजना ज्यामध्ये २० बुद्धीबाधित दिव्यांगाना (स्त्री व पुरुष) निवासी व्यावसायिक प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र नदी हत्तरगा येथे दि. २२ जुलै २०१६ रोजी प्रारंभ केले.

घरौंदा योजनेसाठीचा सहयोग – राष्ट्रीय न्यास, दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली या विभागाने केला.

दिव्यांग व्यक्ती त्याच्या कुटुंबावर अवलंबून न राहता स्वत: व्यवसाय किंवा नोकरी करू शकतील अशी स्थिती निर्माण करणे; त्या अनुषंगाने बालकल्याण दिव्यांग पुनर्वसन केंद्रामध्ये नियमीत विविध उपक्रम शिकविले जातात जेणेकरून दिव्यांग व्यक्तींमध्ये कौशल्य प्राप्त होऊ शकते. शेती, बागकाम, गोशाळा, पेपर कप तयार करणे, कृत्रिम हार, लटकण, तोरण तयार करणे, पणत्या रंगविणे, तसेच भाजीपाला लागवड, भाजी काढणे, फुलझाडांचे संगोपण करणे, फुले तोडणे व विक्री करणे, गो शाळेत धुप, अगरबत्ती तयार करणे, मेडिकल किंवा स्टेशनरी दुकानात लागणारे लिफाफा तयार करणे इ. उपक्रम चालतात.

### जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, लातूर कार्यान्वित अभिकर्ता: संवेदना प्रकल्प, लातूर

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्फत मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा व्यवस्थापन समिती मार्फत जिल्ह्यातील सर्व प्रवर्गातील दिव्यांगांसाठी कार्य करणे. लातूर जिल्ह्यासाठी शासनानी 2019 पासून संवेदना प्रकल्पाची जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राची योजना कार्यान्वित करण्यासाठी निवड केली आहे. त्यादृष्टीने स्वतंत्र नोंदणी प्रमाणपत्र दिव्यांग कल्याण आयुक्त कार्यालय, पुणे यांनी दिलेले आहे. दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करणे, शिबीराद्वारे दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्र, बस, रेल्वे चे पासेस मिळवून देणे, युडीआयडी च्या दृष्टीने प्रयत्न करणे. आशा वर्कर्स, ग्रामसेवक, नर्स, डॉक्टर, शासकीय कर्मचारी, विशेष शिक्षक व मुख्याध्यापक, इ.चे प्रशिक्षण. प्रशासनाने संवेदना प्रकल्पाच्या अंतर्गत चालणाऱ्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर चे सेवा कार्याची नोंद घेतली व संवेदना प्रकल्पास मुंबई उपनगरासाठी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी मंजुरी दिली आहे.

### संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था हरंगुळ (बु) लातूर: राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यता प्राप्त आय टी आय संस्था

वाढत्या औद्योगिकरणामुळे केवळ देशात नव्हे तर जगभरात विविध स्वरूपातील तंत्रज्ञांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. औद्योगिक उद्योगांना त्यांच्या मागणीप्रमाणे प्रशिक्षण व गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ तंत्रज्ञ पुरवणारी संस्था म्हणजे आयटीआय. दिव्यांगा करिता नवीन कायदा RPD Act 2016 निर्माण झाला आहे. एकूण लोकसंख्येच्या आठ ते दहा टक्के दिव्यांगांची संख्या आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यात दिव्यांगा करिता स्वतंत्र आयटीआय सुरू करायचा संवेदना प्रकल्पाने ठरवले. औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे दिव्यांग व्यक्ती आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभा करणे, जेणेकरून दिव्यांग व्यक्तींच्या कुटुंबाचे संपूर्ण पुनर्वसन होईल तसेच समाजातील वंचित दुर्लक्षित घटक हा दिव्यांग व्यक्ती आहे, अशा दिव्यांग घटकास समाज व शासनाकडून न्याय मिळवून देण्याचा हेतू आहे. संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था हरंगुळ बुद्रुक या संस्थेस राज्य शासन व केंद्र शासनाची मान्यता असून दिव्यांगांसाठी एकूण चार प्रकारचे कोर्सेस सुरू करण्यात येत आहेत. यात इलेक्ट्रिशियन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, ड्रेस इलेक्ट्रॉनिक्स .

स्थानिक स्तर समिती:

प्रत्येक जिल्ह्यामध्ये मा. जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्तर समितीचे गठण करणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय न्यासकडे नोंदणी असलेल्या संस्था, एक दिव्यांग व्यक्ती हे प्रमुख सदस्य आहेत. जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी ही समिती गठित करण्यासाठी प्राधान्याने पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. बौद्धिक दिव्यांग व्यक्तीच्या संरक्षण, संपत्तीचे देखभाल करण्याकरिता कायदेशीर पालकाची नियुक्ती केली जाते. बौद्धिक दिव्यांग व्यक्ती तसेच त्यांच्या सर्व कायदेशीर बाबींचे निर्णय कायदेशीर पालक घेत असतो. शासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पेन्शन करिता या प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. त्याकरिता मा. जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या स्थानिक स्तर समितीकडून कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्र दिले जाते. लातूर आणि धाराशिव जिल्ह्यासाठी संवेदना प्रकल्प संस्था प्रतिनिधी म्हणून कार्य करते.

निरामय आरोग्य विमा योजना:

राष्ट्रीय न्यासची निरामय आरोग्य विमा योजना बौद्धिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींकरिता योजना आहे. प्रतिवर्षी, प्रति दिव्यांग व्यक्ती रु. 500 चे शुल्क आहे. प्रतिवर्षी एक लाख रुपयाचा विविध उपचारासाठी झालेल्या खर्चाचा क्लेम करु शकतो. नोंदणीकृत संस्था, दिव्यांग व्यक्तींचे पालक हे निरामय कार्ड, शुल्क भरुन ऑनलाईन पद्धतीने काढू शकतात. संवेदना प्रकल्पा मार्फत निरामय कार्ड काढून दिले जाते.

निवासी पालक प्रशिक्षण कार्यशाळा:

ग्रामीण भागातील दिव्यांग मुलांच्या पालकांसाठी वर्षातून २ वेळेस निवासी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजीत करण्यात येते. पालकांना आपल्या दिव्यांग पाल्याचे पालन पोषण कसे करावे व शासकीय योजनांची माहिती नसते किंवा ह्या दिव्यांगांच्या पुनर्वसनाच्या सुविधा तालुका स्तरावर उपलब्ध नसतात. तसेच लातूर जिल्ह्यातील ज्या पालकांना यातायत समस्यांमुळे किंवा प्रवासाचे अंतर जास्त असल्याने किंवा पालकांचा रोजगार बुडत असल्याने किंवा दिव्यांग मुल अति तीव्र गटातील असल्याने, अश्या दिव्यांग मुलाला जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात सातत्याने आणता येत नाही अश्या पालकांना ५ दिवसाचे निवासी प्रशिक्षण प्रामुख्याने भौतिक व व्यवसाय उपचार थेरपी देण्यात येते. तसेच त्यांची वैद्यकीय तपासणी व उपचार केला जातो, पालकांचे समुपदेशन केले जाते, दिव्यांग मुलांचा IQ काढण्यात येतो, शासकीय योजनांची माहिती दिली जाते, त्याचा लाभ मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातात, निरामय व UDID कार्ड काढले जाते. त्यांना ही सेवा, थेरपी व प्रशिक्षण, निवास व्यवस्था आणि भोजन हे सर्व नि:शुल्क असते. पालक ५ दिवस कामावर न गेल्याने त्यांचा रोजगार बुडाल्यामुळे प्रशिक्षण काळातील उपस्थिती साठी त्यांना दैनंदिन भत्ता पण देण्यात येतो. या उपक्रमाचा हेतू आपल्या दिव्यांग पाल्याला घरी थेरपी करून घेता यावी ह्यासाठी पालकांना प्रशिक्षण दिले जाते.

इ. दहावी परीक्षा केंद्र:

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अन्य दिव्यांग विद्यार्थ्यांप्रमाणे सेरेब्रल पाल्सी आणि बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी दहावी परीक्षा केंद्राची मान्यता संवेदना सेरेब्रल पाल्सी व बहुविकलांग मुलांच्या शाळेला मान्यता दिली. अशी मान्यता मिळवणारी संवेदना ही राज्यातील पहिलीच शाळा आहे. सेरेब्रल पल्सी व बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी दहावीचा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

## संस्थेची प्रमुख कामगिरी:

१. भारताचे राष्ट्रपती महामहीम श्री. प्रणवजी मुखर्जी यांच्याकडून 2016 मध्ये सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्तकर्ता.
२. महाराष्ट्र शासनाकडून 2018 साठी शाहू-फुले-आंबेडकर पुरस्कार प्राप्तकर्ता.
३. महाराष्ट्र शासनाकडून 2014-2015 साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्तकर्ता.
४. संत ईश्वर फाऊंडेशन नवी दिल्ली यांचा उत्कृष्ट संस्था पुरस्कार प्राप्त.
५. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई यांचा पुरस्कार प्राप्त.
६. पुणे मराठी ग्रंथालय, पुणे यांचा पुरस्कार प्राप्त.
७. जिल्हाधिकारी, लातूर यांची दिव्यांग क्षेत्रातील उत्कृष्ठ संस्था म्हणून पुरस्कार प्राप्त.
८. लायन्स क्लब, लातूर यांची पुरस्कार प्राप्त.
९. सावित्रीबाई फुले प्रतिष्ठाण, औरंगाबाद यांचा पुरस्कार प्राप्त.
१०. भारत सरकारचे ALIMCO (आर्टिफिशियल लिंब मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) चे मूल्यांकन आणि मोजमाप शिबिर ज्यामध्ये लातूर जिल्ह्यातील 12000 दिव्यांगजनांची तपासणी त्यात ८७९७ पात्र दिव्यांगजनांना कृत्रिम सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले.

## इतर नागरी समाज संस्था/ एनजीओ/ सरकारी/ सार्वजनिक व्यवस्थेशी संलग्नता

१. राष्ट्रीय न्यास, दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग, सामाजिक न्याय एवं अधिकारता मंत्रालय, भारत सरकार.
२. सक्षम, नागपूर (समदृष्टी, क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ)
३. I. A. C. P (इंडियन असोसिएशन ऑफ सेरेब्रल पाल्सी)
४. विवेकानंद रुग्णालय, लातूर
५. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर
६. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
७. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर
८. परिवार – बौद्धिकदृष्ट्या दिव्यांगांसाठी नॅशनल फेडरेशन ऑफ पॅरेंट्स असोसिएशन
९. विवेकानंद वैद्यकीय फौंडेशन व संशोधन केंद्र, लातूर
१०. लातूर फिजिओथेरपि महाविद्यालय, लातूर
११. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

"जन्मत: वा अपघाताने आलेल्या दिव्यांगत्वावर मात करण्यासाठी जीवाचे रान करणारे पालक माता पिता आपण पाहतो, तेंव्हा मनात कौतुक दाटुन येते. संवेदना प्रकल्प अशा मातापित्यांना सहकार्य करणारी, त्यांच्या पाठीशी खंबीरपणाने उभी रहणारी, दिव्यांगाना प्रशिक्षण देणारी अशी सेवाभावी संस्था आहे. संस्थेने दिव्यांगाना व त्यांच्या कुटुंबीयांना सामान्य जीवनाचे प्रतीक परत मिळवण्यास मदत केली आहे. हे काम साधे सोपे नाही याची जाणीव असुनही समाजातील सुहृदांच्या उदंड सहकार्यावर विश्वासून, सेवा कार्यातील हा एक अल्पसा प्रयत्न आहे."

संवेदना प्रकल्पाद्वारे दिव्यांगासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संस्थेने समिती गठीत केली आहे. समिती मध्ये विविध क्षेत्रातील सेवाव्रती सदस्य आहेत. प्रकल्प सामुहिक शक्तीमुळे दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहे. सर्व समिती सदस्य, विशेष शिक्षक, थेरपिस्ट, दिव्यांगजन, पालक वर्ग, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक, काळजीवाहक, वाहन चालक, देणगीदार आणि पालक संघटना यांच्या सहकार्याने संवेदना प्रकल्प दिव्यांग क्षेत्रामध्ये "सेवा–सर्वोपरी" च्या संकल्पनेची अंमलबजावणी करत आहे. एखादी शासकीय योजना कश्या पद्धतीने राबवावी आणि सेवा निरपेक्ष भावनेनी थेट लाभार्थ्यां पर्यंत कशी पुरवायची याचे आदर्शवत उदाहरण द्याचे असेल तर ते म्हणजे रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या (महाराष्ट्र प्रांत) संवेदना प्रकल्प व त्या अंतर्गत चालणाऱ्या उपक्रमाद्वारे देता येऊ शकते.

नावाप्रमाणे "संवेदना" प्रकल्पाने सिद्ध केले आहे कि, दिव्यांगत्व असाध्य असू शकते, परंतु दुर्दैवाने पीडितांचे जीवन निराशाजनक व बहिष्कृत नाही. गरज आहे ती थोडीशी दिव्यांगाप्रती "संवेदना" जोपासण्याची.

**– डॉ. योगेश धोंडीराज निटूरकर**

**कार्यवाह, संवेदना प्रकल्प, हरंगुळ (बु)**

### अंशकालीन निवास व्यवस्था (रेस्पाईट सेंटर):

दिव्यांग मुलांच्या पालकांना बाहेर गावी यात्रा, नातेवाईकांच्या कौटुंबिक कार्यक्रमासाठी बाहेर गावी जायचे असेल तर पालकांना काही वेळेला दिव्यांग मुलांना सोबत घेऊन जाणे अवघड होते. त्या वेळेस पालकांना विशेषत: आईला यात्रा किंवा अन्य प्रवास करता येत नाही. त्यासाठी अंशकालीन निवास व्यवस्था प्रकल्पात केलेली आहे. या सुविधे मध्ये त्या दिव्यांगाच्या निवास काळात त्यांना विविध थेरपी देणे, वैद्यकीय तपासणी करणे, योग, क्रीडा तसेच वैश्विक कार्ड, निरामय कार्ड व इतर शासकीय कागदपत्रांची पुरतात करणे इ. बाबी वेळापत्रकानुसार केले जाते.

### पालकांचे समुपदेशन केंद्र:

पालकांना आपल्या दिव्यांग पाल्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते त्यात सुरुवात आपलं मुल दिव्यांग आहे ह्याची स्वीकृती पासून ते मुला मध्ये सुधारणा होऊच शकत नाही यामुळे निर्माण होणारे मानसिक तणाव, वैफल्य, पाल्याप्रती नकारात्मक भावना, कौटुंबिक वाद, पालकांचे विभक्त होणे अशा बाबींसाठी त्यांचे वेळोवेळी मानसोपचार तज्ञांकडून समुपदेशन होणे आवश्यक असते. ह्यासाठी संवेदना प्रकल्प पालकांचे समुपदेशन केंद्र चालवते तसेच वेळोवेळी पालकांना आधार देते.

### विशेष शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा:

RPD Act – 2016 च्या नुसार दिव्यांगत्याचे 21 प्रकार आहेत. दिव्यांगत्वाच्या प्रत्येक प्रकारामध्ये विविध समस्या, आव्हाने आहेत व त्याची व्याप्ती खूप आहे, त्यामुळे विशेष शिक्षकांना सर्व प्रकारच्या दिव्यांगत्वाबाबत वेळोवेळी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. संवेदना प्रकल्प विशेष शिक्षकांसाठी विविध विषयांवर अभ्यास वर्ग व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करते जेणेकरून दिव्यांगजणांना न्याय देता येऊ शकतो.

संवेदना प्रकल्पाचे निरपेक्ष सेवा कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय न्यास, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकारने संवेदना प्रकल्पाची महाराष्ट्र राज्याची SNAC – राज्य नोडल एजन्सी केंद्र, महाराष्ट्र राज्य निवड केली.
राष्ट्रीय न्यास यांच्याकडून राष्ट्रीय न्यास अधिनियम 1999 या कायद्यानुसार मतिमंद, आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग या बुद्धीबाधीत प्रवर्गातील दिव्यांगांसाठी राष्ट्रीय न्यासचे गठण करण्यात आले आहे. या न्यासचे राज्य स्तरावरील कार्य व अंमलबजावणीचे दायित्व राज्य स्तरीय समन्वय समिती व स्टेट नोडल एजन्सीचे आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्तर समितीचे कार्य अपेक्षित आहे. राष्ट्रीय न्यास प्रत्येक राज्यामध्ये स्टेट नोडल एजन्सी म्हणून एका संस्थेची नियुक्ती करते. जानेवारी २०२१–२०२३ साठी महाराष्ट्र राज्यामध्ये रा.स्व.संघ जनकल्याण समिती (महाराष्ट्र प्रांत) संचलित संवेदना सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र हरंगुळ (बु) लातूर या संस्थेची निवड केलेली आहे. स्टेट नोडल एजन्सीचे कार्य हे राज्यातील राष्ट्रीय न्यासकडे नोंदणीकृत संस्थांना मार्गदर्शन करणे, नवीन संस्थांची नोंदणी राष्ट्रीय न्यासकडे करण्याबाबत आवश्यक ते सहकार्य करणे, स्थानिक स्तर समित्यांमार्फत देण्यात येणाऱ्या कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्रांबाबत आढावा घेवून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणेबाबत स्थानिक स्तर समित्यांना निर्देश देणे, वेळोवेळी राष्ट्रीय न्यासकडून निर्देश देण्यात येतील त्याप्रमाणे विविध संस्थांची तपासणी करणे, निरामय आरोग्य विमा योजनेची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यासंदर्भात उपाययोजना करणे, राज्य समन्वय समितीची बैठक घेणे आणि केंद्र शासनाने निर्देशित केलेले कार्य आवश्यकतेनुसार करणे.
राष्ट्रीय न्यासने ही SNAC ची ही देशभरात सुरु असलेली योजना २०२३ साली बंद केली त्यामुळे संवेदना प्रकल्प ही SNAC महाराष्ट्र राज्यातील शेवटची कार्यान्वित संस्था होय.

# सामाजिक संस्था व त्यांचे कार्य-

## २.२ आरंभ... स्वमग्नतेच्या जगातील सक्षम पाऊल

एक सुंदर, छान, गुटगुटित आणि स्वस्थ मुल आपल्याला व्हावं अशी प्रत्येक आई वडिलांची इच्छा असते. पण एक ऑटिस्टीक मुल घरात जन्माला आल्यानंतर सुखस्वप्नांचं चित्रच विस्कटून जातं. पंधरा वर्षांपूर्वी असच एक चित्र विस्कटलं आणि सुरू झाला त्या चित्राला सावरण्याचा प्रयत्न. जेव्हां टाकळकर दाम्पत्याला कळलं की त्यांचा पहिला मुलगा ऑटिस्टीक (स्वमग्न) आहे आणि पहिलं पाऊल पडलं स्वमग्नतेच्या जगात. स्वमग्नता हि एक मेंदूच्या विकासाशी संलग्न अपंगत्व आहे. स्वत:च्याच विश्वात, विचारात रमणे म्हणजे स्वमग्नता. ही स्वमग्न मुले नेहमी समाजापासून, अवतीभवतीच्या वातावरणापासून अलिप्त राहतात. नातेवाईक, मित्र-मैत्रिणी आजूबाजूचे लोक यांच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नसतं. स्वमग्नता हा आजार नसून ती एक स्थिती आहे.

स्वमग्न मुलांमध्ये प्रामुख्याने जाणवणारी समस्या म्हणजे भाषा संप्रेषणाची, वैचारिक देवाण-घेवाणीची. सोप्या शब्दात समजावयाचं म्हणजे, जर आपल्याला एखाद्या अनोळखी प्रदेशात, अनोळखी लोकात एकटे नेऊन सोडले तर? आपण गोंधळून जाऊ, आपल्याला त्या लोकांची भाषा समजणार नाही या आपली त्यांना! अशावेळी आपली जी स्थिती होईल नेमकी तशीच स्थिती या स्वमग्न मुलांची असते. म्हणूनच ही मुलं परिसराशी संपर्क नसल्यासारखी वागतात. बाह्य जगाशी यांचा काहीही संबंध नसतो. आपले बोलणे त्यांना ऐकू जाते व बरेचदा ती त्याप्रमाणे वागतात देखील, पण त्यांचे डोळे आपल्याकडे बघत नाहीत. नजरेला नजर देत नाहीत. त्यांच्याकडून शाब्दिक प्रतिसाद फार क्वचित मिळतो. त्यामुळे कित्येकदा या मुलांवर मतिमंदत्वाचा शिक्का मारला जातो. पण यापैकी बरीचशी मुलं ही मतिमंद नसतात. या मुलांना तात्पुरत्या स्वरूपाचे संबंध वा व्यवहार जमत नाहीत. त्यामुळेच तर ती स्वत:मध्ये मश्गूल असतात. हि समस्या मुलांमध्ये जास्त तर मुलींमध्ये कमी असते. त्याचे प्रमाण ४:१ ह्या प्रमाणात असते.

४ नोव्हेंबर २०११ रोजी टाकळकर दाम्पत्याने नाशिक येथील प्रमोद गायकवाड, बेंगलोरचे संशोधक कोणी आणि सामाजिक जाणिवेतून एकत्र आलेल्या उद्योजक मिलिंद केळ यांच्यासह आरंभचा पाया रचला. स्व:ताच्या मनात असलेल्या कल्पना आणि इतर पालकांच्या गरजा ओळखून स्वमग्न मुलांसाठी एक अद्ययावत व आधुनिक सेंटर मराठवाड्यात असावं याचा ध्यास घेतला व मराठवाड्यातले पहिले स्वमग्न मुलांसाठीचे केंद्र आरंभच्या स्वरूपात आपल्या समोर साकार झालं.



स्वत: अंबिका टाकळकर यांनी विशेष बी.एड.ची अर्हता प्राप्त केली. या विशेष असणाऱ्या मुलांसाठी लागणारे प्रशिक्षण व अर्हता प्राप्त असणाराच शिक्षकवर्ग मुलांसाठी नेमून दिला. ज्यामुळे मुलांच्या प्रत्येक गरजेला ओळखून त्याचे समायोजन केले जाते. दोन मुलांपासून सुरू झालेल्या या संस्थेमध्ये आज ६० स्वमग्न मुले शिक्षण घेत आहेत.

## आरंभचे प्रकल्प :

### अर्ली इंटरव्हेंशन सेंटर

आरंभ येथे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना आयुष्यात उभे करण्यासाठी खास परीश्रम घेतले जातात. लवकर निदान लवकर उपचार या पद्धतीनुसार अर्ली इंटरव्हेंशन सेंटर आरंभ चालवते ज्याद्वारे विविध उपचार पद्धती लहान मुलांना देऊन त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले जातात. थेरपीज द्वारा मुलांच्या क्षमता विकसित करण्यावर भर दिला जातो.

ह्यात आयान, ऑक्युपेशनल, प्ले, म्युझिक, ड्रामा, मास्ल,स्पिच, फिजिओथेरपीचा उपयोग केला जातो. विविध थेरपीस्ट नाममात्र दरात मुलांना या उपचार पद्धती देतात त्यामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील मुलानंही महागड्या थेरीपी घेणे शक्य होत आहे. मराठवाड्यातील पालकांना या थेरीपी मुलांना देण्यासाठी पुणे मुंबई च्या चक्र कराव्या लागत त्यांचा हा त्रासही आता कमी झाला आहे.

### आरंभ विशेष मुलांची शाळा

उपचार पद्धतीच्याद्वारे मुलांमधील कौशल्य वाढल्यानंतर त्यांना गरज असते ती विशेष शिक्षणाची. मराठवाड्यात अशा प्रकारचे शिक्षण देणाऱ्या शाळांचीही कमतरता आहेच. आरंभने ही गरज ओळखून एक पाऊल पुढे टाकत आरंभ विशेष मुलांची शाळा सुरु केली ज्यात ६० मुले आज शिक्षण घेत आहेत. प्रत्येक मुलाचा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करून त्यांना सर्वसामान्य मुलांप्रमाणे आयुष्य जगता यावे यासाठी विशेष शिक्षण दिले जाते. जी मुले काही प्रमाणात नियमित शिक्षण घेऊ शकतात त्यांना ते मिळवून देणे अशा दोन्ही पातळीवर आरंभ शाळा काम करते. आतापर्यंत १० मुले दहावी पास तर ४ मुले बारावी पास झाली आहेत. चार मुले स्वतःच्या पायावर उभी आहेत.

### आरंभ क्रिएशन

प्रत्येक व्यक्ती मध्ये काहीतरी सुप्त गुण असतात. गरज असते ते ओळखण्याची. स्वमग्न मुले जरी साऱ्या क्षमता लवकर प्राप्त करु शकत नसली तरी त्यांची बुध्दी सामान्य मुलांप्रमाणे असते. त्यांच्यातले सुप्त गुण ओळखून ते प्रत्यक्षात उतरवण्याचे काम आर्ट ह्यांच्या माध्यमातून आरंभने सुरु केले आणि आता त्याला आरंभ क्रिएशन च्या माध्यमातून व्यवसाय प्रशिक्षण आणि रोजगार केंद्राचे स्वरुप देण्यात आले आहे. १८ वर्षांवरील मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण, मार्गदर्शन देण्याबरोबरच रोजगाराच्या संधी मिळवून दिल्या जातात. २० मुले या आरंभ क्रिएशन मध्ये कार्यरत असून त्यांना मानधनही दिले जाते.



मुलांना त्यांच्या अंगातील कलागुणांनुसार प्रशिक्षण दिले जाते. आणि मग त्यातून सुंदर कलात्मक वस्तूंची निर्मिती केली जाते. समाजात या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करून स्वमग्न मुलांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. पेपर पाऊच आणि प्लेट बनवण्याच्या मशीनवर 5 मुले काम करतात. दरवर्षी दिवाळीच्या काळात २९ हजार च्या वर पणत्या तयार करून आरंभ क्रिएशनच्या माध्यमातून विकल्या जातात. कोर्पोरेट जगतात आरंभच्या मुलांनी तयार केलेल्या वस्तू पोचल्या आहेत. झूम सारख्या मल्टीनॅशनल कंपन्या आणि छ.संभाजीनगरच्या परिसरातील अनेक कंपन्या आरंभ मधील मुलांनी तयार केलेल्या वस्तूंची खरेदी करत असतात. सदैव नव-नवीन कल्पना घेऊन मुलांना वेगळे काहीतरी देण्याचा आमचा हा प्रयत्न फलदायी ठरतो. यामधून आम्ही त्यांच्या क्षमता पण वाढवत आहोत.

संगणक प्रशिक्षण केंद्र:

स्वमग्न तसेच इतर विशेष मुलांना आधुनिक जगासोबत चालता यावे यासाठी आरंभ तर्फे संगणक प्रशिक्षण देण्यात येते.ज्यातून पुढे स्वमग्न मुलांना स्वतःच्या पायावर उभे टाकण्यास मदत होते.

मुलांसाठी राबवण्यात येणारे उपक्रम:

आरंभ फन क्लब : स्वमग्न मुलांमधील कलागुणांना वाव देऊन त्यांना त्यात पारंगत करणे, समाजासमोर त्यांची कला सादर करणे तसेच त्यांच्या पालकांसाठी नृत्य, गायन, चित्रकाम, रंगकाम , वाद्य वादन ह्याचे प्रशिक्षण आणि जाहीर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

आउटरिच प्रोग्राम - मुलांच्या वर्तन बदलासाठी, सामाजिक समायोजनासाठी पिकनिक, ट्रेकिंग,सहली, बँक, पोस्ट ऑफिस, मॉलमध्ये खरेदी, सर्वसामान्यमुलांबरोबर संमेलने याबरोबरच सार्वजनिक सण, समारंभ साजरे केले जातात. विविध कार्यक्रम आणि स्पर्धांमध्ये मुलांचा सहभाग असतो

पालक आणि शिक्षकांसाठीचे प्रकल्प:

पालक समुपदेशन आणि प्रशिक्षण केंद्र

स्वमग्न आणि गतीमंद मुलांच्या पालकांचा आधार गट तयार करून आरंभ त्यांच्यासाठी वर्षातून पाच वेळा विविध प्रशिक्षण सत्र आयोजित करत असते. स्वमग्नमुलांसाठी घरातल्या घरातील उपचारपध्दती, त्यांचे सामाजिक समायोजन, शिक्षण अशा विविध विषयांबरोबरच पालकांनी मुलांच्या सहकार्याने व्यवसाय सुरु करावा यासाठी व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. शुक्रवार आणि शनिवार पालकांचे समुपदेशन केंद्र चालवण्यात येते.

आरंभ पालक मंच :स्वमग्न आणि गतिमंद असणार्या मुलांच्या पालकांसाठी पालक मंच चालवण्यात येतो. ज्यात पालक एकत्र येऊन मुलांसाठी विविध उपक्रम राबवतात.तसेच पालकांसाठी पिकनीक, सांस्कृतीक कार्यक्रम, सहली असे उपक्रम राबवले जातात.

शिक्षक प्रशिक्षण:

स्वमग्नता तसेच विशेष मुलांसाठी काम करणारे तज्ज्ञ मनुष्यबळ तयार करण्यासाठी आरंभतर्फे प्रशिक्षणवर्ग वर्षातून चारवेळा घेतले जातात. शिकवण्याच्या नव्या पध्दतीमाहिती देणे तसेच शिक्षकांनी सतत अपडेट रहावे यासाठी एक व दोन दिवसाचे असे लघु तसेच तीन महिन्याचा 'स्वमग्नता जाणून घेताना' हा दीर्घ प्रशिक्षण वर्ग घेतला जातो.

आरंभ ग्रंथालय:

आरंभ मध्ये पालक, शिक्षकांसाठी, विशेष शिक्षण, विशेष्ज्ञ शिक्षण प्रणाली आणि विशेष मुलांच्या यशोगाथा अशा विविध पुस्तक उपलब्ध असतात.समृध्द पुस्तकालय हे आरंभचे वैशिष्ट आहे. नियोजित संकल्प स्वमग्न मुलांसाठी मराठवाड्यातील पहिले वसतिगृह - वृध्दत्वाकडे झुकलेल्या पालकासमोर त्यांच्या स्वमग्नमुलांना सांभाळण्याचा जटील प्रश्न असतो. शंभर मुले राहू शकतील अशा क्षमतेचे वसतीगृह उभारण्याचा आरंभचा मानस असून त्यासाठी जागा खरेदी करण्यात आली आहे. येत्या दोन वर्षात या प्रकल्पास आकार देण्याचा प्रयत्न आहे.

**नियोजित संकल्प:**

स्वमग्न मुलांसाठी मराठवाड्यातील पहिले वसतिगृह – वृध्दत्वाकडे झुकलेल्या पालकासमोर त्यांच्या स्वमग्नमुलांना सांभाळण्याचा जटील प्रश्न असतो. शंभर मुले राहू शकतील अशा क्षमतेचे वसतीगृह उभारण्याचा आरंभचा मानस असून त्यासाठी जागा खरेदी करण्यात आली आहे. येत्या दोन वर्षात या प्रकल्पास आकार देण्याचा प्रयत्न आहे.

**संगोपन – निवासी शाळा प्रकल्प:**

आपल मुल अपंग आहे हे स्विकारण जितक कठिण असते त्यापेक्षा कितीतरी पटीने पुढच आयुष्य. पालक, डॉक्टर शॉपींग , थेरपी देव दैव हे सगळं करत असतानां , दिवस , महिने आणि वर्ष भराभर निघुन जातात. बघता बघता मुल मोठ होत आणि आयुष्य न जगताच आई बाप वृद्ध अर्थात म्हातारे होत जातात. मुलांचा वयाच्या प्रत्येक टप्पावरच्या समस्या वेगळ्या. मुल मोठी झाली की त्यांची ताकद वाढते अन् मुलांचे करुन करुन आई बापाची कमी झालेली असते. अश्यावेळी सगळ्यात महत्वाचा प्रश्न असतो तो आमच्यानंतर मुलांचे काय ?
ह्याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आम्ही स्वमग्न गतीमंद मुलांसाठी निवासी वसतीगृह सुरु करण्याचा ठरवले. लोकसहभागातून जमिन घेतली तसेच आता पुढचा टप्पा बांधकामाचा. तोही मार्चमध्ये सुरु झाला आहे.
संगोपन हा प्रकल्प सुरु झाल्यानंतर फक्त औरंगाबादच नाहीतर महाराष्ट्रातील कानाकोप-यातील प्रत्येक स्वमग्न मुलाला व त्याच्या पालकांना मदत मिळणार आहे. ऑटिझम फ्रैंडली बांधकाम आणि स्वमग्न मुलामुलींना आवश्यक शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण आणि सर्वसोयीसुविधा संगोपन प्रकल्पात देण्याचा आरम्भा प्रयत्न आहे. येत्या दोन वर्षात हा प्रकल्प उभा करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**आरंभ कॅफे :** स्वमग्न मुलांसाठी रोजगार निर्मितीचा एक भाग म्हणून औरंगाबादला एक लहान कॅफे उघडून , समाज आणि मुलांमध्ये संवाद घडून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**शिघ्र निदान व उपचार केंद्र :** शिघ्र निदान शिघ्र उपचार हा आरंभचा अजेंडा असून त्यासाठी आरंभ थेरेपी सेंटर सध्या आहे त्या भाड्याच्या इमारतीत चालवले जाते. भविष्यात स्वतंत्र इमारत आणि सर्वप्रकारे सुसज्ज अशी स्वतःची इमारत बांधण्याचा आरंभचा मानस आहे.

**सुसज्ज व्यवसाय प्रशिक्षण व रोजगार क्षेत्र :** आधुनिक यंत्रसामुग्रीने सज्ज व्यवसाय प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा प्रयत्न आरंभ करत आहे. सध्या पेपर बॅग आणि पेपर प्लेट तसेच हॅण्डमेड सोप बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असून यात भर करण्याचे प्रयत्न आरंभ करत आहे. स्वतंत्र अशा इमारतीत हे व्यवसाय प्रशिक्षण आणि रोजगार केंद्र आरंभ सुरु करणार आहे.

**सेन्सरी गार्डन :** किमान पाऊण एकर परिसरात विशेष मुलांसाठी सुसज्ज असे सेन्सरी गार्डन उभारण्याचा आरंभ प्रयत्न करत असून त्यासाठीची जमिन आणि अर्धा निधी आरंभने उभा केला आहे.

## आरंभला मिळालेले पुरस्कार:

एक तपाचा प्रवास आरंभने केला. या काळात अडचणीही अनेक आल्या. विशेष मुलांच्या शाळेचा डोलारा सांभाळणे कठीण काम होते. आर्थिक आव्हाने तर होतीच त्याच बरोबर सामाजिक आणि मानसिक आव्हानेही होती. यातून मार्ग काढण्याचे बळ मिळाले ते वेळोवेळी मिळालेले पुरस्कार आणि आरंभच्या कार्याची घेतली गेलेली दखल यामुळे. संकल्प विशेष मुलांची शाळा , भारतीय नौसेना, मुंबई , विशाखापट्टणम कडून सतत दोन वर्ष सर्वोत्तम आई (बेस्ट मदर ) पुरस्कार मिळाल्याने सुरुवातीलाच बळ मिळाले. मागील काही वर्षात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मिळालेला ध्येयपूर्ती पुरस्कार, अमरहिंद मंडळाचा अमर उर्जा पुरस्कार, रेल्फोर फाऊंडेशन पुरस्कार, लोकशाही वृत्त वाहिनीचा मराठवाडारत्न पुरस्कार, नगरच्या स्नेहालय संस्थेने केलेला सन्मान, रेल्वे मंत्री सुरेश प्रभू आणि नागपूर येथे नितीनजी गडकरी यांच्या हस्ते झालेला आमच्या कामाला बळ देऊन गेला आहे.

### प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल:

प्रसारमाध्यमांनीही आरंभ च्या कामाची वेळोवेळी दखल घेतली आहे. त्यात कोरोना काळात विशेष मुलांचे शिक्षण थांबू नये यासाठी प्रथमच आरंभने ऑनलाईन शिक्षणाचा उपक्रम राबवला. त्याची दखल दै. लोकसत्ताने विशेष लेखाव्दारे घेतली. झी दिशा या राज्यस्तरावर प्रकाशित होणार्या साप्ताहिकाने स्वमग्नतेचा आरंभ हा विशेष लेख प्रकाशित केला. टाइम्स ऑफ इंडिया' ७ ऑक्टोबर २०२७ 'आरंभ आर्ट झोन' वर विशेष लेख प्रकाशित. फक्त ऑटीस्टिक मुलांना घेवून दिवाळी पहाट २०१७ चा अयोजन करण्यात आले होते त्याची दखल सर्वच प्रसार माध्यमांनी घेतली. टाईम्स ऑफ इंडिया मध्ये' आरंभ वर प्रकाश टाकणारा लेख प्रकाशित. लोकपत्र 'आरंभ वर विशेष लेख' लोकमत मध्ये आरंभ वर विशेष लेखप्रकाशित झाला आहे. याशिवाय आरंभच्या संचालिका अंबिका टाकळकर यांनी अनेक वृत्तपत्रामधून "स्वमग्नता या विषयावर जनजागृती करणारे लेख लिहिले आहेत त्यात प्रामुख्याने दिव्यमराठीच्या मधुरिमा पुरवणी मध्ये सलग दोन वर्ष कॉलम लिहिला आहे त्यावरचे पुस्तक लवकरच प्रकाशित केले जाईल.

### अडचणीतून मार्ग काढताना:

स्वमग्नता विषयाबाबत अद्यापही समाजात जनजागृती नाही. आरंभच्या समोर पहिले आव्हान हेच उभे राहिले. समाजाला हा विषय समजावणे आणि पालकांना आपले मुल स्वमग्न आहे हे स्वीकारायला लावणे हे काम आरंभ अजूनही करत आहे.

स्वत:च्या मालकीची इमारत नसल्याने विविध प्रकल्प अधिक सक्षमतेने राबवण्यात अडचणींवर संस्था हळूहळू मार्ग काढत आहे. आरंभकडे फक्त दोनच स्कूल व्हॅन असल्याने जास्तीत जास्त मुलांना वाहनसेवा उपलब्ध करून देण्यात अडचणी येतात. अनेक मुलांना स्वत:च्या वाहनाने शाळेत यावे लागते.

कोरोना काळात शाळेला मोठ्या आर्थिक संकटास सामोरे जावे लागले. देणगीदारांकडून येणारा आर्थिक मदतीचा ओघ कमी झाला. त्यातच ८० टक्के मुलांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने ही मुले शाळेचे शुल्क देऊ शकत नाहीत. यामुलांना शिक्षण नाकारायचे नाही असे आरंभने ठरवले आहे. त्यांच्या शालेय आणि थेरीपीच्या शुल्काचा आर्थिक भार आरंभ उचलते. विशेष शिक्षण क्षेत्रात शिक्षकांपासून ते मुलांना सांभाळणार्या आयांपर्यंत मनुष्यबळ हे कुशल असणे आवश्यक असते. हे मनुष्यबळ मिळवणे मोठे आव्हान आहे. आरंभ स्वत:च हे मनुष्यबळ तयार करण्याचा प्रयत्न करते मात्र बहुतांशवेळा अडचणींना सामोरे जावे लागते.

आरंभने दहा वर्षे पै पै जमवून स्वत:च्या मालकिची जमिन खरेदी केली आहे. त्यावर इमारत बांधण्याचे काम सुरु झाले आहे. ८० टक्के मुलांच्या शुल्काचा प्रश्न सोडवण्यासाठी आरंभतर्फे या मुलांसाठी स्पॉन्सर मिळवण्याचे प्रयत्न केले जातात. पालकांसाठी प्रशिक्षण आणि समुपदेशनाचे वर्ग सतत आयोजित केले जातात. शिक्षकांच्या ज्ञानवृध्दीसाठी प्रशिक्षणाचे वर्ग आरंभतर्फे घेतले जातात. जास्तीत जास्त मुलांना सर्व प्रकारच्या उपचार पध्दती आणि शिक्षण देता यावे यासाठी आरंभ देणगीदारांच्या सतत संपर्कात असते.

विशेष मुलांच्या विशेष शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक पाठबळ लागते. त्यासाठी आरंभ कटीबध्द आहेच पण सामाजिक सहभागातून मुलांना लागणार्या अनेक आधुनिक सोयी उपलब्ध होऊ शकतात. ज्या मुलांच्या प्रगतीसाठी पूरक ठरतील. म्हणुनच समाजातील दात्यांना विनंती आहे की त्यांनी आपल्या यथाशक्ती प्रमाणे आरंभला मदत करावी...

**– सौ. अंबिका टाकळकर**

# ४.० ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची
# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारव पुनरुज्जीवन व पुनर्वापर प्रकल्प

बारव – म्हणजे पायऱ्या असलेली विहीर. बारव ला 'बाव', 'बावडी' असे देखील म्हणले जाते. विहिरीतील कमी होत जाणाऱ्या पाणी पातळी पर्यंत पोहोचण्यासाठी या पायऱ्या बांधलेल्या असतात. भारतात बारवची निर्मिती अनेक सहस्त्रकांपासून सुरु आहे. सिंधू संस्कृतीमधील अनेक शहरांतून अशा बारव बांधलेल्या सापडतात. मुख्यत: भारतीय इतिहासाच्या सुवर्णयुगात अनेक बारव बांधल्या गेल्या.  अनेक बारव मंदिर परिसरात किंवा मंदिरांना लागून बांधल्या असून, धार्मिक तीर्थ म्हणून त्याला महत्व दिले जाते ज्यामुळे लोकांच्या भावना जोडल्या गेल्याने त्यांचे संरक्षण आणि वापर करणे सोपे जाते व  water bank म्हणूनही त्याचा वापर केला जात असे. महाराष्ट्रात मुख्यत: मराठा कालखंडात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी अश्या अनेक बारव नव्याने बांधल्या. आजमितीस महाराष्ट्रात अंदाजे २०,००० बारव आहेत. दुर्दैवाने यातील बहुसंख्य बारव दुर्लक्षित आहेत, विनावापर पडून आहेत, कचरा टाकण्याची जागा, धार्मिक विसर्जन विधी करण्याची जागा म्हणूनच जास्त वापरल्या जातात. तर इतर अनेक बारव खाजगी जमिनीवर किंवा खाजगी मालकीच्या आहेत.

आज त्यांचा वापर कमी असला तरी तो प्रामुख्याने शेतीच्या पाण्यासाठी केला जातो. मात्र एक वास्तु / वारसा म्हणून त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन दिसत नाही आणि याबद्दल समाजामध्ये पूर्ण अनास्था आहे. प्रत्येक बारवधर पूर्वी त्या त्या गावाचे पाणी अवलंबून होते, मात्र नंतरच्या काळात धरण, तलाव इत्यादी नवे जलस्रोत निर्माण झाले आणि गावागावात  नळ जोडणी अशा पद्धतीची जल वितरण व्यवस्था निर्माण झाली. या मुळे  नैसर्गिक जलस्रोत... जसे नदी, विहीर आणि बारव येथून पाणी आणणे कमी होत होत बंद झाले आणि बारव दुर्लक्षित राहू लागल्या.

मात्र दुसरीकडे अतिशय अलंकारिक बांधणीच्या स्थापत्यकलेचा उत्तम आणि आश्चर्यकारक नमुना असलेल्या अनेक बारव देखील आपल्या राज्यात आहेत. यातील मंदिराशी संबंधित अनेक बारव आहेत. बारामती तालुक्यातील लोणी भापकर गावातील मल्लिकार्जुन मंदिराची बारव. किंवा जगप्रसिद्ध अशी गुजरात राज्यातील पाटण  येथील  'राणी की बाव' अशी काही ठळक उदाहरणे देता येतील.


जानाई बारव – जेजुरी


धोलाविरा येथील उत्खननात सापडलेली बारव


लोणी भापकर – मल्लिकार्जुन मंदिर बारव

बंगाली बारव




## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारव पुनरुज्जीवन व पुनर्वापर प्रकल्प :

याच सर्व दुर्लक्षित बारव वास्तूंचा उपयोग जलसंधारणाच्या कामासाठी करून घेण्याच्या हेतूने आणि त्यायोगे वारसा जतन करण्याच्या संकल्पनेतून सेवावर्धिनीने बारव पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेतला आहे. जेजुरी येथील बंगाली बारवचे काम CSR अर्थ सहाय्यातून सेवावर्धिनीने सुरुवातीला पूर्ण केले आहे. ही बारव अहिल्यादेवींच्या कालखंडात (अंदाजे २५०–३०० वर्षांपूर्वी) बांधली असल्याने आणि जेजुरीशी असलेले अहिल्यादेवी आणि होळकर घराण्याचे नाते या योगाने या प्रकल्पास 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारव पुनरुज्जीवन प्रकल्प' असे नाव दिले. मात्र केवळ पुनरुज्जीवन करून न थांबता याचा वापर होणे जास्त गरजेचे आहे, ज्यामुळे पाणी आणि वास्तू दोन्ही सतत वापरात राहिल्यानेच लोकांना उपयोग होत राहणार आहे आणि जास्त कालावधी पर्यंत हा वारसा टिकून राहण्यास मदत होईल. म्हणूनच प्रकल्पाच्या नावाचा विस्तार करून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारव पुनरुज्जीवन व पुनर्वापर प्रकल्प' असे नाव दिले. बारव केवळ स्वच्छ न करता, तिचे स्त्रोत मोकळे करणे, झिरपा वाढण्याच्या दृष्टीने पाझर क्षेत्रात जमिनीत पाणी मुरेल असे जलसंधारणाचे काम करणे, स्वच्छ केलेल्या बारव मधील पाणी स्थानिक पाणी पुरवठा व्यवस्थेशी जोडणे असे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आणि टप्पे ठरवले आहेत. बारवांचे बांधकाम प्रत्यक्ष गावागावात विखुरलेले असल्याने तुलनेने कमी खर्चात गावात जलसंधारणाचे काम केले जाऊ शकते तसेच गावाचा स्वतःचा पाण्याचा स्त्रोत तयार झाल्याने गाव पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकते. सध्या वरील उल्लेखित बंगाली बारव मार्फत जेजुरी शहराला पाणी पुरवठा होत आहे.

याचप्रमाणे जेजुरी येथील जानाई बारव, फकीराची बारव, तर सुपे येथील एक बारव, धामारी गावातील नागेश्वर बारव इत्यादींवर सेवावर्धिनी काम करत आहे किंवा पूर्ण झाले आहे. नुकतेच HSBC पुणे च्या कर्मचाऱ्यांनी कडे पठार पायथ्याची इनामी बारव केवळ श्रमदानातून स्वच्छ केली. यावेळी त्यांनी बारववर संरक्षक जाळी बसविण्याची गरज त्यांच्या लक्षात आल्याचे आवर्जून सांगितले. प्रत्यक्ष कामात उतरल्याने जागेची गरज त्यांना ओळखता आली आणि कोणत्या कामाची गरज का असते हे पटल्याचे त्यांनी सांगितले.

३१ मे २०२४ रोजी अहिल्याबाईंचे जन्म त्रिशताब्दी वर्ष सुरु होत आहे. या वर्षात महाराष्ट्रातील ३०० बारवांचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प सेवावर्धिनीने केला आहे. या मोठ्या शिवधनुष्यासाठी अनेकांचे सहकार्य लागणार आहे

**– श्री. आमोद काटीकर**

- The relationship that the interviewer is able to establish with the respondent.
- Willingness to adjust interviews to the time convenient to respondents
- Ability to listen to answers patiently, and to probe and cross-check them in a thorough but polite way.

- Step 7: Training of Field work team When the questionnaire is ready, the fieldwork team must be trained to administer it
- Step 8: Conduct field survey and collect information through

**Primary source**

- Socioeconomic survey, Interaction with beneficiaries and Focused Group Discussion (FGD), in-depth interviews, case studies, etc
- Collecting quantitative and qualitative data.

**Secondary source**

- Government census data and District gazetteers
- Documents from non-governmental organizations

- Step 9: Procure the baseline survey information. This is critical as your impact/change is measured against baseline situation post completion of project.
- Step 10: Analyze Data collected and compare with baseline information
- Step 11: Preparation of report with Findings and Recommendations: an overall assessment of impacts and make recommendations

## Format for Presenting report of Impact assessment

**Introduction:** This section includes the purpose of the report. It describes its scope

**Description of the Project:** brief details of the project, its objectives, need for the project, the project location, the schedule for implementation.

**Methods in Identifying Project Impacts:** Describe the methods used in conducting the assessment, both quantitative and qualitative.

**Project Impacts:** project impacts on different groups, both positive and negative. Also analyze and indicate in the report the Alignment of the project with Sustainable development Goals and level of achievement.

**Limitations of the Study:** Indicate any limitation of study if any.

**Findings and Recommendations:** an overall assessment of impacts. On the basis of the findings the Report should finally make its recommendation to the sponsoring authority. It should clearly state whether the project could proceed as it is, or proceed with some changes, or dropped completely.

**- Vinayak Kelkar**

**(CSR Mentor and Advisor)**

# ८.० सेवाव्रती

## ८.१ श्री. पंकज अशोक मिठभाकरे



श्री. पंकज मिठभाकरे हे 'अब नॉर्मल होम'चे संस्थापक आहेत. संस्थेच्या बाबत सकारात्मकता आणण्याच्या विचारापासून दिव्यांग मुलांमध्ये सकारात्मकता आणण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. दिव्यांग मुलांना सहसा 'ॲबनॉर्मल' म्हटलं जातं; त्यामधून दिव्यांग मुलापर्यंत फक्त नकारात्मकता पोहोचते. म्हणूनच संस्थेचे नाव 'अब नॉर्मल होम' ठेवले त्यामधील 'अब' हा हिंदी शब्द आहे ज्याचा अर्थ 'आता' असा होतो.

लहानपणापासूनच सामाजिक काम करण्याची ऊर्मी असल्याने त्यांनी मानसशास्त्र या विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेतले. तसेच जाणीवपूर्वक नाट्यशास्त्र ह्या विषयाचे पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्या शिक्षणाबरोबरच B.Ed. Special हे देखील शिक्षण, दिव्यांग क्षेत्रात काम करण्याची गरज ओळखून घेतले. मुलांबरोबर सर्जनशीलतेने, कला, खेळ आणि पंचेंद्रियांचा वापर करून शिकविणे, तसेच मानसिक प्रश्नातून बाहेर पडण्यासाठी मानसिक उपचार (Psychological Therapy) करणे हे काम पंकज मिठभाकरे २००८ पासून करत आहेत.

"मानवाचे अविकसित जीन्स विकसित करणे" ही प्रेरणा घेऊन अब नॉर्मल होमचे काम सुरु झाले. समाजातील अविकसित घटकांना विकसित करून समाजाच्या मुख्यप्रवाहात आणणे ह्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यानुसार पंकज मिठभाकरे यांनी काम करताना सर्वात प्रथम "वैयक्तिक अभ्यासक्रम आराखडा" तयार केला. दिव्यांग मुलांप्रती सह-अनुभूती (Empathy) काम करण्याच्या भूमिकेतून श्री. पंकज मिठभाकरे यांना प्रा. किशोरी पाठक यांनी साथ देण्याचे ठरविले. अशाच अनेक ध्येयवेड्या लोकांनी या कामात सहभागी होऊन एक छान सकारात्मक गट तयार झाला. दिव्यांग मुलांप्रती काम करण्याचे ध्येयच पुढे जाऊन् श्री. पंकज मिठभाकरे यांनी पाला सोलापूर जिल्ह प्रातक म्हणून जिल्हा दत्तक घेऊन तेथील दिव्यांग मुलांच्या पालकत्वाचे काम सुरु केले आहे. तसेच मानसशास्त्रातील मोठा अनुभव लक्षात घेऊन त्यांनी 'केली. Me within me' ही थेअरीदेखील तयार / विकसित केली.

Child Psychology (बाल मानसशास्त्र) ह्या विषयावरील प्रत्यक्ष कृतीयुक्त व्हिडिओज Youtube वर उपलब्ध आहेत. अगदी सहज-सोप्या भाषेत त्यांनी बाल मानसशास्त्र माध्यमातून सर्वांपर्यंत विनामूल्य पोहोचविण्यास सुरुवात केली आहे.

**OECD DAC Framework for Impact assessment:**

The impact assessment study normally uses the Organization for Economic Cooperation and Development (OECD) DAC framework for evaluating the impact of the CSR projects. The OECD DAC Network on Development Evaluation (EvalNet) has defined six evaluation criteria - Relevance, Coherence, Effectiveness, Efficiency, Impact and Sustainability for their use. These criteria provide a framework used to determine the merit or worth of an intervention. They serve as the basis upon which evaluative judgements are made.

- Relevance Is the intervention delivering the desired results?
- Coherence How well the intervention fits into the circumstances?
- Effectiveness Is the intervention able to achieve its objectives?
- Efficiency How effectively the resources are being used?
- Impact What difference does the intervention make in the life of people ?
- Sustainability Will the benefits last long for a considerable period of time?

The final report comprises of analysis of Findings against each of the evaluation criterion mentioned above.

**Theory of Change:**

Theory of change is an Outcome based approach. All the methods of the Impact assessment rely on a theory of change as a starting point. Every development program rests on a theory of how and why the program will work and lead to social impact. The theory of change will help you to clearly outline the inputs , outputs, key performance indicators , outcomes and impacts of the project. A theory of change formalizes this, representing how a program will use resources to conduct activities that can lead to changes in behavior and improvements in people's lives.

There are two steps in building a matrix

**1. Implementation Phase:** wherein a matrix is prepared and Key activities /initiatives are listed out and Output indicators are identified against each of the initiatives.

**2. Result phase:** wherein you identify and list out Outcome indicators and Impact Indicators.

Based on the above matrix the impact of the programme evaluated.

# ५.२ सौ. सुनिता लेले



## समाजसेवेच्या ध्यासातून नेत्ररुग्णालय

भारतात, २००२ मध्ये केलेल्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार १ अब्जाहून अधिक लोकांना काही ना काही अपंगत्व आहे, म्हणजे अंदाजे १०% लोकसंख्येला विशेष गरज आहेत; या अनुषंगाने साद- सपोर्ट ऑल एबल्ड डिफरंटली या संस्थेने पुढाकार घेतला. संस्थेच्या संस्थापिका सौ सुनीता लेले या स्वत: एक पालक असून, त्यांनी मुलांना येणाऱ्या अडचणी आणि आईवडिलांचे त्या सोडविताना होणारी तारांबळ त्यांनी स्वत: अनुभवली. नवीन पालकांना येणाऱ्या अडचणी व त्याचे निराकरण कसे करावे याचे उत्तम मार्गदर्शन त्या करतात. त्यांनी BSC(Child Development) आणि Diploma in Counselling केले आहे. सौ सुनीता लेले यांनी "ऑटिझम एक खिळट वाट ते वहिवाट" हे पुस्तक लिहिले असून त्यात ऑटिझम म्हणजे काय, लक्षणे, वर्गीकरण इत्यादी विषयाची सविस्तर माहिती दिली असून, त्यांना आलेले अनुभव त्याचे निराकरण, यशोगाथा इत्यादी गोष्टी त्यांनी या पुस्तकात दिल्या आहेत. हे पुस्तक हिंदी आणि मराठी भाषेत उपलब्ध असून ते पालकांना, शिक्षकांना खूपच मार्गदर्शक ठरले आहे.

सौ. सुनीता लेले यांना नारी शक्ती, सुपर हिरो असे सन्मान मिळाले असून रोटरी क्लब, सिम्बायोसिस इंटरनॅशनल, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था इत्यादी संस्थांनी दिव्यांग क्षेत्रातील त्यांच्या कामगिरी बद्दल पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

त्यांच्या स्वत:च्या मुलाला वाढविताना काय काय अडचणी येतात हे स्वत: अनुभवले आहे आणि त्याला शिकवण्यासाठी त्यांनी स्वतः विशेष मुलांना शिकविण्यासाठीचे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्याचा उपयोग त्यांनी स्वत:च्या मुलाला शिकविताना केला आहे. विशेष पद्धतीने मुलांना शिकविल्यावर त्याचा किती छान उपयोग होतो हे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी साद -सपोर्ट ऑल एबल्ड डिफरंटली ची स्थापना केली

साद- सपोर्ट ऑल एबल्ड डिफरंटली हि एक नोंदणीकृत धर्मादाय संस्था असून ती गेली २० वर्षे कोणत्याही सरकारी अनुदानाशिवाय मतिमंद, गतिमंद, आत्ममग्न, रेट्स सिंड्रोम, Fragil X सिन्ड्रोम, मेंदूचा पक्षाघात झालेल्या व्यक्ती, डाउन्स सिंड्रोम व्यक्ती, बहुविकलांग व्यक्तींना शिक्षण, प्रशिक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात एक सक्षम समाजउपयोगी व्यक्ती म्हणून आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

साद संस्थेची विशेष शाळा, कार्यशाळा, होम स्कूल आहेत तसेच Independent Living skills चे हि प्रशिक्षण दिले जाते, गतिमंद मुलांना NIOS तर्फे १० ,१२ पर्यंत शिकविले जाते. आजपर्यंत संस्थेने जवळ जवळ ३०० विशेष मुलांना प्रशिक्षित केले आहे.

विशेष गरज असणाऱ्या मुलांना /व्यक्तींना शिकविताना असे लक्ष्यात आले कि विशेष गरज असणारी मुले /व्यक्ती या संस्थेत ५ ते ६ तासच असतात, ती जास्त वेळ घरी म्हणजेच आपल्या पालकांच्या बरोबर असतात त्यामुळे जर पालक जर जागरूक असतील आणि प्रशिक्षित असतील, तर त्याचा लाभ नक्कीच त्यांच्या पाल्याला होणार आणि विशेष गरज असणारी त्यांची मुले हि जास्त जास्त प्रगती करू शकणार हे गोष्ट लक्ष्यात आल्यावर पालकांना प्रशिक्षण देण्याचेही काम सुरु केले आहे .

साद संस्थेची ध्येय खालील प्रमाणे आहेत

- मूल आणि कुटुंबाच्या सर्वांगीण विकासाठी काम,
- मुलांना शिकविताना पालकांनाही प्रशिक्षण देऊन सक्षम बनवणे,
- एकात्मिक शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी साद संस्था शाळेबरोबर काम करते,
- अक्षमता जास्त असणाऱ्या मुलांना दैनंदिन व्यावहारिक शिक्षण दिले जाते,
- पालकांना व सवगंसेवी संस्थांना निवासी प्रकल्प सुरु करण्यास मदत केली जाते,
- सोलापूर मध्ये पालकांची संघटना करून निवासी प्रकल्प सुरु करण्यास मदत केली जात आहे,
- पुरंदर तालुक्यात नुकतेच आत्ममग्न व्यक्तींसाठी निवासी प्रकल्प साद च्या मदतीने सुरु करण्यात आला आहे – ARC– Autism Research and Training center

भविष्य कालीन योजना

- जिल्हा, तालुका, गाव पातळीवर जनजागृती करणे,
- पालकांना आणि सहाय्यक शिक्षकांना प्रशिक्षण देणे,
- अधिक अधिक संस्थांना निवासी प्रकल्प सुरु करण्यासाठी मदत करणे,

| अनु.क्र. | विशेष |
|---|---|
| १८ | ट्रस्ट नोंदणी प्रमाणपत्र |
| १९ | विश्वासी कृत्य |
| २० | विश्वस्त तपशील संलग्न स्वरूपात. |
| २१ | ट्रस्टच्या मालकीची शाळा, रुग्णालय, संस्था यांचा तपशील (नाव, पत्ता, प्रभारीचे नाव, प्रभारीचा मोबाईल) |
| २२ | आर्थिक वर्ष २०२०-२१, २१-२२ आणि २२-२३ च्या पगाराचा तपशील - कर्मचाऱ्यांचे नाव, एकूण वार्षिक पगार, पीटी, पीएफ, टीडीएस (कापले असल्यास) |

कृपया 12A/80G नूतनीकरणाच्या सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रांच्या सूचीप्रमाणे तयार ठेवा आणि तुमच्या लेखा परीक्षकाशी (CA) संपर्क साधा.

आयकर सवलत आयुक्तांच्या आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन 2-3 सुनावणी होतील. ट्रस्टच्या उपक्रमांच्या सत्यतेबद्दल आणि संबंधित कागदपत्रांबद्दल समाधान केल्यानंतर नोंदणीचे प्रमाणपत्र जारी केले जाईल.

**- सौ. नेहा क्षीरसागर**

# ३.० संस्था संचालन

## Impact assessment of Social initiatives under CSR

**Concept:**

Impact assessment (IA) is a methodology to review the effects of development interventions. The essence of IA lies in the belief that effective impact measurement is an ongoing process. The main purpose of Impact assessment exercise is to measure the positive and negative impact in terms of the stated objectives and examine the gap between the intent and outcome of an intervention. It is also aimed to identify opportunities to enhance benefits for local communities through developmental initiatives.

On January 22, 2021, the Ministry of Corporate Affairs amended the earlier CSR Rules of 2014 and notified the Companies (Corporate Social Responsibility Policy) Amendment Rules 2021 to make impact assessment mandatory for companies undertaking CSR activities and CSR expenditure above a specified threshold. The move aims to create accurate parameters in assessing the impact of CSR activities by shifting the focus from expenditure alone to impact assessment, and improve the quality of CSR projects while enhancing accountability and transparency. According to the amendment, impact assessment is mandatory for companies with a CSR budget of INR 10 crore or more in any fiscal year and all projects with outlays of INR 1 crore or more. These impact assessments must be undertaken by an independent agency. This showcases a positive approach to moving beyond philanthropy and integrating the idea of 'shared value creation' among businesses in India.

However, it is suggested as best practice that impact assessment be undertaken for all projects as standard procedure especially long-term projects.

**Why Impact Assessment:**

Impact Assessments help the funding agencies and companies to understand and evaluate the impact of their social investments in CSR programmes and projects on their target beneficiaries or society.

Impact Assessment focuses on results instead of activities. It is undertaken to improve transparency and accountability. It identifies areas for improvement and enhanced performance orientation. It also helps in mitigating risks and foster long-term sustainability. The findings of an assessment also help in making evidence-based decisions in implementation and identify hurdles.

# ६.० सेवावार्ता – संस्थांसाठी महत्वाचे

## १२A किंवा ८०G नोंदणी संदर्भात महत्वाची सूचना

धर्मादाय आयुक्तालयांतर्गत नोंदणीकृत असलेले जे ट्रस्ट किंवा ज्या संस्था कलम 12AB अंतर्गत नोंदणीकृत आहेत; त्या सगळ्या संस्थांसाठी आणि ट्रस्ट साठी सरकारने नूतनीकरणाची अधिसूचना जारी केली आहे. ही अधिसूचना 12A तसेच 80G नोंदणींना लागू आहे.

म्हणून, AY 24-25 मध्ये आधीच कालबाह्य झालेल्या किंवा AY 2026-27 मध्ये कालबाह्य होणाऱ्या सर्व तात्पुरत्या नोंदणींचे 12A किंवा 80G चा लाभ मिळणे सुरू ठेवण्यासाठी नूतनीकरण करणे आवश्यक आहे. आयकर विभागाकडून नोटीस येण्यापूर्वी आपली पूर्वतयारी असणे आवश्यक आहे.

"नोटीस आल्यानंतर फक्त सात दिवसांची मुदत मिळते . त्या मुदतीत जर कागदपत्रांची पूर्तता झाली नाही तर आपली नोंदणी रद्द होऊ शकते."

त्यासाठी लागणारी कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | विशेष |
|---|---|
| १ | नवीनतम तात्पुरती 12A ऑर्डर |
| २ | नवीनतम तात्पुरती 80G ऑर्डर |
| ३ | जुना 12A नोंदणी आदेश |
| ४ | जुना 80G नोंदणी आदेश |
| ५ | उपक्रम - 2(15) |
| ६ | उपक्रम - 13(1)© |
| ७ | उपक्रम - 11 (5) |
| ८ | उपक्रम – कायद्यांचे पालन करणे |
| ९ | मालमत्तेच्या मालकीचा कागदपत्र - वीज बिल, कॉर्पोरेशन कर पावती |
| १० | सर्व विश्वस्तांची पॅन आणि आधार स्कॅन प्रत |
| ११ | देणगी यादी - आर्थिक वर्ष २०२०-२१, २१-२२ आणि २२-२३ - नाव, पत्ता, रक्कम, पावतीची पद्धत |
| १२ | सर्व बँक स्टेटमेंटची प्रत - आर्थिक वर्ष २०२०-२१, २१-२२ आणि २२-२३ |
| १३ | संलग्न नमुन्यात बँक तपशील |
| १४ | ट्रस्टने केलेल्या उपक्रमांची नोंद - (ट्रस्टचे पॅम्पलेट, पत्रिका इ.) |
| १५ | आयटीआर V आणि उत्पन्नाची गणना - आर्थिक वर्ष २०२०-२१, २१-२२ आणि २२-२३ |
| १६ | लेखापरीक्षण अहवाल आणि आर्थिक विवरण - आर्थिक वर्ष २०२०-२१, २१-२२ आणि २२-२३ |
| १७ | ट्रस्टच्या एकूण मिळकतीच्या तुलनेत वर्षानुसार धार्मिक क्रियाकलापांचा % |

सेवा तरंग 2.0

## संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह

श्री. विक्रम पंडित - कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर - प्रकल्प व्यवस्थापक

श्री. आमोद काटीकर - प्रकल्प अधिकारी

## विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी

**Considerations for Impact assessment:**

There are several factors which have to be kept in mind before undertaking the Impact assessment. The first and foremost is to have clarity about the purpose of the assessment. It is also essential to know the time and budget available to undertake assessment. Lastly it is essential to engage a competent team for the task.

Impact is about finding out change in behavior of human beings. It is not only seen, touched or heard but also felt. Therefore, it is essential to identify suitable parameters and measurement indicators for measuring the impact.

**Challenges faced while undertaking Impact assessment measurement:**

Following are the main challenges faced in Impact assessment study

- Lack of clarity on purpose and intended use of Impact assessment findings
- Non availability of Baseline data
- Lack of necessary expertise to conduct and evaluate findings
- Evaluating long term impact of initiative is time consuming and expensive

Similarly determining a direct impact of a particular initiative on a social outcome can be challenging as multiple factors contribute to the change.

Steps to be followed for undertaking Impact assessment

- Step 1. Prepare a results chain using theory of change
- Step 2: Define timeline and budget
- Step 3: Identify the evaluation team with desired expertise
- Step 4: Develop an evaluation plan (Covering objectives, parameters, indicators, design, sampling and data collection strategies for the evaluation)
- Step 5: Determine sample for evaluation . Define impact area. In addition, a field visit to the area needs to be undertaken to have a better understanding of the geographic limits of the area and the people living there. Choose a group of people i.e a sample that is big enough for the purposes of our evaluation. Involve all affected stakeholders. Share information and consult with all stakeholders. Stakeholders are people, groups, or institutions which are likely to be affected by a proposed intervention (either negatively or positively), or those which can affect the outcome of the intervention.
- Step 6: Develop Questionnaire. Before the survey, the questionnaire must be developed. The questionnaire is based on the outcomes and indicators previously developed.
    - The questionnaire should cover all aspects of socioeconomic situation (such as religion, caste, family size, education, skills, occupation and income).
    - The design of the questionnaire should focus on key issues, yet be simple and in the local language.
    - Persons selected to conduct the interviews should be properly briefed and trained to get the questionnaires completed.
    - The team conducting the interviews should include female members,
    - The quality of information generated dependent on following factors,

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी

# सेवा तरंग 2.0

# सेवा वार्ता

अंक ६

२०२३-२४

सेवावर्धिनी

नोंदणीकृत पत्ता : ३९०ब, नारायण पेठ, "दत्तधाम", राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०

कार्यालय: "चंदन" २६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ सावित्रीबाई फुले महिला एकात्मसमाज मंडळ

२.२ भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान

३. संस्था संचालन – निधी उभारणी व्यवस्थापन

४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – संसदीय संकुल विकास परियोजना (SSVP)

५. सेवाव्रती

५.१ श्री. सुदामकाका आणि सौ.सिंधुमामी भोंडवे

५.२ श्रीमती कांचन परुळेकर

६. सेवावार्ता – वार्षिक सर्वसाधारण सभा

# १. मनोगत

नमस्कार मंडळी.

सेवावार्ताचा सहावा अंक आपल्या समोर ठेवताना आपण एक वर्षाचा टप्पा गाठत आहोत. नेहमी प्रमाणे या अंकात दोन सेवा संस्था व दोन सेवाव्रती यांची कार्ये आपल्या समोर घेऊन येत आहोत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन वाढवलेली गुरुकुल संस्था, महिलांना स्वावलंबी बनवणारी स्वयंसिद्धा ही चळवळ, खेडोपाडीच्या कार्यातून सामाजिक समस्यांचे आर्थिक गणित सोडवणारी भगीरथ ही सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संस्था तसेच विविध क्षेत्रातील विकासाला प्राधान्य देणारी सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, या अशा सर्व ध्येयासक्त व आपल्या कार्याला जीवन वाहून घेणा-या व्यक्ति आणि त्यांनी बांधलेल्या संस्था यांनी समाजात आपल्या कार्यातून घडवलेला बदल पाहून आपल्याला अचंबीत व्हायला होते. विषय आणि अडचणी वेगवेगळ्या, पण कामावरील निष्ठा, हार न मानण्याची वृत्ती व सेवाधर्म या त्रिसूत्रीने किती प्रचंड कार्य उभारले जाऊ शकते याची खात्री आपल्याला पटेल.

सर्व सेवा संस्थांना भेडसावणारा नेहमीचा एक विषय म्हणजे निधी उभारणी व त्याचे व्यवस्थापन. आजचा अंक व त्यानंतर पुढील महिन्यात होणारे चर्चासत्र याद्वारे आपल्याला निधी उभारणीबाबत मार्गदर्शन होईल. सेवावार्ताचा हा सहावा अंकात आपल्या बरोबर संवाद साधण्याआधी,वर्षभरातील या आधीच्या पाच अंकांची मनात उजळणी झाली. आपण प्रकल्प लिखाण, सामाजिक संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन, सोशल मिडियाचा प्रभावी वापर आणि प्रकल्प मूल्यमापन या विषयांबाद्दल तज्ञांकडून माहिती घेतली. आपल्याला या माहितीचा उपयोग संस्थाचालनासाठी होईल याची आम्हाला खात्री वाटते. महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, विशेष मुले आणि त्यांचे प्रश्न, उद्योजकता, शेती आणि शेतीपूरक व्यवसाय अशा वेगवेगळ्या विषयात कार्य करणा-या व्यक्ती व संस्था याबद्दल या आधीच्या अंकातून आपण माहिती घेतली. ती आपल्याला स्फूर्तिदायक ठरेल.

सेवावार्ताचे अंक व त्यानंतर होणारे आपल्याला उपयोगी असे त्या-त्या अंकातील विशिष्ट विषयावरचे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे तज्ञांबरोबर होणारे संभाषण याद्वारे सेवावर्धिनीला संवाद साधता आला. त्या संवादाद्वारे संस्थांना भेडसावणारे प्रश्न आणि अडचणी यांची नव्याने जाणिव झाली. अनेक संस्थांबरोबर झालेली चर्चा व निर्माण झालेली जवळीक सेवावर्धिनीच्या पुढील वाटचालीसाठी उपयुक्त असेल.
सेवावर्धिनीच्या या सेवावार्ता उपक्रमात आपण सर्व सहभागी झालात याबद्दल सेवावर्धिनीतर्फे मी आपले आभार मानतो.पुढील महिन्यात होणा-या चर्चासत्रात पुन: भेटूच.
-एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ-

**- श्री. विक्रम पंडित**

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.१ सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ

८० च्या दशकात संभाजीनगरच्या वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या सात तरुणांनी एक स्वप्न पाहिलं सर्वसामान्यांना परवडणाऱ्या शुल्कात गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा देण्याचं! त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठानची आणि त्याच्या पहिल्या उपक्रमाची 'डॉ. हेडगेवार रुग्णालयाची' सुरुवात झाली. आपल्या देशात वैद्यकीय प्रश्नांमागे सामाजिक उपेक्षा, स्थलांतर, आर्थिकसमस्या, दारिद्र्य, व्यसनाधीनता, जागृतीचा अभाव अशी अनेक कारणं आहेत. त्यामुळे वैद्यकीय सुविधा देतानाच या अन्य कारणांवरती पण काम करण्याची तयारी प्रतिष्ठानने सुरु केली. यातूनच एका स्वतंत्र व आरोग्यापुरतं सीमित न राहता, विविध क्षेत्रांतील विकासाला प्राधान्य देणाऱ्या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. ती संस्थाम्हणजेच 'सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ'.

आज १२ जिल्ह्यांतील ९५० गावे आणि २ शहरातील ८० उपेक्षित वस्त्यांमधून संस्थेचे ८३ प्रकल्प चालतात. १० लक्ष बांधवांच्या जीवनाला स्पर्श करणारे हे काम आरोग्य, शिक्षण, महिला सबलीकरण, कौशल्य विकास, नैसर्गिक संसाधने विकास आणि शाश्वत विकास इ. आयामांद्वारे चालविले जात आहे. खेड्यांत असलेल्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांमुळे नव्वदच्या दशकात मोठ्या प्रमाणातस्थलांतरीत बांधव संभाजीनगर शहरात आले. मात्र यातील बहुतांश स्थलांतरीतांना संभाजीनगर शहरातील झोपडपट्टी-वस्त्यांत आश्रय घ्यावा लागला.मुलभूत सुविधांचा अभाव, अज्ञान, दारिद्र्य आणि असुरक्षित जीवन ह्या दुष्टचक्रात या वस्त्यांतील मंडळी कायम राहतात. आरोग्यासहित उपजीविकेचे आणि शिक्षणाचे अनेक प्रश्न पुन्हा-पुन्हा विक्राळ स्वरुपात उभे राहत. यावर आपल्यापरीने उत्तरे शोधण्यासाठी सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली व शहरी वस्त्यांतील आरोग्य केंद्रांच्या कामाला १९८९ ला सुरुवात झाली.

आज 'गुरुवर्य लहुजी साळवे आरोग्य केंद्र', 'संत रोहिदास आरोग्य केंद्र', 'संत गाडगेबाबा आरोग्य केंद्र' आणि 'श्री गुरुजी चलचिकित्सालयाद्वारे' ६७ शहरी उपेक्षित वस्त्यामध्ये दरवर्षी २.५० लाख रुग्णांसाठी उत्तम दर्जाची प्राथमिक आरोग्य सुविधा केवळ नाममात्र शुल्क आकारुन पुरविली जाते. ३ वर्षापासून जालना शहरातील सेवावस्त्या आणि शहराजवळची गावे यातूनही या कामाला सुरुवात झाली आहे. सोबत डॉ. हेडगेवार रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया, गर्भवती महिलांसाठी मोफत तपासण्या व उपचार, 'मधुमेह-हृदयविकार क्लिनिक' या उपक्रमांद्वारे वस्त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाऊ लागली. आरोग्याच्या सर्व विषयांवर लोकभागीदारी आणि प्रतिबंधात्मक आरोग्याचे नियोजनबद्ध प्रकल्प हे संस्थेचे वैशिष्ट्य.

१९९३ पासून संस्थेच्या ग्रामीण आरोग्य प्रकल्पाला सुरुवात झाली. सुरुवातीला तीन गावांतून सुरु झालेला 'संजीवनी ग्रामीण आरोग्य' हा प्रकल्प आज एक चळवळ बनला आहे. ९० गावांतून माता-बाल आरोग्याचे भरीव काम होत आहे. या सर्व दुर्गम गावांतून कुपोषणाचे प्रमाण ५२ टक्क्यांहून १७ टक्के इतके कमी झाले आहे. प्रशिक्षीत आरोग्य मित्रांच्या रुपाने गावात आरोग्य क्षेत्रात नवीन नेतृत्व उभे राहिले आहे.'केयर मदर किट', 'श्रुती' यासारख्या प्रगत टेलीमेडिसीन तंत्रांचा प्रभावी वापरही होतो आहे.शालेय आरोग्याचा 'उज्वल भारत' प्रकल्प हा देखील या मालिकेतील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प. गेल्या काही वर्षांपासून संस्थेच्या कामाचा विस्तार नंदुरबार जिल्ह्याच्या दुर्गम भागातही होत आहे. शिक्षण हा व्यक्ति-विकासाचा पाया आहे. विशेषत: शिशू शिक्षण १९९६ मध्ये सुरु झालेलासंस्थेचा 'ओंकार बालवाडी आणि बालशिक्षण संशोधन प्रकल्प' या क्षेत्रातील मैलाचा दगड म्हणून ओळखला जातो.

"A fertile soil alone does not carry agriculture to perfection" – Elias Hasket Derby

आनंददायी, निसर्ग-निगडित व संपूर्णतः अनौपचारिक बालशिक्षणाच्या ह्या प्रकल्पासाठी तितकाच वैशिष्ट्यपूर्ण परिसर संस्थेने उभारला आहे. विशेष मुलांच्या शिक्षणाला समर्पित 'विहंग विशेष मुलांची शाळा' देखील अल्पावधीतच समाजमान्य ठरली आहे. दिव्यांग मुलांसाठी हायड्रोलिक लिफ्ट असलेला स्विमींग पूल, ॲक्वा थेरपीची सोय व सेन्सरी गार्डन सारख्या अत्याधुनिक गोष्टींनी सुसज्ज अशा या विशेष मुलांच्या शाळेची नवी इमारत लवकरच साकार होत आहे. १९९० मध्ये 'विद्यार्थी विकास प्रकल्प' सुरु झाला. उपेक्षित वस्त्यांतील मुलांमध्ये असणारी बुद्धिमत्ता विकसित करणे आणि त्यांच्या पंखांना संधीच्या आकाशात भरारी मारण्यासाठी बळ देणे हे या प्रकल्पाने साध्य केले आहे. यातस्वतः शिकलेले अनेक तरुण पुन्हा आपल्या बांधवांसाठी स्वयंसेवक म्हणून वेळ देतात, हे विशेष. यावर्षीपासून आणखी ५ सेवावस्त्यांमध्ये 'सिद्धार्थ विद्यार्थी विकास प्रकल्पाच्या' रुपाने हे काम अजून पुढे जात आहे.

गेल्या दहा-बारा वर्षापासून शहरी वस्त्या आणि ग्रामीण किशोरींसाठी सुरु असलेला 'किशोरी विकास प्रकल्प' मुलीसाठी स्व-विकासाची संधी ठरला आहे. १०,००० किशोरींचा सहभाग, वेळीच थांबवलेले अनेक बालविवाह हजारो किशोरींना आत्मविश्वासाची शिदोरी देणारा ठरत आहे.शहरी वस्तीतील महिला हा सर्वात वंचित घटक. शिक्षण नाही, आर्थिक सामाजीक अधिकार नाहीत, अशा अवस्थेत अनेक प्रश्नांसहित वस्तीतील महिला जगतात. १९९० मध्ये महिलांच्या संघटनाचे काम सुरु झाले. आज 'तेजस्विनी महिला प्रकल्पाच्या' माध्यमातून शहरातील अनेक वस्त्यांतील ७००० गरीब महिला संघटित झाल्या आहेत. आर्थिक उत्पनाच्या शेकडो यशोगाथा या महिलांनी निर्माण केल्या आहेत. त्याहीपलीकडे जाऊन स्वतःच्या आरोग्याच्या, सामाजिक प्रश्नांच्या सोडवणूकीचे माध्यम म्हणून हे संघटन प्रभावीपणे काम करत आहे.

महिलांची आर्थिक वंचना, सामाजिक अधिकाराची जाणीव नसणे व कौटुंबिक स्वास्थ्य यात सकारात्मक बदल घडवून आणले गेले आहेत. ६००० ग्रामीण महिलांचे स्वतंत्र संघटन, आरोग्य आणि उपजीविकेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करत आहे. सर्व प्रश्नांच्या मुळाशी असलेल्या दारिद्र्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे सर्व प्रकल्प करत असतात. यात लक्षणीय भरारी मारली आहे ती, मंडळाच्या 'कौशल्य विकास' विभागाने. वस्त्यांतील अल्प किंवा अत्यल्प शिक्षीत महिला आणि तरुण मुलांसाठी घराजवळ, सहज पूर्ण करता येतील असे अल्प कालावधीचे आणि मुख्य म्हणजे मोफत किंवा नाममात्र शुल्कात कौशल्य प्रशिक्षणांची साखळी मंडळाने उभी केली आहे. ब्युटिशीयन, ईलेक्ट्रिशीयन, टेलरिंग, केटरिंग, संगणक प्रशिक्षण, रुग्ण-सहायक या कोर्सेसमधून दरवर्षी २५०० गरजूंना रोजगार स्वयंरोजगार मिळतो. या विद्यार्थ्यांसाठी संस्था उद्योजकतेच्या खास प्रशिक्षणापासून ते थेट बीजभांडवल उपलब्ध करुन देण्यापर्यंत सर्व मदत करते.

शहरातील विविध व्यवसायातील १०० हून अधिक नामवंत या कोर्सेस सोबत जोडले गेले आहेत. या वर्षीपर्यंत १५,००० हून अधिक महिला व युवकांना कौशल्य प्रशिक्षण दिले गेले आहे आणि त्यांपैकी ८००० जण दरमहा किमान ५००० रुपये उत्पन्न त्याद्वारे मिळवत आहेत, हे विशेष. २०२२ मध्ये जालना शहरातही कौशल्य प्रशिक्षणाचे काम सुरु झाले असून छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, परभणी जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातही या विषयातील काम पुढे जात आहे.ग्रामीण आरोग्याचे काम करतानाच, शेतीची दुरावस्था आणि त्यापायी होणारी कोंडी लक्षात येत होती. त्यामुळे कृषि-विस्तार कार्यक्रम हाती घेतले गेले. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी यशस्वी प्रयोग झाले. हळुहळू या विषयांचे अनेक आयाम सुरु झाले. तसेच 'जन-जल-जंगल-जमीन-जानवर' या ५ 'ज-कारांच्या यशस्वी व्यवस्थापनातून सगळ्या प्रश्नांच्या सोडवणूकीला मदत होते हेही लक्षात आले. आज सात जिल्ह्यातील १०,००० शेतकऱ्यांसोबत सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ काम करते आहे.

मराठवाडा दुष्काळाचा शाप घेऊन वावरणारा. सततचं जलसंकट डोक्यावर. त्यातून मार्ग काढण्याचे प्रयत्न २०१२-१३ मध्ये सुरु झाले. उपलब्ध जलस्रोतांचा विकास, माथा- ते- पायथा शास्त्रोक्त जलसंधारण हे विषय हाताळल्याने आज ऐंशीपेक्षा अधिक गावांच्या दुष्काळाच्या झळा कमी झाल्या आहेत. २०१२ मध्ये जवळ-जवळ उजाड झालेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दोन दुष्काळग्रस्त गावांचं उदाहरण बोलकं आहे. स्वतःच्या मुलांप्रमाणे वाढवलेल्या फळबागा दुष्काळामुळे शेतकऱ्यांनी स्वतःच्या हातांनी तोडल्या, गेली सहा वर्षे मंडळ तेथील शेतकऱ्यांसोबत सातत्याने काम करीत आहे. परिणामी दुष्काळ असूनसुद्धा चारशे एकरवर डाळिंब बागा फुलल्या आहेत.





वस्त्यांतून त्यांच्या घरी सुग्रास भोजनोचे डबे निःशुल्क पोहचवले जातात. या उपक्रमाचाही लवकरच विस्तार होत आहे. २०२२ च्या सुरुवातीला संस्थेच्या कम्युनिटी रेडिओचे प्रक्षेपण सुरु झाले. रेडिओ देवगिरी (९१.२ एफ एम) या नावाने हा रेडिओ अल्पावधीतच लोकप्रिय झाला आहे. आता मोबाईल App च्या माध्यमातुन संपुर्ण जगात रेडिओ ऐकता येतो. जलसमृद्धीतून सुरु झालेली शेतकरी बांधवांसाठीची कार्यमालिका आता अधिकच मजबूत झाली आहे. १०००० हून अधिक छोट्या शेतकऱ्यांचे संघटन उभे राहिले आहे. ८ जिल्ह्यांत ३२ शेतकरी उत्पादक कंपन्या सावित्रीबाई फुले एकात्म समाज मंडळातर्फे तयार झाल्या आहेत. त्यांची विविध शेतीपूरक उद्योगांतून वार्षिक उलाढाल १०० कोटींपेक्षा अधिक होत आहे. सोलर ड्रायर्स, मुंबा धान्य खरेदी केंद्र शृंखला आणि अद्रक, भाजी-पाला यांचा घाऊक व्यापार आदींमध्ये मंडळाच्या कंपन्यांनी मोठे यश मिळविले आहे.

काळाची पावले ओळखून कृषिविस्तार उपक्रमांबरोबरच मंडळाने कृषि विपणन क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. नाबार्डबरोबर शेतकऱ्यांच्या ३२ उत्पादक कंपन्या झाल्या आहेत आणि अजून काही निर्माणाधीन आहेत. याद्वारे हजारो छोटे शेतकरी आत्मनिर्भर होत आहेत. नाबार्डचे अध्यक्ष डॉ. जी. चिंताला यांनी फेब्रुवारी २०२१ मधील सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाच्या जलसंधारण आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना दिलेली भेट प्रेरक ठरली. डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या कामाचा विस्तार झालेले सावित्रीबाई फुले मंडळ आज महाराष्ट्रातील अग्रगण्य सेवाभावी संस्था म्हणून सुपरिचीत झाले आहे.

अखिल भारतीय पातळीवरचा 'श्रीगुरुजी सेवा पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'फुले-शाहू-आंबेडकर समाज प्रबोधन पुरस्कार' आदि पुरस्कारांनी संस्थेचा गौरव करण्यात आला. गुणवत्तेच्या आग्रहामुळेच संस्थेने २०१८ मध्ये पहिल्यांदा ISO मानांकन मिळविले आहे. अनेक कंपन्यांनी त्यांचे सीएसआर प्रकल्प राबवण्यासाठी संस्थेची निवड केली आहे. विविध क्षेत्रांतील तज्ञ आणि स्वयंसेवी कार्यकर्ते यांच्या बरोबरीने संस्थेच्या यशस्वी वाटचालीत योगदान आहे ते कार्यक्षेत्रातील बंधु-भगिनींचे. त्यामुळेच 'आमच्यासाठी काम करणारी संस्था'नव्हे, तर 'आमच्याबरोबर काम करणारी संस्था'अशीसंस्थेची कार्य क्षेत्रातील ओळख आहे.

समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करत अनेकांना जोडणे हे सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे वैशिष्ट्य. संस्थेच्या कामाची समग्र माहिती आता **www.spmesmandal.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**- डॉ. प्रसन्न पाटील**

Farming looks might easy when your plow is a pencil and you are thousands miles away from the field – Pres. Dwight D. Eisenhower

# २.२ भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रु.२,६०,३०४/ - एवढे आहे अशी बातमी दै. लोकमतमधील आहे. तर मुंबई शहराचे दरडोई उत्पन्न रु. ४ लाख एवढे आहे. अशी ढोबळ आकडेवारी आहे. खर तर सांखिकीमधील सर्वच आकडे ५० % सत्य सांगत असतात. म्हणजे माझ्या गावातील एखादा डॉक्टर महिन्याला रु. १ लाख कमवतो व गावातील शेतकरी रु. १५,०००/ - कमवतो. तर,१,००,००० + १५,०००/ - म्हणजे सरासरी रु. ५७,५००/ - असा एकूण आकडा येतो. याचा अर्थ असं होत नाही, की शेतकऱ्याचे उत्पन्न रु. ५७,५००/ - एवढे आहे. आपण जेव्हा आकडेवारीचा खेळ करतो तेव्हा ही समस्या येते. असं म्हणतात, की गणिताला मन नसतं आणि सामाजिक कामाला गणित नसतं. 'भगीरथ'चे काम म्हणजे मन आणि आकडे या साऱ्याची गोळाबेरीज आहे. हे कोडे आम्ही गेली २५ वर्षे सोडवत आहोत. सुटते असे वाटते तेव्हा नवीनच कुठची तरी समस्या आलेली असते. लहानपणी आपण सर्वांनीच रुबिक क्युब खेळताना वापरला असेल. ६ बाजूंचे रंग कमीत कमी वेळात जुळवण हे सर्वांनाच शक्य होत नाही. सर्वांगीण ग्रामीण विकास हा या क्यूब सारखाच आहे. फरक एवढाच की, या प्रक्रियेमध्ये माणसे, त्यांचे विविध स्वभाव, गुण-दोष या साऱ्याची सांगड घालणे सोपे नसते. रुबिक क्यूब म्हणे २२ सेकंदात सोडवणारे लोक आहेत. सामाजिक समस्या ह्या वर्षानुवर्ष चालत आल्या असल्यामुळे त्या पटकन सुटत नाहीत. पण प्रयत्नांती सुटतात. आमच्या संस्थेचे नाव तर 'भगीरथ' आहे.

महात्मा गांधी, विनोबा भावे, के. सी. कुमारप्पा, आपासाहेब पटवर्धन, नानाजी देशमुख, पोपटराव पवार, अण्णा हजारे या साऱ्यांच्या अनुभवातून गावे विकसित झाली पाहिजेत हा संदेश आपणा सगळ्यांना मिळतो. विकास म्हणजे पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते, वीज हा ढोबळ पॅटर्न तेवढा उपयोगाचा नाही. खरे तर ही गुळगुळीत झालेली राजकरणी लोकांची नाणी आहेत. दर ५ वर्षांनी भाषणे ऐकताना मी पण ऐकायचो. लोक टाळ्या वाजवतात, निवडून येण्यासाठी पैसे व निवडून आल्यावर गुलाल उधळले जातात. अधिक पैसे असतील तर JCB मधून फुले ही उधळली जातात. लोकशाहीच्या मंदिरामध्ये हे सर्व पाहताना मन विषण्ण व्हायचे. सामान्य मनुष्य या साऱ्या प्रक्रियेमध्ये कुठे असतो? तो एक दिवसाचा राजा असतो. 'शेतकरी होईल पुन्हा राजा गावचा पोशिंदा ऐका त्याची गोष्ट' हे शाहीरी थाटामध्ये गाण ऐकताना उर भरुन आल्यासारखे वाटते. वास्तविकता खूपच वेगळी आहे. 'भगीरथ' ही वास्तविकता शोधायचा प्रयत्न करते, त्याला उत्तर देण्याचा प्रयत्न करते.

### बायोगॅस:

काही दिवसापूर्वी HERO HONDA गाडीवरुन LPG चा सिलिंडर घेऊन जाणारा एक शेतकरी मला भेटला होता. उज्ज्वला गॅसचे नवीन कनेक्शन त्याला मिळाले होते, त्यामुळे गडी जरा खुश होता. आता घरातील बाईचे कष्ट थोडे कमी होतील, घरातील धूर कमी होईल, भांडी काळी होणार नाहीत. असे काही-काही तो सांगत होता. अशावेळी त्याचे ऐकून घेणे ही गरजेचे असते. पुन्हा ४-५ महिन्यांनी तो मला भेटला. कोणत्या तरी पाहुण्याकडे गेले असताना तेथे त्याने बायोगॅस पाहिला होता. तो बायोगॅस 'भगीरथ'च्या गवंड्यांनी बांधला होताआणि बाजूला नवीन बायोगॅस बांधण्याचे काम आमचे गवंडी करत होते. दोन जनावरांचे शेण व मलमुत्र टाकून पूर्ण स्वयंपाक होतो. पाहिल्यावर त्यालाही असे वाटले, की अरे आपणही का बायोगॅस बांधू नये? तेथे जाऊन त्यांनी पूर्ण माहिती घेतली. LPG पेक्षाही हे बरे आणि परवडणारे असून, याला सरकारचे अनुदानही चांगले आहे. त्यांनीही बायोगॅस बांधायचा ठरवला. त्यासाठी ते 'भगीरथ'ला पुन्हा भेटण्यासाठी आले होते. हे झाले प्रातिनिधिक उदाहरण.



आतापर्यंत 'भगीरथ'ने ९५०० बायोगॅस बांधले आहेत. ९५०० x रु. ११००/ - x १२ = रु. १२,५४,००,०००/ -देशाची एवढी रक्कम आम्ही दरवर्षी वाचविली आहे.

कारण LPG आपल्या देशामध्ये तयार होत नाही. ८०% LPG हा आपल्याला आयात करावा लागतो. भगीरथ प्रयत्नामुळे धुरमुक्त गाव व जिल्हा ही लोकचळवळ होत आहे.

एका गावामध्ये ५ वर्षे काम करून तेथे त्यांची व्यवस्था निर्माण करून मग दुसऱ्या गावात जायचे. एकाच गावात अडकून रहायचे नाही ही 'भगीरथ'ची कार्यपद्धती आहे. गेली २५ वर्षे असाच दिनक्रम सुरु आहे. आमच्या कार्यालयाचा पत्ता मु. पो. झाराप (भावई मंदिरशेजारी), ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग हा गुगल लोकेशनलाही आहे. गुगल जगाचे भान देते, तर मंदिराचा कळस प्रेरणा देतो. आम्ही गावाचा सर्व्हे करतो, पाणी, जनावरे, ओलिताखालील जमीन, पंप, दुध संकलन केंद्र किती, असे साधे सोपे प्रश्न आम्ही गावातील लोकांना विचारतो आणि त्याची माहिती जमा झाली की, गावाच्या विकासाचा आराखडा गावातील लोकचं तयार करतात. गावाचा क्रेडीट मॅप तयार होतो. 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हे वाक्य सर्वार्थाने ग्रामविकासाच्या बाबतीमध्ये खरे आहे. त्यांना केवळ मार्गदर्शनाची गरज असते. पैसे लागतात, पण पैसे हे सर्वस्व नाही. कुणीतरी योग्य वाट दाखवणारा वाटाड्या लागतो.

'भगीरथ' हे वाटाड्याचे काम करते. देवगड तालुक्यातील कुणकवण या गावामध्ये कुर्ली-सातंडी नावाचे धरण झाले आहे. धरण खाली व गावं वरती अशी परिस्थिती होती. श्रीधर (अण्णा) तावडे ग्रामविकास संस्था व भगीरथ यांच्या माध्यमातून तेथे १५ HP चा पंप व १० किमी लांबीच्या पाईपलाईनचे काम करण्यात आले. आज १०० शेतकरी या पाण्याचा वापर करत आहेत. पण हे सर्व करायला २ वर्ष लागली. या कामासाठी गावातील लोकांनी १०% लोकवर्गणी जमा केली होती. आज पाणी, कुणी, किती, कधी, कशासाठी वापरायचे, पाणी पट्टी किती असावी या साऱ्याचा ताळेबंद गावातील लोक करत आहेत. श्री. सचिन राणे, श्री. रुपेश राऊत, श्री. अवधूत राणे, श्री. जितेंद्र राणे हे सर्व कारभार सांभाळतात. आता 'भगीरथ'ला लक्ष द्यावे लागत नाही. मा. श्री. विनोदजी तावडे यांचे कुणकवण हे जन्मगाव आहे.

### कुक्कुटपालन:

गाव म्हणजे गाई-गुरे, कोंबडी, कुत्री, शेळी, मांजर, माकडे, नदी, जंगल हे सारेच आले. यातील कोंबडीपालन हे 'भगीरथ'च्या अभ्यासाचा विषय आहे. FCR म्हणजे Feed Conversion Ratio. अगदी सोपे करून सांगायचे झाले तर १ किलो वजनाची कोंबडी तयार होण्यासाठी किती किलो खाद्य लागते ते म्हणजे हे FCR गुणोत्तर असते. एखाद्या कोंबडीच्या जातीला २ किलो, तर एखाद्या कोंबडीच्या जातीला १८०० ग्रॅम खाद्य लागेल. ज्या कोंबडीच्या जातीला १८०० ग्रॅम खाद्य लागले ती जात निवडली पाहिजे. कारण यातून उत्पादन खर्च कमी होईल. यासाठी 'भगीरथ'ने कावेरी जातीच्या कोंबडीची निवड केली आहे. आतापर्यंत कुक्कुटपालनाची एकूण ५५ प्रशिक्षणे होऊन २७५ गावांमध्ये २१,७४० कोंबडी पिल्ले वितरण केली आहेत. छोटी पिल्ले न देता, १ महिना वाढविलेली पिल्ले दिली जातात. यासाठी 'भगीरथ'ने अंडी उबवणूक केंद्रे ही सुरु केली आहेत. तसेच काही ब्रुडिंग सेंटर आहेत. भगीरथ ३ दिवसाचे कुक्कुटपालन प्रशिक्षण देते. या प्रशिक्षणामध्ये श्री. मधुसूदन कांदे, श्री. मनोहर ठिकार, श्री. मनोज परब, श्री. रत्नकांत चव्हाण, डॉ. संतोष कुडतरकर हे मार्गदर्शन करण्याचे काम करतात. लस, औषधे, सामान्य आजार कोणते हे सर्व जाणून घेण्याची गरज असते.



कोंबडी घर म्हणजे कोंबडीचा घुड. स्थानिक लोकांच्या गरजा ओळखून स्थानिक फॅब्रिकेशन यांच्याकडून हा घुड बनवून घेतला जातो. मुंगुस हा कोंबडीचा सर्वात मोठा शत्रू आहे. जर घुड मजबूत नसेल तर मुंगुस एका दिवसामध्ये सर्व कोंबडी खाऊन टाकते. या घुडाची किंमत रु. ६,५००/– एवढी असून ५०% अनुदानावर हा घुड १०० ते २०० महिलांना परसबागेतील कुक्कुपालन योजनेतून दिला जाणार आहे. आपण गावामध्ये जाऊन कुक्कुटपालनाचे प्रात्यक्षिक करतो. साऱ्याच लोकांना आपण घुड देऊ शकणार नाही आणि साऱ्या जगाचे प्रश्न स्वयंसेवी संस्था सोडवेल असा आमचा आविर्भावही नाही व तसा असूही नये. आपले काम असते दिशा दर्शनाचे. एखादा घुड बघून अनेक शेतकऱ्यांना असे वाटू शकते की, मी पण रु. ६,५००/– खर्च करून घुड घेऊ शकतो. प्रिसिजन फाउंडेशन, सोलापूर यांनी यासाठी आम्हाला रु. ४,९०,०००/– CSR निधी दिला आहे.

## दुग्धव्यवसाय:

गेल्या महिन्यात निवजे गावातील श्री. अभय परब, श्री. विठ्ठल शिरसाट, श्री. अवधूत देवधर कोल्हापूर येथील मुदाळ या गावात जाऊन आले. Milking मशीनचा अभ्यास करणे हा या भेटीचा हेतू होता. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अशाप्रकारचे मशीन पहिल्यांदाच बसविले जात होते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये हे मशीन नवीन नाही. हे मशीन श्री. अभय परब यांच्या घरी बसविण्यात आले. २ ते ४ दिवस ही मशीन हाताळण्यासाठी लागले. श्री. अभय परब हे आपल्या १२ ते १५ या सर्व म्हशींचे दुध Milking मशीनच्या सहाय्याने काढत आहे. अण्णासाहेब पाटील योजेतून रु. १० लाखाचे कर्ज म्हशी घेण्यासाठी त्यांना मिळाले होते. पुढील २ ते ३ वर्षामध्ये त्यांचे हे कर्ज भरून पूर्ण होईल. या कर्जाचे व्याज सरकार भरणार आहे. असे शेकडो अभय परब भगीरथच्या मार्गदर्शनाखाली तयार झाले आहेत. या सर्वांना लढण्याचे बळ आपण दिले आहे. आज अभय परब हे महिन्याकाठी रु. ३० ते ४० हजार कमवत आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा मध्य. सहकारी बँकेने दुध व्यवसायासाठी १० कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांना दिले आहे. जिल्हा बँक व भगीरथ यांचा यासाठी MOU केला आहे. प्रति दिवस १ लाख लिटर दुध जमा करण्याचा पंचवार्षिक आराखडा आहे. सध्या संघटीत क्षेत्रामध्ये दुध संकलन केंद्रांच्या माध्यामतून गोकुळला ३० हजार लिटर, तर असंघटीत क्षेत्र म्हणजे गवळी दुध जमा करुन शहराच्या ठिकाणी जाऊन विकत आहेत. ५ लिटर दुध जेव्हा गावातून बाहेर जाते. तेव्हा एका बेरोजगार युवकाला काम मिळते. शहरात जाऊन कोणाची तरी नोकरी करण्यापेक्षा गड्या अपुला गावं बरा असे म्हणणारे युवक गावात तयार होत आहेत.





**शाळा:**

आतापर्यंत शंभरहून अधिक शाळा 'भगीरथ'ने डिजिटल केल्या आहेत. यासाठी २५% लोकवर्गणी शाळा जमवते व उर्वरित रक्कम भगीरथ देते. एका Interactive Digital Screen Board ची किंमत रु. १,२५,०००/- एवढी असते. मागील २ वर्षांत एकूण १८ मोठ्या हायस्कूलना हा बोर्ड दिला आहे. इंटरनेटचे कनेक्शन जोडल्यानंतर एका क्लिकवर सारे जग माहिती देण्यासाठी हजर आहे. विज्ञान आश्रमाचे डॉ. कलबाग यांनी केलेला IBT चा प्रयोग आम्ही १८ शाळांमध्ये करत आहोत. Cause to connect पुणे येथील संस्था आमच्यासोबत आहे. श्री अनिरुद्ध बनसोड हे या संस्थेचे प्रमुख आहेत. नुसती हुशारी उपयोगी नाही तर शाळेत शिक्षण घेत असताना कोणते तरी कौशल्य त्या विद्यार्थ्याला आले पाहिजे असा आमचा हेतू आहे.

गावगप्पा करुन या सर्व गोष्टी होत नाहीत, तर यासाठी पैसे लागतात. गेल्या २५ वर्षामध्ये भगीरथ प्रतिष्ठानला रु. ११ कोटीहून अधिक देणगी मिळाली आहे. आम्ही कधीही पैसे मागितले नाहीत किंवा पैसे मागत फिरलो नाही. आम्ही आमचे काम करत गेलो. तुमचे काम प्रामाणिक, खणखणीत वाजणारे असेल तर देणगीदार तुमच्यापर्यंत पोहोचतात हा गेल्या २५ वर्षांचा अनुभव आहे. विविध प्रकारच्या कंपनी व संस्थांकडून भगीरथला CSR निधी मिळाला आहे. यामध्ये वात्सल्य ट्रस्ट, प्रिसिजन फाउंडेशन, Tesa Tapes (I) Pvt. Ltd., भारत गिअर्स, MNGL, प्राज फाउंडेशन, SGP, Metrohm Pvt. Ltd., IRCON, BPCL, UNDP यांचा समावेश आहे. लेखाला मर्यादा आहेत.

हल्ली पुणे येथील चितळे उद्योगाची टीव्हीवर जाहिरात येते 'आणा आणि खा'. भगीरथचे म्हणणे ही तेच आहे. आमच्याकडे या आणि आमचे काम पहा. आम्ही विरजण लावायला शिकवू. साऱ्या प्रकल्पाचे SOP तयार केले आहे. त्या त्या विषयाची प्रशिक्षण आम्ही देतो. हे सारे करण्यासाठी भगीरथ कार्यालयची जागा आपल्या स्वागतासाठी तयार आहे. सकाळी १० ते ६ यावेळेत कार्यालय सुरु असून दर रविवारी सुट्टी असते. आपणाला हे वाचून असे वाटेल की खूप कर्मचारी संस्थेमध्ये कामाला असतील तर तसे नाही. एकूण ४ कर्मचारी संस्थेचा हा गाडा सांभाळत आहेत.

४० ते ५० जण निवासी राहतील अशी व्यवस्था भगीरथ प्रतिष्ठानमध्ये आहे. संस्थेची कामे फिरुन पाहण्यासाठी आम्ही गाईड देतो. सर्व पाहण्यासाठी नक्की या आम्ही वाट पाहतो. लहानपणी आम्ही ऐकायचो कोकणची अर्थव्यवस्था ही मनीऑर्डरची आहे. आम्हांला हे सारे बदलायचे आहे. मुंबई एवढे नाही तर त्यापेक्षाही अधिक दरडोई उत्पन्न कोकणामध्ये थांबून मिळवता येते हा आमचा ध्यास आहे आणि हे सर्व जर करायचे झाले तर 'भगीरथ'च नाव का ठेवले याचा उलगडा आपणा सर्वांना होईल. तुम्ही आमच्या संस्थेला भेट द्यायला नक्की या. आम्ही वाट पाहतो.





**– डॉ. प्रसाद वामन देवधर**
**अध्यक्ष, भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान**
**संपर्क क्र. ९४२२८९६८००**

Farming isn't something that can be taught. Each plant tells its own story that has to be read repeatedly – Kelsey Timmerman

# ३. सेवा संचलन: निधी उभारणी व्यवस्थापन

निधी उभारणे ही कोणत्याही सामाजिक, शैक्षणिक किंवा गैर-नफा संस्थेच्या यशस्वीतेसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. यामुळे संस्थेला आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक संसाधने मिळतात. निधी उभारणीच्या प्रक्रियेत विविध दातृ समूहांशी संवाद साधून त्यांच्याकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करणे समाविष्ट- आहे. ह्या बरोबरच समाजातील विविध घटकांना ह्या कार्याची ओळख करून देणे आणि पारदर्शी व्यवहारातून त्यांना कार्याशी जोडणे, त्यासाठी निधी उभारण्याची प्रेरणा देणे तसेच उपलब्ध निधीचा योग्य विनियोग करणे व त्याचा हिशोब, ताळेबंद चोख ठेवणे असे अनेक आयाम आहेत.

### निधी उभारणीची उद्दिष्टे:

निधी उभारणीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, संस्थेच्या विविध प्रकल्पांसाठी आवश्यक आर्थिक सहाय्य मिळविणे. ह्यासाठी संस्थेची नित्य आणि नैमित्तिक, तसेच कायम स्वरुपी निधीची आवश्यकता निश्चित करणे आवश्यक आहे. वार्षिक, पंचवार्षिक योजनांचा आराखडा बनविणे आणि त्यानुसार निधीचे अंदाजपत्रक तयार करणे उपयोगी ठरते. हे सहाय्य विविध सामाजिक उपक्रमांसाठी, शैक्षणिक कार्यक्रमांसाठी, संशोधन प्रकल्पांसाठी किंवा इतर विकास कामांसाठी वापरले जाते. याशिवाय, निधी उभारणीमुळे संस्थेला त्यांची ओळख वाढवण्यास, लोकांपर्यंत पोहोचण्यास आणि त्यांचे उद्दिष्टे साध्य करण्यास मदत होते. आपण दिलेला निधी नेमका कसा उपयोगात आणला गेला आणि त्यातून काय साध्य झाले, हे देणगीदारांपर्यंत योग्य प्रकारे कळविणे हेही ह्या प्रक्रियेचा महत्वाचा भाग आहे.

### विविध दातृ समूह:

निधी उभारणी किंवा निधी संकलन करताना संस्थेसाठी देणगी देऊ शकतील अशा विविध गटांचा विचार करणे आवश्यक आहे. संस्थेने अशा सर्व प्रकारच्या दात्यांकडून निधी कसा मिळवावा ह्याकरिता वेगवेगळ्या योजना तयार केल्या पाहिजेत. तसेच संस्था एकाच दात्यावर किंवा एकाच गटावर अवलंबून राहणार नाही ह्याची देखील काळजी घेतली पाहिजे.

### वैयक्तिक दाते:

असे देणगीदार जे त्यांच्या वैयक्तिक कारणांसाठी किंवा संस्थेच्या उद्दिष्टांशी सहमत असल्यामुळे आर्थिक सहाय्य देतात. त्यांच्याशी व्यक्तिगत पातळीवर संवाद साधणे आणि त्यांचे विश्वास संपादन करणे महत्वाचे आहे. ह्यामध्ये HNI (High Networth Iindividuals) दात्यांप्रमाणेच सातत्याने दर महिना/वर्ष रक्कम देणारे, काही विशिष्ट दिवशी देणारे असे विविध दाते असतात. वैयक्तिक देणगीदार विशेषत: देणगीतून घडलेल्या यशोगाथा ऐकण्यास उत्सुक असतात आणि अशी माहिती त्यांना अधिक दान करण्यास प्रोत्साहित करते.

### कंपन्या आणि उद्योग:

असे व्यवसाय जे सामाजिक उत्तरदायित्व म्हणून (CSR) त्यांच्या नफ्यातील दोन टक्के निधी सामाजिक कार्यासाठी देतात. या समूहाशी व्यावसायिक संबंध निर्माण करणे आणि त्यांच्या CSR धोरणाशी सुसंगत प्रकल्पांची ओळख करून देणे आवश्यक आहे. ह्याकरिता सरकारच्या CSR वेबसाईटचा तसेच कंपनी वेबसाईटचा अभ्यास करणे, आपला प्रकल्प प्रस्ताव लिहिणे, Logical Framework Analysis (LFA) लिहिणे प्रकल्पातील फिल्ड वर काम करणाऱ्या संचाला सोबत घेऊन त्यातील निधीचे सविस्तर मागणी पत्रक बनविणे आवश्यक ठरते.

### फाउंडेशन्स आणि ट्रस्ट्स:

हे विशिष्ट उद्दिष्टांसाठी निधी उपलब्ध करतात. त्यांच्या धोरणांचा अभ्यास करून त्यानुसार प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. ह्यामध्ये कौटुंबिक ट्रस्ट, धार्मिक ट्रस्ट ह्यांचा समावेश होतो. तसेच देश विदेशातील फाउंडेशन्स, देणगी देणाऱ्या एजन्सी ह्यांचा समावेश होतो. वरील सर्व प्रकारच्या गटांसाठी संस्थेचे हिशोब, सरकारी कागदपत्रे, परवानगी जसे 12AA, 80G, FCRA हे अद्ययावत असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देणगीदारांना अत्यंत सहज सोप्या पद्धतीने देणगी देता यावी, निधीची योग्य पावती मिळावी आणि आयकर कार्यालयाकडील त्याची नोंद व्हावी ही सर्व प्रक्रिया संस्थेने अत्यंत नेटकी ठेवणे तितकेच गरजचे आहे.

## निधी उभारण्यासाठी विविध पद्धती

### व्यक्तिगत बैठक:

वैयक्तिक दात्यांशी थेट भेटून त्यांना आपल्या प्रकल्पांची माहिती देणे, त्यांची प्रकल्प/ संस्था भेट घडविणे करता येईल, तसेच त्यांचा प्रत्यक्ष कामात सहभाग घेऊन त्यानंतर त्यांचे सहाय्य मिळवणे शक्य होईल.

### आयोजन :

विविध निधी उभारणीच्या कार्यक्रमांचे आयोजन करून लोकांच्या सहभागातून आर्थिक सहाय्य मिळवणे. ह्यामध्ये संस्थेचा वार्षिक दिवस साजरा करणे, एखादा नाटक, संगीत कार्यक्रम करणे, आपल्या सेवित जनासोबत सहलीचे आयोजन करणे असे उपक्रम उपयोगी पडतील.

### पत्रव्यवहार आणि ईमेल मोहिम:

दात्यांना पत्रे किंवा ईमेल पाठवून त्यांच्या सहाय्याची विनंती करणे. ह्या वेळी आपल्या कार्याच्या यशोगाथा आणि छोटा अहवाल पाठविणे आवश्यक आहे. ह्याकरिता संस्थेने आपल्या संपर्कातून तयार झालेला इमेल database तयार करणे गरजेचे आहे.

### ऑनलाईन मार्केटिंग मोहिम:

आजच्या डिजिटल युगात ऑनलाईन मार्केटिंग मोहिमांच्या माध्यमातून निधी उभारणे खूप प्रभावी ठरु शकते. यासाठी विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा वापर करुन संस्थेच्या उद्दिष्टांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली जाते. फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर यांसारख्या प्लॅटफॉर्म्सवर पोस्ट्स, व्हिडिओज, ब्लॉग्ज आणि इतर प्रकारच्या कंटेंटद्वारे लोकांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. याशिवाय, संस्थेच्या वेबसाईटवरुन देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

### क्राउडफंडिंगची प्रक्रिया:

क्राउडफंडिंग ही एक अशी पद्धत आहे ज्यामध्ये अनेक लहान-मोठे दाते एकत्र येऊन आर्थिक सहाय्य देतात. यासाठी विविध क्राउडफंडिंग प्लॅटफॉर्म्सचा वापर केला जातो, जसे की किकस्टार्टर, गोफंडमी, Give.do इत्यादी. या प्लॅटफॉर्म्सवर आपल्या प्रकल्पाची सविस्तर माहिती, उद्दिष्ट, आवश्यक निधी आणि प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच्या परिणामांची माहिती द्यावी लागते. लोक या प्रकल्पाबद्दल माहिती वाचून त्यांच्या इच्छेनुसार आर्थिक सहाय्य देतात.

## अप्रत्यक्ष निधी

संस्थेच्या विविध प्रकल्पांसाठी वेगवेगळ्या आवश्यकता असतात जसे प्रकल्प कार्यालयासाठी किंवा सेवा कार्यासाठी जागेची, संगणक, फर्निचर इत्यादी वस्तूंची गरज असते. अनाथाश्रम होस्टेल अशा कार्यासाठी धान्य आवश्यक असते अशा विविध गोष्टींचे देणगी स्वरुपात मिळविणे हा एक प्रकारे मिळणारा अप्रत्यक्ष निधी आहे. अशा स्वरुपातील मदतीमध्ये देणगीदारांना अधिक पारदर्शकता दिसते आणि त्यामुळे अशा प्रकारे अप्रत्यक्ष निधी उभारणे ह्याचासुद्धा प्रयत्न केला पाहिजे.

## निधी उभारण्याचे दायित्व

सामाजिक संस्थेचे काम हे समाजाचे काम असल्याने ह्या कामासाठी लागणारा निधी उभारणे हे एका अर्थी सर्व समाजाचे काम आहे. तसेच त्या संस्थेतील सर्व कार्यकर्त्यांची – ट्रस्टी, स्वयंसेवी कार्यकर्ते तसेच पगारी कार्यकर्ते ह्या सर्वांनी ह्यामध्ये सहभागी असणे आवश्यक आहे. ह्याकामासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण सर्वच स्तरातील कार्यकर्त्यांनी घेण्याची आवश्यकता आहे. निधी उभारणीचे काम उत्तम प्रकारे व्हावे, ह्यासाठी लागणारे साहित्य, तंत्रज्ञान सहाय्य आणि प्रशिक्षित कार्यकर्ते ह्यावर होणारा खर्च हा संस्थेच्या आवश्यक खर्चातील एक भाग समजून संस्था संचालकांनी त्यासाठी योग्य तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

निधी उभारणी ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, जी संस्थेच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अत्यंत आवश्यक आहे. विविध पद्धती आणि तंत्रांचा वापर करुन यशस्वी निधी उभारणी शक्य आहे. यामुळे संस्थेला त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यास आणि समाजात सकारात्मक बदल घडविण्यास मदत होते.

**– श्री. शैलेश घाटपांडे**

# ४. ओळख सेवावर्धिनीच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पाची – संसदीय संकुल विकास परियोजना (SSVP)

'संसदीय संकुल विकास परियोजना ' ही योजना केंद्र शासनाच्या आदिवासी विकास मंत्रालयाकडून कार्यान्वित करण्यात आली आहे. या अंतर्गत भारताच्या एकूण लोकसभा मतदारसंघातील जनजातीचे प्राबल्य असलेल्या जनजातीय उमेदवारांसाठीच राखीव असलेले ४८ लोकसभा मतदारसंघ निवडण्यात आले आहेत. या सर्व जनजातीबहुल लोकसभा मतदारसंघात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना राबविणे आणि त्यायोगे या भागाचा आणि जनजातींचा विकास साधणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. सन २०२२ मध्ये ही योजना कार्यान्वित करण्यात आली.

या योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाचा मुख्य उद्देश, 'शेतीचे उत्पन्न दुप्पट करणे, ग्रामीण/स्थानीय अर्थव्यवस्थेचा विस्तार करणे, स्थानिक जनजातींसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण देणे, त्यांना स्थानिक रोजगार संधी उपलब्ध करुन देणे, त्यांचे रोजगार आणि इतर कारणासाठी होणारे स्थलांतर थांबविणे व नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करणे' असा व्यापक ठरवून दिलेला आहे.

या योजनेअंतर्गत, महाराष्ट्रातील दिंडोरी, जि. नाशिक, नंदुरबार जि. नंदुरबार आणि गडचिरोली हे मतदारसंघ अंतर्भूत होते. वरील आणि इतर सर्वच जनजाती मतदारसंघातील प्रत्येकी पाच गावांचे क्लस्टर यासाठी निवडायचे होते. सेवावर्धिनी महाराष्ट्रातील नाशिक आणि नंदुरबार जिल्ह्यामध्ये सध्या हा प्रकल्प राबवीत आहे. नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी लोकसभा मतदारसंघात असलेल्या सुरगणा तालुक्यात अंबाठा, डोल्हारे, खांदुर्डी, उंबर्डे-पळसन आणि भवाडा ही गावे निवडण्यात आली, तर नंदुरबार जिल्हा, नंदुरबार तालुक्यातील पावला, अर्दितारा, कोठाडे, मालपुर आणि देवपूर ही गावे समाविष्ट आहेत.

**प्रकल्पात समाविष्ट असलेली कामे:**

प्रकल्पाच्या उद्देशानुसार प्रकल्पाच्या कामाचे ४ मुख्य भाग आहेत. निवडलेल्या गावांतील एकूण २५० जनजातीय शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करणे. यात मुख्य गरज होती ती, बारमाही पाण्याचा नैसर्गिक स्रोत शोधणे, सोलरपंपाच्या माध्यमातून या स्रोतातून शेतामध्ये जलपुरवठा करणे. याकामात सेवावर्धिनीला 'ग्रामउर्जा' या सहयोगी संस्थेचे तांत्रिक सहकार्य लाभले. पुढील भागात 'शेतकरी शेती शाळा म्हणजेच Farmers Field School (FFS') राबविणे. तिसरा टप्पा किंवा भाग आहे डेमो प्लॉट चा. यामध्ये, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात एखादे पीक निवड करण्यापासून ते थेट बाजारात विक्री पर्यंतचे सर्व मार्गदर्शन केले जाते. यासाठी प्रत्येक गावात ४ शेत निवडले जातात.

बाजारात त्या उत्पादनाला मूल्य कमी असल्यास, त्या उत्पादनावर आधारित विविध मूल्यवृद्धीच्या प्रक्रिया शिकवण्याचाही समावेश यात असतो. चौथ्या टप्प्यात संपूर्ण क्लस्टरमधून १२५ शेतकऱ्यांची निवड करुन त्यांना परसबागसाठी बियाणे दिले जाते. यासर्वावर शाश्वत उपाय म्हणून शेतकरी उत्पादक कंपनी काढणे हे पुढचे काम आहे. यातच समाविष्ट केलेला दुसरा भाग म्हणजे, शेतकरी महिला बचत गटाची निर्मिती आणि यातून शेतीसाठी भांडवल मिळवून देण्याचा व्यवसाय निर्माण करणे.

ज्यामुळे महिला शेतक-यांना देखील उत्पन्न मिळेल पण, गरजू शेतकऱ्यांना देखील आवश्यक शेती भांडवलाचा पुरवठा होत राहिल.यासर्व प्रयत्नातून प्रकल्पाचे उद्दिष्ट पूर्ण होत आहे असा अनुभव सेवावर्धिनीला काही उदाहरणातून मिळू लागला आहे. या प्रकल्पावर सुरगणा तालुक्यात काम करणारे सेवावर्धिनीचे प्रकल्प अधिकारी जे अंबाठा गावचे स्थानिक रहिवासी आहेत त्यांचा अनुभव त्यांनीच पुढे शब्दबद्ध केला आहे.

नमस्कार!

मला खूप आनंद होतो आहे की, आपल्या संवेदनशील, वंचित, अकांक्षित,मागास-आर्थिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, सामाजिक मात्र राजकिय प्रमाणापेक्षा जास्तच शहाणा असा हा माझा सुरगाणा तालुका. ह्या तालुक्याला मिळालेला विशेष दर्जा, संसदीय संकुल विकास परियोजनेचा आणि अशा अनेक गोष्टी. सुरगाणा तालुक्यात स्वातंत्र्य काळापासून शासन, प्रशासन, संलग्न संस्था काम करत आहेत.मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने व तसा आधीच संवेदनशील तालुका असल्या कारणाने भौगोलिकदृष्ट्या पण अनेक अडचणी शिल्लक राहिलेल्या आहेत.

स्वतंत्र विचारधारेची मंडळी असल्याने, दिल्ली संसद भवन काय, मुंबईचे विधानसभा भवन यांचा आमच्या जीवनात तिळमात्र संबंध नव्हता. आमचा पंतप्रधान म्हणजे आमचा खासदार,आमचा मुख्यमंत्री म्हणजे आमचा सरपंच व आमचे आमदार म्हणजे आमचे गावचे पुढारी. ही आमची स्थिती होती. बाकी प्रशासन तर आमच्या खासदार, आमदार यांचे सेवेकरीच. कारण त्यांच्या परवानगीशिवाय काहीच करायचे नाही. मग वेळ कितीही वाईट आली तरी चालेल. जनताही आपल्या तालुक्याच्या सत्तेच्या धुंदीत सगळं विसरुन जायची. यातच अनेक वर्ष गेलीत. काळ बदलला मात्र विकासाच्या गोष्टी सुरगाणा तालुक्याला मिळाल्याच नाहीत.

सुरगाणा तालुका महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील तालुका आहे. ज्याचा कळवण हा उपविभाग असुन, तालुक्यात २,०५,१३५(२०११ गणनेनुसार) लोकसंख्या, साक्षरता ७५%, ६४ ग्रामपंचायती आणि २९१ महसुली गावे आहेत. त्यातच आपल्या १० गावांसाठी संसदीय संकुल विकास परियोजना सुरु झाली. यात सुरगाणाचा मध्यभाग 'भोरमाळ' हे केंद्रस्थान ठेवले. ह्या संकुलात आजुबाजुची १० गावे समाविष्ट करण्यात आली. १- भोरमाळ, २-पालविहीर, ३-जामुनमाथा, ४- उंबरविहीर, ५-उंबरपाडा, ६-खोकरी, ७-पातळी, ८-निंबारपाडा (खो.), ९-जामुने आणि १०- आंबाठा अशी गावे असुन ह्या गावांमध्ये ही योजना राबवायची सुरुवात झाली ती पाण्यापासून.

सुरगाणा तालुक्याला पाण्याचे वरदान. मात्र पाणी साठवण्याची व्यवस्था नाही. थोडीफार छोटे-छोटे व्यवस्था आहे,पणते पाणी जनावरांनाच पुरत नाही. १० गावे तर निश्चित झाली पण पाणी नाही. कारण, सोलर पंप बसवून शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन द्यायचे हे आपल्या सेवावर्धिनीकडे काम आलं. यासाठी सेवावर्धिनीची टिम व ग्रामउर्जाची टिम प्रयत्न करत होती. पण पाण्यासाठी दुसरीच गावं शोधायला पळापळ झाली. म्हणजे १ तर समस्या समोर आली 'पाणी'.५ गावांना सेवावर्धिनीने सोलरपंप बसवून शेतात पाईप लाईन करुन दिली.आंबाठा, डोल्हारे, खांदुर्डी, उंबरदे, भवाडा या ५ गावांना पाणी शेतात उपलब्ध करुन दिले. आता त्यात करायचे काय? म्हणजे समस्या होती ती,आधुनिक शेतीचे अपुरे ज्ञान.मग मिरची पीक निवडणून त्यांचे शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन करुन मिरची कशी करायची हे शिकवून ५ गावांमध्ये ४-४शेतकरी डेमोधारक निवडले.त्यांना रोप, आवश्यक खत,ड्रीप दिली. काही जणांनी उत्पन्न चांगले घेतले.डोल्हारे येथील शेतकरी श्री.लक्ष्मण बागुल यांनी अर्धा एकर क्षेत्रावर ओली, सुकविलेली मिरची असे ६-७ क्विंटल उत्पन्न घेतले.

आज रोजी सुरगाणा तालुक्यात अनेक स्वयंसेवी संस्था,NGO,संघटना, प्रशासन, प्रशासकीय एजन्सीजकाम करतात. पाणी,शेती,आर्थिक विकास, सामाजिक विकास, शैक्षणिक विकास, अध्यात्मिक विकास,महिला, आर्थिक सक्षमीकरण, बेरोजगार या सर्वांसाठी काम करणाऱ्या संस्था, संघटना काम करतात. ह्या सर्वांच्या मेहनतीतून काही प्रमाणात विकास,बदल हा नक्कीच होतं आहे आणि यातुन अपेक्षित साध्य साधत आहेत. मात्र सुरगाणा तालुक्यात ३ सामाजिक वर्ग राहातं आहेत.



१- कोकणा समाज २-महादेव कोळी समाज ३- वारली समाजात असे आहे ह्या तिन्ही समाजाचा विकासाचा मार्ग भिन्न आहे. यांच्यात रोटी-बेटी व्यवहार पण होत नाहीत. यामुळे ह्या तिघांची प्रतवारी वेगवेगळी होणार आहे.

*कोकणा समाज -आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक विकास होत आहे.
*महादेव कोळी - आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक व राजकिय विकासाची पाहिजे तशी संधी मिळालेली नाही.
*वारली समाज- आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक विकासाच्या बाबतीत खुपचं कमी अर्थात मागे आहे. हा पण एक विकासाला अडथळा आहे.

आपल्या सुरगाणा तालुक्यातील १ चतुर्थ भाग म्हणजे घाटमाथा हा आधुनिक शेतीच्या जोरावर स्ट्रॉबेरीचे बोरगाव भागात उत्पादन करत आहेत. बाकी ३ भागात शेती संबंधीत व पाणी संबंधीत खुपच अडचणी आहेत. त्यातच एप्रिल-मे व जुन २०२४ सुरगाणा तालुक्यात पिण्याच्या पाण्याची भिषण दुष्काळ पाहायला मिळाला आहे. गावाला त्यांच्या गरजेचे पाणी पण उपलब्ध नाही. अशीच काही अंशी परिस्थिती पेठ, दिंडोरीचा काही भाग, कळवणचा काही भाग ग्रासला आहे. ह्या भागांमध्ये विकासाचा प्लॅन काही केल्या यशस्वी होत नाही.याला कारणीभूत थोडीफार राजकिय समज पण आहे व नेतृत्व गुणांची कमी हा दोष आहे.

कारण पुर्वी आदिवासी समाजात असलेला एकसंघ गुण आज ह्या स्पर्धेच्या युगात व्यक्ती-व्यक्तीला खेचत आहे, तर समाज समाजाला खेचत आहे. व्यक्तीविषयी, समाजाविषयीचा भाव काहीसा दुषित झाल्याने आज समाजाची हानी होत चालली आहे. हा दोष सर्व आदिवासी भागात आज पहायला मिळत आहे. याला कारणीभूत -राजकिय परिस्थिती, समाजात निर्माण झालेली वेगवेगळे विचार प्रवाह, मतप्रवाह असुन हा कुणीच मागे हटायला तयार नाही. किंवा वास्तविक समजायला तयार नाही आणि यातूनच निर्माण होतो तो संघर्ष.!

-मधुकर चोथवा







# ९. सेवाव्रती

## ९.१ श्री. सुदामकाका आणि सौ.सिंधुमामी भोंडवे



देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती|
वाळवंटातून सुद्धा स्वस्तीपद्मे रेखती||

बा. भ. बोरकरांची ही सुप्रसिद्ध कविता जणू ज्यांच्या उक्ती, कृती आणि व्यक्तिमत्त्वामुळे सार्थ झाली आहे, अशा सुदामकाका भोंडवे आणि सिंधूमामी भोंडवे यांचे जीवन अतिशय आगळे व प्रेरणादायी आहे. श्रद्धेय नानाजी देशमुखांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रातील मागास समजल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात कामाला सुरुवात करण्यात आली होती. नानाजींचे सहकारी कृष्णा दामोदर तथा के. डी. दादा यांनी बीडमधील गावांमध्ये विविध प्रकारच्या कार्यक्रमांतून जागृती करायला सुरुवात केली होती. डोमरी परिसरातील विद्यार्थ्यांच्या दहावी परिक्षेतील अपयशानंतर त्यांनी येथे संस्कारवर्गाचे आयोजन करण्याचे ठरवले. यामध्ये सुदाम भोंडवे हा डोमरीतील तरुण उत्साहाने सहभागी झाला होता. त्याची तळमळ व धडाडी केडी दादांच्या नजरेत भरली. यावेळी होणाऱ्या विचारमंथनात मराठवाड्यातील ऊसतोडणी कामगारांच्या मुलाच्या शिक्षणाच्या समस्येविषयी काहीतरी ठोस करायला हवे यावर चर्चा झाली. त्यातूनच सोनदरा गुरुकुलाच्या स्थापनेचा विचार पुढे आला.

यावेळी एक आगळी व आश्चर्याची गोष्ट घडली. डोमरीसारख्या छोट्याशा गावात वाढलेल्या, सामाजिक कार्याची, विचारसरणीची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या, सुदामकाकांनी या कामासाठी, वडिलोपार्जित जमिनीपैकी साडेसात एकर जमीन द्यायचा निर्णय घेतला. इतकेच नाही तर डोंगर उतारावरील त्या जमिनीवर चार झोपड्या बांधून स्वतःची पत्नी व ऊस तोडणी कामगारांच्या १४ मुलांसह सोनदरा गुरुकुलाचा श्रीगणेशा केला. सुरुवातीस काही काळ एकत्र असलेल्या केडी दादांवर, नानाजींनी अन्य जबाबदाऱ्या सोपवल्याने, सर्व भार सुदामकाका व सिंधूमामींनीच आपल्या खांद्यावर घेतला. काका आणि इतर कार्यकर्त्यांनी शिक्षण व व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली तर स्वयंपाकघर व शेतीची जबाबदारी सिंधूमामी आणि महिलांनी समर्थपणे पेलली. मामींवर शालेय शिक्षणाचे संस्कार झाले नसले तरी कामांत त्या वाघ होत्या व त्यांचे व्यवहारज्ञानही वाखाणण्याजोगे होते.

हळूहळू कामाचा व्याप वाढत गेला. वेगवेगळे कार्यकर्ते व रा. स्व. संघाचे स्वयंसेवकही येऊन कामात सहभागी होऊ लागले. गुरुकुलाची पहिली पक्की इमारत उभारण्यासाठी विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. नंतरही विविध कामांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांची जडणघडण होण्यासाठी काकांनी व मामींनी स्वतःच्या वर्तनाचा धडा त्यांच्यासमोर ठेवला. गुरुकुलाच्या परिसरात लावलेली विविध झाडे जगवण्यासाठी, त्यांनी खांद्यावरुन घागरीतून पाणी आणून घातले. मुलांमध्ये विविध कलागुण विकसित व्हावे यासाठीही काका विविध उपक्रम हाती घेत. सोनदरा गुरुकुलाच्या निसर्गरम्य परिसरात आढळणाऱ्या झाडांची खोडे, पाने, फुले, बिया तसेच दगड इत्यादींचा कल्पक वापर करुन चित्र, शुभेच्छापत्रे, सजावटीच्या वस्तू, भेटवस्तू इ. करता येतात हे काकांनी विद्यार्थ्यांना दाखवून दिले. सुदामकाकांनी तयार केलेली काष्ठशिल्पे हा प्रत्यक्ष बघण्याचाच विषय आहे. झाडांच्या फांद्या, खोड, वेली यांच्या नैसर्गिक आकारातच अनेकदा विविध प्राणी, पक्षी, मानवाच्या आकृती तसेच अमूर्त कलात्मक शिल्पाकृती लपलेल्या असतात. त्या दिसण्याची नजर सुदामकाकांना उपजतच होती.

सामाजिक कामाविषयी असणारी कळकळ, रसिकता व कलोपासना यांच्याप्रमाणेच आत्मचिंतन व अध्यात्मसाधना हेही सुदामकाकांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे अंग होते. या साधनाप्रवासात, विनोबाजी भावे यांच्या मानसकन्या विमलाताई ठकार, तेजग्यान फाउंडेशनचे सरश्री, ज्ञानप्रबोधिनीच्या गायत्रीताई सेवक व स्वर्णलताताई भिशीकर अशा अनेकांचा सल्ला व मार्गदर्शन त्यांनी घेतले होते. गुरुकुलातील कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनाही या साधनेचा लाभ व्हावा, त्यांनाही याची गोडी लागावी या उद्देशाने सोनदरा गुरुकुलात रोज ध्यान व चिंतन केले जाते. मौन व रोजनिशी लेखनासाठी रोज ठरावीक वेळ योजलेला असतो. अध्यात्माच्या या गोडीमुळे त्यांच्या उपजत शुद्ध सात्विक स्वभावाचे सोने झळाळून उठले. सचोटी व प्रामाणिकपणा हे त्यांच्यासाठी विद्यार्थ्यांना पढवण्याचे शब्द नव्हते, तर ही मूल्य त्यांचा जीवनाधार होती.

एकदा शासनाच्या एका योजनेअंतर्गत गुरुकुलाला रोपवाटिका तयार करण्यासाठी निधी मिळाला. पण त्यावर्षी आलेल्या दुष्काळामुळे ती रोपवाटिका अपेक्षित प्रकारे तयार झाली नाही. यामुळे काकांनी शासकीय कार्यालयात जाऊन निधीच्या रकमेचा धनादेश परत केला. संबंधित अधिकारी असा मुलखावेगळा प्रकार पाहून आश्चर्यचकित झाला. त्याच्या परोपरीने समजावण्यानंतरही काकांनी निधी परत केलाच. वास्तविक त्यावेळी गुरुकुलाला निधीची आवश्यकता होती पण काकांनी आपल्या मूल्यांशी तडजोड केली नाही. स्वतः पडद्याआड राहून इतरांना प्रोत्साहन देण्याची त्यांची वृत्तीही आगळीच होती. सोनदरा गुरुकुलापासून प्रेरणा घेऊन गुरुकुलातील काही माजी विद्यार्थी, शिक्षक तसेच मराठवाड्यातील अन्य कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणे वेगळ्या गुरुकुलांची उभारणी केली. या सर्व गुरुकुलांमध्ये समन्वय असावा या हेतूने त्यांची एक समिती तयार करण्यात आली. त्याचे अध्यक्षस्थान सुदामकाकांनी स्वीकारावे असे सर्वांनी एकमताने सुचविल्यावर काकांनी स्वतः मागे राहून दुसऱ्याचे नाव प्रस्तावित केले.

गुरुकुलातील विद्यार्थ्यांमधून भारताचे भावी सुजाण व क्रियाशील नागरीक घडावेत या विचाराने काकांनी अनेक चांगल्या गोष्टी रुढ केल्या आहेत. विद्यार्थ्यांवर संपूर्णपणे स्वावलंबनाचा संस्कार केला जातो. व्यक्तिगत आणि गुरुकुलातील परिसराची स्वच्छता करणे, स्वतःची सर्व कामे करणे, स्वयंपाकघरात –शेतात मदत करणे, एकट्याने वा एकमेकांच्या मदतीने अभ्यास करणे, शरीरस्वास्थ्यासाठी व्यायाम व खेळ या गोष्टी सर्वांसाठी अनिवार्य आहेत. गुरुकुलात होणाऱ्या लहानमोठ्या कार्यक्रमाच्या नियोजनापासून सूत्रसंचालनापर्यंत सर्व कामांमध्ये विद्यार्थी सहभागी होतात. गुरुकुलामध्ये विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास आणि उत्तरे शोधण्यास प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांची मते समजावीत म्हणून विचारसभेचे आयोजन नियमितपणे करण्यात येते. यावेळी त्यांना आपली मते मोकळेपणाने मांडता येतात.

शिक्षणाचे काम चांगले व्हायचे असेल तर केवळ विद्यार्थ्यांवर लक्ष देऊन उपयोगी नाही; त्याचबरोबर शिक्षक, पालक आणि शिक्षणसंस्था यांच्यातही सकारात्मक बदल झाले पाहिजेत असे काकांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षक-कार्यकर्ते आणि पालकांचीही प्रगती होण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षकांना विविध प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिले. पालकांशी नियमित संवाद ठेवला. पालक भेटी, पालक मेळावा याबरोबरच विद्यार्थ्यांच्या घरी भेट देणे हा सोनदरा गुरुकुलाचा आगळा उपक्रम आहे. करोना महासाथीच्या काळात विद्यार्थ्यांप्रमाणेच पालकांशीही मोबाईल – इंटरनेटच्या माध्यमातून काकांनी संवाद साधला होता.

विद्यार्थ्यांवर काकांचे खूप प्रेम होते. त्यांच्या सुखदु:खात ते एकरूप होऊन जात. किंबहुना त्यांच्याहून जास्त होत असत. गुरुकुलातून विद्यार्थी बाहेर पडल्यावरही ही भावना उणावत नसे. दत्ता नलावडे या सुरुवातीच्या विद्यार्थ्यांचा अनुभवातून हेच स्पष्ट दिसते. बारावीला असताना दत्ताभाऊ व इतर तीनचार विद्यार्थी एका विषयात अनुत्तिर्ण झाले. हे कळल्यावर काकांना खूप वाईट वाटले. हे विद्यार्थी पास होईपर्यंत त्यांनी चप्पल न घालण्याचा संकल्प केला व तो पाळला. ऑक्टोबरच्या परिक्षेत अर्थातच हे सर्वजण पास झाले. काकांच्या चिंतन व कृतिशीलतेला मामींच्या कष्ट, माया आणि व्यवहारकुशलतेची भक्कम जोड होती. मामींच्या स्वभावात एक लोभस मोकळेपणा होता. त्या सहजपणे आपला राग आणि प्रेम व्यक्त करत. काकांच्या शांत स्वभावाच्या पार्श्वभूमीवर मामींचे रागावणे जास्त दिसून येई. मात्र गुरुकुलात आलेल्या प्रत्येकाला भरल्या पोटी पाठवण्यातून त्यांची मायाही लक्षात येत असे.

गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सकस, पौष्टिक व चविष्ट आहार मिळावा यासाठी सिंधूमामी दक्ष असत. म्हणूनच गुरुकुलाच्या शेतांमध्ये आलेल्या भाज्या, फळे यांचा समावेश मुलांच्या आहारात असतो. गुरुकुलाच्या उत्तम गोशाळेतील गायींचे दूध रोज सकाळी मुलांना दिले जाते. न्याहारी, दुपारचे जेवण, संध्याकाळचा छोटा खाऊ व रात्रीचे भोजन अशा आहारामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक वाढ चांगली होते. काकांच्या व्यक्तिमत्वातील साधेपणा, निगर्वी वृत्ती सर्वांना भावणारी होती. प्राज या सुप्रसिद्ध उद्योगसमूहाच्या प्राज फाउंडेशनद्वारा उत्तम काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला पुरस्कार दिला जाणार होता. यावेळी निवडक संस्थांच्या कार्यकर्त्यांना मुलाखतीसाठी पुण्याला बोलावले होते. यावेळी काकांनाही बोलावले होते. अन्य कार्यकर्त्यांमध्ये स्नेहालय संस्थेचे गिरीशजी कुलकर्णी होते.

उपस्थित बहुतेक कार्यकर्त्यांनी घातलेल्या सूटबूट अशा टापटीपीची कपड्यांच्या तुलनेत काकांचे साधे देशी कपडे व संस्थेविषयीची कागदपत्रे असलेली हातातील कापडी पिशवी वेगळे दिसत होते. काकांची मुलाखत झाल्यावर त्यांनी त्याविषयी गिरीशजींशी चर्चाही केली. त्यांच्या मनात,"गिरीशजी आत्ता आपले स्पर्धक आहेत... त्यांना मदत कशाला करायची?" असे हलके विचार आले नाहीत. काकांच्या दिसण्यापेक्षा त्यांच्या कामातील कळकळ, सच्चेपणा व बांधिलकी याला निवड समितीने जास्त महत्त्व दिले आणि त्या पुरस्कारासाठी काकांचीच निवड झाली. अनेकदा असे दिसून येते की, सामाजिक कार्यात कामाचे मोठे डोंगर उभे करणाऱ्या व्यक्तीचे स्वत:च्या कुटुंबाकडे दुर्लक्ष होते. त्यांची पुढची पिढी त्यांच्या कर्तुत्त्वाच्या उंचीपुढे वामनावस्थेत राहते. काकांचे वेगळेपण हे की, त्यांनी स्वत:च्या कुटुंबालाही उत्तम घडण्यासाठी वाव दिला. मामी व त्यांच्या स्वभावात अंतर असले तरी ते मनाने एकमेकांशी एकरुप असल्याने त्यांचे गुणदोष एकमेकांना पूरकच ठरले. अश्विन व कल्याणी या दोन्ही मुलांवर मातापित्यांचे वचन व कृतीयुक्त संस्कार झाले. दोघांनीही उच्च शिक्षण घेतले व आपल्या आईवडिलांचा सामाजिक-शैक्षणिक कामाचा वारसा समर्थपणे पुढे चालवला आहे.

कल्याणी तिच्या पतीबरोबर 'मिल के चलो' या संस्थेद्वारे शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शिक्षणाचे काम करत आहे. अश्विनने सोनदरा गुरुकुलाची सर्व जबाबदारी समर्थपणे सांभाळली आहे. पण त्याच्यावर वडिलोपार्जिततेचा आरोप कुणी करु शकणार नाही. कारण शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने काही वर्षे डॉ. अभय बंग यांच्या सर्च संस्थेमध्ये व ज्ञानप्रबोधिनीच्या हराळी प्रकल्पावर राहून कामाचा सर्वांगीण अनुभव घेतला आहे. त्यानंतर सोनदरा गुरुकुलात काकांच्या मार्गदर्शनाखाली त्याने काही काळ प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतला. फेब्रुवारी २०२३मध्ये झालेल्या दुर्दैवी अपघातात काका, मामी, अश्विनची पत्नी कार्तिकी व कन्या आनंदी यांचे निधन झाले. स्वत: अश्विनही या अपघातातून चमत्कार व्हावा तसा वाचला. या अकल्पित धक्क्यातून सावरुन स्वत:चे दु:ख स्वीकारुन कार्यकर्त्यांना सावरणे, संस्था केवळ सुरु ठेवणे नव्हे तर तिची प्रगती करणे... या सर्वांतून अश्विनच्या व्यक्तिमत्त्यातील सोने लखलखून दिसते. यात काका व मामींनी केलेल्या त्याच्या जडणघडणीचा मोठा वाटा आहे.

मूलत: निगर्वी असणारे काका प्रसिद्धी मिळवण्यासंदर्भात मागेच असत. त्यामुळे त्यांच्या कार्याची थोड्या लोकांनाच माहिती आहे. काही मोजक्या संस्थांनी त्यांच्या कार्याची दखल पुरस्कार देऊन घेतली होती. त्यातील काही ठळक पुढीलप्रमाणे –

- २००० मध्ये पुणे येथील नातु फाउंडेशनचा 'सेवा गौरव पुरस्कार'
- २००४ मध्ये लातुर येथील रणसम्राट सांस्कृतिक मंडळाचा 'चैत्रपल्लवी पुरस्कार'
- २००७ मध्ये ज्ञानप्रबोधिनी, पुणे यांचा 'गुरुगौरव पुरस्कार'
- २००९ मध्ये पुणे येथील प्राज फाउंडेशनचा 'सोशल आंत्रप्रेन्युअर' पुरस्कार
- २०१७ मध्ये एम.आय.टी. पुणे यांचा 'राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय पुरस्कार'
- २०१८ मध्ये महाराष्ट्र शासनाचा फुले शाहु आंबेडकर पुरस्कार'

या पुरस्कारांनी सुदामकाका व सिंधुमामी यांच्या कार्याची पावती दिली असली तरी समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाने चमकणारे विद्यार्थी हेच सुदामकाका, सिंधुमामी व गुरुकुलाला मिळालेले खरे पुरस्कार आहेत. त्यात कुणी उत्तम शेतकरी आहेत, कुणी उद्योजक, कुणी शास्त्रज्ञ तर कुणी प्रशासकीय अधिकारी वा उद्योगजगतात चांगल्या पदावर आहेत.

या सर्वांमध्ये असणारा समान धागा म्हणजे सुदामकाका व सिंधुमामींनी त्यांच्यात रुजवलेलं 'गुरुकुलपण'! काका व मामींच्या दुःखद निधनानंतर झालेल्या कार्यक्रमाच्यावेळी गुरुकुलात आलेला एक माजी विद्यार्थी सहजपणे बोलून गेला, ''माझ्या बायकोला मी सांगितलं आहे. माझ्यावर कधीही, केवढंही संकट आलं तरी माझ्यासाठी जगात एक आश्वासक जागा कायम आहे. मी तिथे जाईन, स्वतःला त्या संकटाला तोंड देण्यासाठी समर्थ बनवेन. ती जागा आहे... सोनदरा गुरुकुल.''

– महेश खरे
९३२०३ ०४०६९



# ८.२ श्रीमती कांचन परुळेकर



### बालपण व कौटुंबिक पार्श्वभूमी:

कांचनताई परुळेकर या मुळच्या कोल्हापूरच्या. कोकणच्या मातीचा वारसा त्यांच्या आडनावातही आहे. त्यांच्या जन्म १९५२ चा. वडील मात्र लहानपणापासून कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील नितवडे गावात वाढलेले. त्यामुळे कोकणची बुद्धिमत्ता व घाटावरचा कणखरपणा त्यांच्यात उतरलेला आहे. सेवाभावी वृत्तीचे बाळकडू त्यांना घरातूनच वडिलांकडून मिळाले. वडील बाळकृष्ण परुळेकर हे त्या काळी हरिजन सेवक संघाचे व ग्रामीण भागातील कार्यकर्ते होते.वडील पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून शिलाई काम करत. कोटाची शिलाई ही त्यांची विशेष खासियत होती. घरात मितभाषी असणारे वडील सामाजिक कार्यात मात्र खूपच सक्रीय होते. इतके की,वडिलांनी राजारामपुरीत चालू केलेले व चांगले नावारुपाला आलेले 'हाऊस ऑफ फॅशन' हे दुकान प्रत्यक्षात मात्र त्यांच्या आईला चालवावे लागले. सामुदायिक शेती व गोठा चालवण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे, हरिजन, सवर्ण यांचे एकत्रित कार्यक्रम घडवून आणणे, चळवळीच्या माध्यमातून धरणग्रस्तांच्या प्रश्न सोडवणे यातच वडील अधिक रमत होते.

### काकाजींचा संपर्क व आयुष्याला मिळालेली कलाटणी:

थोर शिक्षणतज्ञ व माजी खासदार व आमदार डॉक्टर व्ही. टी. पाटील तथा काकाजी हे सामाजिक कामाचे एक वेगळी दृष्टी असणारे आगळेवेगळे द्रष्टे व्यक्तिमत्व होते. त्यांनी कोल्हापुरात समाजकार्याची मूहूर्तमेढ रोवली. त्यांनी शिक्षणातून विकास व विकासातून सामाजिक परिवर्तन या हेतूने गारगोटी येथे 'मौनी विद्यापीठ' या नावाने ग्रामीण शिक्षणाचे केंद्र उभारले. उद्याची स्त्री ही रणरागिणी, कर्तुत्ववान व स्वावलंबी व्हावी म्हणून, कोल्हापूरमध्ये त्यांनी महिलांसाठी 'ताराराणी विद्यापीठ' ही उभारले होते. त्यांचे शिक्षणातील हे धडाडीचे व अभिनव प्रयोग पुढे चांगलेच नावारुपाला आले. कांचनताई लहानपणापासून प्रभावी भाषण करत असत. वयाच्या १३ व्या वर्षी पाडगावच्या हजारो धरणग्रस्तांपुढे भाषण करत त्यांनी उपस्थितांचे मन जिंकून घेतले होते. त्यावेळी व्यासपीठावर स्वत: काकाजी व आमदार रत्नप्पा कुंभार होते. माणसांची पारख असणाऱ्या काकाजींनी या चुणचणीत व बुद्धिमान अशा बालवयातील कांचनला हेरले. बंडखोर व स्वतंत्रविचारी व्यक्तिमत्व असणाऱ्या कांचनला त्यांनी व त्यांच्या पत्नी सरोजिनी देवी यांनी आपली मुलगी मानले. यात जात-पात भावकी आड आली नाही, कारण वारसा कर्तुत्वाचा चालवायचा होता.

### शिक्षण व नोकरीचा टप्पा:

कांचनताईंना इंग्रजी साहित्यात एम. ए. पूर्ण करुन पुढे डी.एड. ही केले आहे. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी एन.सी.सी. अधिकारी म्हणून काम सुरु केले. एन.सी.सी. मध्ये असताना, 'बेस्ट ऑल राऊंड लेडी कॅडेट' व 'बेस्ट शूटर' असे दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळवण्या-या त्या एकमेव महिला आहेत. तेथे दोन वर्ष त्यांनी काम केले. बरोबरीने चालू असणारे शिक्षण पूर्ण झाल्यावर कांचनताई यांनी ताराराणी शाळेत शिक्षिकेचे दहा वर्षे काम केले. त्यानंतर १९७८ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये लिपिक म्हणून रुजू झाल्या. १४ वर्षे काम केल्यावर १९९२ मध्ये शाखा अधिकारी पदावरुन स्वयंसिध्दाची धुरा हाती घेण्यासाठी म्हणून स्वेच्छानिवृत्ती घेतली. अशी एकूण २६ वर्ष त्यांनी नोकरी केली.

१९६८ मध्ये काकाजींनी आपल्या संपूर्ण जंगम मालमत्तेचा न्यास केला व 'सरोजिनी देवी विश्वनाथ विश्वस्त मंडळा'ची स्थापना केली. आपली सगळी संपत्ती त्यांनी या मंडळाकडे सुपूर्द केली. ताराराणी विद्यापीठातील मुलींच्या विकासासाठी व एकूण समाजातील महिलांच्या उत्कर्षासाठी या न्यासातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येऊ लागले. १९९२ मध्ये 'स्वयंसिध्दा' या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमास, बँकेच्या नोकरीतून मुक्त झालेल्या कांचनताईंच्या पुढाकाराने सुरुवात झाली. १९६९ मध्ये सरोजिनी देवी यांचे तर १९९५ मध्ये काकाजींचे निधन झाले.

### स्वयंसिद्धाची सुरुवात:

महिलांनी फावल्या वेळात काही उद्योग करुन उद्योजक बनावे; या हेतूने कांचनताईंनी सुरुवातीला महिलांची एक बैठक बोलावली. त्यात आपल्याला बनवता येतील अशा वस्तू महिलांनी बनवल्या आणि शाळेत पालक सभेच्या दिवशी या वस्तूंची विक्री केली. यातून महिलांना आत्मविश्वास मिळाला. त्यातूनच पुढे स्वतः काहीतरी करु पाहणाऱ्या धडपड्या महिलांसाठीचे स्वयंसिद्धा हे व्यासपीठ उभे राहिले. स्वयंसिद्धा हे नावच पुरेसे बोलके आहे. हे महिला मंडळ नसून, महिलांना स्वावलंबी बनविणारी चळवळ आहे. ज्या महिलेला मार्गदर्शनाची गरज आहे, अशी कोणतीही महिला एक रुपया भरुन नाव नोंदणी करु शकते.

'महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देणारी संस्था' अशी संस्थेची हळूहळू ओळख वाढत गेली. विकल्या जाऊ शकणाऱ्या वस्तू बनवण्यात काही महिला यामुळे संस्थेशी जोडल्या गेल्या. ज्यापुढे प्रशिक्षका बनून इतरांना प्रशिक्षण देऊ लागल्या. येथे तयार होणाऱ्या महिलांच्या वस्तूंना बाजारपेठ मिळायला हवी, त्यासाठी हळदीकुंकू असणाऱ्या महिलेच्या घरी स्टॉल लावण्याची शक्कल कांचनताईंनी लढवली. त्यातूनच हळूहळू मागणी वाढत गेली. पुढे संस्थेच्या आवारातच दर बुधवारी हा आठवडा बाजार भरु लागला.

वस्तू बनवणाऱ्या महिलांची हजारांमधली उलाढाल कधी लाखांवर पोहोचली समजले ही नाही. यात सहभागी होणा-या छोट्या छोट्या उद्योजक महिलांची संख्या सुद्धा शेकड्यातून हजारांवर जाऊन पोहोचली. अशा उद्योजकांना पाठबळ मिळवून यासाठी कांचनताईंनी १९९४ मध्ये 'स्वयंप्रेरिका औद्योगिक सहकारी संस्था' स्थापन केली. आतापर्यंत त्यांनी ५८,००० हून अधिक शहरी महिला व ३०,००० अधिक ग्रामीण महिलांना गेल्या ३० वर्षात प्रशिक्षण दिले आहे. त्यातून दहा हजाराहून अधिक छोट्या-छोट्या उद्योग करणाऱ्या महिला कोल्हापूर शहर व ग्रामीण भागात उभ्या राहिल्या आहेत हे विशेष. त्यापैकी अनेकांची उलाढाल लाखांच्या घरात आहे. या पाठीमागे कांचनताईंनी महिलांमध्ये पेरलेला आत्मविश्वास, चोख व्यवस्थापन व वस्तूंच्या गुणवत्तेचा आग्रह होता.

सुमारे २५ वर्षांपूर्वी दिल्लीत खाद्य पदार्थांचा स्टॉल या कोल्हापुरातील उत्साही उद्योजक महिलांनी लावून दिल्लीकरांना उकडीच्या मोदकांची भुरळ घातली होती!. मंदा आचार्य, सुरेखा उबाळे, शैलजा सुतार, मनीषा सावंत, कल्पना वरपे पाटील यांचा यात पुढाकार होता. काही उद्योजक महिला तर अशा काही तयार झाल्या आणि पुढे गेल्या की त्यांना आपल्या व्यवसायाच्या उलाढालीवर व व्यक्तिगत उत्पन्नावरही आयकर भरावा लागू लागला.

### कृतीतून सिद्ध झालेले परिवर्तनाचे तत्त्वज्ञान:

कांचनताईंनी महिला सबलीकरणाची खूप सोपी व अर्थपूर्ण व्याख्या केली आहे. "एखादी गोष्ट मी करू शकते!" हा आत्मविश्वास महिलांमध्ये निर्माण करणे म्हणजे सबलीकरण. कुटुंबाची चौकट न मोडता, चौकटी बाहेरचे काम करता येऊ शकते. "मला करावेसे वाटते व मी करू शकते, म्हणजे मी करीनच करीन" हा महिलांमधील सामाजिक बदलाचा त्यांचा सिद्धांत आहे. त्यासाठी महिलांना खूप चांगल पाहायला, ऐकायला, विचार करायला, चांगला निर्णय घ्यायला आणि त्यातून विचारपूर्वक कृती करायला जाणीवपूर्वक शिकवले जाते. स्त्रियांना आत्मनिर्भरतेच्या ध्येयाप्रत घेऊन जाणारे प्रबोधन व प्रशिक्षण हे महत्त्वाचे टप्पे निर्णायक ठरतात. याशिवाय श्रमप्रतिष्ठा, कार्यसंस्कृती व स्वयंव्यवस्थापन या बाबीही महत्त्वाच्या आहेतच.

स्त्रिया जर देशाच्या अर्धे अंग असतील, तर हा अर्धा भाग लुळा-पांगळा असून कसा चालेल? त्या समर्थ, स्वावलंबी आणि आपल्या पायावर उभ्या राहिल्या पाहिजेत, स्वयंसिद्ध झाल्या पाहिजेत, याच धारणेने ही अखंड धडपड चालू आहे. आपले कुटुंब आणि समाज मिळून देश होतो. स्त्री आणि पुरुष हे त्यांचे दोन पाय! जर दोन्ही पायांवर देश चालावा असे वाटत असेल, तर महिला सबलीकरणाला पर्याय नाही. ते झालेच पाहिजे. हे होण्यासाठी स्वयंसिद्ध कटिबद्ध आहे.

### प्रशिक्षण हा कामाचा गाभा:

स्वयंरोजगाराचे व अनेकविविध कौशल्य शिकण्याचे पर्याय देऊन, कांचनताईंनी अनेक शहरी व ग्रामीण महिलांवरचा दहावी नापास हा शिक्का पुसला. त्यासाठी स्वयंसिध्दा स्कूल चालू केली. त्यातल्या काही जणी तर आता चक्क प्रशिक्षक म्हणून काम करीत आहेत. अशा व अन्य मिळवून १५० प्रशिक्षिका स्वयंसिद्धाने आतापर्यंत घडविल्या आहेत. कांचनताई खरेतर स्वत: एकही प्रशिक्षण घेत नाहीत. पण एखाद्या महिलेचा त्यांच्याशी झालेला संवाद हेच तिचे पहिले प्रशिक्षण असते, समुपदेशन असते. त्यात त्या महिलेचा न्यूनगंड कायमचा दूर करतात. 'बोला, वाचा, लिहा, करा आणि मिळवा.' ही कामाची पंचसूत्री दिशा महिलांचा कायाकल्प घडवून आणते. काय झाले पाहिजे,यापेक्षा हे असे करता येते, असे प्रात्यक्षिकासह उदाहरण समोर ठेवण्यावर भर असतो.

"प्रश्नांकडे अडकून पडण्यापेक्षा उत्तराकडे चला" असा त्यांचा आग्रह असतो. जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत महिलांमध्ये समृद्ध जगण्याची प्रेरणा निर्माण करण्यावर त्यांचा भर असतो. परप्रकाशाने तेजाळणाऱ्या चंद्रापेक्षा स्वयंप्रकाशित सूर्य व्हा! कारण तो स्वत: प्रकाश देतो व इतरांनाही आपल्या प्रकाशात उजळून टाकतो. या भाषेतले कांचनताई चे आवाहन महिलांना आतून भिडणारे असते. प्रबोधन, प्रशिक्षण आणि आत्मनिर्भरतेसाठीची वृत्तीघडण ही स्वयंसिध्दाच्या यशस्वीतेची त्रिसूत्री आहे. स्वाभिमान आणि स्वावलंबन ही संस्थेची मूलधारणा आहे. धडपडणाऱ्या महिलांचे एक प्रेरणा केंद्र अशी आज स्वयंसिद्धाची ओळख निर्माण झाली आहे. वैचारिकघडण, व्यवहाराची ओळख आणि आश्वासक आधार यामुळे ते महिलांचे तिसरे घर झाले आहे.

### कामाचे वाढत जाणारे वैविध्य:

महिलांनी आवर्जून लिहिते व्हायला पाहिजे, आपले अनुभव शब्दबद्ध करायला हवे, यासाठी कांचनताईंनी स्वानंदसखी फीचर्स नावाचे व्यासपीठ तयार केले. या माध्यमातून कोल्हापूरच काय, तर अन्य जिल्ह्यातील दैनंदिकांमधूनही या अनुभवसिद्ध महिलांचे विचार या स्वानंदसखीच्या माध्यमातून पोहोचू लागले. महिलांनी व्यासपीठावर जाऊन आपले विचार मांडावेत, यासाठीही महिलांना प्रोत्साहन दिले. यासाठी वाणीमुक्ती प्रकल्पांतर्गत सूत्रसंचालन व कथाकथन याबाबत वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले जाते.

संस्थेने एका गावातील पडीक जमीन, सामुदायिक शेतीसाठी घेण्यास महिलांना प्रवृत्त करून त्यांना बी-बियाणे व सुधारित तंत्रज्ञान पोहोचवले. जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी पोषक वातावरण निर्मिती केली. त्यातून कुटुंबासाठी पुरेल एवढे पिकवण्याची मानसिकता मागे पडून, या महिलांनी पहिल्यांदाच विकण्यासाठी पिकवले. शेतीतून नगदी नफा मिळवण्याचा अनुभवही त्यांच्या पदरी पडला. "जिच्या हाती शेताची दोरी ती गाव उद्धारी" हा वाक्प्रचार त्यांनी यावेळी रुढ केला होता. कोल्हापूरच्या राधानगरी तालुक्यातील दुर्गम भागातील निवडक २८ गावांमध्ये महिला आरोग्यदूत प्रकल्प संस्थेने हिंडाल्को कंपनीच्या अर्थसहाय्यातून राबविला आहे. या महिलांना निवासी प्रशिक्षण व प्राथमिक औषधोपचार पेटी दिली जाते.

सरकारी अनुदानापासून चार हात दूर: कर्नाटकातील गटप्रभातील वैद्यकीय सेवा कार्यासाठी सुप्रसिद्ध असणाऱ्या डॉक्टर माधवराव वैद्य यांचा कांचनताई यांच्या विचारांवर ठसा होता. आपली बुद्धिमत्ता सरकार दरबारी मंत्र्यांच्याद्वारे कधी गहाण टाकता कामा नये. नवनवीन अभिनव प्रकल्पांचा अवलंब करत आपण आपले अंगीकृत काम स्व-समाधानासाठी करत राहावे बाकी जगन्नियंत्याची शक्ती पाहून घेईल. सत्ता, पैसा, प्रतिष्ठा यांच्यापासून दूर राहून निस्वार्थपणे काम करत राहिल्यास यशआपलेच असते. आपला स्वाभिमान कायम जिवंत ठेवावा असे ते कांचनताईंना सांगत. त्यामुळे सरकारी अनुदानाच्या मागे धावायचे नाही असे स्वबंधन त्यांनी संस्थेत सुरुवातीपासूनच घालून घेतले होते. शासकीय अनुदान मिळवण्यासाठी खटपटी व खटाटोप करत प्रकल्पांच्या कागदपत्रांच्या जंजाळात संस्था यामुळे कधीही अडकली नाही हे विशेष.

नाविन्यपूर्ण अभिनव उपक्रम व प्रेरित मनुष्यबळ हाती असेल तर सुरुवातीला हाताशी पैसे नसतानाही चांगले काम उभे राहू शकते. एकदा का काम उभे रहायला सुरुवात झाली की, पाठोपाठ पैसा उभा राहत जातो. नुसता व्यवसायिक अथवा व्यापारी दृष्टिकोनातून सेवाभावी वृत्ती कामाच्या मुळाशी हवी हेच खरे! त्यामुळे आता संस्थेच्या कोणकोणत्या कामासाठी व किती निधी हवा आहे अशी विचारणा चांगल्या चांगल्या व्यक्ती व संस्थाकडून होत असते, हे स्वयंसिद्धाचे खरे यश आहे.

पिढ्यानपिढ्या परंपरेचे जोखड मानेवर बाळगणाऱ्या स्त्रीने एक प्रकारचा न्यूनगंड सतत मनात जोपलेला असतो. या न्यूनगंडातून शहरी व ग्रामीण महिलांना बाहेर काढण्याचे आवाहन कसे पेलले? असे कोणी कांचन ताईला विचारले, तर त्या सहजपणे म्हणतात, "कोणताही कठीण कठीण धातू शेवटी वितळतोच ना? आपण त्याच्यासाठी किती उष्णता देतो हे महत्त्वाचे!" कोल्हापूरसारख्या परंपरावादी शहरात तर हे तीन दशकापूर्वी घडवून आणणे हे खरेच मोठे आव्हानात्मक होते.

आज आत्ता याच दिशेने महाराष्ट्रभर बचत गटांच्या चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या सबलीकरणाला एक वेगळी दिशा मिळाली आहे. परंतु हे बचत गट फक्त कर्जवाटपासाठी अथवा केवळ आर्थिक व्यवहारासाठी नसून, ते एक अनौपचारिक शिक्षणाचे व्यासपीठ आहे. ती लोकशाहीची प्रयोगशाळा आहे. या कांचनताईंच्या विचारातून प्रेरणा घेऊन, व्यापक अंगाने त्याकडे बघायला हवे. या बचत गटांच्या चळवळीसाठी स्वयंसिद्धाचे काम हे एक दीपस्तंभासारखे आहे.

**- श्री. विवेक गिरिधारी**
**- संपर्क: कांचनताई परुळेकर**
**(०२३१) २८२८१२९, ७२१९४४२९४०**

# ६. सेवावार्ता : वार्षिक सर्वसाधारण सभा

ऑगस्ट आणि सप्टेंबर हे दोन महिने सर्व सेवा संस्थांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असतात. ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षण (ऑडिट) करून घेणे, वार्षिक गतीविधीचा अहवाल तयार करणे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख ठरविणे ही अत्यंत महत्त्वाची कामे या महिन्यात पूर्ण करावयाची असतात. सप्टेंबरअखेर वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक असते. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी पंधरा (१५) दिवसांची नोटीस द्यावी लागते. या नोटिसीमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यक्रमही (अजेंडा) द्यावा लागतो. सामान्यपणे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामाचा क्रम खालील प्रमाणे:

(१) नोटीस व कार्यक्रम पत्रिकेचे वाचन.

(२) गेल्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजुरी देणे.

(३) ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, हिशोब पत्रक व लेखापरीक्षकांचा अहवाल सभेस सादर करणे व त्यास मंजुरी घेणे.

(४) पुढील आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.

(५) गेल्या वर्षभरात केलेल्या कामाचा अहवाल सभेस सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

(६) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

कार्यकारिणी सदस्य निवडणुकीचे वर्ष असल्यास सर्वात शेवटी निवडणूक अधिकाऱ्याकडे सभेचे कामकाज सोपवून सर्वांनी सामान्य सभासद म्हणून सभागृहात बसणे अपेक्षित असते. निवडणूक अधिकारी त्यानंतर निवड प्रक्रिया सुरु करतात. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यास आवश्यक ती मदत करण्यासाठी संस्थेतील योग्य त्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे गरजेचे असते. निवडणूक प्रक्रियेनंतर नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा निवडणूक अधिकारी करतो व त्यांना सन्मानाने व्यासपीठावर बोलावले जाते. त्यांचे स्वागत व सत्कार होऊन सभेचे कामकाज संपते. संस्थेच्या घटनेत नमूद केल्याप्रमाणे कार्यकारिणी सदस्य संख्या आणि त्यांची निवड नियमितपणे करणे आवश्यक आहे.

नवनिर्वाचित सदस्यांच्या पहिल्या बैठकीत कार्याध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांची निवड करावी. बँकेचे खाते चालवण्यासाठी नवीन कोषाध्यक्ष, सचिव आणि गरजेनुसार आणखी एका सदस्याची यांची नावे पक्की करावीत व त्यासंबंधीची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यावर लगेचच त्याचे इतिवृत्त लेखन करणे हितावह असते. त्यामुळे कोणताही मुद्दा विसरला जात नाही. सभेत आलेल्या सूचना, त्यावर झालेली चर्चा व निर्णय सर्व बिनचूकपणे नोंदविता येतात. नवनिर्वाचित/ विद्यमान कार्यकारिणीने या इतिवृत्तास मान्यता देणे गरजेचे असते. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त हे निधी संकलन व इतर महत्वाच्या वेळीस आवश्यक कागदपत्र म्हणून दाखवता येऊ शकते. आपण सर्वजण अशाच पद्धतीने कामकाज करत असाल. तरीही वार्षिक सर्वसाधारण सभा योग्य पद्धतीने व्हावी यासाठी हा लेखन प्रपंच.

-श्री. सोमदत्त पटवर्धन

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन – कार्यवाह
श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य
सौ. गिरीजा सिरशीकर – प्रकल्प व्यवस्थापक
श्री. आमोद काटीकर – प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी
श्री. आशिष कुवळेकर
श्री. विनायक करमरकर
श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी
एक विश्वासार्ह सहकारी

सेवावर्धिनी
एक विश्वासार्ह सहकारी

# सेवा तरंग 2.0

## सेवा वार्ता

अंक ७
२०२४-२५

सेवावर्धिनी
नोंदणीकृत पत्ताः ३९० ब, नारायण पेठ, "दत्तधाम", राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०
कार्यालयः "चंदन"२६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ चैतन्य महिला मंडळ
महिला सशक्तीकरण आणि सामुदायिक परिवर्तनाचा आधारवड

२.२ भगिनी निवेदिता प्रतिष्ठान :
निराधार महिलां मुलींसाठीचे आधार मंदिर

३. संस्था संचालन – सामाजिक आर्थिक सर्वेक्षण

४. सेवावर्धिनी दिवाळी किट वितरण
देणगीदारांचे योगदान

५. सेवाव्रती

५.१ डॉ .गिरीश कुलकर्णी

५.२ तेजस्वी सेवेकरी

६. FCRA संदर्भात नवीन निर्देश

# १. मनोगत

**नमस्कार मंडळी.**

सेवावर्धिनीच्या रौप्य महोत्सवानंतर सहा वार्तापत्रे व सहा प्रशिक्षणे असा वर्षभराचा जाहीर केलेला कार्यक्रम आपण यशस्वीरित्या पूर्ण केला. यात आपला सहभाग, तज्ज्ञ व्यक्तींनी सेवा संस्थांना उपयोगी ठरणाऱ्या विषयांवर केलेले अभ्यासपूर्ण लेखन व त्यानंतरची त्याच विषयावर आपल्याशी साधलेला संवाद, विविध सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या ज्येष्ठ सेवाव्रती व सेवा संस्थेचा परिचय यामुळे हा संपूर्ण प्रवास आनंददायी व फलदायी ठरला यात शंका नाही.

मार्च २०२४ पर्यंत हा कार्यक्रम असाच चालू ठेवण्याचा आमचा मनोदयही गेल्या प्रशिक्षणामध्ये आम्ही व्यक्त केला होता. त्यानुसार चैतन्य महिला मंडळ व भगिनी निवेदिता प्रतिष्ठान या समाजाने दुर्लक्षित केलेल्या महिलांचे पुनर्वसन करुन त्यांना आत्मनिर्भर बनवणाऱ्या दोन संस्थांची प्रेरणादायी ओळख आपणास या अंकात होणार आहे. कोणतेही काम सुरु करण्यापूर्वी आवश्यक असलेले सर्वेक्षण का व कसे करावे यासंबंधीचा यांचा अभ्यासपूर्ण लेख या अंकाची गुणात्मकता वाढवणारा असणार आहे.

या संपूर्ण प्रवासात तुम्ही आमच्या बरोबर आहातच, ते स्वयंस्फूर्तपणे असावे असे वाटते. अनेक वेळा आठवण करुनही आपल्या लेखी प्रतिक्रिया आमच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. त्यामुळे आपण अंक वाचला की नाही? वक्त्यांनी मांडलेले विचार आपणापर्यंत नीट पोहोचले की नाही,? या सत्रांचा आपल्या संस्थांची गुणवत्ता वाढीसाठी उपयोग झाला की नाही? हे आम्हाला समजत नाही. एप्रिल पासून आपण नव्या स्वरुपात आपणाशी संवाद साधणार आहोत त्यासाठी या कार्यक्रमाच्या स्वरुप कसे असावे? कोणते विषय हाताळावेत,? याबाबत आपली मनमोकळी मते आम्हास लेखी स्वरुपात कळविल्यास हा नवीन कार्यक्रम अधिक प्रेरणादायी व सर्व संस्थांची गुणात्मक व आर्थिक वाढ करणारा ठरावा. आपल्या भरभरुन येणाऱ्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहत आहोत.

**- कार्यवाह, सेवावर्धिनी**

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.१ चैतन्य महिला मंडळ

## महिला सशक्तीकरण आणि सामुदायिक परिवर्तनाचा आधारवड

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: जिथे महिलेची पूजा केली जाते तिथे देव वसतो असे म्हणतात . एका महिलेस मदत केली तर ती पुढे १०० महिलांस मदत करण्याच्या ताकदीस उतरते हे लक्षात घेऊन पुण्यात एका संस्थेचे गेली ३२ वर्षे महिलांचा आधार बनलेली आहे. चैतन्य महिला मंडळ हे महिलांसाठी, मुलांसाठी आणि संपूर्ण कुटुंबांसाठी आशेचा, सामर्थ्याचा आणि दृढतेचा एक प्रकाशमान स्तंभ म्हणून उभे आहे . १९९२ मध्ये ज्योती पठानिया यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या या संघटनेने महिलांच्या सशक्तीकरणासाठी, त्यांना आर्थिक स्वावलंबन देण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक व मानसिक भल्यासाठी अतुलनीय कार्य केले आहे.

### सशक्तीकरणाचा प्रवास: साध्या सुरुवातींपासून राष्ट्रीय मान्यता पर्यंत

चैतन्य महिला मंडळाची सुरुवात एक साध्या पण गहिऱ्या ध्येयाने झाली –"असा एक समाज निर्माण करणे जिथे महिलांना केवळ सदस्य म्हणून नाही, तर समाजाच्या प्रगतीत सक्रिय भागीदार म्हणून समाविष्ट केले जाईल". ज्योती पठानिया, ज्यांना शेती आणि कायद्याचा अभ्यास आहे, हे नेहमीच मानत होत्या की एक महिला सशक्त केली तर ती तिच्या कुटुंबाला आणि आसपासच्या समुदायाला देखील बदल घडवून देईल. त्यांच्या कामाची सुरुवात अगदी एखादं महिला मंडळ सुरु करण्यापासून होते तशी झाली. लवकरच समाजात काही महिलांची अवस्था कशी बिकट आहे हे त्यांच्या लक्षात आलं आणि त्यातूनच त्यांना समाजातील प्रश्नांची,समस्यांची समज आली, भान आले. यातून त्यांचे 'कुटुंब सखी' हे समुपदेशन केंद्र सुरु झाले.

या दरम्यान ज्योतीताईच्या असं लक्षात आलं की खूपशा अशाही महिला आहेत ज्यांना कौटुंबिक हिंसाचाराचा किंवा त्यास्वरुपाचा प्रश्न सोडवताना घरच्यांची तसंच माहेरच्यांची साथ मिळत नाही. त्यामुळे अशा स्त्रियांना कुठे जावं, मार्ग कसा काढावा हेच कळत नाही. नेमकी त्याचं वेळेस ज्योतीताईनी पेपरमध्ये एक जाहिरात वाचली; त्यानुसार लगेच शॉर्ट होमसाठी अर्ज केला. त्यातूनच भोसरीजवळ मोशी येथे 'आश्रय' नावाच्या संस्थेचा जन्म झाला, जी अशा महिलांसाठी काम करते. २०१९ मध्ये 'सखी' हे वन स्टॉप सेंटर सुरु झालं जे २०२३ पर्यंत सुरु होते.

### शिक्षण आणि सांस्कृतिक वारशाचे संवर्धन

CMM मध्ये शिक्षणाला सशक्तीकरणाच्या मुख्य आधारस्तंभ मानले जाते. संस्था विविध शैक्षणिक कार्यक्रम पुरवते, ज्यात उन्हाळी सुट्ट्यांमध्ये बालसंस्कार केंद्रे आणि कमी उत्पन्न असलेल्या महिलांसाठी संगणक शिक्षण कार्यक्रमांचा समावेश आहे. हाय-व्हीजन कंप्युटर अकॅडमी मार्फत 120 हून अधिक महिलांना संगणकाचे प्रशिक्षण दिले गेले आहे, ज्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आणि आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग खुला झाला.

तसेच, CMM ने सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्यासाठी विविध परंपरेच्या सणांमध्ये आणि कार्यक्रमांमध्ये सहभाग वाढवला आहे. मकर संक्रांती, नवरात्री आणि नागपंचमी यासारख्या सणांचे आयोजन करून CMM ने सांस्कृतिक वारशाला प्रोत्साहन दिले आहे. या सणांद्वारे स्थानिक समुदाय एकत्र येतो आणि महिलांना आपल्या स्थानिक सांस्कृतिक ओळख जपण्याची संधी मिळते.



### आर्थिक स्वावलंबन: दारिद्र्याच्या बेड्या मोडणे

चैतन्य महिला मंडलाने महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी मोठे प्रयत्न केले आहेत. त्यांचे झुणका भाकर केंद्र महिलांना रोजगाराच्या संधी देत असून गरीब आणि गरजू लोकांसाठी स्वस्त जेवण पुरवते. या उपक्रमाने महिला सशक्तीकरणात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे आणि आर्थिक स्थिरतेला चालना दिली आहे. तसेच, संस्था महिलांना त्यांचे व्यवसाय सुरु करण्यासाठी, आर्थिक संसाधने मिळवण्यासाठी क्रेडिट सोसायट्यांशी जोडत आहे आणि सहकारी बँकांसाठी मदतही पुरवत आहे. CMM चा उद्देश केवळ तात्कालिक मदत देणे नाही, तर महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे आणि त्यांना दीर्घकालीन स्थिरता देणे आहे.

### कायदेशीर आणि मानसिक मदत: संकटाच्या काळात महिलांसाठी आधार

चैतन्य महिला मंडलाचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे महिलांच्या कायदेशीर आणि मानसिक स्थितीची काळजी घेणे. कौटुंबिक वाद, भावनिक संकटे किंवा कायदेशीर अडचणींचा सामना करणाऱ्या महिलांसाठी, CMM ने 'कुटुंब सखी' कौन्सेलिंग केंद्र आणि मोफत कायदेशीर मदत केंद्र सुरु केले. या उपक्रमांद्वारे महिलांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून दिली जाते आणि त्यांना कायदेशीर मदतीचा लाभ मिळतो. २००२ मध्ये, CMM ने 'आश्रय' नावाचे एक शॉर्ट-स्टे घर स्थापन केले, जिथे महिलांसाठी आणि मुलींसाठी सुरक्षित आश्रय उपलब्ध आहे. हे केंद्र महिला आणि मुलींना आश्रय, वैद्यकीय मदत, मानसिक आरोग्य सेवा आणि कायदेशीर सहाय्य देते. हे केंद्र 'स्वधार योजना' अंतर्गत आहे आणि त्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे महिलांना आणि मुलींना कुटुंबात पुनर्वसन करणे आणि समाजात पुन्हा सामावून घेणे.

### निष्पापांची रक्षा: रेड-लाईट क्षेत्रातील मुलांसाठी रात्रीची देखभाल केंद्र

चैतन्य महिला मंडलाने पुण्यातील रेड-लाईट क्षेत्रातील मुलांच्या संरक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. ह्या मुलांना त्या भयावह आणि वेदनादायक वातावरणातून दूर ठेवण्यासाठी CMM ने रात्रीची देखभाल केंद्र स्थापन केले आहे. या केंद्रात मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि प्रेमळ वातावरण मिळतो, जिथे ते शाळेच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करु शकतात आणि आनंदाने झोपू शकतात. रात्रीच्या देखभाल केंद्रात मुलांना जेवण, दूध, स्नॅक्स आणि शैक्षणिक मदतीची सुविधा दिली जाते. या केंद्राने मुलांना बालविकासाच्या सर्व पैलूंमध्ये सुरक्षित आणि प्रेमळ वातावरणात वाढण्याची संधी दिली आहे.













**पुढचे पाऊल:**

चैतन्य महिला मंडलाचे कार्य अजूनही विकसित होत आहे. यामध्ये नवीन इमारतीचा समावेश आहे, ज्यामध्ये १000 चौरस फूट जागेत *आश्रय* आणि *स्वावलंबन* प्रशिक्षण केंद्र समाविष्ट आहे. हे केंद्र महिलांना औद्योगिक उत्पादन, शिवणकाम आणि इतर व्यवसायिक कौशल्ये शिकवते, ज्यामुळे त्यांना रोजगार मिळवण्याच्या संधी वाढतात. तसेच, संस्था पुणे जिल्ह्यात *वन स्टॉप सोल्युशन मदत केंद्र* चालवत आहे. हे केंद्र महिलांना तात्काळ मदत पुरवते आणि त्यांना सुरक्षिततेसाठी विविध सेवा प्रदान करते. यामुळे महिलांच्या सुरक्षेसाठी CMM चा समर्पण पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे.

**कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन**

चैतन्य महिला मंडलाच्या कार्याने अनेक महिलांचे जीवन बदलले आहे, पण अजून खूप काही करणे बाकी आहे. संस्था देणगी, स्वयंसेवा आणि सामुदायिक मदतीच्या माध्यमातून आपले कार्य वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवते. प्रत्येक मुलीला शैक्षणिक आणि मानसिक मदत पुरवण्याचे कार्य, रात्रीच्या देखभाल केंद्रासाठी आर्थिक मदतीचे योगदान, किंवा व्यवसायिक प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी मदत पुरवून, आपण या मिशनमध्ये सहभागी होऊ शकता.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शब्दात मांडले तर , "तुम्ही एखाद्या पुरुषाला प्रगती करण्यास मदत केली, तर त्याचा फायदा त्याला होईल. पण तुम्ही एखाद्या महिलेला मदत केली, तर ती तिच्या कुटुंबाला आणि समाजाला मदत करेल." चैतन्य महिला मंडल मानते की प्रत्येक सशक्त महिला समाजासाठी एक शक्ती आहे. त्यांचे कार्य हे एक प्रेरणा आहे की बदल एका व्यक्तीपासून, एका कुटुंबापासून आणि एका कृतीपासून सुरु होऊ शकतो. चला, आपण एकत्र येऊन असा समाज निर्माण करुया जिथे महिला आणि मुलं सशक्त, सुरक्षित आणि समृद्ध होतील.


**– संपर्क –**

**www.cmmpune.org**

**jyoti.pathania@cmmpune.org**

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.२ भगिनी निवेदिता प्रतिष्ठान :
## निराधार महिलां मुलींसाठीचे आधार मंदिर.

डॉ. कुसुमताई घाणेकर या भगिनी निवेदिताच्या संस्थापिका. सामाजिक संवेदनांबाबत कुसुमकोमल व योजना राबवताना वज्रकठोर होत असलेल्या कुसुमताईंच्या विलक्षण कल्पक, धाडसी वृत्तीमुळे भगिनी निवेदिताने एड्स सारख्या महाभयंकर रोगाला बळी पडणाऱ्या महिलांसाठीची योजना अंगावर घेतली. अशी योजना राबवणारी ही आशिया खंडातली पहिली महिला संस्था होती. ज्या महिलांना मरणासन्न अवस्थेत घरी दवाखान्यातच काय कुठल्या मंदिर, मशीदीतही दयेचा आसरा मिळत नसे, मरतेवेळी उपचार राहोच, घोटभर पाणी वा नंतरचे अंत्यसंस्कारही करायला कुणी पुढं येत नव्हतं अशा महिलांना कुसुमताईंनी शेवटपर्यंत सांभाळलं. प्रसंगी समाजाचा विरोध, बदनामी पत्करुनही त्या घेतलेला वसा चालवत राहिल्या. आजवर हजारो पीडित मुली, महिला, निवेदिताच्या आधारवटाच्या सावलीखाली राहिल्या पुढे आपापल्या आयुष्यात स्थिरावल्याही. काय होती या मागची प्रेरणा ?

२८ जून एकोणीसशे पंचवीस सालचा कुसुमताईंचा जन्म. मॅट्रिक म्हणजे फार शिकलेली मुलगी वाटावे असे ते दिवस. कुसुमताईंचे अवांतर वाचनही भरपूर होतेच. राष्ट्र सेविका समितीच्या संपर्कात आल्यावर व मावशी केळकर यांच्याकडे पाहून आपणही असे काही भव्य, नि:स्वार्थी, समाजोपयोगी काम केले पाहिजे, हा विचार मनात रुजला. कुसुमताईंनी दोन निश्चय केले. एक डॉक्टर होण्याचा व दुसरा आजन्म अविवाहित रहाण्याचा. १९६७ साली समितीने भगिनी निवेदितांचे जन्मशताब्दी वर्ष स्पर्धा, कार्यक्रम, विशेषांक या माध्यमातून जोरदार साजरे केले. निव्वळ शताब्दी करुन थांबू नये तर निवेदितांप्रमाणे काहीतरी भरीव काम उभे केले पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले. मैत्रिणींशी संपर्क करुन त्यांना एकत्र आणले तर एक मोठे काम उभे करता येऊ शकते हा विश्वास त्यांना वाटत होता. महिला व मुले यांची उन्नती, त्यांचे दारिद्र्य व अज्ञान दूर करणे व ताईंनी कल्पना मांडावी नि कमलताईंनी पूर्ण निष्ठेने ती अमलात आणावी असे तहहयात चालू राहिले. कमलताईंनी शब्दश: तन- मन- धन सारे काही कुसुमताई व संस्था याला वाहिले होते.

त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणे, व देशाच्या भावी पिढीचे आरोग्य शिक्षण व संगोपन यासाठी जे काही करावे लागेल ते करणे हे ध्येय, निवेदिता ही प्रेरणा व त्यांचे "काम काम व सतत काम " हे वाक्य म्हणजे आपली कार्यपद्धती! भगिनी निवेदिता प्रतिष्ठान हे नाव ठरले! पहिला उपक्रम ठरला तो महिलांना हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्याचा."माहेर" नावाने राजवाड्यातील भाड्याच्या जागेतील एका खोलीत हे हक्काचे माहेर सुरु झाले. पुढे त्याचे रुपांतर काम करणाऱ्या महिलांसाठीच्या वसतीगृहात झाले. सुरक्षित जागा, उत्तम जेवण, घरगुती वातावरण यामुळे वसतीगृहामधे संख्या वाढत गेली.कुसुमताईंच्या समितीतील सहकारी कमलताई जोग, या प्रथमपासून कुसुमताईंसोबत खांद्याला खांदा लावून उभ्या राहिल्या. कुसुमता संस्था आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावी यासाठी कुसुमताईंनी कँटीन चालवायची कल्पना मांडली.राजवाडा परिसरात असलेल्या शाळांतील शिक्षकांना चहा, भजी, वडे असे गरम पदार्थ पुरवणे सुरु झाले. मग गावात एक दुकान घेऊन तिथे खाद्यपदार्थ, वह्या पुस्तके इ.चे विक्रीकेंद्र सुरु झाले.





महाराष्ट्राच्या समाज कल्याण खात्याशी संपर्क आला व संस्थेने करण्याजोग्या कामांची मालिकाच कुसुमताईंच्या डोळ्यासमोर दिसू लागली. सरकारची प्रौढ शिक्षणाची योजना मिळाली. त्या प्रौढ शिक्षण केंद्रांना सरकारकडून उत्तम केंद्रांची पारितोषिकेही मिळाली. संस्थेने ग्रामीण भागात घेतलेल्या सात जनसहभाग शिबिरांच्या यशामुळे देशभर अशी शंभर शिबिरे घेण्याचे काम संस्थेला मिळाले व या निमित्ताने गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश या राज्यात संस्थेचे पाऊल पडले.

शिबिराला यायला महिला उत्सुक असत पण मुलांमुळे त्या अडकून पडत. समाजाचा एकेक प्रश्न सुटा नसतो, तर प्रश्नांची गुंतागुंतीची  साखळी असते ही जाणीव ते प्रश्न सोडवू पहाणाऱ्याला होतेच. महिलांनी योजनांचे लाभ घ्यायला हवे असले तर घरातून त्यांचा पाय मोकळा व्हायला हवा, यातून पाळणाघरे सुरु झाली. देशभरात तीनशेच्यावर पाळणाघरे संस्थेच्या पद्धतीने, चोख शिस्तीने चालू झाली. पाळणाघरांच्या संचालिकांसाठी नियमित प्रशिक्षण वर्ग सांगलीतील जागेत सुरु झाले.

मग मुलांच्या आरोग्याचे प्रश्न समोर आले. त्यातून पोषक आहार, तयार पदार्थ देणे हे सुरु झाले. कुसुमताई स्वतः उत्तम सुगरण होत्या. संतुलित आहारासाठी त्या खूप प्रयोग करत. सोयाबीन तेव्हा इतके प्रचलित नव्हते. पण कुसुमताईंनी बालआहारात सोयाबीनची जोड देऊन अनेक पदार्थ कल्पकतेने बनवले होते. ते सांगलीत मथुताई करमरकरांच्या देखरेखीखाली 'सेंट्रल किचन' मधे तयार होऊन देशभरातील संस्थेच्या पाळणाघरांत वितरित केले जात.

कुसुमताईंच्या या प्रयोगांचे कौतुक ज्येष्ठ आहारतज्ञ डॉ .मालती कारवारकर यांनी “मी मांडत असलेले विषय प्रत्यक्ष आचरणात आणणारी अन्नपूर्णा” या शब्दात केले होते. सरकारची माध्यान्ह आहार योजना येण्यापूर्वीच कुसुमताईंनी असा आहार बनवून बालवाड्यांना पुरवणे चालूही केले होते. कुसुमताई सतत नवनवीन उपक्रम सुरु करत, त्याला माणसे जोडत व स्वत: पुन्हा नव्या स्वप्नाच्या पाठलागाला सुरुवात करत. राजवाड्यात स्वतःची वास्तू झाली. त्या जागेत व पुढे पोलीस स्टेशनच्या आवारात अशी दोन कुटुंब सल्ला केंद्रे सुरु झाली. नागपूरलाही भव्य वर्किंग वुमन्स होस्टेल सुरु झाले. संस्थेचे अनाथाश्रम सुरु झाल्यावर त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे ,व देशाच्या भावी पिढीचे आरोग्य शिक्षण व संगोपन यासाठी जे काही करावे लागेल ते करणे हे ध्येय, निवेदिता ही प्रेरणा व त्यांचे “काम काम व सतत काम” हे वाक्य म्हणजे आपली कार्यपद्धती! भगिनी निवेदिता प्रतिष्ठान हे नाव ठरले!

पहिला उपक्रम ठरला तो महिलांना हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्याचा. “माहेर” नावाने राजवाड्यातील भाड्याच्या जागेतील एका खोलीत हे हक्काचे माहेर सुरु झाले. पुढे त्याचे रुपांतर काम करणाऱ्या महिलांसाठीच्या वसतीगृहात झाले. सुरक्षित जागा, उत्तम जेवण, घरगुती वातावरण यामुळे वसतीगृहामधे संख्या वाढत गेली. कुसुमताईंच्या समितीतील सहकारी कमलताई जोग, या प्रथमपासून कुसुमताईंसोबत खांद्याला खांदा लावून उभ्या राहिल्या. कुसुमता पूर्ण अनाथ मुलींची शिक्षणे व विवाहापर्यंतची जबाबदारी संस्थेने सहजपणे घेतली. असे अनेक विवाह झाले. मुली माहेरपण, बाळंतपणाला हक्काने संस्थेत येऊ लागल्या. अगदी पहिली संभाळलेली मुलगी कल्पना, राजवाड्यात संस्थेची नवी इमारत झाल्यावर सासरहून धावत उत्साहाने “गारवा” घेऊन आली! आता निवेदिता हे खरेच एक विशाल कुटुंब बनले आहे!









सांगलीच्या जिल्हाधिकारी लीनाताई मेहेंदळे यांच्याशी चर्चा होऊन सांगली जिल्हयातील देवदासीप्रथा निर्मूलनसाठी काही ठोस प्रकल्प उभारावा असे ठरले. त्यांच्यामुळे संस्थेला जत येथे जागा मिळाली. तेथे देवदासी पुनर्वसन केंद्राची स्थापना झाली. पण हे चक्र थांबण्यासाठी त्यांची पुढली पिढी या प्रवाहापासून दूर ठेवून त्यांना चांगले शिक्षण देणे फार गरजेचे होते. त्यामुळे सरकारने याप्रश्नी लक्ष घालावे व देवदासींच्या मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहे चालवावीत हा विचार कुसुमताईंनी सरकारदरबारी रेटून योजना मंजूर करुन घेतली. जत येथे वसतीगृह सुरु झाले. एकावेळी ऐंशी नव्वद मुली वसतीगृहामधे असत. मुली उत्तम शिकणे, नोकरी करुन स्वयंपूर्ण होणे, व नीट संसाराला लागणे या सर्वच गोष्टी या प्रकल्पाने साध्य केल्या.

'एचआयव्ही एड्स' हा भयंकर आजार वेगाने जगभर पसरला. त्यावर उपाय माहिती नव्हते. देहविक्रय करणाऱ्या महिला याची दुर्दैवी शिकार बनत. उपचारच नाहीत, वर प्रचंड गैरसमज, घाणेरडा रोग म्हणून तिरस्कार, तुच्छता भरपूर होती पण उपायांचा विचार कुणी करत नव्हते. कुसुमताईंनी हे आव्हान स्वीकारायचे ठरवले. एनजीओ ही संकल्पनाही आली नव्हती त्या काळात "निवेदिता" ने अनेक सरकारी योजना यशस्वीपणे व प्रामाणिकपणे राबवल्यामुळे सरकारी यंत्रणेत संस्थेला विश्वासाचे, आदराचे स्थान होते. शासनाने अनेक संस्थांशी बोलणी केली पण कुणीच ही योजना घ्यायचे धाडस केले नाही. केले ते फक्त 'भगिनी निवेदिता' ने! एचआयव्ही विषयात महिलांच्या उपचार व पुनर्वसनाचा निवासी प्रकल्प चालवणारी निवेदिता ही आशिया खंडातली पहिली एनजीओ ठरली! यशवंतनगरला प्रकल्प सुरु झाला. आज परिस्थिती अशी आहे की शाळेचे वरचे नंबर वा बाह्य स्पर्धांची बक्षिसे पाहिली तर त्यात साऱ्या निवेदिताच्याच मुली दिसतात, त्यामुळे त्यांचे प्रवेश आपल्याकडे व्हावेत यासाठी आता शाळा गळ घालतात! आता नियमित एआरटी मुळे व आश्रमातील मोकळे आवार, शुद्ध हवा, चांगला आहार यामुळे मृत्यूदर जवळजवळ शून्यावर आला आहे !

यशवंतनगरच्या जागेत आता कुसुमताईंच्या नावाने रुग्णसेविका प्रशिक्षण केंद्र व कमलताईंच्या नावाने विद्यार्थिनी वसतीगृह दिमाखात उभे आहे. एका तरुण महिलेने इतकी मोठी स्वप्ने पहावीत व आपल्या हाताने एक एक वीट रचत हे निवेदिता मंदिर उभे करावे हे अद्भुत नाही का? आपल्या आराध्य दैवताची याहून चांगली उपासना ती कोणती? निवेदितांचे याहून सुंदर मंदिर काय असू शकेल? संस्थेने सुवर्णमहोत्सवी वर्षाचा टप्पा ओलांडला आहे. दोन वर्किंग वुमन्स होस्टेल, दोन समुपदेशन केंद्रे, तीन अनाथाश्रम, एक स्वाधार निवारा गृह, या जुन्या योजना उत्तम सुरु आहेत. २०१६ साली संस्थेने 'डॉ. कुसुमताई घाणेकर कौशल्य विकास संस्था' सुरु केली. या द्वारे आता महिला व मुलींसाठी विविध कोर्सेस अल्पदरात चालवले जातात. पॅरामेडिकल क्षेत्रातील व्होकेशनल बोर्डाची मान्यता असलेले नर्सिंग असिस्टंट, ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन, आय.सी.यू.टेक्निशिअन असे शासनमान्य कोर्सेस चालतात. काळाची गरज ओळखून संस्थेने जेरियाट्रिक केअर (वृद्धसेवा प्रशिक्षण) हे विशेष प्रशिक्षण सुरु केले आहे. या सोबतच अन्नपूर्णा या नावाने गरजू महिलांना केटरिंगचे प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे राहायला संस्था मदत करत आहे. पुढील वाटचाल करताना अनेक नवे प्रकल्प खुणावत आहेत. कुसुमताईंचे प्रेरक व्यक्तित्त्व व निवेदितांनी दिलेला विचारांचा वारसाच त्यासाठी बळ पुरवत आहे!

– विनीता तेलंग
9890928411

# ३. संस्था संचालन: सामाजिक आर्थिक सर्वेक्षण

भारत हा विविधतेने नटलेला, संस्कृतीने समृद्ध आणि परंपरांनी बांधलेला देश आहे. इथल्या शहरी भागातील धावत्या जीवनशैलीपासून ते ग्रामीण भागातील साध्या, शांत वातावरणापर्यंत अनेक रूपं अनुभवायला मिळतात. या भव्य विविधतेच्या कक्षेत वावरणाऱ्या लोकांच्या आव्हानांना, संधींना आणि स्वप्नांना समजून घेण्यासाठी सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण हे एक महत्त्वाचं साधन आहे. आकडेवारीचा पलीकडे जाऊन, हा अभ्यास लोकांच्या वास्तव आयुष्याचा आरसा बनतो, जो त्यांच्या जीवनातील समस्या आणि गरजा उलगडतो.

उदाहरणार्थ, २०११ च्या सामाजिक-आर्थिक व जातीय जनगणनेने (SECC) भारतातील ग्रामीण आणि शहरी जीवनाची खरी स्थिती समोर आणली. घरांतील उत्पन्नाचे स्त्रोत, जमिनीचे मालकी हक्क, आणि रोजगाराची स्वरूपं या सर्वांचा बारकाईने अभ्यास करत, प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) आणि राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (NFSA) सारख्या उपक्रमांना दिशा मिळाली. सदर लेख जलसंधारण व्यवस्थापनावर आधारित असून, उपजीविका, महिला सक्षमीकरण, शेती, युवक सक्षमीकरण यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी वेगवेगळी सर्वेक्षणे करता येतात.

एका ठराविक भूभागावर राहणाऱ्या मानवी समूह व समुदायाच्या कोणत्याही प्रश्नाविषयी सत्य माहिती मिळवणे, समस्यांचा पूर्ण परिचय करुन घेऊन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी किंवा त्याविषयी धोरण ठरवण्यासाठी सामाजिक आर्थिक सर्वेक्षण ही पद्धत उपयुक्त ठरते. काही वेळेस एखाद्या प्रस्थापित सिद्धांताची पडताळणी करण्यासाठी ही या सर्वेक्षणाचा उपयोग होऊ शकतो. सर्वेक्षण ही पद्धत तशी जुनीच आहे. इसवीसन पूर्वी ३०० या काळात हिरोडोटसने इजिप्त मधील लोकसंख्येची पाहणी केली तर ११ व्या शतकात इंग्लंडमध्ये काही सामाजिक प्रश्नांची पाहणी करण्यात आल्याची नोंद आहे. जॉन हॉवर्ड याने वेल्समधील तुरुंगांची पाहणी करुन कैद्यांची स्थिती व त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी तर फ्रान्समधील लेप्ले या सामाजिक सुधारकाने औद्योगिक कामगारांची स्थिती पाहण्यासाठी सर्वेक्षण केले.

त्याचप्रमाणे इसवीसन १८९० मध्ये अमेरिकेत जेकोब राईस यांनी झोपडपट्टीतील लोकांच्या आर्थिक जीवनमानाची पाहणी केली तर इसवी सन १९०९ मध्ये पॉल केलॉंग यांनी आधुनिकीकरण व नागरिकरणाचे समाजावरील परिणाम यांचा अभ्यास केला. सर्वेक्षणाद्वारे अल्लाउद्दीन खिलजीने सुद्धा त्याचे आर्थिक धोरण ठरवले तर शेरशहाने जमिनीवरील करविषयक धोरण सर्वेक्षणाच्या माध्यमातून ठरवले. अशी अनेक उदाहरणे आपल्याला इतिहासात पाहायला मिळतात. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार व जागरुकता यामुळे सर्वेक्षणाचे प्रमाण वाढले. आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, अर्थ विभाग, रिझर्व बँक ऑफ इंडिया, कामगार मंत्रालय, भारतीय संख्याशास्त्र विभाग, वेगवेगळी महाविद्यालये, शाळा, विद्यापीठे इत्यादींनी वेगवेगळ्या विषयांवर अथवा समस्या व त्यावरील उपाययोजना शोधण्यासाठी सर्वेक्षणे केली आहेत.

सर्वेक्षणाला इंग्रजीत “SURVEY” असे म्हणतात व या इंग्रजी शब्दाचा अर्थ म्हणजे चिकित्सक पाहणी किंवा माहिती घेणे असा होतो. गाव, शहर, कुटुंब, जात, जमात, वर्ग समूह असा कोणताही घटक घेऊन त्यातील लोकांची सामाजिक परिस्थिती त्यांचे परस्पर संबंध, त्यांच्या पुढील प्रश्न, त्यांच्यात होत असणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनाचे स्वरुप, आर्थिक परिस्थिती दिशा व गती इत्यादी माहिती गोळा करुन त्यांच्या समस्या शोधणे व त्यावर उपाययोजना सुचविणे सामाजिक सर्वेक्षणातून शक्य होते.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा फक्त जमीन, पिके, वनस्पती, माती, पाणी इत्यादींचे सर्वेक्षण व विकास यासाठीच नसून माणूस हा केंद्रस्थानी मानून त्याच्या सभोवताली असणाऱ्या सर्वच बाबींचा विकास या कार्यक्रमाला अभिप्रेत आहे. म्हणून माणसाची म्हणजेच गाव, समूह, समुदाय यांची सद्यस्थिती काय आहे? त्यांच्याकडे कोणती साधनसामग्री आहे? कशाची कमतरता आहे? कोणत्या गोष्टी जास्तीच्या आहेत? नेमक्या समस्या कोणत्या? याविषयी सत्य माहिती मिळाल्यावर उपाययोजना ठरवणे सोपे जाते. वरील बाबींची माहिती मिळवण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त ठरते. त्यासाठी काही पद्धती/ तंत्रे आहेत. त्याद्वारे माहिती गोळा करता येते व समस्या लक्षात घेऊन त्यानुसार उपाययोजना आखण्यासाठीची दिशा मिळते.

अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, कृषी, उत्पादन, पशुधन, ऊर्जा अशासारख्या मनुष्याच्या अनेक गरजा आहेत. त्याचप्रमाणे जनावरांना चारा, पाणी, निवारा, शेती विकास, दूध उत्पादन इत्यादी बाबीही मानवाशी संबंधित आहेत. या सर्व बाबी मनुष्याच्या विकासासाठी आवश्यक आहेत. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे नियोजन करताना उपरोक्त बाबींची नेमकी काय परिस्थिती आहे हे पाहूनच पुढील उपाययोजना ठरवता येणे शक्य होईल. सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करुन अशा समूहाची/गावाची सद्यस्थिती जाणून घेता येते. त्यातून समस्या समजून उपाययोजना शोधता येतात.

### माहिती गोळा करण्याच्या पद्धती:

कोणत्याही परिस्थितीत अनुभवावर आधारित व प्रत्यक्ष जाणवलेल्या घटनांना “माहिती” असे म्हणतात. माहितीचे दोन प्रकार असतात. १) प्राथमिक माहिती, २) दुय्यम माहिती. प्रकल्पाच्या किंवा कार्यक्रमाच्या नियोजनासाठी हवी असलेली माहिती स्वतः निर्माण करणे अथवा निरीक्षणातून गोळा करणे या पद्धतीने जमाविलेल्या माहितीस “प्राथमिक माहिती” असे म्हणतात. तर कार्यक्रमासंबंधी इतरांनी गोळा केलेल्या माहितीचा उपयोग नियोजनासाठी होतो अशा माहितीस “दुय्यम माहिती” असे म्हणतात.

### प्राथमिक माहिती मिळवण्याच्या पद्धती:

प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्र कार्य करावे लागते. त्यासाठी निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत या पद्धतीतून प्राथमिक माहिती गोळा करता येते.

### अ) निरीक्षण :

हेतूपूर्वक पद्धतशीरपणे पाहणे किंवा अवलोकन करणे म्हणजे निरीक्षण होय. ही एक क्रियाशील बाब आहे. डोळ्याबरोबरच विविध उपकरणे व साधने यांच्या सहाय्याने निरीक्षण करता येते व ते संग्रहित करता येते. उदाहरणार्थ कॅमेरा, दुरदर्शक, ध्वनी, चित्र मुद्रण वगैरे निरीक्षणात बौद्धिक, शारीरिक व मानसिक घटक सामावलेले असतात. जेव्हा निरीक्षक बाह्य सृष्टीतील एखादी घटना/पदार्थ पाहतो तेव्हा त्याचे संस्कार व्यक्तीच्या कोणता ना कोणत्यातरी इंद्रियावर होत असतात. इंद्रियावरील होणाऱ्या संस्कारामुळे मनाला बाह्य घटनेची/ पदार्थांची/क्रियांची जाणीव होत असते. कोणत्याही घटनेचे अथवा क्रियांचे निरीक्षण करायचे असल्यास नेमके कशाचे निरीक्षण करायचा आहे हे ठरवले पाहिजे. हेतू स्पष्ट असेल तर फक्त ज्या विशिष्ट गोष्टीची माहिती घ्यायची आहे तिचेच निरीक्षण करण्याचे भान आपोआपच राहते.

ज्या गोष्टींची माहिती नको आहे, त्या दिसत असूनही त्याकडे आपोआप दुर्लक्ष होते. याचाच अर्थ ज्या गोष्टींची माहिती घ्यायची आहे त्याचा हेतू स्पष्ट असेल तर निरीक्षण चांगले होते. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम ज्या गावात राबवायचा आहे अशा गावांमध्ये जाऊन, तेथे राहून, तेथील लोकांचे राहणीमान, अन्न, वेशभूषा, सवयी, लोकांचे स्वभाव, लोकांचे एकमेकांचे संबंध, पिण्याचे पाणी, गावातील सोयी सुविधा, सण, उत्सव, जमिनीचा प्रकार, पिके, मशागतीच्या पद्धती, विहिरीमधील पाण्याची पातळी, खडक खडकांचे प्रकार, जनावरे,दूध,झाडझाडोरा, गवत, पक्षी इत्यादी अशा अनेक बाबींची माहिती निरीक्षणातून गोळा करता येते. या माहितीचा उपयोग कार्यक्रमाचे नियोजन करताना होते.

### ब) मुलाखत:

अपेक्षित विषयांची माहिती काढताना संबंधित व्यक्तीची भेट घेतली जाते व वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा करुन माहिती मिळवली जाते अशा प्रकारे माहिती मिळवण्याचे माध्यम म्हणजे मुलाखत होय. या प्रक्रियेत माहिती देणारा व माहिती घेणारा यामध्ये संवाद होणे आवश्यक असते. त्यासाठी त्या दोघांची प्रत्यक्ष भेट घडणे आवश्यक असते. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या नियोजनाच्या अनुषंगाने गोळा करावयाच्या माहिती बाबतीत निवेदकांची संपर्क साधून त्यातील माहिती मिळवण्याचा अनुषंगाने प्रश्न विचारुन चर्चा करुन माहिती घ्यावी लागते. मुलाखतीचे दोन प्रकार असतात.

### १) औपचारिक मुलाखत :

औपचारिक मुलाखत या प्रकारात ज्या विषयांवर माहिती घ्यायची आहे त्यासंबंधी प्रश्नांची सूची तयार करुन घेतली जाते. त्या सूची प्रमाणे एका मागोमाग एक प्रश्न मुलाखत देणाऱ्या व्यक्तीस विचारुन माहिती मिळवली जाते. मुलाखत घेण्याअगोदर निवेदकाची निवड, त्यांना असलेली वेळ, मुलाखतीचे स्थळ ठरवून घ्यावे लागते.

### २) अनौपचारिक मुलाखत:

उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे कोणत्याही गावांचा आराखडा तयार करता येतो. मात्र आराखडा सारखाच असणार नाही. कारण गावाच्या परिस्थितीनुसार उपाययोजना बदलू शकतात. याशिवाय ठरवलेल्या उपाययोजनास लोकांची मान्यता असावी लागते. त्यास लोकांनी प्रतिसाद देणे आवश्यक असते. लोकांची मान्यता नसेल तर उपाययोजना यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून गावानुसार, तेथील स्थानिक परिस्थितीनुसार उपाययोजना ठरवून त्यानुसार त्याचा आराखड्यात अंतर्भाव करण्यात यावा.

## तथ्य संकलन

### प्रश्नावली:

सामाजिक आर्थिक संशोधनातील एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून प्रश्नावलीचा उल्लेख केला जातो. निरीक्षणाद्वारे निरीक्षक वस्तुस्थिती रेखाटू शकतो. परंतु व्यक्तींची मते, त्या मागच्या प्रेरणा, भावना, श्रद्धा इत्यादींचा अभ्यास करण्याकरता म्हणजेच निरीक्षणाच्या कक्षेबाहेरील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग होतो. प्रश्नावली ही प्रश्नांची एक पूर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. ही सामान्यता उत्तरदात्यांना पोस्टाने पाठवली जाते किंवा काही परिस्थितीत व्यक्तिशः त्यांना दिली जाते. दूरवर पसरलेल्या समूहामधील व उपगटातील व्यक्तींकडून माहिती गोळा करता येऊ शकणे हेच प्रश्नावलीचे वैशिष्ट्य आहे. जोहान ग्याकटुंगच्या मते प्रश्नावली म्हणजे "लिखित प्रश्न व लिखित प्रत्युत्तर". प्रश्नावली तंत्रात उत्तरदात्याच्या वर्तनाबद्दलच्या माहितीकरता पूर्णतः त्याच्याच विधानावर जास्तीत जास्त विसंबून राहावे लागते. प्रश्नावलीचा अभ्यास करताना प्रश्नावलीची रचना, प्रकार, फायदे, तोटे इत्यादींचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**१) प्रश्नावली प्रकार :** अभ्यास विषयाचे स्वरुप, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नावलीची रचना इत्यादी अनेक आधारावर प्रश्नावलीचे प्रकार करता येतात. परंतु रचनेच्या आधारावर प्रामुख्याने दोन प्रकार केले आहेत. अ) संरचीत प्रश्नावली, बा) असंरचित प्रश्नावली

**अ) संरचीत प्रश्नावली:** ह्यामध्ये समाविष्ट केलेल्या प्रश्नांचे स्वरुप पूर्वनिर्धारित, सुस्पष्ट व निश्चित असते. प्रश्नांचे स्वरुप व त्याची पर्यायी उत्तरे समस्येच्या व गृहीत कृत्याच्या अभ्यासाच्या आधारावर योजनाबद्धरीत्या तयार केलेली असतात. या प्रश्नावलीत बंदिस्त व खुले प्रश्न विचारले जातात. बंदिस्त स्वरुपाच्या प्रश्नांमधून पर्यायी उत्तरांचा पल्ला व विस्तार निर्धारित झालेला असतो व त्यापैकी एका उत्तराची निवड करण्याचे बंधन उत्तरदात्यांवर असते. या उलट खुल्या प्रश्नांमध्ये तत्वतः त्यांना वाटेल त्याप्रमाणे प्रश्नाचे उत्तर देण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते.

## बंदिस्त प्रश्नावली

**फायदे :**
१) प्रश्न उत्तरदात्यांना विचारण्यास व ते त्यांना समजण्यास सोपे जाते.
२) माहितीच्या विश्लेषणात वेळ व श्रम यांची बचत होते व विश्लेषण सुलभ जाते.
३) प्रश्न व उत्तरातील सुसंगतीमुळे उत्तरामध्ये तुलना शक्य होते व निष्कर्ष काढणे सोपे होते.

**तोटे :**
१) विषयाबाबत माहिती नसल्यास कोणते ना कोणते उत्तर देण्याविषयीचे दडपण उत्तरदात्यावर येते.
२) उत्तरदात्याच्या मतामधील अस्पष्टता व संदिग्धता दिलेल्या उत्तरावरुन उमगून येत नाही.
३) मतांच्या विविध छटा टिपण्यास असमर्थ असतात.
४) प्रश्नांची प्रतिक्रिया खरी असेलच असे सांगता येत नाही.
५) स्पष्ट दात्यांच्या स्वतंत्र विचाराला आळा बसतो.

**खुली (मुक्त) प्रश्नावली फायदे :**
१) उत्तरदात्याला स्वतःचे मत देणे शक्य होते.
२) व्यक्ती एखाद्या विषयासंबंधी आपले मत कसे बनवित जाते हे समजू शकते.
३)तपशीलवार माहितीची उपलब्धता व अधिक संशोधन मूल्य.

**तोटे :**
१) विश्लेषण हे जास्त खर्चिक व कठीण असते व क्लिष्ट असते.
२) विसंगत माहिती मिळू शकते.
३) बऱ्याच प्रश्नांचा अर्थ भिन्न उत्तरदात्यांकडून भिन्नपणे लावला जातो.
४) उत्तरात व्यक्तीनिष्ठता आढळते.

**असंरचित वा संरचनाविहीन प्रश्नावली:**
निरनिराळ्या विषयांबाबत लोकांचे असणारे दृष्टिकोन त्यांची मते व अभिवृत्ती जाणून घेण्यासाठी या प्रश्नावलीचा उपयोग होतो. माहितीतील परस्पर संबंधांचा अभ्यास करता येतो. उत्तरदात्यांना आलेले अनुभव व अनुभवाची सांगड घालून विषया संबंधीची माहिती समजून घेणे हे या प्रश्नावलीचे मुख्य उद्दिष्ट आहे. लवचिकता या प्रश्नावलीचे खास वैशिष्ट्य आहे. बँकेच्या राष्ट्रीयीकरणाबाबत तुम्हाला काय वाटते? अशा नमुन्याचे प्रश्न या प्रश्नावलीत विचारले जातात. यातील प्रश्नात व्यवस्था बद्धता नसते, माहिती तुलनाक्षम नसते हा या पद्धतीचा मुख्य दोष आहे.

**प्रश्नावलीची रचना:**
निवेदकाला समजेल व त्याच्या मनात प्रश्नाविषयी कोणतीही शंका अगर संशय निर्माण होणार नाही अशा तऱ्हेने अभ्यासकाने प्रश्नावलीची रचना करणे गरजेचे असते. पाहणीच्या अर्थपूर्णतेच्या व अचूकतेच्या दृष्टीने प्रश्नांची व शब्दांची काळजीपूर्वक निवड व्हावयास पाहिजे. स्थूल मानाने प्रश्नावली तयार करताना खालील विचार अभ्यासकाने केला पाहिजे.

१) आपणास कोणती माहिती संकलित करायची आहे व कोणत्या प्रकारच्या प्रश्नावली चा उपयोग करावयाचा ते ठरवावे. ज्यांच्याकडून माहिती मिळवायची आहे त्या लोकांचा नमुना, संकलित माहितीच्या विश्लेषणाची पद्धत, प्रश्नावली उत्तरदात्यांपर्यंत पोहोचवण्याची पद्धत, इत्यादी गोष्टींवर प्रश्नावलीचा प्रकार अवलंबून असतो. प्रश्नावलीत बंदिस्त प्रश्न की मुक्त प्रश्न विचाराचे याचाही विचार करणे गरजेचे असते.

२) कच्चा आराखडा: विषयाच्या प्रश्नांचा सर्वोत्तम क्रम राखण्यासाठी प्रश्नावलीचा कच्चा आराखडा तयार करावा लागतो. प्रत्युत्तरांची व विश्वसनीयते करता प्रश्नातील शब्दरचना व प्रश्नावली मध्ये परस्पर संबंध साधण्याकरता प्रश्न मालिकेत वेगवेगळ्या स्थितीवर प्रश्न असणे आवश्यक असते.

**३) प्रश्नांचे पुनर्परीक्षण:** व्यक्तिगत मुल्यामुळे व पूर्वग्रहामुळे येणारे दोष व तांत्रिक स्वरुपाचे दोष काढण्यास करता काळजीपूर्वक तपासणी करणे गरजेचे आहे.

**४) प्रश्नांची पूर्व चाचणी व संस्करण:** प्रश्नावलीने आपले ध्येय साध्य होते की नाही हे पाहण्यासाठी तसेच प्रश्नावलीत फेरफार करणे आवश्यक आहे काय हे ठरवण्यासाठी प्रत्यक्षात प्रश्नावलीचा उपयोग करण्यास सुरुवात करण्यापूर्वी तिची पूर्व चाचणी घेणे आवश्यक असते. पूर्व चाचणीनंतर प्रश्नावलीचे संस्करण म्हणजेच प्रश्नावली तील प्रत्येक घटकांची काळजीपूर्वक तपासणी करणे आवश्यक असते. त्या तपासणीत प्रश्नांचा आशय, प्रश्नांचे स्वरुप, प्रश्नांचा क्रम, प्रश्नांमधील अंतर व प्रश्नांची रचना इत्यादी गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवणे गरजेचे आहे. प्रश्नावली चा उपयोग करताना ती शक्य तितकी सुबोध व सोपी करणे हा संस्करणामागील मुख्य हेतू असतो.

**५) प्रश्नावलीचा आकार:** सर्वेक्षणाच्या व्याप्तीवर प्रश्नावलीचा आकार अवलंबून असतो. परंतु तो प्रमाणाबाहेर जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असते. प्रश्नावलीचा एका बाजूनेच उपयोग करावा व मागील बाजू रिकामी ठेवावी. आवश्यक तोच प्रश्न व आवश्यक तेवढेच स्पष्टीकरण दिल्यास प्रश्नावलीचा आकार मर्यादित ठेवता येतो.

**६) आकर्षक स्वरुप:** प्रश्नावलीसाठी वापरण्यात येणारा कागद टिकाऊ, आकर्षक व त्यावरील छपाई अधिक सुटसुटीत व लक्ष वेधणारी असणे आवश्यक असते. प्रश्नावलीला योग्य समास सोडणे आवश्यक आहे. तसेच प्रश्नावली आकर्षक करण्याकरता एकाच रंगाच्या कागदाऐवजी वेगवेगळ्या रंगाच्या कागदांचा उपयोग करणे आवश्यक ठरते.

**७) प्रश्नांची व विधानांची रचना, प्रश्नांची मांडणी व प्रश्नांचा क्रम:** प्रश्नात क्लिष्टता असू नये. उस्फूर्त प्रतिसाद मिळवण्याकरिता प्रश्न व त्यांची उत्तरे उत्तरदात्यांच्या कुवतीतील असावी. वादग्रस्त विषयावरील प्रश्न विचारताना व्यक्तीच्या भावना, श्रद्धा इत्यादींवर आघात होणार नाही याची काळजी घ्यावी. खाजगी प्रश्न विचारताना जसे व्यसन, छंद, गुप्तरोग, अश्लीलपणा इत्यादींवर प्रश्न विचारताना शब्दांची निवड व मांडणी काळजीपूर्वक करावी. प्रश्नांची मांडणी करताना निवेदकाबाबत काही मते गृहीत धरता कामा नयेत. प्रश्नांचा क्रम तर्कशुद्ध म्हणजे सुसंगत असणे आवश्यक आहे. सर्वात सोपे प्रश्न वस्तुनिष्ठ प्रश्न घ्यावेत. एखाद्या विषया संबंधित प्रश्न एकत्रित यावेत. कालक्रम व विषय क्रमांत सुसंगतपणा असणे आवश्यक आहे. काळ व वेळ यांचा क्रम प्रश्न विचारताना लक्षात घ्यावा. संवेदनाशील प्रश्न, धर्म, जात, लैंगिक माहिती तसेच खुले प्रश्न शेवटी विचारावेत.

### प्रश्नावलीतील प्रश्नांचे प्रकार:

सर्वेक्षणातील प्रश्नांच्या स्वरुपात व आशयात भिन्नता असणे क्रमप्राप्त असले तरी सर्वसामान्यपणे निरनिराळ्या प्रश्नावलींचाही ढोबळमानाने तीन वर्गात समावेश करता येतो.

१) परिचयात्मक माहिती संबंधित प्रश्न: व्यक्तीची व कुटुंबाची ओळख करुन घेण्यासाठी विचारण्यात येणारे प्रश्न

२) उत्तरदात्याच्या सामाजिक पार्श्वभूमी संबंधीचे प्रश्न: कुटुंब प्रमुखाचे वय, जन्मस्थान, वैवाहिक स्थिती, धर्म, मते, कुटुंबाचा आधार इत्यादी विषयासंबंधी विचारण्यात येणारे प्रश्न

३) सर्वेक्षणाशी संबंधित असणारे प्रश्न: सर्वेक्षणासंबंधीची माहिती संकलित करण्याकरता विचारण्यात येणारे प्रश्न.

### प्रश्नावलीचा प्रतिसाद :

उत्तरदात्यांकडून योग्य प्रतिसाद मिळावा म्हणून खालील गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

१) आवाहन: सर्वेक्षकाने निवेदकांच्या मनातील शंका, कुशंका समज, गैरसमज दूर करण्याकरता प्रश्नावली सोबत आवाहन करणे गरजेचे आहे. यामध्ये सर्वेक्षणाचा हेतू ,उद्देश इत्यादी बाबतचा समावेश असावा. प्रश्नावलीचे महत्त्व व ती कशी भरावी यासंबंधी माहिती तसेच आवश्यक असल्यास निवेदकाचे नाव गुप्त ठेवण्याची हमी यात असावी.

२)प्रश्नावलीची चाचणी: प्रश्नावलीची पूर्व परीक्षा व चाचणी घेतल्यास त्यात असलेल्या त्रुटी वगळून प्रश्नावलीला अधिक चांगला प्रतिसाद मिळवता येतो.

**प्रश्नावलीचे फायदे :**

माहिती संकलनाच्या इतर तंत्राच्या तुलनेत प्रश्नावलीचे फायदे खालील प्रमाणे.

१) विस्तृत प्रदेशातील जास्तीत जास्त लोकांकडून माहिती मिळवता येते तसेच श्रम वेळ व आर्थिकदृष्ट्या कमी खर्चाचे आहे.

२) व्यक्ती निरपेक्ष माहिती संग्रहण करता येते वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे शक्य होते.

३) प्रश्नावली ची अनामिकता

४) निवेदकाला विचार करायला वेळ मिळतो.

५) उस्फूर्त प्रतिक्रियांना वाव असतो.

६) विश्वसनीय माहिती मिळू शकते: विचार करण्याला संधी, निवेदनिकांचे नाव गुप्त ठेवणे, उस्फूर्त प्रतिक्रियेला वाव.

**प्रश्नावलीचे तोटे :**

१) साक्षर व सुशिक्षित लोकांनाच या तंत्राचा वापर करता येतो.

२) जर सर्वेक्षण पत्राने करावयाचा असेल तर सगळ्याच व्यक्ती योग्य वेळी पोस्टात पत्र पाठवतील असे नाही. १० ते ५० टक्के प्रश्नावली परत येणार नाहीत असे अपेक्षित धरावे लागते.

सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण हे केवळ तथ्ये सादर करणारे साधन नसून, ते समाजाच्या मनोवृत्तीचा आणि जीवनशैलीचा गाभा उलगडणारे प्रभावी माध्यम आहे. अशा सर्वेक्षणांमुळे समाजातील भिन्न स्तरांमध्ये एक नवा संवाद सुरु होतो, जो विकासाचा पाया मजबूत करतो. भारताच्या सर्वांगीण आणि शाश्वत प्रगतीसाठी या अभ्यासाचा प्रवास अधिकाधिक महत्त्वाचा ठरतो आहे.

# ४. सेवावर्धिनी दिवाळी किट वितरण

सेवावर्धिनी ही संस्था मागील २६ वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध सहयोगी संस्थांसोबत संस्था बांधणी, महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास, आरोग्य, जलसंधारण यांसारख्या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. यंदाच्या दिवाळीच्या निमित्ताने सेवावर्धिनीने दुर्गम भागातील जनजाती महिलांसाठी विशेष दिवाळी किट वितरण मोहिम राबवली. या उपक्रमाचा उद्देश सणासुदीच्या काळात महिलांना आनंद देणे, त्यांना सन्मानाची जाणीव करुन देणे आणि त्यांच्यासोबत एक सामाजिक संवाद साधणे हा होता.

दिवाळी हा सण प्रकाशाचा आणि उत्साहाचा आहे. मात्र, अनेक दुर्गम भागातील जनजाती कुटुंबांना या सणाचा खरा आनंद घेणे शक्य होत नाही. सेवावर्धिनीने या कुटुंबांना दिवाळीचा आनंद मिळावा म्हणून सुमारे हजार महिलांना दिवाळी किट वाटपाचा उपक्रम हाती घेतला. या किटमध्ये साडी, फराळाचे साहित्य, उटणे व सुगंधी अभ्यंग तेल यांचा समावेश करण्यात आला होता. दिवाळी किटच्या तयारीसाठी सेवावर्धिनीचे कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी संपूर्ण नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. सर्व वस्तूंची गुणवत्ता तपासून त्या जपून पॅक करण्यात आल्या. वितरणासाठी संस्थांनी त्यांच्या गरजा आणि पोहोच पद्धतीनुसार किट्स स्वीकारल्या. काही किट्स कुरियरद्वारे, काही प्रवासी सेवेद्वारे तर काही कार्यालयातून प्रत्यक्ष घेतल्या गेल्या.

वितरणातील सहयोगी संस्था व प्रकल्प :

- संसदीय संकुल विकास परियोजना (भोरमाळ व नंदुरबार)
- जनजाती कल्याण आश्रम
- शिवसेवा प्रतिष्ठान, लोणावळा
- NEED (गडचिरोली व यवतमाळ)
- नवी उमेद, पांढरकवडा
- किसान बहुउद्देशीय संस्था, यवतमाळ
- राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था, मुळशी
- डोंगरवाटा जनजीवन सामाजिक सेवा संस्था









## देणगीदारांचे योगदान

या उपक्रमासाठी विविध देणगीदारांकडून सहकार्य मिळाले. सोशल मीडिया आणि वेबसाइटवर जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर मिळालेला प्रतिसाद उत्तम होता. अनेक देणगीदारांनी मोठ्या प्रमाणावर या उपक्रमात सहभाग घेतला. अजूनही काही देणगीदारांनी त्यांचे योगदान देणे बाकी असल्यास, त्यांनी संस्थेशी संपर्क साधावा अशी विनंती करण्यात येत आहे.

दिवाळी किट वाटप उपक्रमाने सुमारे हजार महिलांना आनंदाचा अनुभव दिला. या उपक्रमामुळे केवळ सण साजरा करण्याची संधी मिळाली नाही, तर सेवावर्धिनी व सहयोगी संस्थांमधील संबंध अधिक घट्ट झाले. महिलांनी या वस्तू केवळ उपभोगाच्या वस्तू नसून आपल्यावरील प्रेमाचा आणि आदराचा प्रतीक मानले. सेवावर्धिनीचा हा उपक्रम समाजातील गरजू लोकांसाठी आनंददायी ठरला. या यशस्वी मोहिमेमुळे समाजाच्या विविध स्तरांतील लोकांपर्यंत सेवावर्धिनीची सेवा पोहोचली. भविष्यातही अशा अनेक उपक्रमांसाठी सेवावर्धिनी प्रयत्नशील राहील.

**सेवावर्धिनी परिवाराकडून सर्व देणगीदार, स्वयंसेवक, व सहयोगी संस्थांचे मनःपूर्वक आभार !**

# ८. सेवाव्रती

## ८.१ डॉ .गिरीश कुलकर्णी

कोणतेही सेवाकार्य हे मूलतः संवेदनशील कार्यकर्त्यांच्या प्रेरणेतून अंकुरते. अहमदनगर मध्ये शालेय जीवनात शिकवणीसाठी लालबत्ती भागातून जाताना - येताना आपल्याच वयाच्या अल्पवयीन मुली एका शाळकरी मुलाला दिसल्या. त्याच्या आईच्या आणि आजीच्या वयाच्या महिला देखील जबरदस्तीने तेथे देह व्यापारात वापरताना दिसल्या. या जागी आपल्या कुटुंबातील कोणी व्यक्ती उभी असेल तर काय वाटेल, या विचाराने त्याचे हृदय पिळवटले. डॉ .गिरीश कुलकर्णी यांची शालेय जीवनातील ही वेदनाच स्नेहालय संस्थेची कार्य प्रेरणा बनली. शालेय जीवनात घनश्यामजी देशपांडे तथा बाबाजी यांच्या प्रेरणेतून अहिल्यानगर मधील मार्कंडेय शाखेत स्वयंसेवक म्हणून सहभाग राहिला.

१९८४ मध्ये अहिल्यानगरच्या पेमराज सारडा महाविद्यालयात प्रवेशल्यावर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे च्या कार्यात गिरीश यांनी सहभाग घेतला. या काळात प्राध्यापक यशवंतरावजी केळकर, सदाशिवराव देवधर, डॉ.अशोकराव मोडक, प्राचार्य (नि.)अनिरुद्धजी देशपांडे, यांच्यासह असंख्य पूर्णवेळ कार्यकर्त्यांचा सहवास आणि मार्गदर्शन लाभले. भारतमातेची सेवा म्हणजे आपल्याच वंचित बंधू-भगिनींची सेवा, हे समीकरण उमजले. त्यातून समाजाच्या सर्वात तळातील वंचितांसाठी आपल्या क्षमता वापरण्याची कृती सुरु झाली. एका सेवा कार्याचे बीजारोपण झाले. देहव्यापार आणि मानव तस्करीच्या बळी महिला आणि बालकांची अवस्था गुलामांसारखी असते.त्यांची मुक्तता आणि पुनर्वसन करणारी भारतातील इतरांसाठी प्रेरक आणि अग्रणी सामाजिक संस्था म्हणजेच अहिल्यानगर येथील 'स्नेहालय'.

स्नेहालय हा एक नोंदणीकृत ट्रस्ट आहे. परंतु याचे स्वरुप मात्र एका मोठ्या कुटुंबासारखे आहे. प्रेमाच्या धाग्यांनी बांधलेल्या या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे 'होम ऑफ लव्ह'. गेली ३८ वर्षे येथे वंचितांना - अनाथांना सुरक्षित आश्रय, आरोग्य सेवा, समुपदेशन, कायदेशीर मदत, व्यावसायिक - रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षण अशा दर्जेदार सुविधा स्नेहालय पूर्णतः निःशुल्क पुरविते. दारिद्र्य आणि शोषणाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या महिला व बालकांना सुरक्षित बाहेर काढून नवीन आयुष्य देण्याचे कार्य प्रामुख्याने युवा स्वयंसेवकांच्या मदतीने स्नेहालय करते.

संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष आहेत श्रीमती जया मारुती जोगदंड. शेवगाव येथील लालबत्ती भागात गेली २८ वर्षे वेश्यांसाठी काम करणारी ही संघटक आता स्नेहालय संस्थेची अध्यक्ष आहे. स्नेहालयाच्या विश्वस्त मंडळात १३ महिला आहेत .त्यांच्याकडे या संस्थेची धुरा आहे. श्रीमती जयाताई सांगतात की, "भारतीय समाजातील पुरुष प्रधानता आणि असमानतेचा परिणाम म्हणून महिला आणि बालकांना त्यांच्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहावे लागते. समाजात आणि या बळी समूहात हक्कांबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्यांच्या सन्मानित आणि स्वयंपूर्ण जगण्याच्या क्षमता विकसित करणे हे संस्थेच्या विविध प्रकल्पांचे प्रमुख ध्येय आहे".

संस्थेच्या सचिव डॉ. प्रीती भोंबे यांनी सांगितले की, "१९८९ मध्ये केवळ दोन बालकांपासून सुरु केलेल्या कामाचा विस्तार आज २७ सेवा प्रकल्पांमध्ये झाला आहे. वेश्याव्यासायात अडकलेल्या महिलांच्या बालकांसाठीचा शैक्षणिक प्रकल्प आणि एचआयव्ही बाधितांसाठी वैद्यकीय उपचार देणारा दुसरा अशा दोन उपक्रमांपासून स्नेहालयची वाटचाल सुरु झाली. आमचे सर्व प्रकल्प मुख्यत्वे महिला आणि बालकांच्या मदतीसाठी चालविले जातात. याशिवाय तळागाळातील बालकांना शैक्षणिक प्रवाहात आणणे आणि मानव हक्कांसाठी कार्य करणे हे स्नेहालयचे मुख्य उद्देश आहेत. २ लाखांपेक्षा अधिक लाभार्थींना आत्तापर्यंत आम्ही विविध प्रकारे मदत पुरविली आहे."

संस्थेचा 'पुनर्वसन संकुल' हा महत्त्वाचा प्रकल्प असून वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची बालके, देहव्यापारातून सोडविलेल्या अल्पवयीन मुली, एचआयव्ही मुळे अनाथ झालेली तसेच एचआयव्ही सहजीवन जगणारी बालके, बालविवाहातून सोडविलेल्या मुली, अल्पवयीन माता यांना निवारा देणारा प्रकल्प आहे. बालभवनचे मानद संचालक आहेत संजय बंदिष्टी. त्यांनी सांगितले की, बालभवन प्रकल्पाची स्थापना २००४ सालची! अहिल्यानगर मधील सात आणि छत्रपती संभाजी नगर मधील एक अशा आठ झोपडपट्ट्यांमध्ये प्रकल्प कार्यरत आहे.येथे राहणाऱ्या बालकांना आणि तरुणांना शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आरोग्य उपक्रम आदी द्वारे सामाजिक बदल घडवून आणले जातात.

संस्थेचे 'स्नेहांकुर दत्तक केंद्र' वर्ष २०१८ पासून आज अखेर देशातील सर्वाधिक दत्तक विधान करणारे केंद्र आहे. बेवारस सोडून दिलेल्या आणि कायदेशीर मार्गाने परित्याग केलेल्या बालकांपर्यंत पोहोचून वैद्यकीय व इतर सुविधा हे केंद्र प्राप्त करुन देते. त्यांना दत्तकविधानाच्या प्रक्रियेतून उत्तम कुटुंब मिळवून देणारे शासकीय मान्यता असलेले हे दत्तकविधान केंद्र आहे. आजवर २२०० बालके आणि हजारावर बालमातांचे यशस्वी पुनर्वसन या प्रकल्पाने केले आहे. वर्ष २००२ पासून आज अखेर 'युवनिर्माण प्रकल्प' हा तरुणाईला जगण्याचा सकस उद्देश देत आहे. या उपक्रमाचा लाभ सहा हजार चारशे तरुणांनी घेतला आहे.आजचे युवा आणि विद्यार्थी हे उद्याचे उत्तम नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते बनू शकतात. त्यासाठी स्नेहालयाचे बहुआयामी कार्य आणि समाजाच्या वास्तविक सामाजिक समस्या जाणून घेण्यासाठी युवनिर्माण हे एक व्यासपीठ आहे.

विविध विषयांवरील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकल यात्रा, वर्षात आयोजित होणारी चार युवा शिबिरे, सामाजिक प्रश्नांवरील चळवळी आणि आंदोलनात सहभाग, याप्रकारे युवनिर्माण प्रकल्प तरुणाईच्या चारित्र्याची आणि नागरिकत्वाची घडण करतो. आम्ही सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढील पिढीचे स्वागत करतो करुन त्यांना त्यांनी निवडलेल्या कार्यात सहयोग देण्याचे कार्य युवनिर्माण प्रकल्प करीत असल्याची माहिती संचालक हनीफ शेख यांनी दिली. बालरोग तज्ञ डॉक्टर विक्रम पानसंबळ आणि क्षयरोग तज्ञ डॉक्टर निलेश परजणे स्नेहालयच्या केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर (स्थापना २००८) चे संचालन करतात. आर्थिक अडचणी किंवा एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना इतर ठिकाणी आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागते. अश्या व्यक्तींना वैद्यकीय सेवा, शस्त्रक्रिया आणि वृद्धांना काळजी प्रदान करणारा प्रकल्प येथे राबवला जातो.

स्नेहालय इंग्लिश मिडीयम विद्यालयाचे संचालन करणारे राजेंद्र शुक्रे यांनी सांगितले की, वर्ष २००८ मध्ये स्नेहालय संस्थेने स्वतःची इंग्रजी माध्यम शाळा सुरु केली. सर्वाधिक वंचित समूहातील अनाथ, एचआयव्ही आणि एड्स बाधित आणि दिव्यांग मुलांना सर्वात दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे या भूमिकेतून ही शाळा सुरु करण्यात आली. आर्थिक परिस्थिती किंवा आरोग्यामुळे मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये संघर्ष करणाऱ्या बालकांना शैक्षणिक संधी उपलब्ध करुन देणारा शालेय प्रकल्प आहे. इंग्लंडमधील टी फोर या संस्थेने प्रतिकूल परिस्थितीतल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी सर्वोत्तम कार्य करणारी जगातील तिसरी शाळा म्हणून या शाळेची वर्ष २०२२ मध्ये निवड केली.














रेडिओनगर उपक्रम वर्ष २०१० मध्ये स्नेहालय संस्थेने सुरु केला. नगर शहरातील हे पहिले सामुदायिक रेडिओ केंद्र आहे. मराठी आणि हिंदीमध्ये १५ तास प्रसारण करते. ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख त्याची संचालक म्हणून काम पाहतात. नगरच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जडणघडणीत या माध्यमाची महत्त्वाची भूमिका आहे. संस्थेने महिला आणि १८ वर्षावरील मुलींना तात्पुरता किंवा दीर्घकालीन निवारा, हेल्पलाईन, समुपदेशन, शिक्षण-प्रशिक्षण, कायदेशीर सल्ला, वैद्यकीय उपचार, आदी सुविधा एकाच छताखाली देणारा स्नेहाधार हा प्रकल्प अहमदनगर येथे २०११ मध्ये तर पुणे येथे २०१६ मध्ये सुरु केला. कृषीमित्र प्रकल्पाच्या माध्यमातून संस्था शेतकी समन्वयक शेतकरी गट आणि गट शेती तंत्राद्वारे प्रशिक्षण देते आणि सहयोग करते.

सध्या 'उडान' हा प्रकल्प बालविवाह रोखण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यात कार्यरत आहे. तर 'मनोयात्री आणि मनोबल' या प्रकल्पांतर्गत मनोरुग्ण आणि व्यसनाधीन व्यक्तींना मानसिक उपचार-आधार आणि निवारा देण्यासाठी संस्था कार्य करते. वेश्या व्यवसाय सोडून नव्याने आयुष्य सुरु करणाऱ्या आणि एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या लाभार्थींसाठी नवीन स्वावलंबी जगण्याचा पर्याय म्हणजे 'हिम्मतग्रा' हा ३० एकराचा सेंद्रिय शेती प्रकल्प संस्था राबवते. स्नेहांकुर दत्तक केंद्र - हे संस्थेने २००४ मध्ये सुरु केले असून अविवाहित माता, बलात्कार पीडितांनी सोडून दिलेल्या अर्भकांना काळजी आणि संरक्षण प्रदान करते. अलीकडे अकरा वर्षांच्या बालमाता देखील स्नेहांकुर संस्थेत येत आहेत. कुटुंबातीलच व्यक्तीकडून त्या गर्भवती असतात. समाजाची ही बदलती परिस्थिती आणि गंभीर आव्हाने संस्थेसाठी हा काळजीचा विषय असल्याचे स्नेहांकुरच्या संचालिका डॉ. प्राजक्ता कुलकर्णी यांनी सांगितले.

स्नेहालयचे कार्य आमिर खान यांनी सत्यमेव जयते या मालिकेत जगाला दाखवले. त्यानंतर भारतभरातील ३०० हून अधिक संस्थांनी येथे भेटी दिल्या. शेकडो कार्यकर्त्यांनी येथील उपक्रमातून प्रेरणा घेऊन आपापल्या परिसरात सेवा कार्य सुरु केली आहेत. जगाच्या विविध देशांमधून येथे स्वयंसेवक वर्षभर सेवेसाठी येत असतात. निक कॉक्स आणि जॉयस कोनोली हे दोघे इंग्रज गेले दहा वर्षे या संस्थेत राहून पूर्ण वेळ सेवा देतात. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्राध्यापक यशवंतराव केळकर युवा पुरस्कार डॉ. गिरीश कुलकर्णी यांना वर्ष २००६ मध्ये हैदराबाद येथील अधिवेशनात देण्यात आला. स्नेहालय संस्थेला वर्ष २०१२ मध्ये महिला आणि बालविकास क्षेत्रातील देशातील सर्वोच्च असा भारत सरकारचा डॉक्टर दुर्गाबाई देशमुख पुरस्कार तत्कालीन राष्ट्रपती डॉक्टर प्रणव मुखर्जी यांनी प्रदान केला. वर्ष २०१८ मध्ये इंडियन्स फॉर कलेक्टिव ॲक्शन या अमेरिकेतील संस्थेने भारतातील सर्वोत्तम संस्था म्हणून स्नेहालयाला कॅलिफोर्निया येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनात गौरविले. स्नेहालय आता केवळ संस्था न राहता भारतमातेसाठी कार्य करण्याची एक प्रेरणा बनली आहे.

**- संपर्क : डॉ. गिरीश कुलकर्णी**

# ८.२ तेजस्वी सेवेकरी
## कार्यकारी संचालिका, सहेली संघ, पुणे



तेजस्वी यांनी वैद्यकीय आणि मानसशास्त्र यातील समाजकार्याचे पदव्यूत्तर शिक्षण प्राप्त केले आहे आणि त्या गेली अठ्ठावीस वर्षे सामाजिक क्षेत्रात कार्य करीत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र हे सर्वसाधारणपणे एच आय व्ही एड्स असून विशेष करुन वेश्याव्यवसायातील महिलांसोबत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनी पुण्यामध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची संघटना उभी करण्याचे काम सुरु केले आणि आता त्या सहेली संघ या संस्थेच्या कार्यकारी संचालिका म्हणून काम करीत आहेत.

वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांनी सहेली संघा मार्फ़त अनेक प्रकल्प उभे केले आहेत वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला आणि त्यांची मुले यांच्या मूलभूत तसेच मानवी हक्कांबाबत त्या कार्यरत आहेत. तेजस्वी या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक विषयांवर मान्यताप्राप्त प्रशिक्षक म्हणून काम करतात. उदा. एच आय व्ही एड्स, सामाजिक संघटन, सबलीकरण, मानवी तस्करी प्रतिबंध, वेश्याव्यवसाय संबंधित कायदे इत्यादी.

सध्या त्या राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, जॉन हॉपकिन्स चे एच आय व्ही एड्स वैद्यकीय चाचणी केंद्र - बी जे वैद्यकीय महाविद्यालय तसेच आंतरराष्ट्रीय एच आय व्ही एड्स वैद्यकीय चाचणी संघटनेच्या मानद सामाजिक सल्लागार म्हणून काम पाहत आहेत. त्यांना अनेक स्थानिक,राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे जसे कि, समाजगौरव पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार, राष्ट्रीय सन्मान पुरस्कार तसेच शेरॉन मॅक्सवेल पुरस्कार (USA) इत्यादी. त्यांनी नुकताच त्यांचा पी एच डी शोध प्रबंध, टाटा समाजविज्ञान संस्था मुंबई इथे सादर केला आहे.

# ६. सेवावार्ता: FCRA संदर्भात नवीन निर्देश

गृह मंत्रालयाने (MHA) परदेशी योगदान नियमन अधिनियम (FCRA) अंतर्गत नोंदणीकृत NGO साठी महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले आहेत. या निर्देशांनुसार, NGO ने त्यांच्या मुख्य अधिकाऱ्यांमधील किंवा मंडळातील सदस्यांमधील बदल ४५ दिवसांच्या आत मंत्रालयाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदवणे अनिवार्य आहे. प्रलंबित अर्ज असतानाही नेतृत्व बदलाची माहिती द्यावी लागणार आहे, ज्यामुळे परदेशी निधीच्या उपयोगावर अधिक चांगली नजर ठेवता येईल. नवीन अर्ज सादर करण्याचा पर्यायही उपलब्ध असून, जुना अर्ज त्यासोबत आपोआप रद्द होईल. यामुळे नूतनीकरण प्रक्रिया सुलभ होईल. तसेच, परदेशी निधी व्यवहारांची नोंद ठेवण्यासाठी गुंतवणूक नोंदणी पुस्तिका तयार करणे अनिवार्य करण्यात आले आहे, जी मंत्रालयाच्या लेखापरीक्षणासाठी उपलब्ध असावी.

या निर्णयाचा उद्देश पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणे हा आहे, कारण अनेक संस्थांवर निधीचा दुरुपयोग व नियमानुसार काम न करण्याचे आरोप झाले आहेत. या नवीन नियमांमुळे नेतृत्व बदल आणि परदेशी निधीच्या वापराबाबत अधिक स्पष्टता येईल. काही प्रतिष्ठित संस्थांमध्ये, जसे की सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च आणि इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ, अलीकडेच नेतृत्व बदल झाले आहेत, ज्यामुळे त्यांच्यावरही हे नियम लागू होतील. मात्र, NGO समुदायाने यावर संमिश्र प्रतिक्रिया दिल्या आहेत. काहींना हे पाऊल पारदर्शकता वाढवणारे वाटत असले, तरी काहींनी याला अतिरेकी हस्तक्षेप म्हणत संस्थांच्या स्वायत्ततेवर परिणाम होण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. सरकारच्या या पावलांमुळे परदेशी निधीचा विनियोग योग्य दिशेने होईल आणि सामाजिक कार्यामध्ये सुधारणा होईल. मात्र, संस्थांनीही या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे, जेणेकरून देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देता येईल.

**Link:**
**https://indiacsr.in/mha-issues-new-directive-ngos-must-report-leadership-changes-within-45-days/**

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह

श्री. विक्रम पंडित - कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर - प्रकल्प व्यवस्थापक

श्री. आमोद काटीकर - प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी

सेवावर्धिनी
एक विश्वासार्ह सहकारी

# सेवा तरंग 2.0

# सेवा वार्ता

अंक ८
२०२५-२६

सेवावर्धिनी
नोंदणीकृत पत्ताः ३९० ब, नारायण पेठ, "दत्तधाम", राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०
कार्यालयः "चंदन" २६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ समतोल फाऊंडेशन

२.२ बेघर मुलांना सावरणारी "जीवन संवर्धन फाऊंडेशन"

३. प्रकल्प व्यवस्थापन - शास्त्र आणि एक कला

४. सकस परसबाग प्रकल्प

५. सेवाव्रती

५.१ नारायणन कृष्णन : कुशल आचारी ते मानवसेवेचा प्रणेता

५.२ डॉक्टर अभिजित सोनावणे

६. सेवावार्ता :
स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन आणि निधी संकलनाचे महत्त्व

# १. मनोगत

नमस्कार मंडळी,

सेवातरंग दोन अंतर्गत आजचा हा आठवा आणि शेवटचा अंक. शेवटचा यासाठी की आपण सेवातरंग तीनचे नियोजन लवकरच जाहीर करत आहोत. आपले प्रतिसाद, आपल्या अपेक्षा लक्षात घेऊन सेवासंस्थांसाठी आवश्यक असलेली कार्यपद्धतीची विविध माहिती देण्याचा प्रयत्न आम्ही आतापर्यंत केला.

या अंकात नेहमीप्रमाणे दोन सेवाभावी संस्थांच्या कार्याबद्दलचे माहिती, दोन सेवाव्रती व त्यांचे कार्य याची माहिती, तसेच प्रकल्प व्यवस्थापन या महत्वाच्या विषयाबद्दल माहिती समाविष्ट केली आहे. समतोल फाउंडेशन या मुलांसाठी काम करणा-या संस्थेबद्दलच्या लेखामधे आपल्या दैनंदीन जीवनात दिसणा-या पण आपण दुर्लक्ष करत असलेल्या विषयाबद्दल आपल्याला जाणीव करुन देण्यात आली आहे व याबरोबरच आपल्या कडून अपेक्षित असे आपण काय करु शकतो याचा विचारही मांडण्यात आला आहे. बेघर मुलांना सावरणारी मुंबईतील जीवन संवर्धन फाउंडेशन कशी सुरु झाली आणि त्यामागे काय प्रेरणा होती यबरोबरच त्यांच्या कार्य पद्धतीबद्दल थोडक्यात माहिती आपल्याला बरेच काही शिकवून जाईल.

अक्षया ट्रस्टचे नारायणन  कृष्णन आणि भिका-यांचे डॉक्टर अभिजीत सोनावणे या सेवाव्रतींमधे एका क्षणी कसा बदल झाला आणि दोघांनीही आपापली यशस्वी कारकीर्द त्याग करुन आपले जीवन वृद्धांसाठी कसे वाहून घेतले हे वाचून आपल्यालाही प्रेरणा मिळेल. प्रकल्प व्यवस्थापनाबद्दलची माहिती आपल्याला निश्चितच उपयोगी पडेल. त्यासंबंधी एक चर्चा सत्र तर होईलच. याबाबत आपल्या समस्या अथवा प्रश्न आम्हाला कळवल्यास चर्चा सत्रात त्याबद्दल विषेश लक्ष देता येइल.

सेवातरंग दोन या अंतर्गत या शेवटच्या अंकात निरोप घेताना शेवटी आपल्या आतापर्यंतच्या सहभागाबद्दल आभार. गेल्या संपूर्ण वर्षामधे आपण वेगवेगळे विषय हातळले. सेवासंस्था व सेवाव्रतींची माहिती घेतली. या सर्वांचा आपल्या संस्थेच्या संचालनात व कार्यात आपल्याला उपयोग होत राहील, नवीन नवीन प्रकल्प आपण उभे कराल व समाजोपयोगी भरीव कार्य यातून निर्माण होऊ शकेल हीच सदिच्छा.

**॥ एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ ॥**

**- विक्रम पंडित**

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.१ समतोल फाऊंडेशन

### ध्येय आमुचे बाल प्रेमी समाजाचे

सामाजिक क्षेत्रात काम करतांना अनेक पैलू उलगडावे लागतात. शिवाय सर्वांबरोबर त्याच भाषेत उत्तरे व संपर्कही ठेवावा लागतो. समतोल फाऊंडेशन ही फक्त संस्था नसुन एक सामाजिक बालप्रेमी चळवळ सुद्धा आहे. समतोलच्या मनपरिवर्तन केंद्रात दाखल झालेली मुले ही शैक्षणिक वंचित तर असतातच शिवाय शोषित व अत्याचारीत सुद्धा असतात. आपले हक्क अधिकार या सगळ्या गोष्टी त्यांच्या पासून खूपच दूर आहेत. याच मुलांना जेंव्हा विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी किती कष्ट व प्रयत्न होतात याची जाणीव जो कार्यकर्ता यांच्या बरोबर राहतो, वागतो त्यांनाच माहित असते. लैंगिक अत्याचार हा विषय सर्रासपणे होताना दिसतो. याचे कारण असे आहे की, जेंव्हा बदलापुर सारखी घटना घडते तेंव्हा अशा प्रकारच्या घटना व त्याची बातमी देणारे बातमीदार यांची जणू स्पर्धाच लागते व एका पाठोपाठ एक अशा घटना झळकु लागतात.

त्यामुळे ही प्रकरणे सातत्याने होत असतात, असाच त्याचा अर्थ निघतो. मग ही प्रकरणे दाबून का ठेवली जातात. तर याची कारणे वेगवेगळी आहेत. हीच गोष्ट समाजात जनजागृति चांगल्या प्रकारे होण्यासाठी समतोल जनजागृती अभियान राबवित असते. समतोलच्या १२ प्रकल्पांपैकी एक विषय हा आहे. पण याची दखल समाजाने घेतली पाहिजे. शाळा, कॉलेज, हॉस्टेल, बालगृह एवढेच नव्हे तर वस्ती, झोपड्या, बिल्डिंग सोसायट्या सर्वच ठिकाणी याबाबत जागरुकता झाली पाहिजे. समतोलची सुद्धा एक मर्यादा आहे, पण समस्या खूप आहेत. जेवढा समाज या कार्यासाठी जोडला जाईल तेवढाच विस्तार होणार आहे. म्हणून बालप्रेमी समाज निर्माण करायचा असेल तर आपल्याला सर्वांनाच या कार्याशी जुडले पाहिजे. समतोल हा फक्त आपलाच वैयक्तिक विषय असता कामा नये तर तो सामाजिकच असला पाहिजे.

समाजात डोळे उघडून पाहिले असता आपल्या आसपास संपूर्ण देशात मोठमोठ्या तीर्थस्थळी, मोठी मंदीर, गार्डन व इतर ठिकाणी असंख्य मुलं दिसून येतात अशिक्षित विस्कटलेले केस, पायात चप्पल नसते, अंगावरचे फाटलेले कपडे, केवीलवाणा चेहरा असलेली मुले जी समाजाने दूर फेकलेली असतात. आणि झिडकारलेली असतात. असंच काही कामानिमित्त नाशिक मध्ये गेलो असताना गोदावरी नदीच्या घाटावर काही मुले भेटली भीख मागणे, श्रद्धेने काही भावीक नदीत पैसे टाकतात, ते पाण्यातील पैसे काढणे, कधी तरी चोरी करणे, वस्तू विकणे अशी वेगवेगळी कामे करत असतात. देशात जिथे जिथे तिर्थक्षेत्र आहे तिथे तिथे अशा प्रकारे काम करणारी अनेक मुले दिसून येतील. या मुलांना घेऊन मात्र शासन, प्रशासन, सरकार, महिला व बाल विकास विभाग, सामाजिक विभाग आणि चाईल्ड लाईन या परीवार सोबत व मुलांसोबत कामे करताना मी आतापर्यंत तरी बघितले नाही. संस्था, संघटना थोड्याफार प्रमाणात काम करताना काही काही ठिकाणी दिसतात.




कारण हा एक वेगळाच विषय आहे. अनेक स्थलांतरित कुटुंब, अशिक्षित पालक, नशेची सवय, बेशिस्तपणा, वाईट सवयी अशा अनेक गोष्टी परिस्थितीनुसार हे पालक आणि मुले करत असतात परंतु ही सुद्धा माणसेच आहेत. मुले ही मुलेच असतात याची दक्षता घेऊन काळजी व संरक्षण समाजाने केले पाहिजे यासाठी सकारात्मक नियोजन असणे शिवाय सातत्याने इच्छाशक्ती सुद्धा असली पाहिजे तरच हे शक्य आहे. समतोल फाऊंडेशन ने हा प्रयोग हरिद्वार मध्ये गंगाघाटावर असणाऱ्या व गंगेच्या पाण्यात उडी मारुन पैसे काढणारे मुलांसाठी २०१३/१४ मध्ये स्वतः केला.

सर्व मुलांना एकत्र करुन विश्व हिंदू परिषद यांची मदत घेऊन २ तास शिक्षणाचे अशी शाळा चालवली पुढे सातत्याने हे कार्य चालवणे समतोल फाऊंडेशनसाठी शक्य नव्हते. परंतु एक प्रयोग दाखवून दिला. हाच प्रयोग आम्ही विदर्भात शेगांवचे गजानन महाराज संस्थान यांच्या इथे सुद्धा २०१७ मध्ये केला जी मुले गंध लावून पैसे कमावतात त्यांच्यासाठी होता या मुलांना संस्थानाच्या शाळेत दाखल करुन घेतले यासाठी समाजाची साथ शासन प्रशासन सोबत असणे आवश्यक असते. हाच प्रयोग नाशिक किंवा अन्य तिर्थक्षेत्रांमध्ये मुलांच्या विकासासाठी होऊ शकतो. २६ जुलैला एक लहान आदेश नावाचा मुलगा गोदावरी घाटावर भेटला. खूप छान बोलला. एवढा लहान असुन त्याने लुक्या, भुरया, इलायती अशी नावे असणाऱ्या ६०/७० मित्रांना जमा केले. सगळी मुलं खूप विचित्र बोलत होती.

९ ते १२ वर्षाची ही मुले लैंगिक विषयावर जास्त बोलतात कारण खुल्या वातावरणात त्यांचे लक्ष याकडे जास्त जाते पुढे भविष्यात ही मुले पैसा मिळवण्यासाठी गुन्हेगारी क्षेत्रात जास्त आकर्षित होतात. या मुलांचे काय होते किंवा होणार हे तुम्हांला कळलेच असेल याचा त्रास समाजालाच होणार म्हणजे आपल्यालाच होणार आहे. त्यामुळे समाजात अशी अनेक सामाजिक कार्य करता येऊ शकतात म्हणून समतोल ही बाल प्रेमी चळवळ चालविणारा मोठा परिवार आहे. मुलांचे पालक नाही तर त्यांचे मित्र, गुरु आणि गाईड बना नेहमी लक्षात ठेवा की, तुमची मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शाळेच्या आवारा बाहेर पडल्यावर संपत नाही. तर मुलं शाळेबाहेर असूनही तुम्ही त्यास मदत केल्यास त्याचे जीवनच बदलू शकते. तुम्हांला त्यासाठी फक्त स्वतःला तयार करण्याची गरज आहे. आणि त्याचे प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता आहे. मग तुम्ही त्यांना मदत करु शकता.

एकदा का तुम्ही मनावर घेतले आणि त्यांचे प्रश्न समजून घेतले तर तुम्ही खूप काही करु शकता. ज्याचा तुम्ही स्वप्नातही विचार केला नसे. मुलांना कुठेही कधीही दुर्लक्षित, शिव्याशाप, मारामाऱ्या वा धमक्यांना सामोरे जावे लागते. काही गुन्हे हे शाळेच्या प्रांगणातही घडू शकतात, पण त्याही पेक्षा जास्त मुले हे गुन्ह्यांना शाळेबाहेर वा घरी सामोरे जातात. तुम्ही त्याकडे दुर्लक्ष न करता त्यांना विश्वासात घेऊन सर्वतोपरी मदत केली पाहीजे. जेंव्हा तुम्हांला समजेल की काही तरी चुकते आहे आणि तुम्ही ते समजून घेण्यास वेळ द्यावा आणि ऊत्तर शोधून काढावे. शाळेचे वातावरण बदलणे हे तुमचे, आमचे सर्वांपुढेच खरंच मोठे आव्हान आहे. मुलांचे मानसिक व इतर प्रश्न सोडवू शकेल व मुलांना ना व पालकांना त्यातून मार्ग काढण्यास मदत करेल असा जाणकार असलेला सायकोलॉजीस्ट शाळेत नेमणे गरजेचे आहे. मुलांचे हक्क शिकवणाऱ्या शिक्षकांबरोबर शैक्षणिक कार्यक्रम वेळोवेळी व्हायलाच हवेत.

सामान्य ज्ञान विषयात लैंगिक शिक्षण हे शाळेत प्रत्येकाला शिकवले गेले पाहिजे. शाळेत प्रसाधनगृह वा पिण्याच्या पाण्याची चांगली सोय असणे गरजेचे आहे. मुलांसाठी व मुलींसाठीचे टॉयलेट वेगवेगळे व एकमेकांपासून दूर असले पाहिजे. शाळांनी मुलांवर होणाऱ्या अत्याचाराचे परिक्षण करण्यासाठी काही मुले पालक पंचायत नगर परिषद किंवा देखरेख करणारे कर्मचारी किंवा एखादे मंडळ स्थापन करावे. याचे काम म्हणजे अशा प्रकारच्या घटना घडल्यास तातडीने त्याची शाहनिशा करुन पोलीसांतर्फे किंवा उपयुक्त व्यक्तीला भेटून कारवाई करणे. मुलांच्या विशिष्ट गुणांना समजून घेऊन त्याचा आदर करुन त्यांच्यातील स्वाभिमान जगवणे गरजेचे आहे. त्यांच्यात सामाजिक वागणूक स्वाभिमान आणि चारित्र्यता वाढवणे गरजेचे आहे.







मुलांच्या वाढत्या गरजांचा व जगण्याच्या पद्धतीचा आदर केला पाहिजे. मुलांच्या पुढे जाण्याच्या स्वभावाचा व जगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा आदर करायला पाहिजे. मुलांच्या बाबतीत न्याय स्वच्छ व अचूक देणे गरजेचे आहे. त्यांच्यात मिळून मिसळून वागण्याची वृत्ती वाढायला हवी. व्यंग असलेल्या मुलांना त्यांच्या व्यंगाबद्दल सारखी जाणीव करुन देऊ नका. त्यांना इतर मुलांसारखीच वागणूक द्यायला हवी. इतर मुलांसमोर त्यांना कमी लेखू नका हिणवू नका. फक्त गरीब घरातीलच मुले पळून जातात असे नाही तर मोठ्या सधन कुटूंबातील सुद्धा मुले घर सोडून पळून जाण्याचे प्रकार समाजात दिसून येतात. काळजी न घेतल्याने, दुर्लक्षित केल्याने, पालक व शिक्षकांकडून मारहाण होण्याची भिती. कधीतरी जातीय भेदभाव, लैंगिक अत्याचार, मुलांना समजून न घेता आरोप केल्याने मुलं घरातून पळतात.

प्रत्येक मुलगा हा स्वतःच्या आत्मविश्वासाने जगत असतो. पालकांनी त्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. रस्त्यावरच्या मुलांच्या संख्येत जास्तीत जास्त मुले घरातून पळालेली असतात. मुलं आपले घर त्यांच्या भवितव्यासाठी किंवा नोकरीच्या शोधात मोठ्या शहरांचे आकर्षण किंवा घरच्यांच्या भांडणांमुळे पळून जातात व भयानक आयुष्य जगतात. रस्त्यावरची मुले वाईट नसतात ज्या परिस्थितीत ते जगत असतात ती परिस्थिती वाईट असते. या मुलांनातर दोन वेळचे जेवणही मिळणे कठीण असते. एकदा रस्त्यावर आले की ते सामाजिक अत्याचाराला अनेक संकटांना तोंड देत असतात. आपल्या पेक्षा वयाने मोठे असणाऱ्या मुलांसोबत मैत्री केल्याने ते लवकरच मारामाऱ्या, शिव्या, व्यसने अशा गोष्टींच्या आहारी जातात. वेगवेगळ्या प्रकारची सहजा सहजी मिळतील अशी कामे ते पटकन शिकतात. भिक मागणे, भंगार वेचणे, चोरी करणे अशा गोष्टीत तरबेज होतात.

भारतातील शिक्षण पद्धतीने आपण घडवत असलेल्या ज्ञानींना सर्व जगात मान आहे. म्हणूनच खुप भारतीय शास्त्रज्ञ, इंजिनीयर किंवा इतर व्यवसायिक हे परदेशात स्थायिक झालेले आहेत आणि त्यातील काही देशात व परदेशात स्वतःसाठी व देशासाठी चांगले काम करत आहेत. कडक शिस्त व स्पर्धात्मक परिक्षा पद्धती हाच उत्तीर्ण होण्याचा मार्ग आहे. सर्व पालकांना आपल्या पाल्याने पुढे मोठे होऊन जास्तीत जास्त पैसे कमाविले पाहिजे असे वाटते. पण वेगवेगळ्या स्पर्धांचा दबाव, मुलांकडून वाढत्या अपेक्षा, आपल्या शाळेचा १०० टक्के निकाल यासाठी मुलांवर दबाव टाकला जातो आणि ह्या अपेक्षांची पुर्तता मुले करु न शकल्यामुळे मुलांमध्ये मानसिक अस्वस्थता वाढून ते कधी कधी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. आपण वेळीच ह्या सत्याला सामोरे न गेल्यास येणाऱ्या नवीन पिढीच्या भवितव्याला मुकू शकतो. मानसिक शिक्षा ही गोष्ट अनेक पालकांकडून घडतच असते. शाळेतही शिक्षकांकडून ह्या शिक्षेला अनेक विद्यार्थी बळी पडतात.

मुलांना आपली भीती वाटणार नाही तर आपण त्यांचे मित्रच आहोत या प्रमाणे मुलं सुद्धा आपल्यासोबत तसाच व्यवहार करतील या करता शाळेत काही बदल काही गोष्टी घडणे करणे गरजेचे आहे. जसे की मुलांना छंद जोपासण्यास मदत होईल. मुलांमध्ये त्यांना समजतील त्यांना कळतील अशाच विषयांवर चर्चासत्र, वाद संवाद, प्रश्न उत्तरे असे छोटे कार्यक्रम करणेच गरजेचं आहे. मुलांना इतिहासातील शूरवीरांच्या गोष्टी सांगणे, चित्र काढणे चित्र रंगवणे त्यामुळे मुलांच्यात उत्साह दिसून येतो. नाट्य एकांकिका थिएटर स्टेजवर वावरण्याचा आत्मविश्वास येतो. कुंभारकाम वस्तुकला आपल्या संस्कृतीची ओळख होते. शालेय सहली, फोटोग्राफीमुळे विविध प्रकारच्या निसर्गाचा आनंद घेता येतो. विविध प्रकारचे पारंपारीक मैदानी खेळ खेळल्याने अंगात स्फूर्ती उर्जा निर्माण होते. ऐतिहासीक संग्रहालयाला भेट किंवा वस्तु कला शिबीराला भेट दिल्यास इतिहासकालीन गोष्टींची माहिती मिळते.

## मनपरिवर्तन केंद्रातील नियम व संस्कार, संस्कृती

श्रावण महिण्यात एका पाठोपाठ सगळे सण येण्यास जणू काही पाऊस आणि सणांची रेलचेलच असते. निराधार, निराश्रित, ब्रिजखालील, वस्तीमधील, झोपडपट्टीतील, डोंगरावर राहणारी एक पालक अशी ही मुलं त्यांचे पालक जे काम करतात तेच काम ही मुले सुद्धा करतात कारण परिस्थीतीमुळे त्यांना हे करणेच भाग असते, भंगार वेचणे, प्लॅस्टीक बाटल्या, पिशव्या गोळा करणे, लोहचुंबक लाऊन लोखंडी खिळे व इतर वस्तू गोळा करणे या गोष्टी रोजच्याच ठरलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना शाळा नाही, अभ्यास नाही, आणि मग सणवार, संस्कृती या गोष्टींची माहितीच होत नाही. रोजचे काम करायचे ते विकून येईल त्या पैशात काहीतरी खायाचे आणि उरलेले पैसे व्यसनात उडवायचे या मुलांना ना वर्तमानाची चिंता असते ना भविष्य माहित असते. त्यांना फक्त आला दिवस ढकलायचा एव्हढेच माहित असते. जेंव्हा अशी मुलं समतोल फाऊंडेशनच्या स्वामी विवेकानंद मनपरिवर्तन केंद्रात दाखल होतात. तेंव्हा त्यांना शिस्त, आचार, विचार, सणवार, हिंदू संस्कृती याची जाणिव करुन दिली जाते. महाराष्ट्रातल्या सणांचा सुद्धा आनंद घेण्यासाठी त्यासणाचे महत्व व संस्कृती समजण्यासाठी केंद्र सर्व सण साजरे करते. ज्यामुळे मुलांना सणांची माहिती होतेच शिवाय आपली संस्कृती जोपासण्यास त्यांची मनोवृत्ती तयार होते. केंद्रातील अधिक्षक अश्विनी मॅडम या केंद्रातील मुलांच्या आई प्रमाणेच सांभाळ करतात. कारण ही मुलं आपल्या पालकांना सोडून इथे आलेली असतात. त्यांना सोबत घेऊनच सगळे सणवार साजरे केले जातात, पुजा, आरती, प्रसाद इ. केंद्रात बाप्पाची संकष्टी चतुर्थी मोठ्या उत्साहात साजरी केली. सणवाराला गोडधोड जेवण असल्याने मुलं आणखीनच आनंदी होतात. आपणांस एक विनंती आहे की दिवसाचा १ रु. सुद्धा सामाजिक कार्यात मोठा सहभाग होऊ शकतो. आपण सामाजिक बांधिलकी म्हणून या चळवळीसाठी योगदान करावे.

धन्यवाद !

- संपर्क
विजय जाधव
संस्थापक - समतोल फाऊंडेशन
मोबाईल क्रमांक : 9892961124

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.२ बेघर मुलांना सावरणारी "जीवन संवर्धन फाऊंडेशन"

मुंबई मायानगरी. कोणालाही उपाशी न ठेवणारी नगरी. सतत वाहत असणारे हे शहर. धावपळ, वेग हे या शहराचे वैशिष्ट्य. रेल्वे स्थानक, फलाट हे तर कधी स्तब्ध नसतातच. पण या फलाटावर जरा नजर फिरवली तर दिसतात शून्यात नजर लावून बसलेली मुले. या मुलांचा जगाशी काहीही संबंध नसतो. डोळ्यात नशा असते, कसलीच जाणीव नसते. त्या मुलांना बघून असंख्य जणांचे मन हळहळते पण आपण काय करणार या विचाराने ते दृश्य डोळ्याआड करत मार्गस्थ होतात. पण मुंबईतली दीडशेजण आहेत जे या मुलांना समाजाशी जोडण्यासाठी आपले नोकरी व्यवसाय सांभाळून कष्ट घेत आहेत. या मुलांना शिक्षण आणि जीवनप्रवाहात आणण्यासाठी धडपडत आहेत. आणि या सर्वांना जोडणारे एक समान सूत्र आहे जीवन संवर्धन फाऊंडेशन. या संस्थेचे संस्थापक सदाशिव चव्हाण यांनी तयार केलेले हे सर्व स्वयंसेवक आहेत. आज मुंबईत सुमारे सव्वा लाख बेघर मुले आहेत. हे अनाथ नाहीत तर बेघर आहेत. या मुलांचे नातेवाईक असतात. पण यांना डोक्यावर छप्पर नसते. मग आयुष्यही रस्त्यावर वाहून जाते. या बेघरांना बघून अस्वस्थ झालेल्या सदाशिव चव्हाण यांनी त्यांचे आयुष्य सुधरायचे ठरवले. ते सांगतात, मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी लहानपणापासून जोडलेला आहे.

महाविद्यालयीन शिक्षण सुरु असतानाच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम करत होतो. शिक्षण पूर्ण झाल्यावर काही काळ अभाविपचे पूर्ण वेळ काम केले. त्याचवेळी मी ठरविले होते की समाजाच्या अत्यंत दुर्लक्षित घटकांसाठी काम करेन. मी अभाविपचे काम थांबवून वैयक्तिक आयुष्य सुरु केले. नोकरीनिमित्त मला मुंबईला यावे लागले. एक दिवस मला ईशान्य भारतातून एका सामाजिक कार्यकर्त्याचा फोन आला. त्याच्या भागातील दोन मुली गायब झाल्या होत्या. त्यांना मुंबईच्या रेड लाईट एरियात आणल्याचे त्याला कळले होते. त्यांना सोडविण्यासाठी मला विनंती केली होती. मी फॉरस रोडच्या पोलिस ठाण्यात जाऊन त्यांना मदत करण्यासाठी गळ घातली. फारसा उपयोग होणार नाही असे तेथील पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले पण तरीही दुसऱ्या दिवशी छापा टाकला. त्या मुली नाही पण ईशान्य भारतातल्या इतर दोन मुली सापडल्या. त्यांना परत पाठवायचे तर त्यांना घरचा पत्ता सांगता येत नव्हता. अल्पवयीन असल्याने त्यांना डोंगरी बाल सुधारगृहांमध्ये ठेवण्यात आले. त्यांना सुधारगृहातून सोडविण्यासाठी मी तिथे वारंवार जात होतो. तेव्हा मला बेघर मुलांचे विश्व दिसले. संवेदनशील व्यक्तीला समाजातल्या समस्या दिसल्या की त्या सोडविण्यासाठी आपण काय करु शकतो याचा विचार सतावत राहतो.

सुधारगृहातल्या एकेका मुलाची कहाणी ऐकल्यावर चव्हाण अस्वस्थ झाले. साधारणतः चोरीच्या प्रकरणातील आरोपी सापडत नसतील तर या मुलांना पकडायचे आणि केस सुटली असे दाखवायचे, ही पोलिसांची पध्दत असल्याचे चव्हाण यांच्या लक्षात आले. दोनशे रुपयांच्या चोरीच्या आरोपावरुन एक मुलगा आठ महिने त्या सुधारगृहांमध्ये होता. केस उभी राहण्याची शक्यता नव्हती. अशी अनेक मुले तिथे होती. या मुलांसाठी काम करणारी राणी त्यांना तिथे भेटली. त्यातून त्यांच्या समस्या समजत गेल्या. २००८ ची ही गोष्ट होती. याच मुलांसाठी आपण काम करावे हा विचार हळू हळू पक्के झाले, चव्हाण सांगतात. वाट खूप अवघड होती. पण जितके आव्हान मोठे तितका काम करण्याचा आनंद मोठा हे माझे मत, त्यामुळे कामास सुरुवात केली, चव्हाण सांगतात. ९९ टक्के बेघर मुले लैंगिक शोषणाचे बळी असतात. त्यामुळे अनोळखी व्यक्ती जरा जवळ येतोय असे वाटले की ती ताबडतोब पळून जातात. ही मुले कायम मादक पदार्थांच्या अमंलाखाली असतात. त्यामुळे त्यांच्याशी संपर्क करुन संवाद साधणे महाकठीण. या मुलांचा रात्री १२ नंतर रेल्वे फलाटावर अड्डा जमतो हे चव्हाण यांच्या लक्षात आले. मग त्यांनी त्यांच्यासोबत जाऊन बसायला सुरुवात केली. हळूहळू दोन मुलांनी प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. सहा-आठ महिन्यानंतर जरा त्यांना शिक्षणासाठी तयार केले. मुले तयार झाली तरी त्यांच्या पालकांना राजी करणे हेही अवघडच होते.



एकतर ही मुले कमाईचे साधन असतात. पालकांची परवानगी मिळायला आठ-नऊ महिने असे करत जवळपास दीड वर्षाने दोन मुलांबाबत यश मिळाले. पण त्यांना ठेवायचे कुठे हा प्रश्न होताच. घरात ईशान्य भारतातल्या मुली होत्याच. मग चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जीवनसंवर्धन फाऊंडेशनची स्थापना करुन या मुलांसाठी वस्तीगृह सुरु केले. २०१० मध्ये हा प्रयोग सुरु झाला. या मुलांना परत प्रवाहात आणणे खूप अवघड असल्याचे या दोन मुलांच्या अनुभवातून लक्षात आले होते. हे काम एकट्या दुकट्याचे नाही, हेही लक्षात आले. मग ते स्वतः काम करतच होते पण त्यांनी आपले नेटवर्क वाढवायला सुरुवात केली.रोज लोकलने प्रवास करणारे संवेदनशील नागरिक यांची मदत घ्यायची ठरवली. असे काहीजण मिळालेही. त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण दिले. या मुंबईकरांचे कार्यक्षेत्रही ठरवून दिले. ज्या ठिकाणी राहतात ते स्थानक आणि ज्या स्थानकात उतरुन ऑफिसला जातात ते. या स्थानकांतील फलाटावरच्या मुलांशी संपर्क करायचा. त्यांच्याशी मैत्री होण्यासाठी दोन तीन महिने जाणार हेही त्यांना सांगितले जाते.

सुरुवातीला येता-जाता फक्त हसायचे, हात दाखवायचा. टप्प्यावर मैत्री करायची. जरा जवळ जाऊन एखाद वाक्य बोलून संवाद सुरु करायचा. मग वडापाव, सामोसापाव द्यायचा. तो त्यांनी घेणे हे सुधारणेचे पहिले पाऊल असते. मग वेळ मिळेल तशा गप्पा मारायच्या. त्यांच्या मनात विश्वास निर्माण करायचा. त्याला शाळा, वसतीगृह याची माहिती द्यायची. त्याला तयार करायचे. त्याच्या मनाची तयारी झाली मग त्याचे जे कोणी पालक असतील त्या पालकांची परवानगी मिळवायची. हे पण तितकेच अवघड काम असते. कारण त्यांच्यासाठी ही मुले म्हणजे कमाविणारे हात असतात. ते कमी होणे त्यांच्या पचनी पडणारे नसते. पण आपल्या मुलाचे आयुष्य आपल्यापेक्षा वेगळे आणि चांगले असेल हे पटले की मग या मुलांचा गुरुकुलाकडे प्रवास सुरु होतो. पण प्रवास इतका सोपा नसतो. या मुलांना जडलेल्या व्यसनांवर उपाय केला जातो. वैद्यकीय तपासणी होते. त्यांना काही आजार असेल तर उपचार करायचे. मधल्या काळात या मुलांच्या शाळा प्रवेशासाठीच्या कागदपत्रांची जुळवाजुळव सुरु केली जाते. हा सर्व कालावधी दिड ते दोन वर्षांचा असतो.

पहिल्याच वर्षात तेरा मुले दाखल झाली होती. मुळात या मुलांना एकाच ठिकाणी राहण्याची सवय नसते. त्यामुळे त्यांना चार भिंतीत राहण्याची सवयही आम्हाला लावावी लागते, सदाशिव चव्हाण सांगतात. या मुलांनी फक्त वडापाव, समोसापाव आणि कधीतरी कोणी तरी दिलेले शिळे -उरलेले अन्न खायची सवय असते. आंघोळ तर कधी करत नाहीत. म्हणजे अंगावरचा कपडाही धुतला जात नाहीत,स्वच्छता नाहीच. त्यात व्यसन त्यामुळे या मुलांचे आयुष्य केवळ ३०-३५ एवढेच असते. मुंबईत लाख-सव्वा लाख आणि देशभरात अंदाजे १८-२० लाख एवढी संख्या असलेला वर्ग पूर्णपणे दुर्लक्षित आहे केवळ तो राजकीयदृष्ट्या काही फायदा नसल्याने हे घडते यांची खंत चव्हाण व्यक्त करतात.हे काम २०१० ला सुरु केले. तेव्हापासून आजपर्यंत ८६ मुले आपल्या आयुष्यात स्थिरावली आहेत. घर भाड्याने घेऊन राहत आहेत. या मुलांना आम्ही त्यांचा कल बघून कौशल्य विकास प्रशिक्षण दिले. स्वतःच्या पायावर उभे राहता येईल ते शिक्षण देण्यास प्राधान्य असते, चव्हाण माहिती देतात. ही संस्था फक्त वस्तीगृह चालवते. या मुलांना समाजात वावरण्याची सवय व्हावी यासाठी शिक्षणाचा अधिकारातून आजूबाजूच्या शाळेत या मुलांचे प्रवेश केले जातात. या मुलांवर वस्तीगृहाबाहेर जाण्यावर बंधन नसते.

कारण त्यांना या चार भिंतीतल्या सुरक्षेचे महत्त्व कळलेले असते. पाच -सहा वर्षांपर्यंतची मुले जर मिळाली तर त्यांच्या मनाची पाटी कोरणे सोपे असते पण जितकी मोठी मुले येतात तितके त्यांच्यावर अधिक काम करावे लागते. त्यांना समुपदेशन देऊन त्यांच्या मनावरचे आघात पुसण्याचा प्रयत्न केला जातो. सामान्य घरातील मुलांना १६-१७ वर्षांपासून ज्या लैंगिक गोष्टी कळू लागतात, त्या मुलांनी अगदी लहानपणापासून बघितलेल्या असतात, भोगलेल्या असतात. त्यामुळे त्यांना याबाबतचे समुपदेशन केले जाते. या मुलांचे आयुष्य बघितले की आपण समाज म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ आहोत, अशी खंत ते व्यक्त करतात. पण समाजाला तरी कसा दोष देता येणार कारण आपल्या जगण्याची व्यवस्था बदलल्याने अशी मुले तयार झाली आहेत. बारा बलुतेदार प्रथा बंद झाली आणि मग वैदू, कैकाडी आदी भटक्या जमातींच्या हाताला काम राहिले नाही. मग ते शहरांमध्ये रोजगाराच्या शोधात आले. मुळात एका जागी मुक्कामाची सवय नसल्याने घरांची गरज त्यांच्या पालकांना वाटत नाही.अशीच मुले ९६ टक्के आहेत. बाकीची अनैतिक संबंधातून जन्माला आलेली किंवा घरातून पळून आलेली मुले असतात. मी जरी समाजाला दोष देत असलो तरी याच समाजाच्या सहभागातून हे काम चालते, अशी कबूलीही ते देतात. या मुलांचा संपूर्ण खर्च हा देणग्यातूनच भागतो.

फक्त शैक्षणिकच नाही तर या मुलांच्यातील कलागुण, क्रीडा नैपुण्य जोपासण्याचा प्रयत्न आम्ही करतो. यासाठी विविध संस्था आम्हाला मदत करतात, मुलांनाही त्यात गती आहे, अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षीसेही मिळवली असल्याचे, चव्हाण अभिमानाने सांगतात. सध्या या संस्थेत मुलगे आणि मुली मिळून १७१ जण आहेत. मुलीसाठी ठाणे शहरातील हरी निवास सर्कल परिसरात गुरुकुल आहे. तर मुलांची सोय टिटवाळा येथे केली आहे. बदलापूरमध्ये सर्वांची एकत्र सोय करण्याच्यादृष्टीने वस्तीगृहाचे बांधकाम सुरु आहे. कोणत्याही संस्थेची प्रगती व्हावी, अशीच संस्थापकांची इच्छा असते. पण या संस्थेची गरजच राहू नये आणि जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या डोक्यावर छप्पर असावे, जगण्यासाठीच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, हीच इच्छा आमची आहे. हे झाले की जीवन संवर्धन सारखी कृत्रिम व्यवस्था लागणारच नाही, आणि आम्ही आमचा प्रकल्प बंद करु, हेच आमचे स्वप्न असल्याचे चव्हाण सांगतात. सदाशिव चव्हाण यांचे हे स्वप्न पूर्ण होवो, याच सदिच्छा.





[मुंबईकरांचे मदतीला धावून जाण्याचे स्पिरीट आहे. त्या स्पिरिटमुळेच जीवनसंवर्धनला स्वयंसेवक मिळत गेले. एका स्वयंसेवकाचा किस्सा सदाशिव चव्हाण यांनी सांगितला. तो स्वयंसेवक लोकलने चालला होता. त्याने उगीच लोकलची चेन खेचली आणि गाडी थांबवली. रेल्वे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. न्यायालयात हजर करायचे होते. पण न्यायालयाची वेळ संपल्याने त्याला जवळच्या स्थानकावर नेऊन पोलिस कक्षात बसवले. रात्रभर तिथेच ठेवले. पोलिसांशी गप्पा मारताना त्याने जीवन संवर्धनची माहिती दिली. दुसऱ्या दिवशी त्याला न्यायालयासमोर हजर करुन दंड भरल्यानंतर सोडून देण्यात आले. दोन महिन्यांनी त्याला त्या पोलिसांचा फोन आला एक १२ वर्षांचा चांगल्या घरातील मुलगा पळून आला आहे. त्याला खूप समजावले पण तो परत जायला तयार नाही. तुम्ही भेटा आणि शक्य असेल तर त्याला तुमच्या संस्थेत घेऊन जा. त्या स्वयंसेवकांने त्याला संस्थेत आणले. तो मुलगा चांगला शिकला. तो दक्षिण आफ्रिकेत नोकरी करत आहे. वस्तीगृहात असलेल्या एका मुलाची आईही स्वयंसेवकाचे काम करु लागली आहे.]

[समाजाच्या मदतीबाबत तर बोलावे तितके कमी. याबाबतचा एक अनुभव चव्हाण यांनी सांगितला. माझ्याकडे एक गृहिणी आली. तिला संस्थेला काहीतरी मदत करायची होती. मी कोणाकडे जाऊन पैसे मागणार नाही असे तिने आधीच सांगितले. मग मी तिला एक पर्याय दिला. वस्तीगृहात एक वेळ २५० पोळ्या लागतात. महिन्यातून एकदा २५ घरात जाऊन संस्थेची माहिती सांगायची आणि त्यांच्याकडून प्रत्येकी दहा पोळ्या आणायच्या. गेली चार महिने नेमाने महिन्यातून एकदा तिने पोळ्या आणून दिल्या आहेत.]



**– संपर्क**
**सदाशिव चव्हाण**
**जीवन संवर्धन संस्था**
**मोबाईल क्रमांक :7506927704**

# ३. प्रकल्प व्यवस्थापन - शास्त्र आणि एक कला

**परिचयः**

या लेखात आपण प्रकल्प व्यवस्थापनातील काही मूलभूत तत्वांविषयी चर्चा करणार आहोत – विशेषतः सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या अनुषंगाने. प्रकल्पांचे प्रभावी व्यवस्थापन एखाद्या संस्थेच्या यश आणि अपयशामध्ये निर्णायक ठरु शकते.

प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंस्टीट्यूट (www.pmi.org) यांच्या परिभाषे नुसार प्रकल्प म्हणजे एखादा नावीन्यपूर्ण पदार्थ किंवा सेवा किंवा परिणाम साधण्याकरता विशिष्ट कालमर्यादेपुरता उपक्रम आहे. यात दोन गोष्टी ध्यानात घ्यायच्या आहेत. विशिष्ट कालमर्यादा आणि नावीन्यपूर्ण. म्हणजे आपण निरंतर करीत असलेले काम किंवा अगोदरच अस्तित्वात असलेल्या गोष्टींचे उत्पादन म्हणजे प्रकल्प नव्हे. काहीतरी नवीन, सुधारणा जर आपण घडवून आणू पाहत असलो, आणि ते विशिष्ट काळात पूर्ण करण्याचे नियोजन जर असेल तरच त्या उपक्रमाला प्रकल्प म्हणता येईल. नियमित शाखा भरवणे, मंडळाची वार्षिक बैठक घेणे हा प्रकल्प नाही. पण एखाद्या नवीन सामाजिक समस्येवर संशोधन करणे, एखाद्या भागात एखादा नवा उपक्रम राबवणे हे प्रकल्पाचे उदाहरण होऊ शकेल. प्रकल्प व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्तीला – अर्थात प्रकल्प व्यवस्थापकाजवळ हे वेगळेपण जपताना वेळेचे आणि इतर मर्यादांचे भान ठेऊन कार्य पूर्ण करणे हे कौशल्य असणे महत्वाचे आहे.

प्रकल्प आणि नित्यक्रमातील कार्यः एखाद्या संस्थेत प्रकल्पासोबत नित्यक्रमा प्रमाणे चालणारी अनेक कामे सुरु असतात. अशा कामांना "operations" असे म्हणता येईल. प्रकल्प कार्य आणि नित्यक्रमातील कार्य यात बराच फरक आहे आणि त्याकरता लागणारी कौशल्य, मानसिकता यातही मोठा फरक आहे. प्रकल्प कार्य आणि नित्यक्रमातील कार्य यासाठी माणसे निवडताना याचे भान ठेवणे आवश्यक आहे. थोडक्यात हा फरक नेमका काय आहे ते समजून घेऊया.

| पैलू | प्रकल्प कार्य | नियमित कार्य |
|---|---|---|
| कार्याचा प्रकार | काही नवीन निर्माण करणे नाहीतर आहे त्यात सुधारणा करणे | सातत्याने करायचे काम, नावीन्य क्वचितच |
| कार्यकर्ते | प्रकल्पाच्या गरजेनुसार विशिष्ट क्षमता असलेली टीम | संस्थेचे नियमित कार्य करणारे |
| काल-मर्यादा | ठराविक कालमर्यादा | संस्थेच्या वेळापत्रका प्रमाणे पुढे-मागे |
| उद्दिष्टे आणि निष्पन्न | नावीन्यपूर्ण, आणि सतत उलगडत जाणारे | संस्थेची अगोदरच ठरलेली उद्दिष्टे |
| कार्यप्रणाली | प्रकल्पाच्या गरजेनुसार ठरवावी लागेल | संस्थेच्या ध्येय धोरणाशी संलग्न |
| कार्यकर्त्यांमध्ये लागणारे गुण | सर्जनशीलता, हिकमती स्वभाव, चाकोरीबाहेर विचार करण्याची क्षमता | सातत्य, विश्वसनीयता |
| अपेक्षित परिणाम | नवीन काही घडवून आणणे | आहे त्यातून कार्य साधणे |

प्रकल्पात सर्व काही नवीन असल्यामुळे केवळ ठराविक आणि नित्याचे कार्य करण्याची सवय असलेल्या व्यक्तीचा प्रकल्पात निभाव लगेलच असे सांगता येत नाही. तसेच प्रकल्पात हिकमती आणि हरहुन्नरी असलेली व्यक्ति नित्यक्रमात कंटाळून जाऊ शकते. प्रत्येकाच्या स्वभावानुसार त्याला योग्य ते कार्य देणे हे संस्थेच्या नेत्यांना जमले पाहिजे. दुसरे म्हणजे अनेकदा तीच व्यक्ति प्रकल्प आणि नित्याच्या कार्यात सहभागी असते. अशा वेळी कशाला प्राधान्य द्यावे याबाबत गोंधळ उडू शकतो. नेहेमीच्या कार्यात कर प्रकल्पकडे दुर्लक्ष झाले तर विलंब, खर्चात वाढ आणि अशी झळ पोचू शकते. असे होऊ नये याकरता संस्थेच्या नेतृत्वाने जागरुक पणे आणि नियमितपणे प्रकल्प आणि इतर कार्यात प्रधान्यक्रम ठरवणे, आणि त्यानुसार संसाधनांची व्यवस्था करणे अत्यावश्यक ठरते.

**प्रकल्प व्यवस्थापन कार्यप्रणाली – ५ प्रकारची कार्ये :**

कोणत्याही प्रकल्पात ५ प्रकारचे कार्य अभिप्रेत असतात. प्रत्येक वेळी ते एकापाठोपाठ येतील किंवा विशिष्ट ओघाने येतील असे सांगता येत नाही, परंतु ही कार्य करावी लागतात नक्की. ते काय आहेत आणि त्यांचा परस्परांशी संबंध काय आहे हे खालील आकृतीत पाहायला मिळेल.




**1.Initiating processes (पूर्वतयारी) :**

पूर्व तयारी शिवाय प्रकल्प अस्तित्वात येत नाही. कोणताही प्रकल्प हाती घेणे हा एक विचारपूर्वक घेतलेला निर्णय असतो – ज्यात वेळ, पैसा, संसाधने, परिश्रम यांची मोठी गुंतवणूक आवश्यक असते. म्हणूनच संस्थेने प्रकल्प मुळात कशासाठी करायचा, त्याचे उद्दिष्ट एवढ्या मोठ्या गुंतवणुकीशी सुसंगत आहे का, याचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यावसायिक स्वरुपाचा असो, वा सामाजिक कार्यातील असो – दोन्ही मध्ये हा विचार केला पाहिजे. या सर्व विचारा अंती प्रकल्प एक तर मंजूर होईल, नाहीतर तो विचार पुढे ढकलला जाईल, नाही तर पूर्णपणे रद्द केला जाईल. प्रकल्प मंजूर अथवा नामंजूर करण्याचा निर्णय हा सहसा संस्थेच्या शीर्ष नेतृत्वाने घ्यायचा असतो, करण प्रकल्पाला लागणारी संसाधने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी त्यांची असते. प्रकल्प व्यवस्थापक आणि त्याच्या टीम ने प्रकल्पाच्या पूर्तीसाठी नेमके काय करावे लागणार आहे, त्यात काय अडचणी आहेत आणि काय संसाधने लागणार आहेत याचा सरासार विचार करुन ते स्पष्टपणे मांडले पाहिजे. जसे युद्धात नुसतेच "आता तुम्ही लढा" असे देऊन भागणार नाही. त्यासाठी सैनिक, शस्त्रास्त्रे, युद्धनीती याचा विचार पण केला पाहिजे. नाहीतर माघार घेणे अधिक सुज्ञपणाचे. प्रकल्पाचेही थोडेफार तसेच आहे.

**2.Planning processes (नियोजन) :**

असे म्हटले जाते, की नियोजनाचा अभाव म्हणजे पराभवाची निश्चिती! अपुरे नियोजन हा अयशस्वी प्रकल्पाचा जणू पायाच. नियोजनासाठी पुरेसा वेळ देणे अपरिहार्य आहे. नियोजनाचे अनेक पैलू आहेत. नेमके काय करायचे आहे (Scope), कशाला किती वेळ लागणार आहे (Schedule), खर्च काय येणार आहे (Cost), काय संसाधने लागणार आहेत (Resources), कोण भागीदार सोबत लागतील, इत्यादी. जेव्हां प्रकल्पाचे उद्दिष्टे आणि कार्यक्रम महितीतला असतो, तेव्हां संपूर्ण आराखडा सुरुवातीलाच स्पष्टपणे मांडणे इष्ट ठरते. परंतु कधीकधी नेमकी गरज आणि त्यावरील उपाय हे सुरुवातीला ज्ञात होत नाहीत, ते प्रयोगातून शिकत पुढे जावे लागते, तेव्हा, त्याला agile (प्रसंगानुसार बदलता येण्यासारखे) नियोजन असे म्हणतात. काहीही झाले, तरी पुढील दिशा स्पष्ट करण्यासाठी सखोल नियोजन अत्यावश्यकच!

**3.Executing processes (अंमलबजावणी) :**

क्रियेवीणा वाचळता जशी व्यर्थ आहे, तसे नुसतेच कागदावरच्या किंवा भाषणातल्या नियोजनाचा उपयोग सुद्धा शून्य आहे. नियोजित कार्याची अंमलबजावणी करताना टीम ने ती आखणी नुसारच केली पाहिजे. आपली इच्छा होईल तेव्हा, वाटेल तसे काम केल्याने गोंधळ होईल. एखाद्या सैनिकाला दिलेला आदेश जसा तो तंतोतंत विनातक्रार पार पाडतो, तसेच. अर्थात जर कार्य करताना अडचणी आल्या किंवा काही अनपेक्षित घटना घडल्या, तर त्याची सूचना तातडीने प्रकल्प व्यवस्थापक किंवा नेतृत्वाला दिली पाहिजे.

**4.Controlling processes (नियंत्रण) :**

जेव्हां प्रकल्पाचे कार्य सुरु असते, तेव्हां त्यावर सतत नजर ठेवणे, येणाऱ्या अडचणी तत्परतेने सोडवणे ही प्रकल्प व्यवस्थापक आणि संस्थेच्या नेतृत्वाची मुख्य जबाबदारी ठरते. एखादा खेळ सुरु असताना टीम च्या प्रशिक्षक प्रत्येक हलचालीवर बारीक नजर ठेऊन असतो आणि डाव अपेक्षेनुसार पडत नसेल तर तातडीने उपाय शोधत असतो, अगदी तसेच. कधीकधी टीम अपेक्षेप्रमाणे खेळ (कार्य) करीत नसते, किंवा त्यात त्रुटी असतात. त्या दुरुस्त करण्यासाठी त्यांना योग्य feedback (अभिप्राय/सूचना) द्यावा लागतो. कधी कधी नियोजनाच अपुरे ठरल्याचे दिसून येते. अशावेळी पुन्हा एकदा प्राप्त परिस्थितीनुसार फेर नियोजन आवश्यक ठरते. शेवटी कार्य पूर्ण होत आले, किंवा होण्याची शक्यता मावळू लागली, की प्रकल्प बंद करण्याचा (closure) निर्णय घ्यावं लागतो. प्रकल्पावर देखरेख ठेवणे, आपल्या टीम ला पाठबळ, तसेच योग्य वेळी योग्य सूचना देणे आणि योग्य वेळी प्रकल्प नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य निर्णय घेणे, ही प्रकल्प व्यवस्थापकाची जबाबदारी असते – ज्यात अनेकदा तो संस्थेच्या शीर्ष नेतृत्वाची मदत घेऊ शकतो.

**5.Closing processes(पूर्तता) :**

प्रकल्प पद्धतशीरपणे पूर्ण करणे, ही पुढील प्रकल्पांच्या आणि उपक्रमांच्या यशाची पायाभरणी आहे. प्रकल्पाच्या उद्दिष्टांची पूर्तता अपेक्षेप्रमाणे झाली असो, वा नसो, योग्य पद्धतीने closure हे जणू प्रकल्पाचे “क्रियाकर्म” किंवा “उद्यापन” आहे आणि अनिवार्यच आहे. पूर्तता करताना काय करावे? नियोजित आणि प्रत्यक्षात आलेले प्रकल्पाचे दृश्य आणि अदृश्य फलित किंवा परिणाम, यांची नोंदणी केली पाहिजे. ती पद्धतशीर पणे लाभ धारकांकडे हस्तांतरित केली पाहिजे. हस्तांतरित करण्यापूर्वी एखाद्यावेळी प्रशिक्षण देणे, देखभाल दुरुस्तीसाठी काही संसाधने उपलब्ध करून देणे, इत्यादी आवश्यक आहे. जेणेकरुन प्रकल्पाचे लाभ हे शाश्वत राहतील आणि निरंतर मिळत राहतील. प्रकल्प बंद करण्यापूर्वी त्यातून आपण काय शिकलो (तांत्रिक, आर्थिक, सामाजिक बाबी) यांची नोंद घेऊन भविष्यात यातून अधिक सक्षम पद्धतीने प्रकल्प कसा राबवता येईल याचा शोध-बोध रीतसरपणे घेतला पाहिजे आणि त्याचे documentation आणि closure report (अहवाल) लिहिला पाहिजे.

### कारभारी, प्रणाली, परिस्थिती :

प्रकल्प यशस्वी करण्यासाठी त्याचे कारभारी, कार्यपद्धती (प्रणाली) आणि परिस्थिती यांची यथोकहीहत सांगड घालणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे नेतृत्व हे एक शास्त्र आहे, तसेच कला पण आहे. काही जणांना ही कला न शिकवता - उपजतच मिळालेली असते (उदाहरणार्थ - छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर), तर काहींना शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास आणि परिश्रम करुन, अनुभव घेऊन शिकावी लागते (उदाहरणार्थ – आर्य चाणक्य).




### 1.People (कारभारी/भागधारक) :

कोणत्याही कार्याचे यशापयश हे त्याच्याशी संलग्न असलेल्या लोकांवर अवलंबून आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. प्रकल्प व्यवस्थापन शास्त्रात stakeholder असा एक शब्द वापरला जातो. आपण त्याला कारभारी किंवा भागधारक म्हणू. अशी कोणतीही व्यक्ति, किंवा गट किंवा संघटना/संस्था – जी प्रकल्पाला प्रभावित करु शकते, किंवा प्रकल्पाने त्यांच्यावर परिणाम (चांगला किंवा वाईट) पडत असतो, किंवा ज्यांची अशी धारणा आहे (वास्तविक किंवा काल्पनिक) की प्रकल्पाचा माझ्यावर परिणाम होणार आहे – या परिभाषेत मोडणार प्रत्येक जण stakeholder म्हटला जातो. यात आपल्याच टीम चे सदस्य, सेवा पुरवणारे, ग्राहक, देणगीदार, सरकार, नियामक मंडळे, लाभधारक, स्थानिक राजकारणी, स्वतः प्रकल्प व्यवस्थापक, संस्थेचे नेतृत्व करणारे विश्वस्त अथवा संस्थापक अशी अनेक मंडळी येतील. या सर्वांना प्रकल्पाचे महत्व पटवून देणे, त्यांना आपल्यासोबत घेऊन जाणे, कुणाचा विरोध असेल तर तो कमी करणे आणि जास्तीत जास्त लोकांचा पाठिंबा मिळवणे – ही प्रकल्प व्यवस्थापक आणि त्यावर काम करण्याऱ्या टीमची खरी कसोटी आहे. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे – "राजी राखिता जग, मग कारभाराची लगबग"!

### 2.Process (प्रणाली/कार्यपद्धती) :

प्रकल्प व्यवस्थापनाचे एक विस्तृत शास्त्र आहे. हे शिकता येण्यासारखे कौशल्य आहे – नव्हे त्याची सर्वांनाच गरज पण आहे. दुर्दैवाने याकडे फार कमी लोक किंवा संस्था लक्ष देतात. प्रकल्प व्यवस्थापन प्रणालींमध्ये दोन आघाडीच्या पद्धती म्हणजे Project Management Institute (www.pmi.org) जी अमेरिकन पद्धती आहे किंवा PRINCE2 (https://www.prince2.com/uk), जी ब्रिटिश आहे आणि याचा विस्तार म्हणजे Projects In Controlled Environments. जसे इलाज करणारा डॉक्टर शिकलेलाच असावा लागतो, तसेच महत्वाचे प्रकल्प राबवताना त्याची जबाबदारी येऱ्या-गबाळ्याकडे देऊन कामाचे नाही. या पद्धतीं मध्ये scope (आवाका), cost (खर्च), time (वेळ), quality (उत्तमता), risk (जोखमी), resources (संसाधने), communication (संपर्क), suppliers (कंत्राटदार/सेवा पुरवणारे) अशा १० बाबींचा शास्त्रोक्त पद्धतीने विचार करुन नियोजन कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते.

### 3.Environment (परिस्थिती) :

आधुनिक जग हे वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, व्यवसाय, शासकीय धोरणे, लोकांच्या अपेक्षा या सर्वच बाबी क्षणा क्षणाला बदलत जातात. प्रकल्पाचे नियोजन सुद्धा त्याच वेगाने या सर्वांना अनुरुप बदलत गेले पाहिजे. याला प्रकल्प व्यवस्थापन परिभाषेत agility असे म्हणतात. आपण त्याला "चपळाई" असं शब्द वापरु. आधुनिक जगात

प्रकल्पाच्या बाबतीत याचा अर्थ काय? थोडक्यात म्हणजे प्रकल्पाचे छोटे-छोटे भाग करुन वेगाने काम पूर्ण करणे – जितक्या लवकर शक्य होईल तितक्या लवकर ते ग्राहक किंवा भाग धारकांसमोर सादर करणे, आणि त्यांचा जो feedback (अभिप्राय) असेल त्या पद्धतीने नियोजनात वेगाने बदल घडवणे. एखादा मुरब्बी खेळाडू जसा परिस्थितीनुसार आपल्या खेळाचा वेग आणि शैली बदलू शकतो, तसेच आहे हे. शक्यतो दर आठवड्याला किंवा जास्तीत जास्त पंधरवड्याला काहीतरी निश्चित काम झाले पाहिजे, त्याचा वेळेत आढावा घेतला पाहिजे, त्यात शक्य तितक्या भागधरकांना सातत्याने सहभागी केले पाहिजे – तरच हे शक्य होईल.हा आठवडा किंवा पंधरवडा या कालावधीला sprint किंवा iteration असे म्हणतात. जितकी छोटी sprint तितकी आपली agility (चपळाई) जास्त. बदलत जाणाऱ्या परिस्थितीचे वेगाने आकलन करण्याचा एक मतीतार्थ असाही गृहीत धरला पाहिजे – की ज्या कारणासाठी प्रकल्पाचा घाट घातला, ते खरंच साध्य होणार आहे का? नसेल तर तो प्रकल्प पद्धतशीरपणे बंद करणेच इष्ट. निदान संस्थेची संसाधने अनावश्यक आणि अनुत्पादक कार्यात वाया जाणे तरी टळू शकेल. हा निर्णय अर्थातच संस्थेचे शीर्ष नेतृत्वच करु शकेल. मात्र त्यासाठी आवश्यक असणारी माहिती आणि विश्लेषण पुरवण्याची जबाबदारी ही प्रकल्प व्यवस्थापक आणि त्याच्या टीम ची आहे.

### स्वयंसेवी संस्थांमधील प्रकल्प व्यवस्थापन :

स्वयंसेवी संस्था समाजा करता उपयुक्त असे अनेक प्रकल्प सातत्याने राबवित असतात. प्रकल्प व्यवस्थापनाचे मूलभूत तंत्र हे जसे एखाद्या व्यावसायिक किंवा शासकीय प्रकल्पाला लागू आहे, तसेच ते स्वयंसेवी प्रकल्पांना सुद्धा आहेच. तरीही स्वयंसेवी संस्थांच्या प्रकल्पांचे काही विशिष्ट पैलू ध्यानी घेतले पाहिजेत.

### निधीची चणचण :

“देणाराचे हात हजारो, दुबळी माझी झोळी” असे गीत सर्वांनी ऐकले असे. मात्र देणगीदार प्रकल्पाला तेव्हाच पैसे देतो, जेव्हा त्याच्यासमोर विस्तृत प्रस्ताव येतो. परंतु तो प्रस्ताव तयार करण्यापूर्वी संस्थेला अनेक सायास पडतात. समाजात जाणे, त्यांच्या समस्या समजून घेणे, त्यावर संशोधनातून आणि चर्चेतून मार्ग शोधणे, इत्यादी. यालाही निधी लागतोच. नियमित संस्था संचालना सुद्धा निधी लागतो. अपुरा निधी असेल तर पूर्वतयारी अपुरी ठरते, आणि प्रकल्प डळमळीत पायावर सुरु होतो. यावर उपाय म्हणजे समविचारी संस्थांनी एकत्र विचार करणे, एकमेकांपासून शिकत राहणे – आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व खर्चाचा चोख हिशेब ठेवणे. आपण योग्य कारणे देऊन जर संशोधन, संस्था संचालन इत्यादी कार्यासाठी सुद्धा निधी मागितला, तर तो निश्चित मिळू शकेल. पण आपलाच गृहपाठ कच्चा असेल तर मात्र कठीण आहे. स्वयंसेवी संस्थांकरता Fund raising (निधी उपलब्ध करणे) हा एक स्वतंत्र विषयच आहे.

### संसाधानांचा अभाव :

स्वयंसेवी संस्थांकडे प्रकल्पासाठी पूर्ण वेळ कर्मचारी वर्ग, प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र व्यक्ति किंवा विभाग राखणे अवघड आहे. यामुळे अनेकदा एकाच व्यक्ति प्रकल्प, दैनंदिन कामे, हिशेब – या सर्व गोष्टी करीत असतो. त्यात जर तो स्वतः पूर्णवेळ कर्मचारी नसेल तर त्याच्या मागे इतर व्याप असतात. अशा परिस्थितीत प्रकल्पाकडे दुर्लक्ष होऊन त्याचा बट्ट्याबोळ निश्चित समजला पाहिजे. कोणताही प्रकल्प ठरवताना त्याला लागणारे मनुष्यबळ आणि इतर संसाधने उपलब्ध करुन दिलेच पाहिजेत. तशी तरतूद नियोजनात असेलच हवी. इथे सुद्धा गृहपाठ आणि नियोजन पक्के पाहिजे. अन्यथा एकांडा शिलेदार चक्रव्यूहात शाहिद होईल.

### सहाय्यक विभागांचा अभाव :

प्रत्येक संस्थेच्या संचालनासाठी हिशेब (accounts), मानव संसाधन विकास (Human Resourc-es), माहिती तंत्रज्ञान (Information Technology) अशा अनेक विभागातील तज्ञ व्यक्तींची गरज असते. स्वयंसेवी संस्थांकडे असे स्वतंत्र विभाग किंवा व्यक्ति मिळणे अवघड आहे. अशा वेळी विशिष्ट सेवा पुरवणाऱ्या संस्थांचा संपर्क ठेऊन त्यांच्या सेवा मागणी नुसार, तात्पुरत्या स्वरुपात घेणे आवश्यक ठरते.

### आव्हानात्मक परिस्थिती आणि भागधारक :

स्वयंसेवी संस्थांचे प्रकल्प हे सामाजिक समस्येतूनच उद्भवतात, म्हणजे सुरुवातीपासून आव्हाने ठरलेलीच. त्यातून समाज, त्यातील अनेक घटक, त्यांचे आपसातील तणाव, हे सर्व ओघाने आलेच. या सर्वांना कार्याला जोडणे हे मोठे कौशल्याचे काम आहे. व्यापक जनसंपर्क, संवाद आणि संबंध असणे अपरिहार्य आहे.

## यशस्वी प्रकल्पांचे सूत्र :

आव्हाने तर आहेतच, पण प्रकल्प यशस्वी करण्यासाठी काय करता येईल याचाही विचार करु. काही सूत्र पुढे दिलेली आहेत.

### 1.संस्थेच्या नेत्यांनी व्यक्तिगत लक्ष पुरवणे :

स्वयंसेवी संस्थांच्या विश्वस्त किंवा कार्यकारी मंडळात प्रथितयश आणि प्रतिभावान व्यक्तींचा समावेश असतो. अशा नेत्यांनी आपल्या संस्थेच्या कार्यक्रमात, विशेष प्रकल्पात व्यक्तिगत लक्ष दिले पाहिजे. त्यांच्या सहभागामुळे टीम चा हुरुप वाढेल आणि ते अधिक सक्षम होतील.

### 2.कंत्राटी पद्धती आणि कर्मचाऱ्यांचा वापर :

निधीचा ओघ अनिश्चित असल्यामुळे मनुष्यबळाची उणीव असल्यामुळे प्रकल्पाच्या गरजेनुसार संस्थांना कंत्राटदारांचा प्रभावी वापर करायला शिकले पाहिजे. सतत लागणाऱ्या कामासाठी विश्वासू आणि कर्तबगार व्यक्ति आणि कंपन्यांची यादीच असली पाहिजे. यामुळे अल्प अवधीत मोठे काम उभे राहू शकते. कर्मचारी वर्गासाठी सुद्धा अशा पद्धतीने विचार करता येईल. विद्यार्थी दशेत internship करु इच्छिणारे अनेक जण असतात, तसेच समाजाला काही देऊ इच्छिणारे अनुभवी व्यक्ति पण उपलब्ध होऊ शकतात. आपला संपर्क वाढवून, इंटरनेट च वापर करुन अशा व्यक्तींचा शोध घेतला पाहिजे.

### 3.प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे :

संस्था कोणत्याही क्षेत्रातील असो, प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य हे अत्यावश्यक् आहे आणि ते वाढवण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे प्रशिक्षित मनुष्यबळ संस्थेजवळ नसेल, तर त्यासाठी मार्गदर्शक किंवा consultant शोधायला पाहिजेत. केवळ भाषणे देऊन, आवाहने करुन मोठे प्रकल्प उभे राहू शकत नाहीत.

### 4.दूरगामी आणि सूक्ष्म नियोजनाचा समन्वय साधून “चपळाई” दाखवणे :

कोणत्याही प्रकल्पाचे दूरगामी नियोजन जसे आवश्यक आहे, तसेच त्याची विभागणी करुन निकट भविष्यात (या आठवड्यात, आज) काय करणार आहोत याचेही सूक्ष्म नियोजन सुद्धा आवश्यक आहे. वर म्हटल्याप्रमाणे एक किंवा जास्तीत जास्त २ आठवड्यात प्रत्येक कार्य आणि प्रकल्पाचा आढावा घेतलाच पाहिजे. यात संस्थेच्या नेतृत्वाने सुद्धा रस दाखवला पाहिजे. विनाकारण प्राधान्य क्रम बदलणे, त्याच व्यक्तीला १० कामे सांगणे टाळले पाहिजे. नेत्यांनी शिस्तबद्ध कार्याचा परिपाठ घालून दिला, तर ती संस्था नक्की यशस्वी होईल.

### 5.शाश्वतते कडे लक्ष :

प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच त्याच्या लाभाची आणि परिणामांची शाश्वतता कशी टिकेल याचा विचार आणि नियोजन पाहिजे. प्रकल्प संपल्या वर तो कुणाकडे सुपूर्द करणार? त्याच्या देखभालीकडे आणि संचालनाकडे कोण लक्ष देणार? त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे का? प्रकल्पाचे दृश्य आणि अदृश्य परिणाम मोजण्याची काय यंत्रणा असेल? Third party audit करण्याची गरज आहे का? हे आधीपासून ठरवले तर घडू शकते. अन्यथा प्रकल्प पार पडल्यावर operation successful but patient dead (शस्त्रक्रिया यशस्वी होऊन पण पेशंट मेला) अशी अवस्था होईल.

## सेवावर्धिनी कशी मदत करू शकेल? :

गेल्या २७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेली "स्वयंसेवी संस्थांची विश्वासार्ह सहकारी" – सेवावर्धिनी या विषयात आपल्या संस्थेला कशी मदत करू शकेल? काही शक्यता पुढे दिल्या आहेत. या व्यतिरिक्त काही कल्पना असतील तर त्यावर निश्चित चर्चा करता येईल.

### 1.प्रकल्प रचना आणि प्रस्ताव लेखन :

समाजाशी नाळ जोडलेली असल्यामुळे स्वयंसेवी संस्था अनेकदा सामाजिक समस्यांविषयी जागरुक आणि संवेदनशील असतात. मात्र यावर उपाय काय करावा, यावर विचारमंथनासाठी मदत लागते. समस्येकडून समाधानाकडे जाण्यासाठी, ठोस आणि प्रभावी प्रकल्प कशा पद्धतीने मांडता येईल यात सेवावर्धिनी निश्चित मदत करु शकेल. अशा प्रकल्पांना निधी मिळवण्यासाठी पण प्रयत्न करता येईल.

### 2.संयुक्त प्रकल्प :

अनेक स्वयंसेवी संस्थांची एकत्र मोट बांधून संयुक्तपणे प्रकल्प राबवणे हा सेवावर्धिनीचा हातखंडा आहे. गेली अनेक वर्षे सुरु असलेला जलदूत प्रकल्प हे याचे उत्तम उदाहरण आहे. यात सेवावर्धिनी शीर्ष संस्था म्हणून program management कडे लक्ष देईल, तर सहभागी संस्था आपापल्या क्षेत्रात प्रकल्प राबवतील. पाणी, शेती, उपजीविका, महिला सबलीकरण, अशा अनेक विषयांवर कार्यरत संस्थांनी एकत्र येऊन जर प्रकल्प आखला तर त्याला निधी मिळणे, योग्य व्यवस्थापन करणे आणि तो यशस्वी करणे निश्चितच सोपे होईल. अशी कोणती कल्पना असेल तरी आपण सेवावर्धिनी शी संपर्क करु शकता.

### 3.प्रकल्प व्यवस्थापन आणि monitoring :

स्वयंसेवी संस्थांकडे जर प्रकल्प व्यवस्थापन, प्रगती अहवाल लिहिणे, प्रकल्पावर देखरेख ठेवणे यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ कदाचित नसू शकेल. या गोष्टी वेळ खाऊ आहेत आणि मूळ कार्यापेक्षा वेगळ्या आहेत. सेवावर्धिनी यात परामर्श, प्रणाली आणि तंत्र बसवून देणे आणि दैनंदिन व्यवस्थापनात सुद्धा सहाय्य करु शकते.

### 4.सामाजिक आणि आर्थिक परिणामांचे विश्लेषण (social and economic impact assessment) :

अनेक देणगीदार सामाजिक आणि आर्थिक परिणामांची मोजणी आणि त्यावर अहवाल लेखन याबाबत विशेष आग्रही असतात आणि ते योग्यही आहे. स्वयंसेवी संस्थांकडे अशा प्रकारचे कौशल्य आणि प्रशिक्षित मनुष्यबळ नसेल किंवा जर देणगीदाराने "third party" अर्थात तटस्थ संस्थेकडून असे मूल्यमापन करुन घेण्याचा आग्रह धरला असेल, तर सेवावर्धिनी यात मदत करु शकते. Project closure report लिहिण्यात सुद्धा सेवावर्धिनी सहाय्य करु शकते.

### 5.प्रकल्प व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे :

अनेक संस्थांकडे प्रकल्प व्यवस्थापन आणि त्यासाठी लागणाऱ्या यंत्रणा (tools and techniques) विकसित नसतात. कमीत कमी खर्चात प्रकल्पाचे documentation, monitoring करणाऱ्या पद्धती कशा विकसित करता येतील आणि माहितीचे योग्य व्यवस्थापन करुन त्याचा दूरगामी वाटचालीकरता वापर करणे यासाठी सुद्धा सेवावर्धिनी मार्गदर्शन करु शकते.

अशा स्वरुपाच्या कोणत्याही सेवे साठी सेवावर्धिनीच्या पुढील ईमेल पत्त्यांवर संपर्क साधावा:
contact@sevavardhini.org किंवा projects@sevavardhini.org.

## सारांश:

स्वयंसेवी असो व व्यावसायिक – अनेक संस्थांमध्ये प्रकल्प व्यवस्थापन या विषयाला पुरेसे महत्व दिले जात नाही. यातून मग प्रकल्पातून अपेक्षित असलेले परिणाम साधता येत नाहीत. विशेषतः स्वयंसेवी संस्थांकडे अशा तज्ञतेची नितांत गरज आहे.

प्रकल्प व्यवस्थापन हे एक विशिष्ट कौशल्य आहे. यात शास्त्र आणि कलागुणांचा संगम अभिप्रेत आहे. व्यक्ति, इतर संसाधने यांचा सुयोग्य वापर करुन ध्येयाची पुरती करणे यात प्रकल्प व्यवस्थापनाचे महत्व आहे. आधुनिक युगात बदलत्या परिस्थितीत कार्य करताना प्रकल्प व्यवस्थापनात चपळाई (agility) अत्यावश्यक आहे.

# ४. सकस परसबाग प्रकल्प

## आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबनाचा उपक्रम

सकस परसबाग प्रकल्प हा सेवावर्धिनीने रिको कंपनीच्या आर्थिक सहकार्याने सहा महिने यशस्वीरित्या राबवला. प्रकल्पाचा उद्देश भूमिहीन, शेतमजूर, ऊसतोड कामगार तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबांना परसबाग लागवडीद्वारे आरोग्यदायी जीवनशैली आणि आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवणे हा होता. या उपक्रमांतर्गत 10 प्रकारच्या भाज्यांची बियाणे तयार करण्यात आली, ज्यामध्ये दोडका, कारली, टोमॅटो, दुधी भोपळा, वाटाणा, गवार, मुळा, काकडी आणि पालक यांचा समावेश होता. रिको कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी श्रमदानाद्वारे बियाणे तयार केले, तर सेवावर्धिनीने त्यांचे वितरण प्रभावीपणे पार पाडले.

प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी सेवावर्धिनीने संस्थांच्या प्रतिनिधींना परसबाग लागवडीचे एक दिवसीय प्रशिक्षण दिले. हे प्रशिक्षण लाभार्थी कुटुंबांपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्था प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यक्षेत्रात जाऊन बियाणे वाटप केले. प्रकल्पाच्या योजनेनुसार, दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी आढावा बैठक घेतली जाई. या बैठकीत प्रकल्पात येणाऱ्या अडचणी, कामाची स्थिती आणि सुधारणा यावर चर्चा होई. त्यामुळे इतर प्रतिनिधींनाही मार्गदर्शन मिळाले. आरोग्यदृष्ट्या प्रकल्पाचे योगदान महत्त्वाचे होते. आरोग्य तपासणीसह सेंद्रिय खत वाटप हा प्रकल्पाचा अविभाज्य भाग होता. तसेच, प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात झाडे लावण्यावरही भर देण्यात आला. कडीपत्ता, पपई, शेवगा, आवळा आणि आंबा यांसारख्या झाडांची लागवड करण्यात आली, ज्यामुळे पर्यावरणपूरक वातावरण तयार झाले.

पळसखेल गावात सेवावर्धिनी शेती परिवार व ग्रामपंचायतीच्या सहकार्याने सेंद्रिय परसबाग उपक्रमाने आरोग्य सुधारण्याबरोबरच भाजीपाल्यावर होणाऱ्या खर्चात बचत करण्यास हातभार लावला. गावातील नाना नारायण सावंत आणि सुरेखा सावंत यांनी सेंद्रिय परसबाग फुलवण्याचा आदर्श इतरांसमोर ठेवला. त्यांनी कोणतेही रासायनिक खत किंवा फवारणी न करता परसबाग तयार करण्याचा सल्ला दिला, ज्यामुळे महाभयंकर आजारांपासून कुटुंबांची सुटका होऊ शकते. सकस परसबाग प्रकल्पाने लाभार्थी कुटुंबांना ताज्या व सेंद्रिय अन्नाचा पुरवठा करताना त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग दाखवला. या प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर आरोग्य व स्वावलंबनासाठी एक नवा आदर्श निर्माण झाला. "आरोग्यम् धनसंपदा" या तत्त्वावर आधारित हा प्रकल्प इतर क्षेत्रांसाठीही अनुकरणीय ठरला आहे.





# ८. सेवाव्रती

## ८.१ नारायणन कृष्णन : कुशल आचारी ते मानवसेवेचा प्रणेता



नारायणन कृष्णन, मदुराईचा एक कुशल आचारी , जो एका मोठ्या स्वप्नांसह आपली कारकिर्द घडवत होता. ताज हॉटेल्स, बेंगळुरुमध्ये एक प्रतिष्ठित स्वैपाकी म्हणून काम करताना, त्यांनी स्वित्झर्लंडमधील एक नामांकित नोकरीसाठी निवड होण्याचा मान मिळवला. मात्र, २००२ साली घडलेल्या एका हृदयद्रावक प्रसंगाने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. एका प्रवासादरम्यान, त्यांनी एका वृद्ध व्यक्तीला उपासमारीमुळे स्वतःच्या मलमूत्र खाताना  पाहिले. ही दुर्दैवी घटना पाहून नारायणन यांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांनी त्वरित जवळच्या हॉटेलमधून इडली विकत घेतली आणि त्या वृद्ध व्यक्तीला दिली. त्या व्यक्तीच्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी नारायणन यांच्या हृदयात बदल घडवला. त्या घटनेनंतर त्यांनी वैभवशाली कारकिर्दीचा त्याग केला आणि आपल्या जीवनाला मानवतेच्या सेवेसाठी समर्पित केले.

२००३ साली "अक्षया ट्रस्ट" संस्थेची स्थापना करुन नारायणन यांनी मदुराईतील बेघर, गरजू, आणि मानसिक आजारग्रस्त लोकांना अन्न पुरवण्यास सुरुवात केली. ही संस्था दररोज ४२८ लोकांना नाश्ता, जेवण आणि रात्रीचे अन्न पुरवते. मात्र, अन्नदान हीच त्यांच्या सेवाकार्यातील मर्यादा नव्हती. त्यांनी या लोकांच्या केसांचा भांग करणे, दाढी करणे आणि त्यांना स्वच्छता राखण्यास मदत केली, जेणेकरुन त्यांच्या आत्मसन्मानाला पुनरुज्जीवन मिळेल. नारायणन यांनी आपल्या कार्यासाठी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा केली नाही, पण त्यांच्या उपक्रमांमुळे ते माध्यमांमध्ये सतत चर्चेत राहिले. २०१० साली त्यांना सीएनएन हिरो पुरस्कारासाठी टॉप १० मध्ये स्थान मिळाले, आणि त्यांच्या कार्यावर आधारित "उस्ताद हॉटेल" या मल्याळम चित्रपटात त्यांच्या कार्याची झलक दाखवण्यात आली.

### मानवतेच्या सेवेत जीवनाचा खरा अर्थ

नारायणन यांनी अन्नदानाला केवळ भुकेसाठी दिलासा नव्हे, तर आत्मसन्मान निर्माण करण्याचे साधन मानले. गरजू लोकांना फक्त अन्नपुरवठा करून थांबण्याऐवजी, त्यांनी त्यांचा आत्मसन्मान वाढवण्यासाठी त्यांना स्वच्छतेची सेवा दिली. "खरा आनंद दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यात आहे," असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. त्यांनी समाजातील दुर्लक्षित घटकांना दिलेल्या सेवेमुळे मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

त्यांच्या संस्थेमुळे मदुराईतील हजारो गरजू लोकांना जीवनाचा नवीन अर्थ मिळाला आहे. त्यांनी समाजाला दाखवून दिले की वैयक्तिक स्वार्थ सोडून दिल्यास, आपण मानवतेच्या सेवेसाठी आपले जीवन अधिक अर्थपूर्ण बनवू शकतो. अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वामुळे आजही समाजातील अनेकजण त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आहेत. नारायणन कृष्णन हे एक उदाहरण आहेत की एका व्यक्तीच्या कृतींमुळे किती मोठा बदल घडवता येतो, आणि त्या बदलामुळे समाजाचे भवितव्यही उज्ज्वल होऊ शकते.

### मानवतेचा प्रवास आणि प्रेरणा

नारायणन यांच्या कृत्यांनी सामाजिक सेवा आणि परोपकाराच्या जगाला एक नवीन आयाम दिला आहे. ते कधीही प्रसिद्धीसाठी झगडले नाहीत, परंतु त्यांच्या कार्यानेच त्यांना जागतिक ओळख मिळवून दिली. सीएनएन हिरो पुरस्कार प्राप्त करताना त्यांच्या कार्याने जगभरात दाद मिळवली. "अक्षया ट्रस्ट" मधून त्यांनी अन्नदानाच्या माध्यमातून हजारो गरजू लोकांना आधार दिला. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही प्रचाराला प्राधान्य दिले नाही, परंतु त्यांच्या सेवाभावी उपक्रमांमुळे समाजावर त्यांचा गहिरा प्रभाव पडला.

नारायणन यांनी दाखवून दिले की, सेवाभाव ही केवळ कृती नसून ती जीवनाची साधना आहे. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन, आपण देखील आपल्या समाजासाठी काहीतरी योगदान देऊ शकतो. असे कार्य करणे म्हणजे केवळ गरजू लोकांना मदत करणे नाही, तर त्यांना आत्मसन्मान आणि स्वाभिमान मिळवून देणे आहे. नारायणन कृष्णन यांचे जीवन म्हणजे मानवतेच्या सेवेसाठी वाहून घेतलेल्या व्यक्तीचे प्रतीक आहे, जे आपल्या कृतींमुळे समाजाला सतत प्रेरणा देत राहते.

# ५.२ डॉक्टर अभिजित सोनावणे



**१५ ऑगस्ट !!!**

हीनुसती तारीख नव्हे, आपणा सर्व भारतीयांच्या मनावर सुवर्णाक्षराने कोरलेला हा अभिमानाचा दिवस!

याच तारखेला एकेवर्षी भारत स्वतंत्र झाला होता...आणि एकेवर्षी मी सुद्धा! भारत इंग्रजांच्या गुलामगिरीत होता आणि मी माझ्याच! सुरुवातीला इंटरनॅशनल कंपनीमध्ये मी महाराष्ट्र प्रमुख होतो. महिन्याचं उत्पन्न... 4-5 लाख! पण यांतही समाधानी नव्हतो! भरपूर पैसे कमावणे, वर...वर...वर जाणे...आणखी वरचे पद मिळवणे...! घर गाडी बंगला घेणे... आज महाराष्ट्र प्रमुख आहे, उद्या भारताचा प्रमुख होणे..., जमलंच तर परवा जगातील काही देशांचासुद्धा प्रमुख होणे...! जग जिंकायला निघालेला सिकंदर होतो मी! फरक इतकाच, तो सिकंदर घोड्यावर होता, आणि दिडशहाणा मी... गाढवावर! हे गाढव मीच होतो आणि गाढवावर बसलेला दिडशहाणाही मीच!

एके दिवशी, आयुष्याच्या वाटेत भेटलेल्या भीक मागणाऱ्या एका आजोबांनी या दिड शहाण्या सिकंदराची नशा उतरवली...! माणूस म्हणून जगण्याचे सूत्र सांगितलं...! ॲलोपॅथी, होमिओपॅथी, नॅचरपॅथी आणि इतर कुठल्याही पॅथीपेक्षा Sympathy आणि Empathy (अनुभुती आणि सह अनुभुती) या पॅथी वापरणं हे माणुस असल्याचं लक्षण असतं हे त्यांनी माझ्यावर ठसवलं...! वेद शिकण्यापेक्षा एखाद्याची वेदना समजून घेणं, हे वैद्य असल्याचं खरं लक्षण, हे त्यांनीच मनावर बिंबवलं! डोंगरावर चढणाऱ्या माणसाचे पाय ओढुन त्याला पाडण्यापेक्षा, जमिनीवर पडलेल्या एखाद्या निराधाराचे हात ओढुन त्याला उभं करणं यातच खरा पुरुषार्थ असतो... पुरुषार्थाची व्याख्या नव्यानं त्यांनी मला सांगितली...!

ते खरंतर भिक्षेकरी नव्हते, ते उच्चशिक्षित होते. या गोड व्यक्तीमधुन मधुर रस चावुन चावुन ओरबाडुन घेवुन उसाच्या चोयटीसारखं त्यांच्या भाऊबंदांनी त्यांना रस्त्यात फेकलं होतं! बाबांनी सांगितलेल्या त्या बाबी त्यावेळी कानात आल्या होत्या... पण मनात नाही...! मी धावत होतो शर्यतीत...! शर्यतीची नशा होती...!! पैसे... पद... प्रतिष्ठा... मी एकेक गड जिंकत चाललो होतो... पण मन भरत नव्हतं! हे सगळं कमावून झाल्यावर एके दिवशी भेटायला गेलो त्यांना... आणि समजलं, की मला मुलगा समजणारे "ते" बाबा बेवारस म्हणुन रस्त्यावर "मेले"...! हो... स्वर्गवासी होणं, कैलासवासी होणं आणि देवाघरी जाणं ही प्रतिष्ठितांची मक्तेदारी ...! "मेला" हा शब्द प्रतिष्ठा नसणारांसाठीच ठेवणीत ठेवलाय ! ते मरुन गेले... आणि जातांना भिका-यांच्या डॉक्टरला जन्माला घालुन गेले... ! मी त्यांचा मुलगा म्हणुन जिवंत असुनही ते बेवारस म्हणुन गेले...!

ज्यांनी त्यांना रस काढून हाकलुन दिलं होत, त्यां लोकांत आणि माझ्यात फरक काय? मी अंतर्मुख झालो !पुर्वी दिलेले त्यांचे विचार आता कानातुन मनात यायला लागले... Heart पासुन हृदयात यायला लागले...! त्यांच्या विचारांचं मनन चिंतन व्हायला लागलं, माझ्याही नकळत ....! आणि या दिडशहाण्या सिकंदराची नशा पुर्ण उतरली! जग जिंकण्यापेक्षा, जगातला "माणुस" जिंकावा किंवा माणुसकीचं "जग" जिंकावं...! उतरलेल्या नशेनं हेच शीकवलं! आणि, हा दिडशहाणा सिकंदर त्या गाढवावरुन उतरला आणि 14 ऑगस्टला त्याने या इंटरनॅशनल संस्थेचा राजीनामा दिला. आणि 15 ऑगस्ट 2015 ला भिकाऱ्यांचा डॉक्टर म्हणून तो रस्त्यावर आला...! स्वतःच स्वतःवर लादलेल्या गुलामगिरीतुन तो मुक्त झाला...! मीच आखुन घेतलेल्या पद-पैसा-प्रतिष्ठा या शर्यतीतुन मी स्वतंत्र झालो 15 ऑगस्ट 2015 ला.... म्हणुन हा माझ्या दृष्टीने माझाही स्वातंत्र्य दिन...!

या अगोदर असलेले सर्व दिवस माझ्यासाठी पैसा असुनही "दीन" होते... 15 ऑगस्ट 2015 नंतर ते पैसा नसुनही "दिन" झाले! जवळचे लोक म्हणतात... हरलास तु आभ्या! नाही...! शर्यतीत किती धावायचं? कसं धावायचं? यापेक्षा कुठं थांबायचं...? हे कळणं जास्त महत्वाचं! योग्य ठिकाणी हरावंच लागतं...! कुठं आणि कधी हरायचं हे ज्याला कळतं तो कायम जिंकतो! कारण शर्यतीत धावणाराला हे कधीच कळत नाही... की शर्यत लावणारा स्वतः कधीच पळत नाही! एखाद्याला आपल्या पुढं जाताना बघुनही आपल्याला आनंद झाला तर समजावं... आपण आत्ता खरे "मोठे" झालो...बाकी वय बीय सारं झुठ!! वय फक्त केस पांढरे करण्यापुरतं येतं... जेव्हा ते मन शुभ्र करेल... तेव्हा त्याची किंमत...! नाहीतर नुसताच तो गणितातला एक फालतु आकडा!! दरवेळी मी सर्वांना दर महिन्याचा लेखा-जोखा सादर करत असतो.

15 ऑगस्ट 2015 ला मी इंटरनॅशनल संस्थेमधला जॉब सोडला होता, अंगावरची झूल काढली होती. मी स्वतः मुक्त झालो होतो यादिवशी! आज बरोबर या गोष्टीला सहा वर्षे पूर्ण झाली, म्हणून साधारण सहा वर्षांचा लेखाजोखा आज अगदी थोडक्यात सादर करत आहे... वाटेत भेटलेल्या भीक मागणा-या आजोबांना आदरांजली वहायची म्हणुन भीक मागणा-या समुहासाठी मी काम करायचं ठरवलं. ते तर गेले... पण त्यांच्यासारखे अजुन खुप आहेत... त्यांतल्या एखाद्याला हात देवु, या विचारांतुन...! या समुहासाठी काहीतरी काम करायचं म्हणून रस्त्यावर फिरायला सुरुवात केली. सुरुवातीला मला सुद्धा कशाचीही माहिती नव्हती. मी भीक मागणारांमध्ये मिसळायचा प्रयत्न करु लागलो. सुरुवातीला लाज वाटायची...! डोक्यावर कॅप, डोळ्यावर गॉगल आणि चेहऱ्यावर रुमाल बांधून मी त्यांच्यात मिक्स होण्याचा प्रयत्न करायचो. मुखवटा लावला होता...! पण मला भीक मागणा-या लोकांनी त्यांच्यात सुरुवातीला येवू दिलं नाही.

त्यांना वाटायचं, हा पोलिसांचा खबऱ्या असेल आणि आपल्याला पकडून देईल पोलिसांत, भीक मागतो म्हणुन ... ! (कारण भीक मागणं हा गुन्हा आहे कायद्यानं)किंवा कदाचित आपल्या बरोबर धोका करुन, आपली जमा झालेली भीक घेऊन कुठेतरी पळून जाईल हा भामटा ...! डॉक्टर आहे हा xxx, गोड बोलुन आपल्या किडन्या काढून विकेल, रक्त विकेल, अजुन काही काही पार्ट काढुन हा बाजारात विकेल.... यांत आपण मरुन जाऊ... या डॉक्टरचा भरवसा काय? किंवा आपल्या पोरीबाळींना कुठेतरी फसवेल, फसवुन "धंद्याला" लावेल. (मी अगोदर शरीर विक्रय करणा-या मुलींचं पुनर्वसन करणा-या एका संस्थेत बुधवार पेठेत काम करायचो... शरीर विक्रय करणा-या या ताईंमध्ये माझी उठबस होती, काही लोकांना वाटायचं, हा माझा "धंदा" आहे, आणि मी मधला दलाल! भीक मागणाऱ्या समुहामध्ये हाच गैरसमज पसरला होता)या सर्व गैरसमजापोटी, या लोकांनी मला त्यांच्यात येण्यास पूर्णपणे बंदी घातली, धमक्या दिल्या, शिव्याही दिल्या.

खूप वेळा अंगावर धावुन सुद्धा आले, काही लोक तर चप्पल दाखवायचे किंवा अंगावर थुंकायचे...! मी त्यांच्यात येवुच नये, यासाठी ते हरत-हेनं मला विरोध करायचे! मी पूर्णपणे निराश झालो होतो. या लोकांसाठी मी माझी खुर्ची आणि प्रतिष्ठा पणाला लावली होती. माझ्या चार ते पाच लाखांच्या उत्पन्नावर पाणी सोडलं होतं...मी पूर्णपणे निराश झालो! धोबी का कुत्ता ना घर का ना घाट का अशी अवस्था झाली.कुत्रं तरी बरं, त्याला कुणीतरी हाड् म्हणुन का होईना, तुकडा तरी टाकतं... मला ते ही मिळेना! एकीकडे काहीही कमवत नव्हतो आणि ज्यांच्यासाठी काम करायचं म्हणुन नोकरी सोडली, ते लोक मला भाव देत नव्हते, नव्हे ते मलाच हाकलून लावायचे, जसा काही मीच भिकारी होतो...! या काळात भिक्षेक-यांपेक्षा वाईट अवस्था झाली माझी! मी खरोखरचा बेरोजगार, बेनाम झालो होतो... 14 ऑगस्ट पुर्वी लोक अपॉइंटमेंट घेवुन आदरानं भेटायला यायचे... 15 ऑगस्ट नंतर भिक्षेकरी पण मला हाकलुन द्यायचे...

माझ्यावर थुंकायचे! किती विरोधाभास! लाखोंचा पगार थांबल्यामुळे, माझं घर डबघाईला आलं... कालचा साहेब, आज भिकारी झाला! एका रात्रीत रावाचा रंक होतो... आणि रंकाचा रावही होवु शकतो... ही म्हण मला माहीत होती...! मी रावाचा रंक झालो होतो, त्या काळात, एका भिका-यांचं उत्पन्न माझ्यापेक्षा जास्त होतं ...! अशा परिस्थितीत, डॉक्टर मनीषा धावुन आली. अर्धांगिनी असण्याचं कर्तव्य तीनं निभावलं! तिने आर्थिक स्थिती सावरण्याचा प्रयत्न केला... आई-वडील डॉक्टर पीडी सोनवणे आणि सौ भारती सोनवणे यांनी मानसिक आधार दिला. माझा भाऊ अमित सोनवणे आणि बहीण दिप्ती सोनवणे यांनी चोहोबाजुंनी आधार दिला...!पण तरीही मी पुर्ण ढासळलो होतो...! आर्थिक आणि मानसिक! यांतुनही मी रस्त्यांवर फिरायचो भिक्षेक-यांत.... आणि मला ओळखणारे लोक मात्र माझी खिल्ली उडवायचे... काय हो, महाराष्ट्र प्रमुख, आज रस्त्यावर कसे काय तुम्ही...? खी.खी.. खी... हसत लोक टोमणा मारायचे...! एसी हाफीसात बसणारे तुमी... आज गटाराजवळ बसले, वास घेत गटाराचा ... आरारारा.... वाईट वाटतं बुवा तुमचं... खी..खी... खी...! काय वो सर... आज भिका-यांत बसले तुम्ही...? काय पाळी आली राव तुमच्यावर... खी..खी... खी...! कशाचा सर रे तो ...? खी..खी... खी...हि, खी... खी... खी... मी आयुष्यात कधीही विसरु शकत नाही !!!

मात्र या खी... खी... खी...ने इरादे अजुन मजबुत केले! मित्र म्हणायचे, काय बे, आब्या उतरली का रे मस्ती तुजी? साल्या, लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत, तु मोटा तीस मार खान निघालास होय ? स्वतःला शाना समजतो का रे? एवढी मोठी नोकरी सोडलीस? मर साल्या आता, नोकरी सोडून जो शहाणपणा केला आहेस भोग त्याची फळं... त्याच लायकीचा आहेस xxxx तु... ! ही xxxx शिवी मनात रुतुन बसलीय, काट्यासारखी ... !हि शिवी मी मनात जपुन ठेवलीय... फ्रेम करुन आणि या फ्रेमवर मी खुप प्रेम करतो ! मी पुर्ण डिप्रेस झालो होतो, डिप्रेस करणारे माझेच होते...! बुडण्याचं दुःखं नसतं... मरण्याचंही नसतं, पोहता येत नाही याचंही दुःखं मुळीच नसतं... पाण्यात ढकलणारा जेव्हा आपलाच असतो ते खरं दुःखं! मी या दुःखात बुडुन गेलो! तरीही निर्लज्जासारखं, मला हाकलून देणाऱ्या भिक्षेक-यांमध्ये मी रोज रोज जायचो. नाही नाही ते त्यांचं ऐकून घ्यायचो, त्यांच्या पोटभर शिव्या खायचो, रात्री झोप लागायची नाही, कारण शिव्याशाप खावुनही शेवटी पोट रिकामंच असायचं....! हे असं एक नाही, दोन नाही, तीन नाही, तर तब्बल 31 महिने चाललं...! एकेदिवशी, अंगावर अक्षरशः किडे पडलेले, फुटपाथवर 24 वर्षे पडलेले एक आजोबा होते, त्यांच्या पाच फुटांवर सुद्धा कुणीही जात नसे.

त्यांचं सर्व ड्रेसिंग करुन, त्यांना स्वच्छ करुन "आपलं घर" च्या विजय फळणीकर सरांकडे एका वृद्धाश्रमात ठेवलं. या बाबांना पूर्ण माणसात आणलं....! ते गेले, तेव्हा त्यांचा मुलगा म्हणुन त्यांचे अंत्यसंस्कारही केले....! भीक मागणाऱ्या समूहाने हे सर्व पाहिलं... ! यानंतरही या भिक्षेकर्यांनी मी भिक्षेक-यांसाठी केलेल्या अनंत गोष्टी दुरुन दुरुन पाहिल्या...! आणि हळूहळू माझ्याबद्दलचं त्यांचं मत बदलत गेलं...! यार ... हे सालं आपल्यातलंच हाय... ह्यो आपल्यासाटीच कायतरी करतोय ...! इतकी साधी गोष्ट त्यांना कळायला 31 महिने गेले होते... आणि हे त्यांना कळेपर्यंत मी पण ख-या अर्थानं भिकारी झालो होतो...! हळूहळू मला त्यांनी आपल्या मध्ये ऊठ-बस करण्याची मनापासुन परवानगी दिली. ऑगस्ट 2015 ते मार्च 2018 अशी अडीच वर्षे मी फक्त त्यांच्यात मिक्स होण्यासाठी झुंजत होतो...! हा काळ माझ्यासाठी अत्यंत वाईट होता... खडतर होता...! त्यांच्याशी नातं निर्माण करण्यासाठी आणि विश्वास निर्माण करण्यासाठी मला अडीच वर्षे झुंज द्यावी लागली. या काळात त्यांच्याशी नातं निर्माण करण्यासाठी मी त्यांच्याबरोबर सतत बसत असे, उठत असे, जेवत असे, खात असे...!

भिक्षेक-यांनी माझी अशी अडीच वर्षे कठोर परीक्षा पाहून मला त्यांच्यातला एक होण्याची संधी दिली...! भिकारी होणंही इतकं सोपं नसतं तर ! त्यासाठी पण परिक्षा असतात... MPSC आणि UPSC पेक्षा अवघड! यासाठीही कठोर परिश्रम असतात तर !!! साधारण एप्रिल 2018 पासून माझं डॉक्टर फॉर बेगर्स म्हणून खऱ्या अर्थाने काम सुरु झालं. डॉक्टर होण्यासाठी, कलेक्टर होण्यासाठी किंवा एखादा ऑफिसर होण्यासाठी आधी तीन ते चार - पाच वर्षे कठोर अभ्यास करावा लागतो आणि त्यानंतरच पदवी हातात मिळते. मी सुद्धा अडीच तीन वर्षे कठोर परिश्रम घेऊन भिकाऱ्यांचा डॉक्टर ही पदवी मिळवली होती, उत्तम मार्कांनी मी पास झालो होतो ! होय... मी भिका-यांचा डॉक्टर झालो होतो... ! ही पदवी मात्र एकदा हातात पडल्यानंतर, मी मागं वळून पाहिलंच नाही. सांगायला अभिमान वाटतो की, आज या भिक्षेकरी कुटुंबाचा मी कुटुंबप्रमुख आहे. मला विचारल्याशिवाय आज कोणतीही गोष्ट आज यांच्यात होत नाही...यांच्यामध्ये सोयरीक जुळताना सुद्धा आज माझा शब्द शेवटचा धरला जातो.यांच्या पोरांची नावं मला विचारुन ठेवली जातात...!पोरी कुठलीही गोष्ट पहिल्यांदा आपल्या आईला सांगतात...पण, आज भिक्षेकरी पोरी मला नी मनिषाला त्यांच्या आईअगोदर आम्हाला सारं सांगतात...!

आमी आईबाप होवुन गेलो अशा पोरींचे... बिन बाळंतपणाची, मनिषा... आई झाली त्यांची! लगीन झालेली बाई, सर्व गोष्टीं आपल्या नव-याला, नायतर आपल्या बापाला सांगते... पोरी मलाच बाप समजाया लागल्या.... आयशप्पत... मी पन्नास वर्षाच्या विवाहित पोरीचा पण बाप झालो...! बापापेक्षा पोरगी वयानं मोठी... पण म्हटलं ना? वय हा फक्त एक आकडा! नातं महत्वाचं... आणि नात्याला वय नसतं !भिक्षेक-यांच्या शंभराहुन अधिक पोरांची नावं आज "अभिजीत" आहेत...पन्नासाहुन अधिक पोरींची नाव आज "मनिषा" आहेत...! कोणताही पुरस्कार फिका वाटतो मला यापुढं! आज सहा वर्षानंतर माझं भिक्षेक-यांचं कुटुंब 1100 इतक्या लोकांचं आहे. यात मला 200 ते 300 इतके आईबाप आहेत, तितकेच आजी-आजोबा आहेत आणि या वयामध्ये मला आणि मनिषाला 200 ते 300 पोरं सुद्धा आहेत ! आज जगातला सर्वात श्रीमंत व्यक्ती मी असेन असं मला वाटतं! या सर्वांशी मानसिक नाती जुळवता जुळवता 1100 भिक्षेक-यांना वैद्यकीय सुविधा देत आहोत. यांच्या, म्हणजेच आमच्या 52 पोराबाळांचे शिक्षण करत आहोत, याहुन आनंद कोणता?

डोळ्यांना दिसत नसल्यामुळे या भिक्षेकरी आजीआजोबांचे रस्त्यांत अपघात होतात, यात त्यांचे जीव जातात, हातपाय मोडतात.... ते टाळावे म्हणून अशा 950 लोकांचे डोळ्यांचे ऑपरेशन आपण करुन दिले आहेत आणि आता अपघाताचे प्रमाण सुद्धा कमी झाले आहे. रस्त्यावर बेवारस म्हणून कित्येक वर्षे खितपत पडलेल्या 22 आजी आणि आजोबांना महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या वृद्धाश्रमांमध्ये निवारा मिळवून दिला आहे. ते तिथे माझे आई बाप - आजी आजोबा म्हणूनच राहतात. स्वतःचं नाव आणि आडनाव सुद्धा ते विसरुन गेले आहेत... आता ते आडनाव सुद्धा "सोनवणे" म्हणुन लावतात! सोनवणे आडनावाला याआधी इतका सन्मान कधी मिळाला नव्हता...! पण, आईबापाला आधार दिला म्हणुन स्वतःला सुदैवी समजु की आईबापाला वृद्धाश्रमात ठेवावं लागतंय म्हणुन स्वतःला दुर्दैवी समजु..? या विचारांत आजही झोप लागत नाही मला! हा भीक मागणारा समुह जर कष्टकरी झाला तरच समाज त्याला गावकरी म्हणून स्वीकारेल याची मला जाणिव झाली. भीक मागणारांना गावकरी बनवायचं हे ध्येय ठरवुन" भिक्षेकरी ते कष्टकरी आणि कष्टकरी ते गावकरी" हि आमच्या कामाची टॅगलाईन मी ठरवली!

माझ्या शब्दांना भिक्षेकरी गटामध्ये थोडी किंमत आहे हे कळल्यानंतर मी त्यांना भीक मागणं सोडायला प्रवृत्त केलं, आणि त्यांना त्यांच्या कुवतीप्रमाणे वेगवेगळे व्यवसाय सुचवण्यात सुरुवात केली. याला यश येऊन 105 कुटुंबांनी भीक मागणं सोडलं आहे आणि हि कुटुंबं आज सन्मानाने जगत आहेत. रस्त्यावर चालणाऱ्या या कामांमध्ये मला अनेक व्यक्ती आणि संस्था यांची मदत झाली. पब्लिक चॅरिटी कमिशन ऑफिस, इन्कम टॅक्स ऑफिस, महिला व बालकल्याण, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, लेले हॉस्पिटल, पोलीस डिपार्टमेंट, पुण्यातील नामांकीत संस्था आणि व्यक्ती! संस्थेतील बड्या अधिका-यांची नुसती भेट घेणं, "मुश्कील ही नही नामुमकीन है"... तरीही ही मंडळी मला लहान पोरगं समजुन मला वेळ देतात... माझं ऐकुन घेतात... मदत करतात. मोठ्ठ्या खुर्चीतली ही सर्व माणसं माझ्यासाठी मुद्दामहुन छोटी होतात! लहान बाळाबरोबर खेळतांना आपणही लहान होतो तसंच...!!! कसे ऋण फेडावे यांचे? याच प्रवासात आपल्यासारखे सहृद भेटले आणि आपण माझ्यावर पूर्णपणे विश्वास टाकून संस्थेला देणगी देण्यासाठी सुरुवात केली.

मी सुद्धा या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी करत असलेल्या कामाचा सर्व लेखा-जोखा दर महिन्याला सर्व सहृदांना पाठवत असतो. मी करत असलेल्या कामाबद्दल सर्व बाबी प्रांजळपणे कळवतो आणि सल्ला सुद्धा घेतो. यातून कामांमध्ये एक पारदर्शीपणा राहण्यासाठी खूप मदत झाली, शिवाय हे काम फक्त डॉक्टरच नाही तर आपलंही आहे हे समाजाला वाटायला लागलं! न फेडता येणा-या आपल्या ऋणांत आहे मी, माझा साष्टांग नमस्कार स्विकारावा! हे सर्व करत असताना मी भीक मागणा-या व्यक्तींच्या हृदयापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करु लागलो. त्यांची सुखदुःख समजून घेण्याचा प्रयत्न करु लागलो. आणि यातूनच जन्म झाला माझ्या ब्लॉगचा...! भारतात आणि भारताबाहेर हे ब्लॉग पोहोचू लागले. शाबासकी मिळू लागली आणि या अशा शाबासकी ने माझा हुरुप आणखी वाढला. काही लोक माझे ब्लॉग स्वतःचे म्हणून त्यांच्या नावावर कॉपी करुन पुढे पाठवतात. या गोष्टीचा मला मुळीच खेद नाही.... पण खेद याचा वाटतो की ते फक्त माझे ब्लॉग कॉपी करतात माझं काम नाही...! ब्लॉग कॉपी करण्याबरोबरच माझं काम जेव्हा ते कॉपी करतील तो दिवस माझ्या आनंदाचा! जवळचे लोक मला नेहमी विचारतात आभ्या, इतकं सगळं करुन तू काय कमावलंस..? मी खूप काही कमावलंय... आदरणीय सिंधुताई सपकाळ उर्फ माई यांनी मला मुलगा म्हणून मला स्वीकारलं, हे पुत्रत्व मी कमावलं! आदरणीय राणीताई बंग यांचा हात डोक्यावर मायेने पडला, तो मायेचा हात मी कमावला...!

आदरणीय डॉक्टर प्रकाश आमटे यांनी हूरुप देऊन सामर्थ्य दिले, हात धरुन शक्ती दिली, ती शक्ती मी कमावली...! शास्त्रज्ञ आदरणीय रघुनाथ माशेलकर यांनी पोटाशी धरुन उच्चारलेले I am proud of you my child हे शब्द, या शब्दांतुन child असणं मी कमावलं ! सुपर कॉम्प्युटर चे जनक श्री विजय भटकर म्हणाले होते, 'मी कॉम्प्युटर बनवला, पण तू माणूस घडवतो आहेस... ' मी हा "विजय" कमावला...!विश्वास नांगरे पाटील सर म्हणाले होते, भारीच करतोय तु राव कायतरी, आयुष्यात कधी अडचण आली तर मला फोन कर... हा घे माझा पर्सनल नंबर... हा "विश्वास" मी कमावला... !तुमच्यासारखे जवळचे लोक मी कमावले... ! जन्माला येताना माकड म्हणूनच जन्माला आलो... परंतु भीक मागणाऱ्या लोकांमध्ये राहून मी हळूहळू माणूस बनत गेलो... माणुस म्हणुन चेहरा मी कमावला... ! ते खरं रे आभ्या परंतु या बदल्यात तु गमावलंस किती... ? अरे हो, खरंच मी खूप काही गमावलं सुद्धा आहे... ह्या कामानं मी... मी पणा गमावला !

आपण कुणीतरी आहोत याचा अहंकार मी गमावला! केवळ स्वतःपुरतं जगायचं हा स्वार्थ मी याच कामा मध्ये गमावला! स्वतःच्या चेहऱ्यावर लावलेला खोटा खोटा मुखवटा मी गमावला! सर आणि साहेब यांची खोटी प्रतिष्ठा गमावली... ! पोरा - लेकरा - बाळा या उबदार शब्दात मी विसावलोय आता... मला खुर्चीपेक्षा... उकीरडा आवडायला लागलाय आता! मला उष्टं... खरकटं... शिळं ... आणि नासकं जेवण आवडतं हल्ली आणि आवडत राहील, तोपर्यंत.... जोपर्यंत माज्या भिकारी आईबापाला सन्मान मिळत नाही तोपर्यंत! माझा भिक्षेकरी जोपर्यंत कष्टकरी होत नाही तोपर्यंत... तो गांवकरी होणार नाही तोपर्यंत..! माझ्या आईबापाला जेव्हा मी भिक्षेकरी म्हणुन स्वतंत्र करेन तोच माझा स्वातंत्र्य दिन असेल...! मी तर सारा लेखाजोखा मांडलाय... आता अजुन कमवायचं राहिलं काय...? आणि गमवायचं राहिलं काय...? माय बापहो... तुम्हीच निवाडा करा...!

जयहिंद !!!


**डॉ. अभिजीत सोनवणे**
**डॉक्टर फॉर बेगर्स**
**सोहम ट्रस्ट, पुणे**
**9822267357**
**abhisoham17@gmail.com**
**www.sohamtrust.com**
**Facebook : SOHAM TRUST**

# ६. स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन आणि निधी संकलनाचे महत्त्व

स्वयंसेवी संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनामध्ये निधी संकलन, निधीचा विनियोग, हिशोब लेखन, लेखा परीक्षण, गुंतवणूक धोरण, विविध कायदेशीर तरतुदी हे महत्त्वाचे विभाग येतात. निधी संकलन हा महत्त्वाच्या विभागाचा काटेकोरपणे विचार होत नाही व संस्था आर्थिक दृष्ट्या अडचणीत येऊ शकते. निधिसंकलनाचा विचार आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच करायला हवा. याच साठी पुढील वर्षाचे अंदाजपत्रक (बजेट) फेब्रुवारी महिना अखेरीस धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे दाखल करणे अपेक्षित व अनिवार्य असते. बऱ्याच संस्था अंदाजपत्रक धर्मादाय आयुक्तालयात सादर करताना आढळत नाहीत.

अंदाजपत्रकात पुढील वर्षातील नियोजित कामे व त्याचा अपेक्षित खर्च याचा विचार करावा लागतो. यातून वर्षासाठी किती निधी लागणार आहे आणि कशासाठी लागणार आहे याचा पूर्ण तपशील लक्षात येतो. उदाहरणार्थ दैनंदिन व्यवहार खर्च, प्रकल्पासाठी लागणारा खर्च (मनुष्यबळ व इतर), पायाभूत सुविधांसाठी (Infrastructure Facilities) येणारा खर्च, नवीन मालमत्ता (Assets) वाहन, फर्निचर, संगणक, पुस्तक, साठी लागणारा निधी या सर्व गोष्टी विचारात घेऊन बजेट तयार करणे आवश्यक असते.

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन – कार्यवाह

श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर – प्रकल्प व्यवस्थापक

श्री. आमोद काटीकर – प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी